स. ग्रं. सं. ठाणे
विषय [illegible]
सं. नं. २१८



# आणि

प्रो. ना. सी. फडके

REFBK 0010802
REFBK-0010802

नों. क्र. २९०६०
३०/११/५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम २९०६० वि: ...
क्रमांक ........................ नोंः दिः ३०/११/५८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २९०४० वि:
क्रमांक २९८ नों: दि:

# स्मृती आणि संचार

प्रो. ना. सी. फडके एम्. ए.




मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १०८०९

REFBK-0010802

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २.

प्रकाशक :
गो. रा. पाटणकर
कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस,
६२६ शनिवार पेठ, पुणें २.

* * *

चित्रकार : व्ही. एस्. पाथरकर

* * *

मुद्रक :
सी. एस्. लाटकर,
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस,
२५२/५ अ, नारायण पेठ, पुणें २.

# स्मृती आणि संचार

* * *

# : अनुक्रम :


| | | | पृष्ठें |
|---|---|---|---|
| १. | पुलाखालचं पाणी | ...... | १ ते ५७ |
| २. | ब्रह्मदेशांत मी काय पाहिले ? | ...... | ५८ ते ११८ |
| ३. | कथाकलीच्या माहेरघरी | ...... | ११९ ते १४४ |


* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रमांक 29040 वि: [illegible]
क्रमांक 296 नों दि: 30/7/75

परक्या माणसांपुढे ओढून घेतलेला बुरखा तीं माणसं उठून गेलीं की पडदानशीन स्त्रीनं तोंडावरून दूर करावा त्याप्रमाणे आभाळानं पावसाळ्यांत तोंडावरून घेतलेला ढगांचा बुरखा आज दूर टाकला होता. किती तरी दिवसांनी चांदण्या रात्रीची शोभा पाहावयास मिळत होती. वाऱ्यांतला वेग आणि ओलसरपणाहि नाहीसा झाला होता. दासीच्या हातांत हालणाऱ्या पंख्याचा शीतल, मृदु वारा यावा त्याप्रमाणे मंद झुळूक वाहत होती. नदीचा पूर आता ओसरल्यामुळे पाण्याची धीरगंभीर खळबळ ऐकू येत नव्हती. पावसाळ्यांत नदीतीरावरून येणारे ओलसर दर्प नाहीसे झाले होते. वर्षाऋतूंत न्हालेल्या झाडांच्या आणि वेलींच्या अंगाचे वास दुरून कुठून तरी येत होते. लकडीपुलावरून रेंगाळत्या पावलांनी चालता चालता मी थांबलों, आणि खाली वाकून पाहिलं. खालच्या पाण्याचा रंग चांदण्यामुळे दुधट झाला होता, आणि चंद्राचं प्रतिबिंब स्थिर दिसण्याऐवजी पाण्याच्या संथ गतीमुळे हेलावून एखाद्या वाकड्या तिकड्या रेघेसारखं दिसत होतं.

ज्या ठिकाणचं पाणी आता ओसरून गेलं होतं, त्या ठिकाणीं नव्या कमानींच्या बांधकामासाठीं आणून टाकलेल्या साहित्याचे ढीगच्या ढीग दिसत होते. एक-दोन छोट्या झोपड्या नजरेस पडत होत्या. तांबड्या कंदीलांचा प्रकाश दिसत होता. माझ्या पाठीमागच्या बाजूनं रात्रीच्या या शांत प्रहरींदेखील वाहनांची आणि माणसांची थोडीशी रहदारी चालू होती व तिचे आवाज माझ्या कानावर येत होते.

मी तसाच वाकून नदीच्या पाण्याकडे पाहत राहिलों. समोर दूरवर नजर टाकली तों दोन्ही बाजूंच्या किती तरी उंच उंच इमारतींच्या खिडक्या प्रकाशानं उजळलेल्या दिसल्या. इंद्रधनुष्याची कमान क्षितिज-रेषेपासून चढलेली दिसावी त्याप्रमाणे ठिकठिकाणीं प्रकाशाचे झोत वर आलेले दिसले. शहरांतल्या थिएटरांच्या त्या जागा असाव्यात. खूप अंतरावर झगझगीत दिव्यांच्या दोन समांतर रांगा नदीवरून आडव्या गेलेल्या दिसत होत्या. त्यापलीकडे देखील

किती तरी दिव्यांचे पुंजके चांदण्यात तरंगत होते. पुणें शहराचा विस्तार पसरत पसरत आता किती तरी दूरवर जाऊन पोंचला होता. माझ्या मागे, पुढे, उजव्या डाव्या बाजूंस जिकडे तिकडे शहर होतं. चाळीस वर्षांपूर्वी ज्या शहरांत मी हिंडलों फिरलों तें काळाच्या उदरांत जणूं गडप झालं होतं. पूर्वीच्या त्या छोट्याशा पुण्याच्या खाणाखुणादेखील किती थोड्या शिल्लक राहिल्या होत्या. पुलावर थांबून दूर नजर लावून पाहतां पाहतां माझ्या मनांत आलं, माझ्या आठवणी-तलं तें शहर कुठें गेलं? या पुलाखालचं पाणी असं वहात वहात दूर जातं, अदृश्य होतं,तसंच तें जुनं पुणं गेलं काय? या शहराचं हें नवं प्रचंड स्वरूप मला आवडत नाही असं नव्हे, परंतु माझ्या जीवनाशीं अधिक निगडित असलेलं त्याचं जुनं स्वरूप मला अधिक प्रिय आहे. तें माझ्या आठवणींतून जाणं शक्य नाही. त्याच्या आठवणी नव्या पिढीला सांगाव्या...

ज्या लकडी पुलावर मी या घटकेला उभा आहे, त्याच्या अरुंद रस्त्यावरची रहदारी पूर्वी—मी विद्यार्थी होतों तेव्हां—रात्रीच्या पहिल्या दुसऱ्या प्रहरापर्यन्तच चालू असायची, नंतर एखाद्या लहानशा खेडवळ नदीचं पाणी आटावं त्या-प्रमाणें ती रहदारी बंद होत असे. शहराचा आणि उत्तरेकडच्या या तुरळक वस्तीच्या भागाचा संबंध पार तुटून जात असे. शहरांतून फर्ग्युसन कॉलेजांत जाणारे आम्ही विद्यार्थी सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास या पुला-वरून जात असूं तेव्हांच काय ती पुलाच्या रस्त्यावर मोठी वर्दळ दिसायची. आम्ही आमचे क्रिकेट, फुटबॉल वगैरे खेळ आटोपून दिवेलागणीनंतर घरीं परतलों कीं त्या वेळेसच पुलावर शुकशुकाट झालेला असायचा. आज कॉले-जांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांहून आम्ही किती तरी निराळे होतों. टिळक, आगरकर यांच्या पिढीतल्या अंगरखे-पागोटीं घालणाऱ्या डेक्कन कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांहून आम्ही जितके वेगळे होतों,तितकेच आजच्या विद्यार्थ्यांहूनहि आम्ही वेगळे होतों. आमचे पोषाख, आमच्या चालीरीती, आमचे विचार, प्रतिष्ठेच्या कल्पना, विचार करमणुकीची साधनें—सगळ्याच गोष्टी निराळ्या होत्या.

आमच्यापैकीं फार तर पांचपंचवीस जण सायकलवरून कॉलेजांत जाणारे असतील. बाकीचे आम्ही सर्वजण पायींच चालत जात असूं.बूट, पॅंट घालणारा एकहि विद्यार्थी आमच्यांत नसे. टिळक—आगरकरांच्या वेळचीं विद्यार्थ्यांच्या डोक्यावरचीं पागोटीं त्या वेळेस अस्तंगत झालेलीं होतीं, परंतु आताप्रमाणे

डोक्याचा अगदींच उघडा कारभार झालेला नव्हता. गांधी टोपी, भगवी टोपी, अशा प्रकारच्या राजकीय पक्षांच्या निशाण्याहि लोकांच्या डोक्यापर्यंत पोचलेल्या नव्हत्या. स्वदेशी माल वापरण्याची लाट मात्र अधूनमधून उठत होती. त्यामुळें आम्हां विद्यार्थ्यांच्या डोक्यावर बहुधा देशी कापडाची बनविलेली साधी बंगलोरी टोपी असे. धोतर, साधा शर्ट, कोट असा बहुतेक विद्यार्थ्यांचा पोषाख असे. पुणेरी जोडा अजूनहि थोडासा प्रचारांत होता. "पठाणी वहाण" काबूल कंदाहारची वाट चालून महाराष्ट्रापर्यंत येऊन पोचली नव्हती. सामान्यतः आम्ही सर्वच विद्यार्थी गरीब, मध्यम वर्गातले होतों, आणि गरीबच दिसण्यांत आम्हांला शरम वाटत नसे. आमच्या गळ्यांत धोकट्या असत व त्या धोकट्यांत सर्व तासांचीं पुस्तकं, वह्या तर असतच, पण शिवाय फराळाचा डबाहि असे. फर्ग्युसन कॉलेजच्या आसपास चहाचीं हॉटेलं तर तेव्हा नव्हतींच पण एक आणा फेकून चहा पिणं आम्हांला माहीतहि नव्हतं. मधल्या सुटींत कॉलेजालगतच्या कालव्याच्या कांठावर टोळक्या-टोळक्यांनी झाडाखाली निवांत बसून आम्ही डबे उघडीत असूं, आणि एक प्रकारचा समाईक फराळ करीत असूं. तासाला दांडी मारणं आम्हांला फारसं माहीत नव्हतं. पांच वाजेपर्यंत कॉलेजचे वर्ग असत. मग बहुतेक विद्यार्थी गांवाकडे परत जात; पण क्रिकेट, फुटबॉल खेळणारे आम्ही विद्यार्थी मैदानावर जात असूं. आम्ही घराच्या वाटेला लागेपर्यंत तिन्हीसांजा टळून जात. त्यामुळे मधल्या सुटींत दशम्या खाण्याचा कार्यक्रम भरपूर आणि सावकाश होत असे. सुटी भरपूर तासाची असे त्यामुळे दशम्या खाऊन झाल्यानंतरहि थोडा वेळ उरत असे.

या वेळेचा चांगला उपयोग करण्यासाठी आम्ही एक विटीदांडू क्लब काढला होता. या विटीदांडू क्लबाचे सर्व सभासद मला आता आठवत नाहींत; परंतु त्या वेळचे प्रसिद्ध माटे वैद्य यांचे चिरंजीव–पुढे ज्यांनी वकिलीचा धंदा केला व गायनकलेंतहि बरेंच प्राविण्य संपादन केलं ते–बाबूराव माटे या विटीदांडू क्लबाचे सभासद होते हें मला पक्कं आठवतं. आणखी एक सभासद असेच पक्के आठवतात, ते म्हणजे पुढे कर्व्यांच्या संस्थेंत गेलेले प्रो. ना. म. पटवर्धन. या विटीदांडू क्लबाचा जो स्वयंभू चिटणीस होता तो खेळाची उपकरणं आपल्या धोकटींत घालूनच आणीत असे. कांही दिवस हा विटीदांडू क्लब चांगलाच गाजला.

मधल्या सुटींतला रिकामा वेळ घालविण्यासाटीं आमच्यापैकी कांहींजण आणखी एक उद्योग करीत. तो म्हणजे कुणाची तरी सायकल घ्यायची आणि बसायला शिकायचं. या उद्योगाच्या निमित्तानं माझी आणि त्या वेळचे प्रिन्सिपल रँग्लर परांजपे यांची समोरासमोर पहिली मुलाखात झाली. कुणाची तरी सायकल–अर्थात् त्याला न विचारतां–घेऊन मी बसण्याची विद्या हस्तगत करीत होतों. माझी संमति न घेतां सायकल रस्त्यावरून बाजूला शिरली, बागेतल्या एका कुंडीवर जाऊन थडकली, कुंडी फुटली, सायकल आडवी झाली, मी कसा उभा राहिलों कोण जाणें पण राहिलों खरा. कॉलेजचा पहारेकरी आला व त्यानं मला पकडलं. कॉलेजच्या आवारांतल्या आंब्यांच्या झाडांवरच्या आधीच तोडलेल्या कैऱ्या इतरांप्रमाणें माझ्याहि खिशांत होत्या. त्याहि त्या पहारेकऱ्याला दिसल्या. अशा प्रकारें दोन गुन्हे उघडकीस आल्यावर मग काय विचारतां ? त्यानं मला सरळ नेऊन परांजप्यांच्या पुढे उभं केलं, आणि माझा दुहेरी गुन्हा त्यांच्या कानांवर घातला. मला आतां दंड होणार असं वाटलं, परंतु तसं कांही घडलं नाही. परांजपे मला काय म्हणाले तेहि आतां नक्की आठवत नाहीं; परंतु कॉलेजच्या आवारांत सायकलवर बसायला शिकण्याचा प्रकार त्यांना पसंत नव्हता एवढं मला कळलं. सायकल या वाहनाविषयीं त्यांच्या मनांत अढी उत्पन्न होण्याजोगा प्रसंग नुकताच घडला होता. त्यांनी सायकलवर बसणं सोडून दिलं होतं. लकडी पुलाच्या गांवाबाहेरच्या टोकाजवळ ते सायकलवरून पडले होते. आम्हांला पहिल्या टर्ममध्यें गणित विषय शिकवितांना त्यांचा डावा हात गळ्याभोवतीं अडकविलेल्या पट्टींतच धरलेला असे. त्यांच्या त्या अपघाताची हकीगत मोठी गंमतीदार होती. तिचा संबंध एका बोकडाशीं होता !

ज्या चौकांत आज हिंगण्याकडे जाणारा मोठा रस्ता फुटतो, आणि मोठमोठीं सिनेमाचीं पोस्टर्स दिसतात, तो चौक त्या वेळेस अगदीं लहान होता. त्या चौकांत एक भला मोठा माजलेला बोकड नेहमीं उभा असे. आतां पोलीस असतो. त्या वेळेस तो बोकड असे. गवताचे भारे, भाजीच्या टोपल्या, फळांच्या करंड्या डोक्यावरून वाहून आणणाऱ्या बायांना तो रोखीत असे, आणि त्यांनी जकात टाकल्यावाचून त्यांची सुटका होत नसे. दिवसभर तो बोकड कांहींना कांही खात असायचा. तो कुणाच्या मालकीचा होता कुणास ठाऊक ?

बहुतेक तो कुणाचाच नसावा. मोकाट सुटलेल्या पोळासारखा तो स्वैर करीत अष्टौप्रहर उभा असायचा. तो कुणाला रोखील आणि कुणाची वाट अडवील त्याचा नियम नसे. तो बोकड म्हणजे सगळ्यांच्या भीतीचा एक विषय होऊन बसला होता. पुलाच्या उतरणीवरून फर्ग्युसन कॉलेजच्या रस्त्याला लागणाऱ्या सायकलस्वारांना तर त्याला टाळण्याची फार खबरदारी घ्यावी लागे. एके दिवशीं रँग्लर परांजप्यांना हा बोकड आडवा आला आणि परांजपे सायकल-वरून खालीं पडले. त्या दिवसापासून परांजप्यांनीं सायलवर बसणं सोडलं. डोक्याला जरीच्या झिरमिळ्यांची गुलाबी पगडी, खांद्यावरून टाकलेलं तलम उपरणं, पायांत अस्सल पुणेरी जोडा, अशा थाटांतल्या आंकडेबाज मिशांच्या सायकलस्वाराचं दर्शन काळाच्या उदरांत कायमचं गडप झालं. पुण्याचा सर्वांगीण इतिहास कधी कुणी लिहिला तर लकडी पुलाच्या कोपऱ्यावर ज्यानं आपली कारकीर्द कांहीं दिवस गाजविली त्या इतिहासप्रसिद्ध बोकडाच्या अशाच आणखी हकाकती त्याला सांगतां येतील.

कॉलेजच्या मैदानावरून आम्ही गावाकडे परतत असूं ते सूर्यास्त झाल्यावर बऱ्याच वेळानं दिवेलागणीनंतर. मनसोक्त खेळून थकवा आलेला असे, भुके-मुळें घराची ओढ लागलेली असे. आम्ही एकंदर दहा बाराजण असूं. परंतु आमच्या गप्पागोष्टी थंडावलेल्या असत. लकडी पूल ओलांडून गावांत शिरल्या-वर त्या वेळेस फक्त दोनच रस्ते लागत. एक नारायण पेठेकडे जाणारा डाव्या हाताचा व दुसरा सरळ सदाशिव पेठेकडे जाणारा. या दुसऱ्याच रस्त्यानं आम्ही जात असूं. या रस्त्यानं वीस पंचवीस कदम चालल्यावर औंधकरांच्या वाड्यासमोर डाव्या हाताला त्या वेळस एक गुत्ता होता. या ठिकाणचा एकंदर देखावा अगदी किळसवाणा असे. गुत्त्यांत जाणाऱ्या आणि गुत्त्यांतून बाहेर पड-णाऱ्या लोकाची ती गर्दी, त्यांचीं झिंगलेलीं बोलणीं, दुकानाच्या दारांतच मांड-लेलीं गावठी दारूचीं पिपं, जाड काचेचे पेले, हवेंत भरलेला गुळचट आंबट दुर्गंध, दुकानाबाहर उभे राहिलेले चिवडेवाले, चिवड्याच्या शितरांनाच लावलेले घासलेटचे ढणढणारे मशालीसारखे दिवे, त्यांचा तांबूस प्रकाश आणि धूर—हें सारं दृश्य पाहिलं की आमच्या मनाला मोठा धक्का बसे.

त्या सुमारास दारूबंदीची चळवळ लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखाली चालू होती, आणि ती हाणून पाडण्याचे सरकारी प्रयत्नहि चालू होते. गुत्त्या-

वर पिकेटिंग करणं हा गुन्हा समजला जात होता; व तो गुन्हा मुद्दाम करून कांही लोक तुरूंगांत जात होते. सविनय कायदेभंग गांधींजींनीं शिकविण्याच्या आधीच कित्येक वर्षे पुण्याला माहीत होता. वर्तमानपत्रांत वाचलेल्या बातम्या आणि कॉलेजांतून घरीं जातांना रोज नजरेस पडणारा गुत्त्यावरचा तो देखावा यांचा परिणाम आमच्या मनावर झाल्यामुळें आपणहि कांही तरी करावं असं आम्हांला वाटूं लागलं. पिकेटिंग तर बेकायदा होतें. मग आम्ही काय करूं शकत होतो ? या प्रश्नाचं उत्तर ज्यांच्या उदाहरणावरून आम्हांला सुचावं असे एक गृहस्थ त्या वेळेस दारूबंदीच्या चळवळीत कार्य करीत होते. त्यांचं नांव शंकर गणेश लवाटे. पिकेटिंगवरील सरकारी बंदीचा हुकूम न मोडतां दारूबंदीची खटपट करण्याचा एक मार्ग यांनी काढला होता. दारू न पिण्याचा उपदेश करणारं एक छोटंसं स्वकृत भजन म्हणत रात्रीच्या प्रहरीं ते शहराच्या निरनिराळ्या भागांतून हिंडत असत. त्यांचा कित्ता गिरवायचं आम्ही ठरविलं. रोज कॉलेजांतून घरी जातांना लकडी पूल ओलांडल्यावर आम्ही आठ दहाजण दोघादोघांच्या रांगा करून चालूं लागून टाळ्यांच्या तालावर मोठ्यांदा गाऊं लागत असूं, " हरे राम हरे राम राम राम हरे हरे । हात जोडतों, पाया पडतों दारू पिऊं नका रे ॥ "

प्रत्यक्ष गुत्यासमोर आम्ही रेंगाळत नसूं, परंतु आमचे आवाज विशेष उंच होत असत. सदाशिव पेठेच्या हौदाच्या चौकापर्यंत आमची ती चाल आणि आमच्या तोंडचं ते गाणं चालू राहत असे. मग आमच्या वाटा फुटत असत. आमची ती रात्रफेरी बरखास्त होत असे. आमचा हा क्रम किती दिवस चालला होता आणि अखेर कशामुळं बंद पडला ते आता मला आठवत नाहीं. सरकारनं तो बंद पाडला नाही एवढं खास. बहुधा टर्म संपली म्हणूनच ती रोज रात्रीची फेरी बंद पडली असावी; परंतु जोंपर्यंत ती चालू होती तोपर्यंत ती साहजिकपणें सामान्य लोकांच्या कुतूहलाचा विषय झाली होती. " हरे राम हरे राम " वगैरे ते दोन चरण म्हणत रस्त्यानं जाताना आम्हांला मनांतल्या मनांत वाटे, केवढं प्रचंड कार्य आपण करून राहिलों आहोंत ! चौका-चौकांतल्या पोलिसांच्या अंगावरून लोकांना दारू न पिण्याचा उपदेश खुशाल करीत जायचं म्हणजे काय ? केवढं हें धैर्य ! आमच्या या उपदेशाचा परिणाम होणार खचित् ! टिळकांच्यापर्यंत बातमी पोंचली तर ते आम्हांला म्हणतील, शाबास ! सरकारचं लक्ष गेलं तर आमची धरपकड होईल खास ! निदान पोलीस आम्हांला हटकील आणि

आमचीं नांवं टिपून घेईल अशी थोडी भीति आणि थोडीशी आशा आम्हांला रोज वाटायची. रोज आश्चर्य वाटायचं की अरे, काळ्या डगल्यांतील पोलीस आपल्याला हटकीत नाहीत हें काय ? ब्रिटिशांच्या परकी सत्तेवर एक छोटासा विजय मिळविल्यासारखं आम्हांला वाटायचं ! कोवळ्या तारुण्यांतल्या साऱ्याच कल्पना कोवळ्या. त्या आज आठवल्या की हास्यास्पद वाटतात, परंतु त्या काळांत त्या किती मोलाच्या वाटत होत्या ? आणि जें जुनं पुणं मला आज आठवतं त्याच्याशीं त्या किती दृढपणें निगडित झालेल्या होत्या !

* * *

: २ :

चाळीस वर्षांपूर्वी पुण्यांत अवघीं चार कॉलेजं होतीं. डेक्कन कॉलेजांत फक्त आर्टसच्या शिक्षणाची सोय होती. हें कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज, आणि शेतकी कॉलेज शहरापासून दूर होतीं. त्यांतल्या त्यांत जवळ होतं फर्ग्युसन कॉलेज, आणि पुण्याच्या नागरी जीवनाशीं विशेष संबंध येत असे तो फक्त फर्ग्युसन कॉलेजांतील अध्यापकांचा आणि विद्यार्थ्यांचाच. फर्ग्युसनमधल्या विद्यार्थ्यांची संख्या एक हजाराच्या पलीकडे गेलेली होती, आणि ही संख्या म्हणजे त्या वेळचं एक आश्चर्यकारक रेकॉर्ड होतं. सबंध मुंबई इलाख्यांतलं सर्व दृष्टींनीं सर्वांत मोठं कॉलेज आमचं म्हणून आम्हां विद्यार्थ्यांना मोठा अभिमान वाटत असे. आमच्या अभिमानाचा फुगा टांचणी टोंचून फोडण्यासाठीं डेक्कन कॉलेजांतले विद्यार्थी नेहमी उत्सुक असत 'भटजी कॉलेज' असा फर्ग्युसन कॉलेजचा उल्लेख ते करीत असत. या त्यांच्या उल्लेखांतली तुच्छता वजा केली तर तो उल्लेख खोटा म्हणतां येण्यासारखा नव्हता. आईबापांकडून दोन–दोनशे, तीन–तीनशे रुपये महिन्याकाठी मागवून चैनबाजींत उडविणारे, वसतिगृहांत घरचा एकेक नोकर घेऊन राहणारे, चांदण्या रात्रीं नौकाविहार करणारे, गाण्या-बजावण्याच्या मैफली वसतिगृहाच्या खोल्यांतून झडविणारे, अध्यापकांच्या तासांना क्वचितच हजर राहणारे, गंधर्व मंडळीच्या नाटकांना पहिल्या रांगांतल्या खुर्च्या अडविणारे, कपड्यालत्त्यांचा शोक करणारे बहुतांशीं बडे बापके बेटे असे ते डेक्कन कॉलेजांतले विद्यार्थी कुणीकडे आणि गळ्यांत धोकट्या घालून पायीं चालत जाणारे आम्ही फर्ग्युसनचे विद्यार्थी कुणीकडे! डेक्कन कॉलेज 'अमीरां'चं होतं, फर्ग्युसन 'भटजीं'चं होतं, ही गोष्ट खरीच होती. किंबहुना गरीब विद्यार्थ्यांची सोय करण्याच्या प्रतिज्ञेनच आमचं कॉलेज स्थापन झालेलं होतं. सरकारी नोकरींत लठ्ठ लठ्ठ पगार ओढणारे, बूट पॅंट असा साहेबी पोषाक करणारे आमचे प्रोफेसर नव्हते. पायांत जोडा, कमरेला धोतर, अंगावर कोट उपरणं, डोक्याला रुमाल असा आमच्या प्रोफेसरांपैकीं बहुतेकांचा वेष होता. प्रो. पटवर्धन, हरिभाऊ लिमये असे थोडेजण डोक्याना पगडी घालीत;

परंतु त्या पगडीला जरीच्या झिरमिळ्या नसत. कॉलेजबाहेर वावरतांना रँग्लर परांजप्यांच्या डोक्यावर ऐटबाज लाल गुलाबी झिरमिळ्यांची पगडी असे; परंतु वर्गांत शिकवितांना मात्र केंब्रिजयुनिव्हर्सिटीची, कांहींशीं होडीच्या आकाराची कडक काळी टोपी ते घालीत. केंब्रिज विश्वविद्यालयांत रँग्लरचा बहुमान मिळवून आलेले ते एकमेव अध्यापक होते, आणि स्वतःचं हे अपूर्व वैशिष्ट्य विद्यार्थ्यांसमोर दिमाखानं मिरविण्याची त्यांना मोठी हौस होती; परंतु रँग्लर परांजप्यांचा थाट वगळला तर आम्ही विद्यार्थी जसे भटजी होतो तसेच आमचे प्रोफेसरहि भटजी होते हे कांहीं खोटं नव्हे.

परंतु या गोष्टीचा आम्हा विद्यार्थ्यांना विषाद वाटत नसे; कारण आम्हाला माहीत होतं की, डेक्कन कॉलेजांतले बहुतेक अध्यापक शिकविण्याच्या कामांत धड्ड होते, उलट आमच्या अध्यापकांचा चांगलं शिकविण्याबद्दल लौकिक होता. मला स्वतःला हा लौकिक फारसा पटला नाही. आम्ही तास सहसा चुकवीत नसूं; परंतु कित्येक प्रोफेसरांच्या तासांना आम्ही लख्ख पुढच्या डेस्कावर डोकं टेकून झोप काढीत असूं, आणि ‘नंबर वन,’ ‘नंबर टू’ अशी तासाच्या अखेरीस हजेरी सुरू झाली की झोप संपवून आपला क्रमांक आला की, ‘यस् सर’ अशी ललकारी मारीत असूं. प्रो. गोविंद चिमणाजी भाटे यांची दृष्टि फार अधु होती, आणि शिवाय आपलं व्याख्यान कोण ऐकतं काण ऐकत नाही याविषयी संपूर्णतः बेफिकीर राहून व्याख्यान देत राहण्याची स्थितप्रज्ञता त्यांच्या ठिकाणीं होती. त्यांच्या तासाला अगदी पहिल्या बाकावर बसून खुशाल झोप काढणं सहज शक्य होतं. आम्ही पांच सहा विद्यार्थी मागच्या बाकावर बसत असूं; आणि पत्ते खेळत असूं. तासभर एकाग्र चित्तानं ऐकलीं पाहिजेत अशीं कोणत्याच प्रोफेसरचीं व्याख्यानं मला वाटलीं नाहीत. याला अपवाद फक्त दोघाच प्रोफेसरांचा, एक प्रो. राजवाड्यांचा आणि दुसरा प्रो. वासुदेव बळवंत पटवर्धनांचा. राजवाडे दोन चष्मे वापरीत असत; आणि वाचण्याचा चष्मा डोळ्यांना लावून ते पुस्तक वाचूं लागले की, त्यांना वर्गातलं कांही दिसत नसे; परंतु त्यांचा तास फार ऐकण्यासारखा वाटे. प्रो. पटवर्धनांच्या तासाला तर निजायची सोयच नव्हती. कारण ते खुर्चींत बसून किंवा टेबलामागं एके ठिकाणीं उभं राहून शिकवीत नसत. इंग्रजी काव्य आणि नाटक शिकविण्याचं काम त्यांच्याकडे असे, आणि व्यासपीठावर येरझारा घालीत, हातवारे आणि आभे-

नय करीत ठणठणीत आवाजांत शिकविण्याची त्यांची पद्धत असे. ते बहुतांशीं नेहमीच हंसत असत. माणकेश्वराच्या विष्णूजवळ कोपऱ्यावर गोळ्यांचा वाडा आहे त्याच्या केसरी कचेरीकडे जाणाऱ्या रस्त्यावरच्या ठेंगण्या, दुमजली पाखड्यांत ते राहात असत; आणि सायकलवर कॉलेजांत जात येत असत. त्या वेळेस देखील ते स्वतःशीं सारखे हंसत असत. त्यांचा तास म्हणजे हंशा, विनोद, नाटकी अभिनय, टाळ्या यांनी गजबजलेला असे. पण राजवाडे आणि पटवर्धन हे दोन अपवाद सोडले तर इतर प्रोफेसरांचे तास मला तरी कंटाळवाणेच वाटत.

बाहेर लोकांत मात्र फर्ग्युसन कॉलेजमधल्या साऱ्याच प्रोफेसरांचा उत्तम शिकविणारे म्हणून लौकिक होता. स्वार्थत्यागपूर्वक चालविलेलें हें कॉलेज या दृष्टीनेच समाज फर्ग्युसन कॉलेजकडे बघत असे. ज्यांना त्यांची इच्छा असती तर मोठ्या पगाराची सरकारी नोकरी मिळाली असती; परंतु जे शंभर सवाशे रुपयांचंच वेतन घेऊन अध्यापनाचं काम करीत होते असे कांहीं थोर विद्वान फर्ग्युसनच्या अध्यापकांत होते. त्यामुळें फर्ग्युसनमधील प्रोफेसर म्हटला की, एक ध्येयवादी स्वार्थत्यागी पुरुष म्हणूनच लोक त्याच्याकडे बघत. या आदर-बुद्धीचा विपरीत परिणाम झालेलाहि कधी कधी दिसे. स्वार्थत्यागी प्रोफेसर, गाढा विद्वान आणि उत्तम साहित्यिक असणारच, अशी सामान्य लोकांची समजूत होती; आणि या समजुतीच्या आधारावर ‘ मनोरंजन ’ मासिकाची पानं फर्ग्युसन कॉलेजचे प्रोफेसर अडवीत असत. प्रो. वा ब. पटवर्धन व्यासंगी होते, व त्यांचे लेख साहित्याच्या दृष्टीने चांगलेहि असत. प्रो. भाटे यांचीं प्रवासवर्णनं शैलीच्या दृष्टीनं अगदी भिकार होती. तरी निदान प्रवासाची दांडगी हौस हा एक गुण तरी त्यांच्या लिहिण्यांत होता. परंतु प्रो. पानसे, प्रो. काळे, प्रो. कानिटकर वगैरेंच्या निखालस तिसऱ्या प्रतीच्या लेखांनाहि मासिकाच्या साध्या व खास अंकांत मानाचं स्थान देण्यांत येत असे. लेखकाच्या नांवापुढें बी. ए., एम्. ए., एल्एल्. बी. अशी पदवी असली की लेख चांगला समज-ण्याची वाचकांची प्रवृत्ति होती. कवि आपल्या टोपण नांवापुढें देखील पदवी लावून आपल्या काव्याची किंमत वाढवीत असत. त्यावेळच्या मासिकांच्या फायली काढून पाहिल्या तर बहुतेक प्रमुख लेखक पदवीवाले होते असं आढळेल. पुढें पदवी, मागं पदवीपेक्षाहि अधिक दुर्मिळ असा ‘ प्रो. ’ या अक्षराचा अलंकार, आणि स्वार्थत्यागपूर्वक अध्यापनाचं कार्य करीत असल्या-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम 29040 दि: ...
क्रमांक ... 294 ... नों: दि: 3.01.1971



बद्दलचा लौकिक, अशा त्रिवेणी संगमामुळें सरस्वतीच्या दरबारांत फर्ग्युसन कॉलेजच्या प्रोफेसरांना सहज स्थान मिळालं. साहित्याच्या दृष्टीनं हा गोंधळ हास्यास्पद होता; परंतु डेक्कन कॉलेजांतील विद्यार्थ्यांना आम्हांला हिणवितां येत असे की, आमचे प्रोफेसर नामवंत लेखक आहेत, तुमचे कुठे आहेत ?

एका बाबतींत मात्र डेक्कन कॉलेजचा वरचष्मा आम्हांला मान्य करावा लागत असे. ती बाबत म्हणजे वार्षिक संमेलनांत होणाऱ्या नाटकांची. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी डेक्कन कॉलेजच्या ' वेणीसंहार ' नाटकांत काम केलें आणि पुढें प्रेक्षकांत वडील नाटक पाहत बसले असतांना बापाच्या नावानं तर्पण करण्याचा विधि केला, अशी जुनी आख्यायिका आहे. नाट्य प्रयोगांची ही परंपरा डेक्कन कॉलेजांत आमच्या वेळेसहि जोरांत चालू होती. पुणें शहरांतील शाळांपैकीं नाटक करण्यांत पटाईत म्हणून "भावे स्कूल" चा लौकिक (कांही लोकांच्या मतें दुर्लौकिक !) होता, आणि कॉलेजांपैकी नाटक करावं तर डेक्कन कॉलेजनंच अशी डेक्कन कॉलेजची कीर्ति होती. फर्ग्युसनमध्ये नाटकांवर बहिष्कार नव्हता, परंतु अध्यापकांचं विशेष प्रोत्साहनहि नव्हतं. १९१० सालीं या नाटकाच्या बाबतींत काय घडलं कुणास ठाऊक, पण तें घडल्यामुळे रँग्लर परांजप्यांनी संमेलनाच्या वेळीं नाटक होऊं द्यायचं नाही असं ठरविलं. कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांची संख्या अनावर फुगलेली म्हणून भोजनाचा कार्यक्रम संमेलनांतून गळलाच होता. आता नाटकालाहि काट मिळाला की, वार्षिक संमेलनासाठी केवळ एक व्याख्यान एवढाच कार्यक्रम शिल्लक राहणार होता; आणि ते व्याख्यान तरी कुणाचं तर एखाद्या गाजलेल्या आणि विद्यार्थ्यांना प्रिय असलेल्या वक्त्याचं नव्हे, तर कॉलेजला मोठी देणगी ज्याच्याकडून मिळेल अशा एकाद्या व्यापाऱ्याचं किंवा मवाळ पंथांतल्या एकाद्या रेम्याडोक्याचं ! मी फर्ग्युसनमध्ये असतांना एकदा तर सर रामकृष्ण भांडारकर यांचंच संमेलनप्रसंगीं व्याख्यान झालं, आणि त्या वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध महापुरुषानं त्या वेळेस पुणेकरांच्या चर्चेचा विषय झालेल्या ' ड्रेनेज ' वर जें प्रवचन सुरू केलं तें कांही केल्या संपेना ! अशा स्थितींत नाट्यप्रयोगालाहि काट मिळाला तर वार्षिक संमेलनात उरलं तरी काय असं वाटून १९११ सालच्या संमेलनांत नाटक करायचंच असं आम्ही कांहीं विद्यार्थ्यांनी ठरविलं. परांजप्यांनी खूप विरोध केला; परंतु शेवटीं संमति दिली. आम्ही " त्राटिका "नाटक केलं. त्या प्रयोगांत प्रो. श्री. म. माटे

यांनी पिल्याची भूमिका केली. पायांत कुणबाऊ वहाण, वर लांडा तंग चोळणा अंगांत पैरण, डोक्याला मुंडासं, कानशिलांवर आणि कपाळाला पांढऱ्या गंधाच्या टिकल्या, निसर्गसिद्ध झुपकेदार मिशा, उग्र चेहरा, ठणठणीत आवाज, दाणेदार उच्चार, आणि कुणबाऊ भाषा बोलण्याची सफाई, यामुळे मास्त्यांचं काम अगदी सुंदर झालं, आम्हांला तालमी द्यायला प्रो. भानू, प्रो. पानसे येत असत. त्यांना तर मास्त्यांचं काम पाहून भीति वाटली की हा विद्यार्थी कॉलेज सोडून नाटक मंडळींत गेला नाही म्हणजे मिळविली. याप्रमाणें १९११ सालचं संमेलन नाट्यप्रयोगासहित झालं, पण कॉलेजांत असतांना पुन्हा नाटक झालं नाही. परांजप्यांनी नाटकावर 'बॅन' घातला. डेक्कन कॉलेजचे विद्यार्थी आम्हांला चिडवूं लागले "काय रे तुमचं कॉलेज, नाटकावाचून संमेलन करतां? हात तुमची!" ही हेटाळणी आम्हांला मुकाट्यानं ऐकून घ्यावी लागे.

परंतु या कमीपणाची भरपाई दुसऱ्या एका गोष्टींत आम्हांला करता येत असे, ती गोष्ट म्हणजे क्रिकेट. डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपॉल बेन यांची फार इच्छा कीं आपल्या विद्यार्थ्यांनी फर्ग्युसनला चांगला ×× मार द्यावा. डेक्कन कॉलेजांत दाणी नांवाचा डावखुरा फसवा गोलंदाज होता, आणि रोबेन नांवाचा एक विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत जसा पहिल्या श्रेणींत येणारा तसा उत्तम बॅट्समनहि; परंतु आमच्या टीममध्यें देवधर होते, शिक्षण-क्षेत्रांतील कार्याबद्दल ज्यांनी लौकिक मिळविला, मराठा समाजाच्या पुढाऱ्यामध्यें ज्यांना बरंच वरचं स्थान आहे व बाबूराव जगताप म्हणून जे आता ओळखले जातात ते होते. प्रो. भानूंचा मुलगा होता, प्रो. मास्त्यांचा मुलगाहोता. आतां पुण्याच्या ज्येष्ठ वकिलांत जमा झालेले शंभूराव गोडबोले होते. आणि अशा मजबूत संघाचं नेतृत्व पुढें अकोल्यास ज्यांनीं वकिलींत उत्तम नांव मिळवलं व जे अकालीं दिवंगत झाले त्या वाय. जी. जोशी यांच्याकडे होतं. जोशी स्वतः आमच्या संघाचे आघाडीचे द्रुतगति गोलंदाज होते. स्वभावानं मोठे मनमिळाऊ आणि दिलदार. संघाचं नेतृत्व करण्यांत चतुर. आम्हां सर्व विद्यार्थ्यांचे फार लाडके. सामना चालू असला की, 'कम ऑन वाय् जी!" असं विद्यार्थ्यांनी ओरडावं, वायुजीनं चेंडू टाकण्यापूर्वी तंबूकडे बघावं, हसावं थांबा थांबा अशा अर्थी हाताची खूण करावी आणि चेंडू टाकून खरोखरच विकेट घ्यावी, असं अनेक वेळां होत असे. डेक्कन कॉलेज आमचा पराभव

केव्हाच करू शकलं नाहीं. देवधर म्हणजे आमचा मोठाच आधार होता; परंतु मला आठवतं की शील्डच्या सामन्यांतल्या देवधरांच्या धावा ३०-४० च्या आसपास असायच्या आणि आमचा जय व्हावयाचा तो देखील बहुधा तितक्याच धावांनीं. त्या वेळीं संबंध संघाचा स्कोअर देखील १०० च्या आंतच असायचा. दोन दोनशे चार-चारशे धावा कधीच होत नसत. त्यामुळें देवधरांच्या ३०-४० धावा निर्णायक ठरत. अटीतटीच्या सामन्यांतलं त्या वेळचं धावांचं प्रमाण ज्याप्रमाणं थोडं होतं. त्याप्रमाणेंच पोशाखाच्या बाबतीतलीं खेळाडूंची ऐटहि बेताचीच असे. डेक्कन कॉलेजचे व एंजिनिअरिंग कॉलेजचे खेळाडू सारे फ्लॅनेलच्या पॅंट्स व शर्ट चढवून मैदानावर उतरत; पण आमच्या संघांत जवळ जवळ निम्मे खेळाडू धोतर नेसलेले असत. देवधरची गणना या धोतरवाल्यांतच असे. पोषाखाचे चोचले या साध्या मुलाला माहीतच नव्हते. एकदा आमचा व डेक्कन कॉलेजचा सामना चालू असतांना, व देवधर बॅटिंग करीत असतांना मोठा पाऊस आला. खेळ थोडा वेळ थांबविण्यांत आला आणि देवधर तंबूत परत आला. त्याला सचैल भिजलेला पाहून कुणी तरी लोकरीचा गरम स्वेटर त्याच्यापुढें करून म्हटलं, हा घाल. देवधरनं अंगांतला शर्ट काढायला सुरुवात केली. लोक हंसूं लागले. कां तें त्याला कळेना. मग कुणी तरी सांगितलं. अरे स्वेटर शर्टच्या वरून घालावयाचा असतो. "असं होय?" असं म्हणून देवधरनं अंगावरून अर्धा काढलेला शर्ट पुन्हा घातला, आणि ज्याचा स्वेटर होता त्यानं तो देवधरच्या अंगांवर चढविला!

त्या वेळचे सर्वांत मोठे सामने म्हणजे चौरंगी सामने. त्यांत हिंदु संघांतून खेळण्यासाठीं देवधरची निवड झाली, तेव्हां सामना पाहावयास जातांना आम्हांला फार उत्सुकता होती ती हें पाहण्याची, की या बड्या सामन्यांतहि देवधर धोतर नेसून खेळतो की पॅंटबूट घालून खेळतो? चौरंगी सामन्यांत खेळणारा विशीच्या आंतला कॉलेजांतला पहिला विद्यार्थी बहुधा देवधरच असावा. मुंबईच्या कॉलेजांत सगळ्यांत जबरदस्त संघ त्या झेवियर कॉलेजचा असे; परंतु त्या कॉलेजचाहि पराभव करून युनिव्हर्सिटीचं नॉर्थ कोर्ट शील्ड प्रथम पुण्यास आणण्याचा मानहि देवधरच्या कारकीर्दींत फर्ग्युसन कॉलेजानंच मिळाविला. डेक्कन कॉलेजच्या टवाळखोर विद्यार्थ्यांना शरमेनं खालीं मान घालायला लावायचं असलं की आम्ही क्रिकेटचा विषय काढीत असूं. त्यांनी कधी शील्ड मिळविलं नव्हत.

त्यांच्याकडे कुणी देवधर नव्हता. त्यांचं मैदान लहानसं आणि भिकार होतं, उलट आमचं नवं विस्तीर्ण मैदान तयार झालं होतं, आणि मैदानावर उत्तम-पैकीं पॅव्हेलियन बांधण्यांत आला होता. आणि डेक्कनच्या विद्यार्थ्यांचं नाक कापण्यासाठीं सांगण्यासारखी आणखी एक गोष्ट होती. ती म्हणजे प्रतिवर्षी गव्हर्नरच्या संघाबरोबर गव्हर्नमेंट हाऊसमधील सुंदर राखीव मैदानावर आमचा एक मित्रत्वाचा सामना होत असे. या सामन्यांत गव्हर्नर स्वतः खेळत असे आणि आमच्या संघाचं नेतृत्व प्रो. काळे करीत असत. प्रो. काळे मंदगति गोलंदाजी बऱ्यापैकीं करीत व त्यांना एकादी विकेट मिळाली की विद्यार्थी आनंदानं टाळ्या पिटीत; परंतु प्रो. काळे यांचा धोतराचा अभिमान देवधर-पेक्षाहि जाज्वल्य ! त्यांनी वर्गात शिकविण्याच्या वेळेस तर कधी इस्त्री केलेली 'इजार' घातली नाहीच, परंतु क्रिकेटच्या मैदानावर प्रत्यक्ष 'हिज एक्सलन्सी' शी सामना देतांनादेखील आपल्या धोतराचा परित्याग केला नाहीं ! 'भटजी कॉलेज' हा प्रयोग म्हटला तर उपहासाचा होता, परंतु देवधरसारखे विद्यार्थी आणि काळ्यांच्यासारखे अध्यापक आपल्या करारानं आणि कर्तबगारीनं त्या प्रयोगाला बहुमानार्थी स्वरूप आणीत.

* * *

## : ३ :

आमच्या वेळीं कॉलेजांतला सगळ्यांत महत्वाचा खेळ क्रिकेटच होता. डेक्कन कॉलेजांत टेनिसचं प्रस्थ फार होतं. बोलूनचालून फार खर्चाचा तो खेळ आमच्या कॉलेजांत खेळला जात असे इतकंच. आमच्या प्रोफेसरांपैकीं रँग्लर परांजपे आणि काळे टेनिस चागलं खेळत. वार्षिक टूर्नामेंटमध्यें डबल्सच्या सामन्यांत त्यांची जोडी असायची. सामना खेळतांना रँग्लर परांजप्यांच्या तोंडून मोठे गमतीदार उद्गागार निघायचे. एखादा टोल चुकला आणि पॉइंट गेला की "अरे! अरे! काय गाढवासारखा मारला!" असा ठरीव दुःखोद्गार त्यांच्या तोंडून बाहेर पडायचा, व खेळापेक्षा असल्या उद्गारांनी आम्हां विद्यार्थ्यांची फार करमणूक व्हायची; पण फर्ग्युसनमध्यें टेनिसचं प्रस्थ बेताचंच होतं. क्रिकेटच्या खालोखाल फुटबॉलचंच महत्व होतं. फर्ग्युसनच्या वसतिगृहांत त्या वेळीं म्हैसूर-मद्रासकडले बरेच विद्यार्थी असत, आणि त्यांच्या मायदेशांतला सर्वांत लोकप्रिय खेळ इकडेहि ते हौसेनं खेळत. फर्ग्युसनच्या फुटबॉल टीममध्यें बहुतेक भरणा सितारामराव, नरसिंहराव अशांचाच असे. त्यांनीं "बास्केट बॉल" चाहि खेळ इकडे सुरू केला होता; परंतु या दोन्ही खेळांना कॉलेजांत दुय्यम स्थान होतं. हॉकीचा खेळ तर फारच क्वचित् खेळला जात असे. या खेळांचे आंतर-कॉलेजीय सामने होत नसत. लांब उडी, उंच उडी, पळण्याच्या शर्यती अशा मैदानी खेळांच्या अटीतटीच्या दंगली भरत नसत. आंतर कॉलेजीय मल्लयुद्धाचे सामने झालेले मला आठवतात व ते किर्लोस्कर थिएटरच्या स्टेजवर लाल माती टाकून झाल्याचंहि आठवतं. या सामन्यांतहि फर्ग्युसन कॉलेजच विजयी होत असे. आमचे पटाईत कुस्तीगीर तिघे होते. एक बंगाली. याचं नांव बंगाली होतं, पण ते होते खानदेशांतले. दुसरे सातवळेकर. प्रसिद्ध चित्रकार आणि वैदिक संशोधक सातवळेकर यांचे. बंधु हे आतां हे हैदराबादेस मोठ्या हुद्द्याच्या नोकरीवर आहेत; आणि तिसरे नवले. आता डेक्कन जिमखान्याच्या चौकांत 'एन. महादेव अँड. को,' या औषधी दुकानासमोर ज्या ठिकाणीं छोटं हॉटेल आहे त्या ठिकाणीं एका मोठ्या पिंपळाच्या झाडाखाली त्या वेळेस आखाड्याची

लहानशी इमारत होती. या तालमींतले नवले होते. त्यांची देहयष्टि मोठी धिप्पाड आणि पिळदार होती. आखाड्याची इमारत आणि पिंपळाचं झाड आता दिसेनासं झालं आहे, परंतु त्या रस्त्यानं हिंडतांना नवले अजूनहि दिसतात.

परंतु कुस्ती, बास्केटबॉल, फुटबॉल यांकडे आम्हां विद्यार्थ्यांचं लक्ष असलं तरी खरा गाजावाजा होता क्रिकेटचाच. १९११ सालीं आमच्या कॉलेजनं शील्ड मिळविलं, परंतु पुढे मात्र देवधर टीममध्यें असूनहि तो पराक्रम पुन्हा साधला नाही. तथापि शील्ड सामन्यांचा मोसम प्रतिवर्षी गाजत असेच. त्या वेळेस विश्वविद्यालयाच्या वार्षिक परीक्षा आतासारख्या उन्हाळ्यांत न होतां नोव्हेंबरच्या गुलाबी थंडींत होत असत. क्रिकेटच्या सामन्यांचा सीझन संपण्याच्या सुमारास परीक्षा जवळ आलेल्या असत. विद्यार्थी क्रिडांगणाकडे जाईनासे होत. वर्गातल्या व्याख्यानांना जोर चढे. परीक्षेसाठी नेमलेले अभ्यास पुरे करण्याची शर्यत अध्यापकांत लागे. बहुतेक विद्यार्थी नोटांच्या पुस्तकांत आणि वह्यांत तोंड खुपसून घोकंपट्टी करण्यांत गर्क होऊन जात. परीक्षेसाठी जोरांत अभ्यास सुरू करणं या अर्थी ‘ गिरणी सुरू करणं ’ असा प्रयोग त्या वेळीं आमच्यांत रूढ होता. “ काय, झाली की नाही गिरणी सुरू ? ” असं आम्ही एकमेकांना विचारीत असूं.

त्या दिवसांत युनिव्हर्सिटीच्या परीक्षा जरी नोव्हेंबरमध्ये होत्या तरी ती सुट्टी आताप्रमाणें महिनाभराचीच असे. डिसेंबरच्या शेवटीं शेवटीं परीक्षांचे निकाल जाहीर होत; जानेवारींत कॉलेजचं नवं वर्ष सुरू होत असे; आणि तीन महिन्यानंतर जी उन्हाळ्याची सुट्टी येत असे तीच आतासारखी सगळ्यांत मोठी सुट्टी असे. या मोठ्या सुट्टींत बाहेरचे विद्यार्थी आपआपल्या गांवीं जात, आणि आम्ही खास पुण्यपत्तनस्थ विद्यार्थी वासंतिक चैनीचा प्रारंभ करीत असूं. आमच्या या चैनीसाठी त्या वेळच्या पुण्यांत कितीतरी गोष्टी सुसज्ज तयार असत. ज्या भागांतल्या बंगल्यांत बसून मी लिहीत आहे त्या भागांत आणि त्याच्या उत्तर दिशेस कॉलेजच्या अलीकडे व पलीकडे दाट झाडी आणि बागा होत्या. त्या भागांत मोठमोठीं जुनीं जांभळांचीं आणि आंब्याचीं झाडं होतीं. अशाच बागा आणि अशींच झाडें हिराबागेंत आणि पर्वतीच्या वाटेवरहि होतीं. कम्युनिझमचं तत्वज्ञान आम्हीच काय, त्या काळांतल्या मोठमोठ्या पुढाऱ्यांनी देखील ऐकलेलं नव्हतं. परंतु पुण्याच्या पंचक्रोशींतल्या या बागा आम्ही सार्वजनिक

मालकीच्या समजत असूं. चोरून खाल्लेलीं जांभळं आणि आंबे विशेष मधुर लागत. आमचे हे चोरटे हल्ले बहुधा यशस्वी होत. पण एखाद्या वेळेस बागेच्या रखवालदाराच्या हातीं सापडण्याचा प्रसंग येई, आणि रखवालदारानं काढून घेतलेली डोक्यावरची टोपी किंवा आग्‍र्याहून निसटणाऱ्या शिवाजीमहाराजांचा कित्ता गिरवितां गिरवितां पळण्याच्या धांदलींत पडणारा पायांतला एक जोडा-आणि एक हातचा गेल्यामुळे उरलेल्याचाहि उपयोग नाही म्हणून स्वेच्छेनं टाकलेला दुसरा जोडा असा भुर्दंड द्यावा लागत असे. परंतु टपोऱ्या काळ्याभोर जांभळांच्या आणि हापूस-पायरी आंब्यांच्या चोरट्या गोडीला चटावलेल्या अस्सल रसिकांना शिरस्त्राणाची किंवा पादत्राणाची किंमत द्यावी लागली तरी दुःख अगर पश्चाताप होण्याचा थोडाच संभव होता? आम्ही एवढाच धडा शिकत असूं, आणि युक्ति करीत असूं की, ज्या बागेवरची मोहीम आमच्या अंगाशीं आलेली असे त्या बागेकडे मग फिरकायचं नाहीं. शत्रू पुन्हा बेसावध झाल्याचा अदमास घेऊन मग तिकडे मोर्चा वळवायचा. हा गनिमी कावा यशस्वी झाल्यावाचून राहत नसे.

आजूबाजूच्या बागा जशा आमच्या मालकीच्या आम्हांला वाटत तशाच विहिरीहि! उत्तम चिरेबंदी बांधणीची व पायऱ्यांची आणि पाण्यानं सदा भरलेली, सर्वांत प्रशस्त मोठी विहीर फर्ग्युसन कॉलेजच्या समोर होती. पाटलाची विहीर म्हणून ती प्रसिद्ध होती. गणेशखिंडीच्या नाक्यावर चतुःश्रृंगीकडे वळलं की थोड्याच अंतरावर उजव्या बाजूस उत्तम बांधणीची एक मोठी विहीर अजूनही आहे, तिचाहि उपयोग आम्ही करीत असू. शहरांत दोन विहिरींवर विशेष गर्दी असे. भिकारदास मारुतीसमोरची नातूंची विहीर आणि बंगल्याची विहीर. मला वाटतं ही बंगल्याची विहीर आता महाराष्ट्र व्यायाम मंडळाच्या जागेंत आहे. या दोन विहिरी उन्हाळ्यांत सदा गजबजलेल्या असत. पोहायला शिकविण्याचे वर्ग त्या वेळेस नव्हते. ज्यांना येत असे त्यांनी येत नसणाऱ्याला शिकवावं अशी धोपटमार्गी पद्धत असे. परंतु गंमत अशी की पोहतांना कुणी बुडून अपघात झाल्याचं मला आठवत नाहीं. कुणी नवखा पोहणारा गटंगळ्या खाऊं लागलाच तर विहिरीच्या कांठावर उन्हांत अंग वाळवीत

बसलेले पटाईत पोहणारे झटकन उड्या टाकीत आणि संकटांत पडलेल्या मुलाला वर काढीत.

वासंतिक सुट्टीच्या दिवसांत मध्यान्हापर्यंतचा आमचा वेळ कोणत्यातरी एका विहिरीवर व तिसऱ्या प्रहरानंतरच्या चार घटका कोणत्या तरी बागेंत जात असत. त्यानंतरचा कार्यक्रम म्हणजे वसंत व्याख्यानमालेंतलीं व्याख्यानं. या मालेचं त्या वेळचं स्वरूप आजच्याहून फार वेगळं होतं. आज ज्या ठिकाणीं 'आनंद कार्यालय' आहे, तिथं त्या रस्त्याच्या पेरूगेटा-कडच्या कोपऱ्यावर केळकरांचा वाडा होता. आता त्या वाड्याचं स्वरूप बदललेलं आहे, आणि तो वाडा केळकरांचाच आहे की दुसऱ्या कोणाचा आहे तें मला माहीत नाहीं. त्या वेळेस या वाड्याच्या मधोमध लहानशी पटांगणवजा मोकळी जागा होती. व्याख्यानाला तेवढी जागा पुरत असे.तीनचारशे श्रोत्यां-हून अधिक श्रोते व्याख्यानांना नसत. सातआठशे श्रोते जमले म्हणजे गर्दी लोटली असं म्हणायचं. ॲनी बेझंट वक्त्या आणि लो. टिळक अध्यक्ष असा योग जमला की गर्दी याहूनहि जास्त व्हायची, परंतु तीसुद्धा पटांगणांत मावेल एवढीच असायची ! कित्येक हजारांच्या विराट सभा त्या वेळेस माहीत नव्हत्या वसंत व्याख्यानमालेंतील श्रोत्यांची रोजची सरासरी हजेरी अडीचशे-तीनशे-पलीकडे नव्हती. पांच पंचवीस खुर्च्या व बाकं मांडलेली असत. त्यांवर वडील-धारी प्रतिष्ठित श्रोतेमंडळी बसत. बाकी सारे श्रोते भोवताली कोंडाळं करून उभे राहत. खुर्च्यांवर व बाकांवर रोजच्या रोज राखीव जागेवर बसल्या-प्रमाणें बसायलादेखील कोणताहि आकार द्यावा लागत नसे. 'व्याख्यानास तिकिटें' हा शब्दप्रयोग त्या काळांत व्याख्यानं करणारांना आणि तीं ऐकणा-रांनाहि हास्यास्पद वाटला असता.

त्या लहानशा पटांगणाच्या पश्चिमेकडच्या बाजूस एका आंब्याच्या झाडा-खाली सुमारे गुडघाभर उंचीचं लहानसं व्यासपीठ मांडलेलं असे. त्यावर दोन खुर्च्या आणि त्यापुढे साध्या चादरीनं झाकलेलं एक लहानसं टेबल असे. दिवे लागणी झाली की म्युनिसिपालिटीच्या साध्या घासलेटी कंदीलासारखे दोनचार कंदील अंगणांत लावण्यांत येत. आणि व्यासपीठावरच्या मेजावर दोन शामदानं लावून मांडण्यांत येत. 'शामदानं' म्हणजे काय चीज आहे असं कदाचित् आजच्या वाचकांना वाटण्याचा संभव आहे; कारण विद्युद्दीपांच्या आजच्या

युगांत एका अरुंद नळकांडींत स्प्रिंगवर बसवलेली मेणबत्ती व तिच्या ज्योतीचं रक्षण व्हावं यासाठी वर बसविलेला कांचेचा एक लहानसा ग्लोब अशा थाटाच्या दिव्याचा प्रकाश आता जवळ जवळ अजबखान्याच्या वाटेला लागला आहे. सभा लहानशा अंगणांतच भरत असल्यामुळें वक्त्याचा आवाज श्रोत्यांना सहज ऐकूं जात असे. ' ध्वनिक्षेपक ' हा शब्द त्या वेळेस कुणाला ऐकूनहि माहीत नव्हता !

राजकारणाच्या बाबतींत ते दिवस जरा मंदीचे होते. शिवाय व्याख्यान-मालेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनं राजकारणाचा विषय वर्ज्य समजणं शहाणपणाचं होतं. परंतु बाकी विविध विषयांचा समाचार मालेंत घेतला जाई. कांही वक्ते दर वर्षी बोलत, आणि त्यांचे विषयहि ठराविक असत. पुढे डेक्कन कॉलेजांत प्रोफेसर झालेले पण त्या वेळेस कऱ्हाडांत वकिली करीत असलेले श्री.बापूसाहेब चापेकर–स्त्रीनट म्हणून प्रसिद्धि पावलेल्या नानासाहेब चापेकरांचे थोरले बंधु–दर वर्षी साहित्याविषयक व्याख्यान देत. त्यांची धाटणी कांहींशीं कृत्रिम, बोलणं अनुनासिक, भाषा जाडजूड, थाट हरदासाचा असे; परंतु त्यांचं व्याख्यान लोकांना आवडत असे. श्री. वासुदेवराव चिपळुणकर दरवर्षी मालेंत बोलत. त्यांचं व्याख्यान धर्मविषयक असे आणि ते थिऑसॉफिस्ट असल्यामुळे थिऑ-सॉफिच्या दृष्टिकोनांतूनच ते आपल्या विषयाची मांडणी करीत. गौरवर्ण, सडपातळ शरीरयष्टि, शुभ्र परीटघडी धोतर, कोट उपरणं व डोक्यावर सुंदर गुलाबी रंगाची पगडी, या वेषाचा श्रोत्यांवर चटकन परिणाम होत असे; आणि त्यांचा आवाज आर्जवी, भाषा साधी व सफाईदार, आणि प्रतिपादन एकांगी असलं तरी कळकळीचं असल्यामुळे त्यांचं व्याख्यान दरवर्षी गाजत असे. ' हरिभक्तिपरायण ' ही पदवी लावून घेणारे ल. रा. पांगारकर यांचं संतवाङ्मयविषयक व्याख्यान गर्दीचं होत असे. त्यांच्याइतकी रसाळ वाणी मी अजून ऐकली नाहीं. उसासे, हुंदके, अश्रुपात हीं तंत्रंहि त्यांनी आत्मसात् केलीं होतीं. सुशिक्षित समाजालाहि ते मधूनमधून टाळ्या वाजवायला लावीत, भजन करायला लावीत, इतका ते आपल्या व्याख्यानांचा पगडा श्रोत्यावर बसवीत. रँग्लर परांजपे एखाद्या वर्षी बोलत. ' मतदानपद्धति ' हा त्यांचा आवडता विषय होता. ते इंग्रजींत बोलले तर जरा तरी बरे बोलत; परंतु वर्गांत शिकवि-ण्याच्या वेळच्या साऱ्या लकबा त्यांच्या व्याख्यानांतहि पाहावयास सांपडत.

डोळे, भुवया, गाल, मिशांचे आकडे यांच्या हालचालींची विरामचिन्हं देत देत त्यांचं एकेक वाक्य पुरं होई. मराठींत बोलतांना त्यांचे फार हाल होत. योग्य शब्द त्यांना चटकन आठवत नसे व मग असा एखादा शब्द ते ठेवून देत की हास्यरस सहज निर्माण होई. एकदा आपला मुद्दा विशद करण्यासाठी गोष्ट सांगण्याची त्यांना लहर आली. " एक होता राजा, आणि एक होती "एवढे सहा शब्द त्यांच्या तोंडून बाहेर पडले.पण मग घोडं एकदम अडलं! "राजा"चं स्त्रीलिंगी रूप राणी त्यांना कांही केल्या आठवेना ! अर्ध पाऊण मिनिट त्यांनीं खटपट केली, आणि शेवटीं ' राजी ' असा शब्द त्यांनीं ठोकून दिला. मुंबईचे एक डॉक्टर होते (त्याचं नांव मला आता आठवत नाही.) ते दरवर्षी आहार-विषयक व्याख्यान देत. आधुनिक सुधारणेमुळे आपला आहार किती गलिच्छ झाला आहे व त्यामुळे समाजाच्या तनदुरुस्तीवर किती अनिष्ट परिणाम होतात त्याचीं भयंकर चित्रं ते आवेशानं रंगवीत. हॉटेलांतल्या तळकट भज्यावर त्यांचा फार कटाक्ष असे. चहावर तर अर्थातच असे आणि आदल्या रात्रीचीं उरलेलीं भजीं दुसऱ्या दिवशीं पुन्हा पाण्यांत कालवून गरम ताजीं भजीं कशीं करण्यांत येतात त्याचं मोठं रसभरित वर्णन ते करीत. त्यांचीं व्याख्यानं ऐक-णारे श्रोते चहावर आणि भज्यांवर बहिष्कार घालीत नसत, परंतु डॉक्टर-मजकुरांच्या व्याख्यानाला गर्दी होत असे.

नाटककार देवलांचे बंधु रावबहादुर देवल संगीत संशोधक म्हणून प्रसिद्ध होते. आपल्या भारतीय संगीतांत हार्मोनियममध्ये वाजणारे बाराच स्वर नसून बावीस श्रुति आहेत, आणि हार्मोनियममधले स्वर ' टेंपर्ड ' असल्यामुळें ते शास्त्रोक्त व शुद्धहि नाहीत, असा त्यांचा सिद्धान्त होता. त्यांना बोलता मुळीच येत नसे, आणि जो सिद्धान्त मांडायचा त्याचा स्पष्ट समज त्यांना तरी पडला आहे की नाही अशी श्रोत्यांना शंका यावी इतका गोंधळ ते करून टाकीत; परंतु त्यांचं व्याख्यान असलं की चांगली गर्दी होत असे, कारण त्यांच्या मुद्यांचं स्पष्टीकरण करण्यासाठी अबदुल करीम खांसाहेब मधून मधून गाऊन दाखवीत आणि मधेच " आता व्याख्यान पुरे झालें, खांसाहेबांचं गाणंच होऊं द्या " असा आग्रह धरतां येतो हें लोकांना माहीत झालं होतं. एकदा पंडित विष्णु दिगंबर पलुस्करांचं व्याख्यान झालं. डोळ्यांना काळा चष्मा लावलेली भव्य मूर्ति, खणखणीत आवाज, उत्तम प्रतिपादन आणि बोलण्याची रुबाबदार

शैली या गुणामुळें त्यांचं व्याख्यान उत्तम झालं. परंतु नुसत्या व्याख्यानानं पोट भरलं म्हणून ढेकर द्यायला श्रोते तयार नव्हते. त्यांनी पंडितजींना गाण्याचा आग्रह केला आणि मग वसंतुऋतुतल्या रात्रीच्या पहिल्या प्रहरीं, चंद्रिकेच्या मंद सुखकारक प्रकाशांत, आम्रमंजिरींचा सुगंध हवेंत दरवळलेला असतांना " सुमरन (स्मरण) कर ले मेरे मन " या भजनाचे शब्द पंडितजींच्या मधुर पल्लेदार आवाजांत निघाले. त्यांची माझी आठवण कधी बुजणं शक्य नाही. त्या आलापांचे तरंग त्या जागेंत अजूनहि कदाचित् रेंगाळत असतील !

प्रतिवर्षीचे कांही वक्ते जसे ठरलेले असत तसेच व्याख्याता व अध्यक्ष अशांच्या कांही जोड्याहि ठरलेल्या होत्या. अशांपैकी विशेष उल्लेखनीय जोडी म्हणजे प्रो. भाटे आणि प्रो. काळे यांची. भाट्यांचं व्याख्यान असलं की काळे अध्यक्ष असायचे आणि काळे वक्ते असले की भाटे अध्यक्षाच्या खुर्चीत असायचे हे ठरलेलं ! व्याख्यान-मालेंतली उपवक्त्यांची प्रथा अगदीं प्रारंभापासूनची आणि जुनी आहे. कधीकधी नवीन उपवक्ते व्यासपीठावर चढून बोलत. मराठीं कवितेवरच्या कुणाच्या तरी एका व्याख्यानानंतर नाटककार राम गणेश गडकरी एका उपवक्त्याचा मुद्दा खोडून काढण्यासाठीं पुटपुटत जागेवरून उठले, तरा तरा चालत जाऊन व्यासपीठावर चढले, "अध्यक्ष महाराज आणि सभ्य स्त्रीपुरुष हो—" अशी खणखणीत सुरवात त्यांनीं केली, पण मग एकदम त्यांचं सारं अवसान संपलं, आपलं म्हणणं नीट कसं मांडावं हे त्यांना सुचेना, आणि " मला एवढंच सांगायचं की माझ्या आधीच्या वक्त्यांनी आपल्याला जें सांगितलं ते निखालस चूक आहे. " एवढीच शापवाणी उच्चारून ते खाली उतरले !

परंतु व्याख्यानानंतर बोलणाऱ्या उपवक्त्यांत नवीन रंगरूटांची भर क्वचित्च होत असे. या बाबतची मिरासदारी चालविणारे चार सहा ठरीव महाभाग होते. कुणाचंहि कुठल्याहि विषयावर व्याख्यान होऊन गेलेलं असो, ही ठरीव माणसं उठलीं नाहींत आणि बोलली नाहींत असें कधीं होत नसे. क्वचित् झालं तर लोकांना चुकल्याचुकल्यासारखं वाटे. व्याख्यानाला रंग भरला नाहीं अशी कुजबुज सुरू होई. या ठरीव उपवक्त्यांत न्यायरत्न विनोद यांचे श्वशुर श्रीयुत म. गो. अभ्यंकर हे सगळ्यांत ठरीव होते. त्यांचा धंदा वकिलीचा होता, आणि मला वाटतं आप्पा बळवंत चौकांतलं कोपऱ्यावरचं

त्यांचं राहतं घर अजूनहि आहे. या गृहस्थांना उपवक्ता म्हणून बोलण्याची भयंकर हौस असे, आणि सर्व विषयांत आपली गति आहे असा त्यांचा समज असे. त्यामुळें इतर कुणी बोललं नाहीं तरी म. गो. अभ्यंकर बोलणारच याबद्दल आमची खात्री असे व उपवक्त्यावाचून सभा सुनी चालली असा रंग दिसल्याबरोबर "म. गो. उठा !" "म. गो. बोला !" असं आम्ही ओरडत असूं, आमच्या ओरड्याचा ते कनवाळू सद्गहस्थ मानहि ठेवीत. ते आपल्या जागेवरून उठून पायांतला पुणेरी जोडा फटफटवीत व्यासपीठाकडे जाऊं लागलेले दिसले की सभेंत चौफेर टाळी होत असे. म. गो. काय बोलणार याबद्दल कुणाला उत्सुकता नसे; परंतु व्याख्यान उपवक्त्यांवाचून सुनं नाहीं, उत्तर-प्रत्युत्तरांचा रंग नेहमीप्रमाणें थोडा तरी भरेल या कल्पनेनं आम्ही सर्वजण खुष होत असूं !

* * *

: ४ :

वसंत—व्याख्यानमालेंतील एखाद्या व्याख्यानाला उपवक्त्यांची उलटसुलट भाषणं, मुख्य वक्त्याचं उत्तर, अध्यक्षांचा समारोप असा विशेष रंग भरला की सभा आटपायला रात्रीचे नऊदेखील वाजत; परंतु सामान्यतः व्याख्यान सवा-आठ साडेआठला आटपे, आणि त्या सुमारास व्याख्यानाच्या जागेपासून सदाशिव, नारायण, शनिवार इत्यादि पेठांकडे फुटणाऱ्या श्रोत्यांचे 'अमदयानं भाषणाची बहार केली, तमका मूर्खासारखं बोलला, अमक्यानं तमक्याची खाशी उडविली' अशा प्रकारचे उदगार ऐकूं येण्यासारखं असत; त्यावेळीं 'केसरी' आठवड्यांतून एकदांच निघत असे. परंतु वसंतव्याख्यानमालेंत होणाऱ्या व्याख्या-नांचा गोषवारा प्रत्येक मंगळवारच्या अंकांत देण्यांत येत असे. व्याख्यानांचे बरेच विस्तृत वृत्तांत 'ज्ञानप्रकाश' मध्यें वाचावयास मिळत, व एखाद्या व्याख्या-नांत उत्तर-प्रत्युत्तरांच्या फैरी कशा झडत्या याची कल्पना त्यावरून येण्यासारखी असे. ज्ञानप्रकाशांतल्या या वृत्तान्तांत टाळ्यांचे कंस असत. क्वचित् "हंशा" हि छापलेला असे, पण टाळ्यांपेक्षां हंशाच्या कंसांचा रिपोर्टांत अधिक सुळसुळाट व्हावा असली व्याख्यानं मात्र त्या वेळीं होत नसत.

संध्याकाळीं जशी वसंत-व्याख्यानमालेंतली व्याख्यानं असत, तशी रात्री कीर्तनें असत. हीं कीर्तनं गावांतल्या वेगवेगळ्या पेठांत असत आणि ती बहुधा त्या त्या पेठांतल्या मारुतीपुढें होत. कीर्तनासाठीं इतर देव सोडून मारुतीचीच निवड कां करण्यांत येत असे हे मला एक कोडेंच वाटे. व मला त्याचा खुलासा सुचे तो एव-ढाच की, राम, कृष्ण इत्यादि देव संसारी असल्यामुळें पहाटे दोन-दोन तीन-तीन वाजेपर्यंत जाग्रण करण्यास त्यांना ' घरची ' परवानगी मिळणं कठीण आहे हें ओळखून ज्याची शेजारति करावी लागत नाहीं अशा ब्रह्मचारी बलभीमापुढची जागा हे कीर्तनाचे व्यवस्थापक पसंत करीत असले पाहिजेत. इतर देवांपेक्षा मारुति अधिक सोयीचा वाटण्याचं आणखी एक कारण होतं तें असं की, बाकीचे देव देवळांत राहणारे. त्यांच्यापुढे कीर्तन करायचं म्हटलं की जितके लोक देवळाच्या परिसरांत मावतील तितक्यांनाच तें ऐकायला मिळणार, उलट

मारुति मात्र उघड्यावरचा देव, म्हटलं तर त्याला देऊळ नाहीं, पण म्हटलं तर सबंध रस्ता इतकेंच नव्हे तर चार रस्त्यांचा चौक म्हणजे देखील एक प्रकारे त्याच्यापुढचीच जागा, आणि रस्त्यांत किंवा चौकांत पांचपांच सहासहा हजार श्रोत्यांची सोय व्हायला हरकत नाहीं.

या कीर्तनांच्या बाबतींत पेठापेठांत म्हणजेच मारुति–मारुतींत मोठी चुरस असे. गवत्या मारुतीपुढे अमक्या प्रसिद्ध बुवांचं कीर्तन झालं तर लगेच दुसऱ्या रात्रीं भांग्या मारुतीपुढे त्याच्याहून सवाई कीर्तीचे जे बुवा असतील त्यांचं कीर्तन झडत असे. पत्र्या मारुति, डुल्या मारुति, सोन्या मारुति अशा नांवांच्या झाडून साऱ्या मारुतीपुढचे रस्ते आणि चौक हजारो स्त्री-पुरुषांच्या गर्दीनं फुलून जात. रहदारी बंद करण्याचा प्रश्नच नसे. कारण रात्रीं टांग्यांची वर्दळ नसेच. शहरांत मोटारी फारशा नव्हत्याच. ‘बस’ नांवाच्या वाहनांचा प्रकार तर ऐकिवांतहि नव्हता. हजारो लोक अगदीं निर्वेधपणानं कीर्तन ऐकण्यासाठीं रस्त्यांत बसलेले असत. वसंत व्याख्यानमालेंतल्या व्याख्यानांना स्त्रिया आलेल्या मला आठवत नाहींत. परंतु कीर्तनांच्या श्रोत्यांत मुख्य भरणा विधवांचा, वयस्क संसारी बायकांचा व मुलाबाळांचा असे. हा जनानी समाज बसून राहिलेला असे. पुरुष जमत ते बहुधा गर्दीच्या कडेला उभे राहत, आणि एकच एक कीर्तन ऐकत बसण्याऐवजी या मारुतीपुढचं थोडं, त्या मारुतीपुढचं थोडं, अशा प्रकारें साऱ्याच कीर्तनांची थोडी थोडी चव घेत ते रात्रभर हिंडत राहत. या फिरत्या श्रोत्यांत आम्ही असूं. आमच्या टोळक्यांत सुपेकर नांवाचा एक खोडकर विद्यार्थी होता. कीर्तन शांतपणे ऐकण्यापेक्षां कांही तरी गंमत करण्यासाठीं तो आमच्याबरोबर येत असे. त्याची ठरलेली मस्करी ही की, सकाळी पोहण्याच्या वेळेस धरून पिशवींत घालून आणलेल्या बेडकांपैकीं एकदोन बेडूक तो काढी व गर्दींत भिरकावून दई, आणि त्यानं तसं केलं की, बायकापोरं किंचाळ्या फोडून उठत, धावूं लागत, आणि क्षणभर गर्दी हलून एकच गोंधळ उडे. एका मारुतीपुढें ही गंमत केल्यावर आमचा सुपेकर मुकाट्यानं तेथून सटके आणि बेडकांनी भरलेली आपली पिशवी घेऊन दुसऱ्या मारुतीकडे मोर्चा वळवी !

कीर्तनकाराची योग्यता आणि लोकप्रियता-विद्वत्ता, पांडित्य, वक्तृत्व या गुणांपेक्षां त्याच्या गायनकलेंतील नैपुण्यावरून ठरत असे. यामुळे ज्यांचा मूळ

गवयाचा पेशा असे गवयी पेशान्तर आणि वेषान्तर करून कीर्तनकार बनले होते. काशीकरबुवांचं प्रस्थ त्या काळीं फार होतं. कीर्तनाच्या वेळीं ते लोकांना हवा तसा गाण्याचा रंग भरीत व गातांना तालाच्या खटपटीहि पुष्कळ करीत. त्यांना गाण्याचा चांगला समज आणि हौस होती. भास्करबुवा बखल्यांची मैफल कुठेहि झाली की ते उपस्थित असत, आणि " या बुवा, या, असे पुढे या " म्हणून भास्करराव त्यांना जवळ समोर बसायला लावीत. एकमेकांचे मुख्य पार्टी फोडण्याच्या खटपटी नाटक मंडळ्या करतात त्याप्रमाणें एकमेकांचे कीर्तनकार फोडण्याचे प्रयत्न मारुतीवाले करीत असत. आपला पट्टीचा कीर्तनकार दुसऱ्या मारुतीवाल्यांना फोडतां येऊं नये म्हणून चांगली बिदागी देऊन त्याला सबंध ' सीझन ' साठी गुंतविण्याची युक्तीहि कांही मारुतीवाले करीत.

जो उत्तम गाणारा त्याच्या कथेला गर्दी लोटायची हा नियम अगदींच निरपवाद नव्हता. डॉक्टर पटवर्धन यांची कीर्तनंहि तुडुंब गर्दीचीं होत असत. गंधर्व मंडळीच्या नाटकांचं आकर्षण गाणं तर महाराष्ट्र नाटक मंडळीच्या कांहीं गद्य नाटकांकडे लोकांना खेचणारा गुण त्यांतील राष्ट्रीय वृत्तीचा परिपोष करणारी भाषणं. या नाटकाच्या बाबतींतल्या न्यायासारखाच कीर्तनांतलाहि न्याय होता. काशीकरांसारखे हरदास पट्टीचे गाणारे आणि नाटकी ढंगानं गाऊन लोकाना संतुष्ट करणारे होते, तर डॉक्टर पटवर्धन शिवाजीसारख्या राष्ट्रपुरुषांचीं आख्यानं लावून गर्दी खेचीत. डोक्याला पांढरा स्वच्छ रुमाल बांधलेली त्यांची मूर्ति, उंच मजबूत हाडपेरामुळें व सतेज करारी चर्येमुळे रुबाबदार दिसत असे. त्यांच्या आख्यानाचा विषयच वीररसाचा असे, आणि त्यांची स्वतःची स्वातंत्र्याची तळमळ, लोकजागृतीची आस्था, प्रसंग - वर्णनाची सुंदर हातोटी, प्रसंगोचित नाट्य, आवेशयुक्त वाणी इत्यादि गुणांमुळे त्याचं आख्यान हजारो श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभं करी. त्यांच्या आख्यानाप्रमाणेच त्यांच्या कीर्तनाचा पूर्वरंगहि सामान्य लोकांना आवडत असे. कारण ते आपल्या पूर्वरंगांत द्वैताद्वैताची, मायाब्रह्माची किंवा सगुणनिर्गुणाची वेदान्ती चर्चा न करतां आधुनिक सुधारणेनं बहकलेल्या समाजावर कोरडे ओढण्याच्या धोरणानं धर्माचं विवरण करीत. विधवाविवाह, प्रेमविवाह इत्यादि ' फॅडां 'चा ते निर्घृण समाचार घेत, आणि तरुणांच्या केसांचीं झुलपं, स्त्रीपुरुषांचे आहारविहारांचे चोचले, उत्तान भावना उद्दीप्त करणारीं नाटकं, चित्रपट, कादंबऱ्या, साहेबांचे

आचारविचार व आमच्या समाजांत रूढ होऊं पाहणारी त्यांची भ्रष्ट नक्कल, यांवर ते सडकून ताशेरे झाडीत. त्यांच्या या प्रचारापासून बोध घ्यायची कुणाची तयारी होती अशांतला भाग मुळींच नव्हता. उलट त्यांची मर्मभेदक उपहासपूर्ण टीका ऐकून टाळ्या पिटणाऱ्या लोकांत ज्यांवर ती टीका असे त्याच आचार विचारांच्या तरुणांची गर्दी असे; परंतु घटकाभर करमणूक करून घ्यायला त्यांची ना नसे. डॉ. पटवर्धनाचं कीर्तन असलं की लोकांचे थवेच्या थवे तिकडे लोटायचे आणि चार घटका रस्ते आणि चौक तुडुंब भरलेले असायचे !

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी वासंतिक सुट्टींत पुणें शहरांत कोणकोणत्या मौजा असत त्यांचं हे वर्णन आणखी एका गोष्टीचा उल्लेख केल्याखेरीज पूर्ण होणार होणार नाही. ती गोष्ट म्हणजे रसाची गुऱ्हाळं ! ' दुकानं ' नव्हे, ' गुऱ्हाळं ' आज या नव्या विस्तीर्ण पुणें शहरांत उसाचा रस पिण्याच्या ज्या जागा ठिकठिकाणीं मला दिसतात त्यांना 'दुकानं' हे क्षुद्र नांव शोभेल; परंतु मी फर्ग्युसन कॉलेजांत शिकत होतो त्या वेळेस रसपान करण्याचीं जीं ठिकाणं होतीं त्यांचा ' दुकान ' म्हणून निर्देश केल्यास त्यांचा अपमान होईल. कारण त्यांचं वैभव आणि त्यांचा थाट फार वेगळा होता. रसपानाची विशेष लोकप्रिय ठिकाणं दोन होतीं. एक विश्रामबागेसमोर एका घराच्या माडीखाली पोर्चसारखी मोकळी जागा आणि पलीकडे आंगण होतं त्या जागचं आणि दुसरं तुळशीबागेसमोरच्या ओळीला जवळजवळ मंडईच्या कोपऱ्यावरचं. हे दुसरं गुऱ्हाळ मला वाटतं करंदीकर नांवाच्या ब्राह्मणाचं होतं. ' रमणीय रसवंती ', ' मूनलाईट रसवंती ' यासारख्या नांवाच्या पाट्या रंगवून लावण्याची सुधारणा त्या वेळेस माहीत नव्हती. मला वाटतं रसपानाच्या जागेवर नांवाची पाटी लावण्याचा उपक्रम केव्हां आणि कुणी केला याबद्दलचं संशोधन केल्यास ' मोदी गणपती ' जवळच्या हौदालगत एक गुऱ्हाळ होतं त्याचं नांव घ्यावं लागेल. सुमारे १९२० सालीं या गुऱ्हाळवाल्यानं ' रसवंती ' अशी पाटी आपल्या दुकानावर लावली! ह्याच्या आधीच्या दिवसांत मी वर उल्लेखिलेल्या दोन ठिकाणांवर पाटीबिटी कांहीं नव्हती; परंतु हल्लीच्या ' दुकानां ' हून त्यांची ऐट व शोभा किती निराळी होती ! लहानशा जागेंत कशीबशी अंग दुमडून बसलेलीं, एकच उसाचं लहानसं कांडे पिळणारा छोटा लोखंडी हातचरक चालविणारी, आणि जिथे बेवड्याच्या गुत्त्यांत ग्लास टेबलावर मांडलेले असावेत तसे जाड ग्लास टेबला-

वर मांडलले असतात व गिऱ्हाईक दोन आणे फेकून एकदाच रसाचा ग्लास पितात अशीं आजची हीं सर्वस्वी काव्यहीन ‘ दुकानं ’ कुणीकडे, आणि त्या दिवसांतली तीं गुऱ्हाळं कुणीकडे !

या गुऱ्हाळांत रसपान करणारांसाठीं बाकं खुर्च्या नसत. स्वच्छ सारवून आकर्षक केलेले मातीचे ओटे असत. ताज्या रसाचं काठोकांठ भरलेलं भलं मोठं वीस शेरांचं तपेलं अशाच सारवून स्वच्छ केलेल्या जागीं तयार असे. रस देणाऱ्या माणसापुढच्या बैठ्या ओट्यावर घासून अगदीं चकचकीत केलेलीं पितळेची फुलपात्रं आणि शेर शेर मापाच्या चकाकणाऱ्या तपेल्या पालथ्या मांडलेल्या असत. जवळच जाड जाड उसांचे ( पांढऱ्या गुलाबी तुऱ्यांच्या किर-कोळ उसांचं पीक देणारं अमेरिकन बियाणं तेव्हां इकडे आलेलं नव्हतं !) भारेच्या भारे शिगोशिग पडलेले असत. पलीकडच्या मोकळ्या जागीं एका खड्ड्यांत भला मोठा लाकडी चरक मांडलेला असे. त्या खड्ड्यांत एकाच वेळीं दोन दोन चार चार ऊंस चरकांत घालून पिळण्यासाठीं दोन्ही बाजूंस दोन इसम उकिडवे बसलेले असत. चरकाच्या घाण्याला बैल जुंपलेले असत. चरका-बाहेर येणाऱ्या रसाची लठ्ठ धार मोठ्या तपेल्यांत पडत असे आणि घाणा चालू असला कीं ‘ न्यंऽऽऽव ’ असा खर्जांतला बसका अनुनासिक स्वर सारखा चालू राही. या सुंदर स्वराच्या पार्श्वसंगीतावर गिऱ्हाईकांचं रसपान चालत असे ! अर्धा ग्लास, फार तर एक ग्लास अशा दरिद्री मापानं त्या वेळची माणसं रस पीत नसत. कांहीं कांहीं गिऱ्हाईकं संध्याकाळच्या वेळीं अंगांत साधा सदरा आणि खांद्यावर फडकं अशा थाटांत येऊन चार चार सहा सहा शेर रस उठ-वीत. चार सहा मित्रांचं एकादं टोळकं आलं आणि त्यांची आपापसांत स्पर्धा लागली तर रसाचं मोठं तपेलं खलास होई. परंतु या पट्टीच्या शोकिनांची गोष्ट सोडली तरी पावशेराचं फुलपात्र मागविणारं गिऱ्हाईक फार क्वचित् असे. बहुतेक जण शेराची तपेली तरी मागवीत आणि फुलपात्रांतून पिण्याऐवजी तपेली उंच धरायची आणि रसाची धार जी तोंडांत सोडायची ती गटागट रस पिऊन झाल्यावर तपेली खाली ठेवायची असा रसपानाचा मान्य विधि असे !

आज एका मोठ्या ग्लासाला दोन आणे पडतात. त्या दिवसांत रुपयाला वीस-पंचवीस शेर रस मिळे. एकदम भरपूर पुष्कळ घेतला तर बत्तीस शेर-सुद्धां ! भरपूर लिंबूआल्यासकट ! या स्वस्ताईमुळें उन्हाळ्यांत घरोघर वांस-

तिक पूजा होत असत. हरभऱ्याची डाळ स्वस्त होती. कच्चे आंबे, मुबलक मिळत असत. खोबरं स्वस्त होतं. तेल, फोडणीचं सामान सढळ हातानं वापरतां येत होतं. ‘ भावनियंत्रण ’ हा शब्द ऐकूनदेखील माहीत नव्हता. आंब्याची डाळ आणि पन्हं किंवा उसाचा रस अशा थाटाची वासंतिक पूजा पांच दहा रुपयांत होत असे; आणि मध्यमवर्गीय माणसांना हा वासंतिक विलास आवाक्या-बाहेरचा वाटत नसे. वसंतपूजेच्या वेळचे मंत्र उच्च स्वरांत म्हणून आंब्याची डाळ व रस यांचे यथेच्छ सेवन करून, यजमानाला मनःपूर्वक ‘ शांतिरस्तु तुष्टि-रस्तु ’ चा आशीर्वाद देऊन, ढेकर देत घराबाहेर पडलेले, उघड्या अंगावर फक्त उत्तरीय टाकलेले किंवा साधा सदरा घातलेले, वसंतपूजेच्या वेळेस मिळा-लेल्या मोगऱ्याच्या गजऱ्याच्या फुलांचा वास घेत घेत भिक्षुकांचं संध्याकाळच्या वेळच्या अड्ड्याचं ठिकाण जें जोगेश्वरीचं देऊळ त्याकडे सावकाश निघालेले दत्तंभट गोविंदभट, नारायणभट, अशांची लहान लहान टोळकी म्हणजे पुणें शहरांतलं वसंतकालांतील एक ठराविक दृश्य होतं. नूतन मराठी विद्यालयांत तर अशी वहिवाट होती की, उन्हाळ्याच्या सुट्टीच्या आदल्या दिवशीं कुणा तरी मोठ्या माणसाचं विद्यार्थ्यांना उपदेशपर व्याख्यान सकाळी व्हायचं, आणि संध्याकाळीं शाळेतर्फे एकंदर सर्व विद्यार्थ्यांसाठीं रसपान व्हायचं. त्यासाठीं विद्या-र्थ्यांकडून कोणताही आकार घेण्यांत येत नसे. यथेच्छ रस प्यावा आणि पोटभर आंब्याची डाळ खावी. रसपानासाठी एकेका वर्गांतल्या विद्यार्थ्यांना पाळीपाळीनं सोडण्याची व्यवस्था केलेली असे; परंतु कांहीं विद्यार्थी स्वतःच्या वर्गाची पाळी तर साधीतच, परंतु शिवाय इतर वर्गांच्या विद्यार्थ्यांतहि घुसून रस पिण्याच्या आणि डाळ खाण्याच्या तीन तीन आवृत्त्या करीत. अशा खोडकर विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून शासनहि होत नसे. अरे लबाडा पुन्हा आलास काय अशा अर्थानं शिक्षकानं हास्य करावं आणि खोडकर विद्यार्थ्यानं किंचित् शरमून मान खाली घालावी एवढाच प्रकार होत असे. रसाला आणि आंब्याच्या डाळीला तोटा नव्हता. आठ आठ दहा-दहा शेर रस पिऊन आणि आंब्यांच्या डाळीचे वीस-पंचवीस द्रोण खाऊन ते सहज पचविणाऱ्या विद्यार्थ्यांचं कौतुक होत असे. नूतन मराठी विद्यालयांतला वासंतिक रसपानाचा हा विधि तिसऱ्या प्रहरीं जो सुरू होई तो दिवेलागणीपर्यंत चालू राही. वर्गावर्गांत विद्यार्थ्यांचा हर्षभरित गलका आणि ओरडा भरून राहिलेला असे. कितीक बाकं रसानं चिकट होऊन जात. डाळ

टाकून दिलेल्या द्रोणांच्या राशींच्या राशी इतस्ततः पडलेल्या दिसत. उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त विद्यार्थ्यांना निरोप देण्याच्या या प्रकारांत काव्य होतं खचित !

वसंतऋतूंत संध्याकाळीं बुधवार पेठेंतून सहज एक चक्कर टाकण्यांतसुद्धा केवढी मजा असे. बाहुलीच्या हौदापासून बुधवार चौकापर्यंतचा दक्षिणोत्तर रस्ता म्हणजे त्या वेळच्या पुण्यांतील रमत गमत सहल करण्याची एकच एक फॅशनेबल जागा होती. रस्ता आताच्या निम्म्यानं सुद्धां नव्हता. परंतु गाडीघोड्यांची वर्दळ अगदीं कमी असे. खडकावरले विडीवाले नाईक हातांत सलकडीं, डोक्याला जरीचा मंजिल अशा थाटांत सुंदर घोड्यांची जोडी हाकीत जात किंवा ‘ जगाचा इतिहास ’ लिहिणारे जे नातू परवा अकालीं कालवश झाले त्यांचे आजोबा तात्यासाहेब नातू पायांत पंजाबी चढाव, शुभ्र परीटघडी पोशाख, डाव्या खांद्यावर उंची करवतीकाठी उपरण्याची घडी, कानांत टपोऱ्या मोत्यांची भीकबाळी अशा रुबाबांत डाव्या गुडघ्यावर उजवा पाय आडवा टाकून छोट्या “ डॉग कार्ट ” ला जोडलेला देखणा पांढराशुभ्र घोडा हाकीत जात, परंतु सामान्यतः वाहनांची वर्दळ रस्त्यानं नसे. खरेदीविक्री सावकाश चाले. पंपूशेटच्या सुगंधी सामानाच्या दुकानांत तर गिऱ्हाईक क्वचित् दिसे; परंतु हें दुकान रस्त्यानं जाणाऱ्या लोकांच्या मोठ्या कुतूहलाचा विषय होता; कारण नाटकमंडळ्यांतल्या बड्या बड्या व्यक्तींची या ठिकाणीं बैठक असे. आज शहरांतील नामांकित सिनेमा नटनटींना प्रत्यक्ष पाहण्याची जी उत्कंठा लोकांत दिसून येते, तसलीच उत्कंठा त्या वेळच्या लोकप्रिय गद्य-पद्य नटांविषयी होती. पंपूशेटच्या दुकानाच्या अरुंद जागेंत पांढरेशुभ्र परीटघडी अभ्रे घातलेल्या गाद्यांवर लोडाला टेकून बसलेल्या या नाटकवाल्यांना पाहण्यासाठी लोक त्या दुकानावरून जातायेतांना मुद्दाम रेंगाळत.

त्या वेळेस बुधवारांतला तो हमरस्ता लक्ष्मीरोडनं कापला गेलेला नव्हता. आणि बेलबाग चौक अर्थातच नव्हता. एका बगलेनं बावनखाणीवरून येणारा रस्ता आणि दुसऱ्या बगलेनं मंडईकडून येणारा रस्ता बाहुलीच्या हौदापाशी ज्या ठिकाणीं मिळत असत त्या ठिकाणीं एक छोटी इमारत होती. तिला

'कोतवाल चावडी' म्हणत असत. (अजूनहि ही इमारत पेशवाईतल्या त्या नांवानंच ओळखली जाते.) तेथपासून बुधवारच्या चौकापर्यंत अरुंद रस्त्याची सलग पट्टी होती. या पट्टीवर 'नेटिव्ह जनरल लायब्ररी' (आताचं नगरवाचन मंदिर) ही एकच काय ती मोठी इमारत होती. बाकीच्या साऱ्या इमारती छोट्याछोट्याच होत्या. कापडाचीं कांही दुकानं होतीं, परंतु मुख्य कापड-बाजार हा समजला जात नसे. सुवासिक तेलं, प्रसाधनं (बायका स्नो, पावडर, लिपस्टिक अजून वापरूं लागल्या नव्हत्या!) साबण, स्टेशनरी, कटलरी मालाचीं बेलबागेच्या प्रवेशद्वाराजवळ (म्हणजे बोळकांडीजवळ! बोहऱ्यांचीं दोन बैठीं दुकानं होतीं, व त्यांच्यालगत 'गोडशाचं दुकान' होतं, त्याला डेक्कन कॉलेजांतल्या फॅशनेबल विद्यार्थ्यांचा मोठा आश्रय असे. पुस्तकाचं एकहि मोठं दुकान या रस्त्याला नव्हतं. धार्मिक पुस्तकं, डायऱ्या, पंचागं विकणारी चार बैठीं दुकानं फरासखान्याच्या हौदासमोर होतीं. आता ज्या ठिकाणीं मोटारी उभ्या करण्यासाठी भोवताली कठडें घातलेलें आवार केलेलं आहे त्या ठिकाणीं बाग होती, तिला बुधवारची बाग म्हणत असत. या बागेंत फिरायला येणाऱ्या लोकांसाठीं दारापाशीं चिवडेवाले, काबलीवाले उभे असत. 'भेळ' खाणं त्या वेळेस कुणाला माहीत नव्हतं. कोतवाल चावडीपाशीं एका बाजूस एका इराण्याचं दुकान होतं. तिथं औषधें, बिस्कीटे वगैरे जिनसा चांगल्या मिळत असत; परंतु त्या दुकानांत जाण्याची आम्हांला भीति वाटे. कारण त्या दुकानांत विलायती दारूहि मिळत असे. त्या दुकानाबाहेर हिरव्या-तांबड्या काचांचा मोठा कंदील होता तो पाहून आमची कल्पना होई की, दारू विकणाऱ्या सर्वच दुकानांवर ही धोक्याची निशाणी लावण्यांत येत असावी! औषधं घ्यायचीं झालीं तर आम्ही तीं समोरच्या गणू शिंद्यांच्या दुकानांत घेत असूं. सोडा, लिंबू आणि आईस्क्रीम विकणारें हे एकच दुकान होतं. संध्याकाळच्या वेळेस दुकानापुढच्या जागेंत रस्त्यालगत आइस्क्रीम तयार करण्याचं भांडं, छोट्या छोट्या चिनी मातीच्या बशा, आणि पत्र्याचे चमचे असं साहित्य मांडलेलं असे तें पाहून आइस्क्रीमची चव घ्यावी असं वाटे; परंतु मध्यमवर्गीयांनीं खुशाल रस्त्यालगतच्या बाकांवर बसून सोडालिंबूच्या बाटलीसारखा किंवा आइस्क्रीम यासारखा साहेबी पदार्थ पिण्याखाण्याइतपत सुधारणा झाली नव्हती. आपल्याला कुणीं पाहिलं तर काय म्हणतील अशी लोकमताची भीति वाटे.

मात्र त्यावेळची बुधवार रस्त्याची खरी शोभा होती ती म्हणजे फुलांच्या दुकानांची ! कोतवाल चावडीपाशीं माळ्याचीं दोनचार दुकानं होतीं, विठोबाच्या छोट्या देवळाच्या दाराशीं दोन होतीं; आणि फरासखान्याच्या हौदासमोर तर फुलबाजाराची छोटीशी पेठच असल्यासारखं होतं. आधीच तुडुंब भरलेल्या या हौदांत वरून पाण्याची मोठी धार पडतांना दिसे. आणि हौदासमोरच्या दुकानांतून जाई–जुई–मोगऱ्यांचे ढीगच्या ढीग, सुंदर गावठी गुलाबाच्या राशी, तुळशीचे आणि बिल्वपत्रांचे पुंजके पडलेले असत आणि फुलवाले हार आणि गजरे तयार करण्यांत गुंतलेले असत. मध्यमवर्गीय ब्राह्मणांच्या घरोघर त्या वेळीं देवपूजा होत असे, आणि महिन्यास रुपया, बारा आणे, आठ आणे, चार आणे अशा रतिबानं फुलं आणण्याचा प्रघात असल्यामुळें या निरनिराळ्या दर्जाच्या तयार पुड्यांचे लहान लहान ढीगहि दुकानाच्या पुढच्या फळ्यांवर मांडलेले असत. लगीनसराई चालू असली म्हणजे चकाकत्या पांढऱ्या कलाबतूनं मढविलेले मोठमोठे कमालखानी हारहि दुकानादुकानांत टांगलेले दिसत. या दुकानांतल्या पुष्पसंभाराचा सुगंध हवेंत दरवळलेला असे. वसंतऋतूंतील संध्याकाळच्या वेळेस कोतवाल चावडीपासून चौकापर्यंत सहल करीत करीत हौदासमोरच्या या दुकानापुढें येऊन घडी अर्धा घडी उभं राहण्यांत किंवा हौदाच्या कट्ट्यावर गप्पा मारीत बसण्यांत मोठी मौज होती !

* * *

: ५ :

शहरांतल्या निरनिराळ्या मारुतीपुढच्या कीर्तनांची करमणूक फुकटांतली असे, पण ती नैमित्तिक असे. वर्षांतून बारा महिने चालूं राहणारी पण पैसे टाकले तरच मिळणारी विकतची करमणूक निराळी होती; ती म्हणजे सिनेमा आणि नाटक-तमाशे. बोलक्या चित्रपटांचे दिवस अजून पुष्कळ दूर होते. देशी मूक चित्रपटांचा धंदाहि नुकताच जन्मला होता. मंडईसमोरचे "आर्यन" हें एकच सिनेमाचं थिएटर होतं. तिथं फाळक्यांचा पहिला चित्रपट व बाबूराव पेंटरांच्या महाराष्ट्र फिल्म कंपनीचा पहिला चित्रपट दाखविला गेला तेव्हां प्रचंड गर्दीचं रेकॉर्ड झालं.पुढे कांही वर्षांनी पुण्यात जे दुसरं चित्रपटगृह सुरू झालं तें मला वाटतं बावनखाणीसमोरचं 'ग्लोब' थिएटर. तेंहि मूक चित्रपटांच्या जमान्यांतच सुरू झालं. लष्करांत चित्रपटगृहं अर्थातच होतीं. परंतु शहरापुरतं बोलायचं झालं तर कितीक वर्षं तरी सिनेमा म्हणजे आर्यन सिनेमा अशी स्थिति होती. या सिनेमाचे मॅनेजर श्री. बळवंतराव वाघ होते. अंगांत कोट, डोक्याला टोपी अशा साध्या वेषांतले, साधारण ठेंगणेसे, आणि मध्यम बांध्याचे हे गृहस्थ आपल्या कामांत मोठे कुशल होते. आर्यन सिनेमा लोकप्रिय व्हावा यासाठी ते नेहमी नवे नवे उपक्रम करीत. त्या वेळीं चित्रपटांना जरी वाचा फुटली नव्हती तरी ते पहाणाऱ्या प्रेक्षकांची संगीताची हौस भागविण्याची व्यवस्था थिएटरांत केलेली असे. पडद्यापुढेंच पायपेटी आणि तबला असे. चित्रपट चालूं झाला की या वाद्यांचा गोंगाट चालूं होई. चित्रपटांतल्या प्रसंगांना शोभतील अशीं निरनिराळ्या रागांतलीं लोकप्रिय नाटकातली पदं वाजविण्याची खटपट पेटीवाला करी. नागपूर-वऱ्हाडकडे आणि उत्तर हिंदुस्थानांत तर मूक पटांना अशा पार्श्वसंगिताची जोड देण्याऐवजी प्रेक्षकांची निराळीच सोय थिएटरवाले करीत. इंग्रजी चित्रपटांची भाषा सिनेमाच्या बहुसंख्य आश्रयदात्यांना कळणार नाही म्हणून धावती टीका करणारा निवेदक पडद्यापुढे बसविलेला असे. तो सर्व प्रसंगांचीं वर्णनें करी. पात्रांची संभाषणं देखील बोलून दाखवी; इतकंच नव्हे तर, वर्णन करतांना आपल्या स्वतःच्या

स्वतंत्र स्वतंत्र काव्यविनोदाचा मसाला भरीला घाली. एखाद्या निवेदकाची लोकप्रियता एवढी मोठी असे की चित्रपटाच्या बरोबरीनं त्याचं आकर्षण लोकांना वाटे, आणि एखाद्या खेळाला तो आजारी असला किंवा रजेवर असला आणि त्याची जागा दुसऱ्या कुणी घेतली असली तर ती गोष्ट प्रेक्षकांना मंजूर नसे. आम्हांला आमचा नेहमीचा आवडता निवेदक हवा असा ते ओरडा करीत आणि पडद्यावर दगड फेकून खेळ बंद पाडायलासुद्धां ते कमी करीत नसत.

चित्रपटावर अखंड कॉमेंटरी करणाऱ्या निवेदकांची ही संस्था पुण्यांत व एकंदर महाराष्ट्रांतच कधी आली नाहीं. परंतु पेटीतबल्याचा मात्र सर्रास प्रचार होता. आर्यन सिनेमांत पेटीवादनाच्या कामावर चांगला मनुष्य असावा अशी श्री. वाघ यांची खटपट असे. संगीत नाटकमंडळ्यांतले नामांकित पेटीवाले नोकरीला ठेवणं शक्य नव्हतं. परंतु कीर्तन वाजविणारे चांगले पेटीवाले मिळत असत. कीर्तन सांभाळून हा जोडधंदा त्यांना करण्यासारखा होता. कीर्तनकारांची साथ करण्याबद्दल त्या वेळेस विशेष प्रसिद्धि पावलेले दोन पेटीवाले मला आठवतात. जरा झकपक पोशाख करणारे, किंचित् वाकड्या व बसक्या नाकाचे, भुवयांमधोमध बुक्क्याची काळी रेघ लावणारे भालेराव आणि लॉर्ड आणि जाडंभरडं धोतर नेसणारे, गबाळग्रंथी पोशाख करणारे, जरा आडव्या अंगाचे, ठेंगणे साठे. आर्यन सिनेमांत पेटीतबला चांगला असावा असा ज्याप्रमाणें श्री. वाघ यांचा कटाक्ष असे त्याचप्रमाणें चित्रपटाची जाहिरात करण्याचे नवे नवे प्रकारहि ते शोधून काढीत. पुढें 'जाहिरात-जनार्दन' ही पदवी ज्यांनीं आपल्या नांवासागें लावली त्या श्री. अनंत हरी गद्र्यांचा जाहिरातबाजीच्या क्षेत्रांतल्या कारकीर्दीचा जन्म आर्यन सिनेमाच्या वाघांच्या कचेरींतच झाला. चित्रपटांच्या जाहिरातीप्रमाणें प्रेक्षकांच्या सुखसोयीकडे देखील श्री. वाघ विशेष आस्थेने लक्ष पुरवीत. एकदां तर उन्हाळ्याच्या दिवसांत वरच्या दर्जाच्या प्रेक्षकांच्या अंगावर पिचकाऱ्यांतून सुगंधी पाण्याचे फवारे सोडण्याचा उपक्रम त्यांनीं केला होता!

चित्रपट बोलके नव्हते आणि देशी चित्रपट वर्षांतून एखादाच निघत असे. त्यामुळें नाटकांवर चित्रपटांचं संकट आले असं म्हणतां येत नव्हतं. उलट प्रोज आणि संगीत नाटकमंडळ्यांच्या विशेष भरभराटीचा तो काळ होता. पुण्यांतलं



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 2... वि: ...
नों: दि: ...

सगळ्यांत जुनं थिएटर—ज्या ठिकाणीं किर्लोस्करांच्या ‘ सौभद्र ’ नाटकाचा पहिला प्रयोग झाला तें आनंदोद्भव थिएटर. तें काळाच्या उदरांत केव्हांच गडप झालं होतं. त्यानंतरचं पुण्यांतलं गाजलेलं मोठं थिएटर म्हणजे आर्यभूषण. या थिएटरांत महाराष्ट्रांतल्या सर्व उत्तमोत्तम नाटकमंडळ्यांची हजेरी लागली होती. परंतु नागझरीच्या पुलाच्या अलीकडे गणेश पेठेंतलं हें थिएटर म्हातारपणीं तमाशांच्या स्वाधीन झालं होतं. दाणेआळींतलं विजयानंद, मंडईपासून कोतवाल चावडीकडे जाणाऱ्या रस्त्यावरचं ‘ नूतन आर्यभूषण ’ बावनखणी समोर नव्यानं झालेलं ‘ ग्लोब ’ आणि किर्लोस्कर नाटक मंडळीनं स्वतःचं म्हणून बांधलेलं नानावाड्याशेजारचं ‘ किर्लोस्कर ’. थिएटरं चारच आणि पुण्यांत मुक्काम करूं पाहणाऱ्या गद्यपद्य नाटक-मंडळ्या सहज डझनभर अशी स्थिति होती. त्यामुळें आज ज्याप्रमाणे डझनावारी चित्रपट तयार परंतु ते लावण्यास थिएटरच नाही, अशी पंचाईत झालेली दिसते, त्याप्रमाणेच त्या वेळीं नाटक-मंडळ्यांची कुचंबणा होत असे. किर्लोस्कर थिएटर खूप गाजावाजा आणि खर्च करून मुंबईच्या रॉयल ऑपेरा हाऊसच्या तोडीचं म्हणून बांधलेलं परंतु तें आकारानं खूप मोठं होतं एवढंच. सोयीच्या दृष्टीनं विशेषतः सगळ्या जागीं रंगभूमिवरील पात्रांच्या आवाज ऐकूं येण्याच्या दृष्टीने प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरण्याजोगं तें नव्हतं. त्या मानानं जुनं विजयानंद थियटर किती तरी अधिक चांगलं होतं. आकारानं लहानसंच पण प्रयोगांच्या रंगतीला फारच सोयीचं. बाकीचीं थिएटरं गुंतलेलीं असलीं की नाटक—मंडळ्या ‘ नूतन आर्यभूषण ’ला शरण जात असत. परंतु तें थिएटर म्हणजे स्थापत्यकलेचा एक अजब नमुना होता. प्रेक्षकगृहाच्या दुसऱ्या मजल्याशीं समांतर असलेली रंगभूमि; प्रेक्षकांची नजरबंदी करणारे जागोजागचे खांब, एकीकडे सांगली-मिरजेकडील लोण्याचे डबे विकणारं दुकान आणि दुसरीकडे ‘ दूधलोटी ’ विकणारं पुरभय्याचं ‘ मथुराभुवन ’ यांच्या मधोमधचं प्रवेशद्वार व आंत शिरल्याबरोबर लोकांना चढाव्या लागणाऱ्या अवघड पायऱ्या अशा या थिएटरचा साराच थाट अपूर्व होता. बावनखाणीसमोरच्या ‘ ग्लोब ’ थिएटरांत नाटकाचे प्रयोगहि करतां येत असत. हें थिएटर मात्र पुष्कळच आधुनिक आणि सुबक होतं. ही चारीं थिएटरं नेहमी गजबजलेलीं असत. नागरिकांच्या रात्रीच्या संचाराची हीं केंद्रं होतीं. त्या वेळेस नाट्यप्रयोगांवर कालाची मर्यादा कायद्यानं घातलेली

नसल्यामुळे नाटक पाहून घरीं परतलेल्या प्रेक्षकांचे थवे पहाटेच्या पहिल्या प्रहरीं रस्त्यांतून जातांना अनेक वेळां दिसत.

नाटकांच्या भरभराटीचा तो काळ होता. त्यामुळेंच की काय नाटकमंडळां-तल्या फाटाफुटीचाहि तो काळ होता. किर्लोस्कर मंडळींतून फुटून निघालेल्या बालगंधर्व-बोडस-टेंबे यांनी गंधर्व नाटकमंडळी काढली. तिच्यांतून टेंबे अल्प-कालांतच बाहेर पडले व शिवराज नाटक मंडळी त्यांनी स्थापन केली. ती देखील लवकरच फुटली. व मुख्य स्त्रीपार्टी गायक नट म्हणून त्या मंडळींत नांवारूपाला आलेल्या शंकरराव सरनाइकांनीं यशवंत नाटकमंडळी काढली. नाट्यकलाप्रवर्तक मंडळींतही अशाच फाटाफुटी झाल्या. गद्य नाटकं करणाऱ्या महाराष्ट्र मंडळीलाहि असेच फाटे फुटले. बलवंत संगीत नाटकमंडळी म्हणजे असल्या फाटाफुटींनाच आलेलं एक फळ होतं. परंतु नाटकमंडळ्यांची संख्या केवढीहि फुगली तरी फारसं बिघडत नव्हतं. लोकांना नाटकांची गोडी विल-क्षण होती. लोकांजवळ पैसेहि होते. या काळांत संगीतानं नाटकांवर आक्रमण केलं आणि खऱ्या नाट्यकलेचा घात झाला असा आक्रोश करण्याची व त्या-बद्दल त्या वेळच्या नाटकमंडळ्यांना दोष देण्याची एक फॅशन रूढ असलेली दिसते. परंतु त्या वेळची वस्तुस्थिति अशी होती की नाटकांच्या आश्रयदात्यांना संगीताचं भलतं वेड होतं. खूप ताना मारणारा एखादा स्त्रीपार्टी नट जवळ बाळगला की साधारण बऱ्यापैकी नाटक गाजवून गल्ला भरतां येतो असा हिशोब नाटकमंडळ्यांना करतां येत असे. संगीत नाटक मंडळीची बरी वाईट प्रत प्रेक्षक ठरवीत होते ती मुख्य स्त्रीपार्ट्यांच्या तानबाजीवरून! नाटकापेक्षां संगीताचा हव्यास लोकांना अधिक होता. नाटकातल्या संगीताला ताळतंत्र उरला नाही याबद्दलच्या दोषाचे खरे धनी त्या वेळचे नाटकवाले नव्हते तर संगीताची विपरीत अभिरुचि दाखविणारे प्रेक्षकच म्हणावयास हवेत.

चमत्कार असा कीं, नाटकांत चिकार गाणं पाहिजे—आणि तें देखील ज्यावर ‘ शास्त्रोक्त ’ अशी चिठी मारतां येईल असं पाहिजे!—अशी लोकांची एकीकडे मागणी होती, तर दुसरीकडे ज्यांत गायन बिलकूल नाही, अशा प्रोज नाटकांनाहि तीं लोकप्रिय ठरलीं तर भरपूर आश्रय मिळत असे. ज्या नटांवर लोकांची विशेष प्रीति आणि भक्ति होती, त्यांचीं नाटकं गाजल्यावाचून राहत नसत. गंधर्व नाटक मंडळीचं विद्याहरण किंवा स्वयंवर जितकं गाजलं तितकंच

महाराष्ट्र नाटक मंडळीचं भाऊबंदकी गाजलं. केशवराव भोसले या सुमारास दिवंगत झाले; परंतु त्यांच्या पश्चात् ललितकलादर्शक नाटक मंडळीची लोकप्रियता पेंढारकरांनी चांगली टिकविली व वरेरकरांचं ' सत्तेचे गुलाम ' खूप गाजलं. गडकऱ्यांच्या कीर्तीची कमान वाढती होती आणि त्यांच्या गद्य-प्रेम-संन्यासा'चे महाराष्ट्र नाटकमंडळीचे प्रयोग जसे गाजत होते, त्याचप्रमाणें त्यांच्या संगीत ' भावबंधन'चे बलवंत नाटक मंडळीचे प्रयोग चिकार गर्दीचे होत होते. माधवराव जोशी यांच्या संगीत ' विनोद ' नाटकानं लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता. सरनाईकांच्या यशवंत नाटक मंडळीचे ग्लोब थिएटरांतले प्रयोग चिकार गर्दीचे होत होते. पुण्याच्या प्रेक्षकापुढे मराठी भाषा बोलणाऱ्या नटांनीं उर्दू नाटक करण्याचा अभूतपूर्व प्रयोग या कंपनीनं केला होता व तो विलक्षण यशस्वी झाला होता. ' चलती दुनिया ' या उर्दू नाटकाचं लोकांना अक्षरशः वेड लागलं होतं. या नाटकाबद्दलची एक आख्यायिका ऐकण्यांत होती ती अशी कीं, निजाम हैद्राबाद येथील मुक्कामांत कंपनीनं या नाटकावर खोऱ्यानं पैसा ओढला व मुक्काम आटोपून कंपनी निघाली तेव्हां आता 'चलती दुनिया ' पाह्यला मिळणार नाही म्हणून लोक रडले आणि ज्या दोन बाल-नटांच्या त्या नाटकांतल्या कामावर लोक फिदा होते त्यांची त्यांनी रेल्वे-स्टेशन-पर्यंत मोठी थाटाची मिरवणूक काढली !

पुण्याच्या लोकांना त्या दिवसांत उपलब्ध असलेला आणि त्या काळच्या स्वरूपांत आता न राहिलेला आणखी एक करमणुकीचा प्रकार सांगायला हवा. ही करमणूक कीर्तनाप्रमाणें फुकट मिळणारी होती, परंतु वर्षांतून एकदाच तिचा मोसम येत असे. वसंत व्याख्यानमाला हे जसं पुण्याच्या उन्हाळ्यांतलं वैशिष्ट्य होतं. त्याप्रमाणें गणपति-उत्सव हेंहि पुण्याचं एक वैशिष्ट्य होतं आणि हा उत्सव विशेष गाजायचा तो मेळ्यांमुळें ! ! सार्वजनिक गणपतीपुढे आता काव्यगायन, शास्त्रोक्त गाण्याच्या बैठकी, नकला, छोटीं नाटकं देखील होतात. त्या वेळचे गणपति असली करमणूक करून घ्यायला शिकले नव्हते. गणपतीपुढें व्याख्यानें होत. उत्सवाच्या दहा दिवसांत ठिकठिकाणीं व्याख्यानांना भरती येत असे. हीं व्याख्यानं बहुधा राजकारणांत अग्रेसर असलेल्या पुढाऱ्यांची असत व राजकीय विषयांवरचींच असत. वक्त्यानं व्याख्यानाचा विषय म्हणून गीतेंतला एखादा श्लोक किंवा दासबोधांतल वचन घेतलं तरी रस्त्याच्या कोप-

ऱ्यावर उभं राहून व्याख्यान देणारे पाद्री ज्याप्रमाणे शेवटीं आकाशांतल्या बापाच्या मूळपदावर येतात त्याप्रमाणे गीतेच्या किंवा दासबोधाच्या आधारानं वक्ते राजकारणच सांगत आणि ते देखील टिळकांचं जहाल राजकारणच ! राजकारणांतील मवाळ पक्षाला गावांत थारा उरला नव्हता. गणपति-उत्सवांत कुणा मवाळ पुढाऱ्याचं व्याख्यान होण्याची शक्यता नव्हती. व्याख्यानांप्रमाणेच उत्सवांतला दुसरा महत्वाचा कार्यक्रम म्हणजे मेळे. सगळ्यांत लोकप्रिय मेळे दोन होते. एक 'भोरकरांचा मेळा' आणि दुसरा 'सन्मित्र समाज मेळा'. यांतील पहिल्याची लोकप्रियता मेळेवाल्यांच्या फॅशनेबल ड्रेस, त्यांच्या हातांतल्या घुंगरांच्या काठ्या आणि कवायतीचे चित्तवेधक प्रकार यांवर अवलंबून होती. उलट सान्मित्र समाज मेळ्यांतल्या लोकांचा पोशाख अगदीच साधा-सदरा, टोपी व हातांत टिपरी, एवढाच असे. परंतु त्यांच्या पदांची कविता देवल थाटाची फार सुबोध, प्रासादिक आणि परिणामकारक असे; त्यांत समाज-सुधारणेवर टीका आणि जहाल राजकारणाचा प्रचार असे, आणि विशेष म्हणजे या मेळ्यांत प्रतिष्ठित वकील आणि सुशिक्षित पदवीधर यांचा भरणा असे. भिडे वकील आणि "लाल" नांवाचे एक गृहस्थ फार सुंदर पद म्हणत असत. गणपति–उत्सवांत शहरांतले ब्राह्मण–मराठे एकोप्यानं वागत; पण सान्मित्र समाज मेळा सुशिक्षित बामणांचा, आणि भोरकरांचा मेळा मराठ्यांचा, असा थोडासा फरक होताच ! हा फरक अधिक स्पष्ट करणारा आणखी एक मेळा लवकरच निघाला. त्याचं नांव 'मावळी मेळा'! पायांत वहाणा, छातीवर बांधलेली धोंगडीची घडी, डोक्याला पागोटं, हातांत घुंगरं लावलेला भाला, असा या मेळेवाल्यांचा थाट असे, आणि ते जीं पदं म्हणत तींहि त्यांच्या नांवाला शोभणारीं असत.

१९०७ सालीं सुरतेच्या कॉंग्रेसमध्ये दंगल होऊन टिळकांचा जहाल पक्ष बाहेर पडला, तेव्हा सामान्य जनतेचा मवाळ पुढाऱ्यांवरचा रोष शिगेला पोचला. या रोषाचे पडसाद त्या वर्षी पुण्यातल्या मेळ्यांच्या पदांत भरपूर उमटले. नामदार गोखल्यांची वैयक्तिक निंदा आणि टवाळी किती व्हावी त्याला कांहीं सुमार राहिला नाही. "हा 'पोपट' मोलें-कानी। सांगतो मधुर शब्दांनी। द्या टिळकांना काळें पाणी। जाइ राष्ट्रपक्ष मोडोनी॥" या नमुन्यावरून पाहा. झाडून साऱ्या गणपतीपुढे बहुतेक सर्व मेळेवाल्यांनी या गलिच्छ

संगीतटीकेच्या नागझरींत मनःपूत हात धुऊन घेतले. उत्सवाचे हें अधःपतन थांबविण्याचं श्रेय सरकारने घेतलं. १९०८ सालीं लोकमान्यांना शिक्षा झाली, सरकारी दडपशाही सुरू झाली, जहाल राजकारणाला 'आळी मिळी गुप चिळी' चं स्वरूप आलं, व त्याचा परिणाम गणपतींतल्या मेळ्यावरहि झाला. १९१४ सालीं जून महिन्यांत टिळक मंडालेच्या तुरुंगांतून सुटून पुण्यास परत आले व त्या वर्षीचा गणेशोत्सव मात्र नव्या उत्साहानं झाला. परंतु या वर्षीच्या उत्सवांतल्या व्याख्यानांत राजकारणाच्या बरोबरीनं दुसरा एक विषय गाजला. तो म्हणजे गीतेच्या शिकवणुकीसंबंधीचा टिळकांचा सिद्धांत! या विषयावरचीं टिळकांचीं स्वतःचीं व्याख्यानं झालीं. खंडन-मंडनपर इतरांचींहि झालीं. 'गीतारहस्य' हा ग्रंथ लिहून टिळकांनीं मधमाशांचं मोहोळ उठविल्यासारखं दिसलं. गीतेचा कर्मसंन्यासपर अर्थ मानणारे टिळकांच्या सनातनी अनुयायांतहि पुष्कळ लोक होते. ते त्यांच्यावर तुटून पडले व या धमधमीचा फायदा मवाळ पंथांतल्या कित्येक पंडितांनी घेतला. टिळकांनी आपल्या हयातींत खाल्ल्या नसतील अशा शिव्या त्यांच्या वांट्याला आल्या. इरसाल प्रतिष्ठित शिव्या देण्याचा त्या वेळचा उच्चांक बघावयाचा असेल तर सांगलीचे रावसाहेब यशवंतराव कोल्हटकर यांच्या 'गीतारहस्य खंडन' या ग्रंथाचं नांव सांगतां येइल.

त्या वर्षीच्या व्याख्यानांच्या विषयांत जसा बदल झाला तसा मेळ्यांच्या पदांतहि झाला. त्यांतला पूर्वीचा शिमगा नाहीसा झाला. टिळक परत आले याबद्दलचा आनंद व्यक्त करणारीं पदं खूप होतीं; परंतु केवळ शिवराळ पदांचा लोप झाला होता. पुढे वर्षांनी गांधींच्या असहकारितेचे वारे देशांत वाहूं लागले तेव्हा मेळ्यांच्या पदांत राजकारणाचा संचार पुन्हा जोरानं झाला. हिंदुमुसलमानांची एकी हा एकच ध्यास त्या वेळेस गांधींनी घेतला होता, त्याचा परिणाम होऊन गणपति-उत्सवांत मुसलमान सामील झाले. मुसलमानांचा एखादा मेळा कसा निघाला नाहीं हेंच आश्चर्य! परंतु असा मेळा निघाला नाहीं तरी मेळ्याचा एक अगदीं नवा प्रकार 'पैसाफंड रानडे' या नांवानं ओळखल्या जाणाऱ्या गृहस्थांनी या सुमारास काढला. पूर्वीं कधी कुणी न केलेला प्रयोग त्यांनी केला. अल्पवयी मुला-मुलींचा मेळा त्यांनी काढला. गोड गळ्याच्या मुलांमुलींचीं तबलापेटीच्या उत्तम साथीवर म्हटलेलीं पदं लोकांना फारच कर्णमधुर वाटण्यासारखीं होतीं. रानड्यांचा हा 'पैसाफंड' मेळा एकदम अत्यंत

लोकप्रिय झाला. मेळ्यांतल्या पदांतल्या प्रचाराला मागं ढकलून सुरेल गाय-नाला प्राधान्य देण्याच्या प्रगतींतला ' पैसाफंड ' मेळा म्हणजे एक महत्त्वाचा मैलाचा दगड म्हणावा लागेल ! या मेळ्यांतल्या एका मुलीचं लोकांकडून फारच कौतुक झालं. तिचं नांव शांता आपटे !

* * *

## : ६ :

१९०८ सालीं लोकमान्य टिळकांना सहा वर्षांच्या काळ्या पाण्याची शिक्षा सांगून सरकारनें हिंदुस्थानाबाहेर मंडालेच्या तुरुंगांत त्यांची रवानगी केली, तेव्हांपासून एकंदर देशांतील राजकीय चळवळ थंड झाली होती. पूर्वपरंपरेमुळें आणि टिळकांच्या वास्तव्यामुळें पुणें शहराचा पिंड मुख्यतः राजकारणी बनलेला होता. एकंदर नागरी जीवनांत विशेष महत्त्व होतं तें राजकारणाला. बाकीच्या साऱ्या व्यवहारांतील उत्साहाचा आणि चैतन्याचा उगम राजकारणांतून होत असे. टिळकांच्या गैरहजेरींत पुण्याचं दैनंदिन आणि नैमित्तिक विविध जीवन चालू राहिलं होतं; परंतु त्यांत एक प्रकारच्या विफलतेची उदासवाणी जाणीव होती. व्याख्यानं, सभासंमेलनं होतं होतीं, परंतु देशांतलं राजकारण जोरांत असलं की जी त्यांत जो प्रकाश असे तो नाहीसा झाला होता. गणपति-उत्सव होत होते, परंतु टिळक पुण्यांत असले की जी प्रेरणा त्या उत्सवांत भरून ओसंडत असलेली दिसायची ती दिसत नव्हती. पंढरीला जाणाऱ्या पालख्या प्रतिवर्षाप्रमाणे आषाढांत पुण्यांतून वाजतगाजत जात होत्या, परंतु मिरवणुकींत अग्रभागीं डोक्याला पगडीऐवजीं काळी टोपी आणि कपाळाला गुलाल अशा थाटांत आपल्या राजकारणांतल्या सहकाऱ्यांबरोबर चालतांना टिळक दिसले म्हणजे तिला जी शोभा यायची ती येत नव्हती. टिळकांच्या शिक्षेच्या काळांत पुण्याच्या नागरिकांचे व्यवहार वर वर यथाक्रम चाललेले दिसले तरी जरा सूक्ष्म नजरेनं पाहाणाराला सहज कळे की लोकांचे डोळे दूर मंडालेकडे लागलेले आहेत !

पण १९१४ च्या जून महिन्यांत १० तारखेला सकाळीं शहरांत बातमी पसरली की पहाटे टिळक सुटून आले, आणि त्याबरोबर जवळजवळ सहा वर्षं शहरावर आलेली निष्क्रियतेची कळा एकदम उडून जाऊन परतलेल्या चैतन्यानं शहर फुलून गेलं. ज्याच्या त्याच्या तोंडीं ' टिळक आले, ' ' टिळक आले ', हेच शब्द होते. लोकांच्या झुंडीच्या झुंडी टिळकांच्या दर्शनासाठीं गायकवाड-वाड्याकडे जात होत्या. चार-पांच दिवसांनीं त्यांच्या जाहीर स्वागताची गायक-

वाड वाड्यात जाहीर सभा झाली तिला प्रचंड गर्दी लोटली. त्या सभेंतल्या भाषणांत टिळकांनी सांगितलं, "सहा वर्षांपूर्वी मी आपल्याशीं ज्या तऱ्हेनं वागलों त्याच तऱ्हेनं, त्याच नात्यानं व त्याच पेशाने यापुढं वागेन." टिळकांच्या या उद्‌गारानं पुण्याच्या राजकीय जीवनांत आलेली सहा वर्षांची सुस्ती संपली. शहर पुन्हा खडबडून उठून राजकारणाचा विचार करूं लागलं.

या नव्या जागृतीला आणखी चालना देणारी एक घटना लवकरच घडली. ऑगस्ट महिन्याच्या सुरवातीस पहिल्या महायुद्धाला प्रारंभ झाला. दुसऱ्या आणि या पहिल्या महायुद्धांत फार अंतर होतं. पहिल्याहि महायुद्धांत जगांतली मुख्य मुख्य राष्टं पडलीं, परंतु हिंदुस्थानांतल्या सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनापर्यंत त्या युद्धाचे परिणाम येऊन पोचले नाहीत. दुसऱ्या महायुद्धांत ज्याप्रमाणें शत्रु कलकत्त्याच्या दारांत येऊन पोचल्याच्या अफवा होत्या त्याप्रमाणे पहिल्या महायुद्धांतहि 'एम्डेन' नांवाची जर्मन पाणबुडी बोट हिंदुस्थानच्या आसपास दिसली होती. परंतु लोकांची धावपळ, शहरांचा त्याग, असले प्रकार घडले नाहीत. खाण्यापिण्याचं दुर्भिक्ष, प्रवासांतले हालहि लोकांच्या वाट्याला आले नाहीत. वैमानिक हल्ल्यांचा शोध लागलेला नव्हता. 'ब्लॅक आउट' हा शब्द प्रयोगहि कुणाला माहीत नव्हता. देशातल्या इतर शहराप्रमाणे पुणें शहराचंहि जीवन पहिल्या महायुद्धाच्या त्या काळांत व्यवस्थित आणि ठीक चाललं होतं; एवढंच नव्हे तर महायुद्धाच्या निमित्तानं सरकारची आणि लोकमान्य टिळकांची एक नवीनच लढाई जुंपून टिळकांनी होमरूल लीगची नवी आघाडी उघडल्याबरोबर पुण्याचे लोक त्या आघाडीवर उत्साहानं दाखल होऊं लागले. या चळवळीच्या वेळेस टिळकांनी सबंध देश हलवून सोडला. पूर्वी कधी नव्हे इतक्या यथार्थतेनं जनतेच्या दृष्टीनं पुण्याला हिंदुस्थानच्या राजधानीचं स्वरूप या चारपांच वर्षांत आलं होतं. टिळकांच्या राहत्या गायकवाडवाड्याला राजप्रासादाचं महत्त्व प्राप्त झालं होतं.

मात्र फरक असा की, राजप्रसादाच्या दाराशीं हत्यारबंद पहारा असतो आणि आंत जाणारं माणूस पहाऱ्यावर रोखलं जातं; पण गायकवाडवाड्याच्या दारालगतच्या देवडीवर जो भय्या होता त्याच्या हातांत फक्त एक उंच दंडा असे, आणि तो आपल्याला रोखील असं भय न बाळगतां माणूस वाड्यांत

निःशंकपणे प्रवेश करूं शकत असत. पुढे गांधीजी मोठे झाले तेव्हां त्यांची भेट घेण्यास कुणाला मनाई नव्हती; परंतु प्रत्यक्षांत त्यांची गाठ घेणं सोपंहि नव्हतं. त्यांच्या बैठकीच्या गाभाऱ्यापर्यंत पोंचणाराला आधी 'नामदेवाच्या पायऱ्या' ओलांडण्याचं दिव्य करावं लागेच. विशेष प्रसंगीं तर गांधीजींच्या दारावर पहारा करण्याचं काम सरोजिनीदेवी करीत असत व त्या पहाऱ्यावर असल्यावर कुणी फालतू माणूस गांधीजीपर्यंत काय बिशाद जाऊन पोंचेल? या बाबतींतला टिळकांचा खाक्या निराळा होता. त्यांची भेट घेण्याच्या बाबतींत साऱ्या-दुनियेला अक्षरशः मुक्तद्वार होतं.

याचा अर्थ असा नव्हे की टिळकांचीं मामुली कामं सोपीं करणारीं माणसें त्यांच्याभोवती नसत. टिळकांचा चिटणीस, टिळकांचा खासगी सेक्रेटरी, असे रीतसर हुद्दे लावणारीं कुणी माणसं होतीं असं मला आठवत नाही. परंतु त्या हुद्द्यांना शोभणारीं टिळकांचीं कामं करणाऱ्या व्यक्ति होत्याच. अशा व्यक्तींपैकी लोकांच्या अगदी ठळकपणानं नजरेंत भरणारे एक गृहस्थ म्हणजे अंतुकाका फडणीस! चिटणीस, कारभारी, शरीररक्षक अशा साऱ्या भूमिका अंतुकाकांत एकत्र झाल्या होत्या; आणि टिळकांकडे कांही काम असलं की लोक आधीं अंतुकाकांना गाठीत. चांगल्याच आडव्या अंगाचे; जाड्याभरड्या सैल बोंग्या सदऱ्याकोटाचा पोशाख करणारे, तुळतुळीत हजामत केलेले, डोक्यावरचा मागचा घेरा अर्धा उघडाच टाकून टोपी घालणारे अंतुकाका फडणीस म्हणजे त्या दिवसांत टिळकांची सावली होती. पायांतला पुणेरी जोडा फरफटत, अंगावरचं उपरणं आवरीत, तुळतुळीत डोक्यावरचा घाम पुशीत ते रस्त्यानं निघाले की "अंतुकाका, अहो अंतुकाका" अशी हाक कुणीकडून उठेल व त्यांना आपली गति रोखावी लागेल त्याचा नियम नसे. गति रोखणं अंतुकाकांना सोपं जात नसे कारण त्यांच्या चालण्याची तऱ्हा वैशिष्ट्यपूर्ण होती; अच्युत बळवंत कोल्हटकर विनोदानं एकदा म्हणाले होती कीं, टिळकांच्या परिवारांतला किंवा केसरी कचेरींतला माणूस त्याच्या चालण्याच्या तऱ्हेवरून हमखास ओळखावा!

टिळक फार मोठे होते, परंतु रस्त्यानं पायीं जातांना पुण्याच्या लोकांना ते पुष्कळदा दिसत. धोतराचा उजवीकडचा घोळ जवळजवळ गुडघ्यापर्यंत वर आलेला, सैल कासोट्यामुळे डावीकडचा सोगा टाचेंत अडकेल इतका खाली

लोंबलेला, पायांतला जोडा चटचट वाजत आहे अशा थाटांत तोंडांतली सुपारी चघळीत झराझरा चालणारे टिळक दृष्टीस पडले की लोकांच्या मनांत आदराबरोबरच हास्यगर्भ कौतुकहि उचंबळून येत असे. टिळकांचे उजवेडावे हात तात्यासाहेब केळकर व काकासाहेब खाडिलकर यांच्याहि चालण्याच्या तऱ्हा मुलखावेगळ्या. एक पोट चाचपीत, चाचपीत खाकेंत छत्री मारून भराभर पावलं उचलणारे, तर दुसरे छत्री एखाद्या भाल्यासारखी खांद्यावर धरून रस्त्याच्या अगदी कडेनं एकेक पाऊल रेंगाळत टाकीत, किलकिल्या डोळ्यांनी भोवतालच्या रहदारीकडे बघत, आपल्याच विचारांच्या तंद्रीत असल्याप्रमाणे ढकलत ढकलत जाणारे केसरीचे मॅनेजर धोंडोपंत विद्वांस हे तर टिळकांच्या नात्यांतलेच होते. तेव्हां त्यांनी टिळकांची चालण्याची तऱ्हा उचलली असल्यास नवल नाहीं. परंतु हीं सारीं माणसं पुण्याच्या लोकांच्या प्रीतीतलीं होतीं. कारण तीं टिळकांच्या प्रभावळींतली होतीं, आणि टिळक त्या वेळेस लोकप्रियतेच्या शिखरावर होते.

होमरूल लीग चळवळ ऐन भरांत होती. त्या काळांत टिळक पूर्णांशानं राष्ट्राचे कर्णधार होते. त्यांची ओसंडून जाणारी लोकप्रियता स्वयंभू होती. दुसऱ्या कुणी ती वाढवावी अशी गरजच नव्हती. तथापि त्या लोकप्रियतेचं कोडकौतुक सुंदररीतीनं कुणीं केलं तर लोकांना तें हवं होते आणि त्यामुळे अच्युतराव कोल्हटकरांचा दैनिक " संदेश " जरी मुंबईस निघत असे तरी पुण्यांतल्या टिळकभक्त वाचकांना तें घरचंच वर्तमानपत्र वाटे, व मुंबईपेक्षांहि पुण्यांतले लोक कोल्हटकरांचं कौतुक अधिक करीत. टिळकांचा आणि त्यांच्या राजकरणाचा जोराचा प्रचार हा " संदेश" चा स्थायी भाव होता; आणि होमरूलच्या नव्या चळवळीसाठी लोकमान्यांनी देशभर दौरा काढला तेव्हा त्या दौऱ्यांतील व्याख्यानांचीं व ठिकठिकाणीं होणाऱ्या टिळकांच्या सत्काराचीं मोठीं रसभरित वर्णनं " संदेश" मध्ये येत होतीं. तीं वाचण्यासाठी ' संदेश' वर पुणेकरांच्या उड्या पडत होत्या. पायांत स्लीपर आणि पायमोजे, बंगाली पद्धतीचं वाटावं अशा तऱ्हेचं घोळदार धोतर, काळ्या पांढऱ्या केसांनी तुरळक झाकलेलं उघडं डोकं, बरोबर दहा-पांच लोकांचा घोळका, अशा थाटांतले उण्यापुऱ्या उंचीचे, धिप्पाड बांध्याचे, सदा हसतमुख असे अच्युतराव पुण्याच्या रस्त्यांतून पायींच हिंडतांना लोकांना दिसले की " तें पहा साहेब ! " अशी आजूबाजूच्या दुकानांत कुजबूज होत असे.

अच्युतरावांच्या लेखणीप्रमाणेंच त्यांची वाणी पुणेकरांच्या परिचयाची व आवडती होती. " संदेश" कार कोल्हटकर बोलणार असले की सभेला खूप गर्दी व्हायची. एकदां गणपति उत्सवांतल्या त्यांच्या एका व्याख्याला नाट्यचार्य खाडिलकर अध्यक्ष होते. अच्युतरावांनी व्याख्यानाच्या आरंभी खाडिलकरांच्या किलकिल्या डोळ्यांपासून सुरवात करून त्यांची मूर्ति प्रत्यक्ष गजाननासारखी कशी आहे त्याचं इतकं कांहीं सुंदर रसभरित वर्णन केलं की लोकांची हसून हसून मुरकुंडी वळली. एका प्रसंगीं नूतन आर्यभूषण थिएटरांत भरलेल्या नाट्य-संमेलनांत भाषण करतांना " नमन नटवरा, विस्मयकारा " या खाडिलकरांच्या एका पदाच्या पहिल्या चरणाचा मोठा अभिनयपूर्ण उच्चार अच्युतरावांनी प्रारंभींच केला. नंतर नटाच्या ठिकाणीं कोणकोणते आश्चर्यकारक गुण ( आणि अवगुणहि ! ) असतात त्याचं अत्यंत मार्मिक वर्णन केलं, आणि अखेर 'नमन नटवरा विस्मयकारा 'असें पुन्हा एकदा म्हणून त्यांनीं भाषण संपविलं. टाळ्यांचा कडकडाट झाला. त्यांची अशी किती तरी भाषणं त्या वेळच्या पुणेकरांच्या स्मरणांत असतील.

वृत्तपत्राचे संपादक आणि राजकीय पुढारी या दोन्ही गुणांनीं युक्त असलेल्या व्यक्तींबद्दल पुण्याच्या लोकांना जितकं कुतुहल होतं तितकं केवळ कादंबऱ्या लिहिणाऱ्या साहित्यिकांबद्दल त्या काळांत दिसून येत नव्हतं. प्रो. वामन मल्हार जोशी यांची पहिली कादंबरी त्या सुमारास गाजली होती,आणि त्यांचे सुंदर लेख व लघु-कथाहि मनोरंजन, चित्रमयजगत् वगैरे मासिकांत प्रसिद्ध होत होत्या; तथापि सामान्य लोकांत त्यांच्याविषयीं विशेष जिज्ञासा आढळत नसे. प्रा. शि. म. परांजपे आणि नाट्याचार्य खाडिलकर सोडले तर राजकारणापासून दूर असलेल्या साहित्यिकांत लेखक आणि पट्टीचा वक्ता जवळजवळ नव्हताच. श्री. तात्यासाहेब केळकर सभांतून भाषणं करीत असत, परंतु व्याख्यान कलेंतील तरबेजपणा त्यांच्या अंगीं अजून यावयाचा होता. शाळा-कॉलेजांत वाङ्मय-मंडळ निघण्याचे दिवस अजून दूर होते. तरुण विद्यार्थ्यांचा साहित्यविषयक उत्साह विशेष वाढीला लागलेला नव्हता; आणि जो थोडा होता तो प्रकट होण्याचे मार्ग हल्लीप्रमाणें ठरलेले नव्हते. अशा अनेक कारणांनी उदयोन्मुख यशस्वी नवे कादंबरीकार ही पदवी जरी तात्यासाहेबांनीं ( वामन मल्हार जोश्यांनी ) निश्चितपणें मिळविली होती तरी पुण्याच्या सामान्य नागरिकांत

त्यांच्याविषयी विशेष जिज्ञासा आढळत नव्हती. डोक्याला रुमाल, अंगावर उपरणं, साधा लाँग कोट अशा थाटांत सायकलवरून जाणाऱ्या वामनरावांना बघून हेच ते " रागिणी " कर्ते असं कितीसे लोक आपआपसांत कुजबुजत असतील कोण जाणे !

हरिभाऊ आपटे एवढे नामांकित, 'करमणूक' साप्ताहिकाचे संपादक व कादंबरीकार अशा नात्यांनी गाजलेले, परंतु त्यांच्याबद्दल देखील सार्वजनिक कुतुहल ज्याला म्हणतां येईल तें फारसं नव्हतं. व्याख्यानकलेंत त्यांची विशेष ख्याति नव्हती, हें याचं कारण तर होतंच, परंतु शिवाय दुसरं कारण होतं तें हें की ते मवाळ पक्षांतले होते, आणि लौकिक-आदराच्या देव्हाऱ्यांत जहाल राजकारण करण्याखेरीज इतरांना त्या दिवसांत स्थान नव्हतं. त्यांच्या राहत्या " आनंदाश्रमा " वरून जातांना ' या ठिकाणीं महाराष्ट्राचे ज्येष्ठ कादंबरीकार राहतात' असं कांही कुणी म्हणत नसत, किंवा हरिभाऊंची स्वाक्षरी घेऊं या असं म्हणून कुणी तरुण विद्यार्थी आंत शिरत नसत. स्वाक्षरी घेण्याची फॅशन त्या काळांत नव्हती. लोकप्रियतेच्या प्रदर्शनाचा हा प्रकार वगळला तर मात्र हरिभाऊंचे समाजाशीं घनिष्ठ संबंध होते. पुण्याच्या दैनंदिन नागरी जीवनांत हरिभाऊंच्या इतकं लक्ष घालणारा दुसरा मराठी कादंबरीकार झालाच नाही असं निःशंकपणें म्हणतां येईल. ज्या काळांतल्या गोष्टी मी सांगत आहें त्या काळांत ' करमणूक ' बंदच पडली होती. त्यांच्या कादंबरीलेखनाला भरतीची लाट येऊन गेली होती. आधुनिक मराठी कादंबरीला जन्म देणारा प्रतिभासंपन्न लेखक या भूमिकेचा त्यांनी जवळजवळ संन्यास घेतला होता. परंतु मवाळ पक्षाचं पुण्यांतलं राजकारण चालविणाऱ्या अग्रेसर व्यक्तींपैकीं ते एक होते. पुण्याची म्युनिसिपालिटी उच्चवर्णीय सुशिक्षितांच्या हातून ब्राह्मणेतरांच्या हातीं जाण्याचे दिवस दूर होते. परंतु त्या दिवसांत दुसरं एक संक्रमण चालू होतं. म्युनिसिपालिटीच्या कारभारांतलं कित्येक वर्षांचं जुनं मवाळ पक्षाचं वर्चस्व संपून त्याची जागा जहाल पक्ष घेत होता. हरिभाऊ आपटे मवाळपंथीय नगरपित्यांचे पाठिराखे, मसलतगार व मार्गदर्शक होते. अशी एक गोष्ट सांगतात की हरिभाऊंच्या कादंबरी-लेखनाला उद्देशून नामदार गोखले त्यांना एकदा म्हणाले, " काऊचिऊच्या गोष्टी कसल्या लिहीत बसलांत ? प्रत्यक्ष कार्य करा." परंतु स्नेहभावाने केलेली ही टीका हरिभाऊंच्या बाबतींत फारशी खरी नव्हती. राजकारणाच्या

धकाधकींत ते फारसे पडले नाहीत. परंतु पुण्याच्या नागरी व्यवहारांत त्यांनी खूपच लक्ष घातलं होतं. हरिभाऊंचा आनंदाश्रम म्हणजे मवाळांच्या बैठकीचा अड्डा अशी पुण्याच्या लोकांची समजूत होती. या समजुतीचे दुष्परिणामहि हरिभाऊंच्या वाट्याला आल्यावाचून राहिले नाहीत. १९०८ सालीं टिळकांना शिक्षा झाली तेव्हा आनंदाश्रमांत हरिभाऊंनी आणि त्यांच्या मित्रांनी पेढे खाल्ल्याची सपशेल खोटी बातमी कांही उद्योगी लोकांनी शहरांत पसरविली आणि आनंदाश्रमापुढे कांही वावगे किळसवाणे प्रकार लोकांनी केले. १९४८ सालीं गांधीवधानंतर लोकांच्या घरांची जाळपोळ करतांना पेढे वांटल्याचा आणि खाल्ल्याचाच आरोप त्यांच्यावरहि करण्यांत आला होता. लोकांना अप्रिय व्यक्तींवर सूड घ्यायचा झाला की त्या कामीं पेढे कसे उपयोगी पडतात त्याबद्दल एखादा निबंध लिहिण्यासारखा आहे.

पुण्याच्या म्युनिसिपालिटीचा कारभारच नव्हे तर इतर अगणित उद्योग हरिभाऊ आपटे आपल्यामागे लावून घेत. हजार प्रकारचीं कामं घेऊन लोक त्यांच्याकडे येत आणि हरिभाऊंचा स्वभाव इतका उपकारी, प्रेमळ आणि भिडस्त होता की कुणाला ' नाही ' असं उत्तर त्यांना देतांच येत नसे. त्यांच्या घरीं त्यांच्याभोवती दहा लोकांचा गराडा नेहमी पडलेला असे. ज्या दिवसांत ' करमणूक ' पत्र निघत असे त्या दिवसांतहि हरिभाऊंच्या घरांतील ही वर्दळ चालू असेच. निवांतपणें लेखन करण्याची सवड लोक हरिभाऊंना देतच नसत. छापखान्याचा माणूस ' मजकुरासाठी अडलंय ' म्हणून सांगायला आला आणि उभाच राहिला की मग हरिभाऊंनी बैठक मांडावी आणि चालू कादंबरीचं नवं प्रकरण द्यावं. जें लिहावयाचं त्याची मनाशीं शांतपणें जुळवणी ते केव्हां करीत असतील ते त्यांचं त्यांना माहीत ! त्यांचं बहुतेक सर्व लेखन अशा धकाधकींत आणि गडबडींतच झालं हें लक्षांत घेतां त्यांच्या कादंबऱ्यांचा मोठेपणा आदराच्या आणि कौतुकाच्या शब्दांनी किती वर्णावा तें खरोखर कळत नाही !

त्या काळांत सामान्य लोकांच्या मनावर जहाल राजकारणाची केवढी पकड होती त्याचा एक गमतीचा पुरावा हरिभाऊ आपट्यांच्या आयुष्यांत बघायला सापडतो. सामान्य जनतेला जहाल राजकारण प्रिय होते, त्यामुळे तें राजकारण करणारा नाटककारहि त्यांना चटकन प्रिय होण्याचा अधिक संभव असे, आणि हें ओळखून नाटक मंडळ्याहि अशा नाटककारांच्याच नाट्यकृति रंगभूमीवर

आणण्याची व्यावहारिक दक्षता दाखवीत. हरिभाऊ आपटे जसे कादंबरीकार म्हणून गाजले तसे नाटककार म्हणून गाजले नाहींत याची इतर अनेक कारणं असतील, परंतु मवाळ राजकारणाचे ते एक कट्टे पुरस्कर्ते होते हें त्याचं एक कारण असावं अशी शंका येते. तसं पाहिलं तर हरिभाऊंच्या अंगीं नाट्यलेखनाचे कित्येक गुण प्रकर्षानं होते. त्यांच्या लिहिण्यांतला साधेपणा आणि प्रसाद बघितला की देवल मास्तरांच्या शैलीची आठवण झाल्यावाचून राहत नाही. लोकांचीं हजार कामं मागं लावून घेण्याचा हरिभाऊंचा स्वभाव नसता, आणि नाटक-मंडळ्यांनी त्यांची पाठ धरली असती तर हरिभाऊंनी जशा अठरा कादंबऱ्या लिहिल्या, तशींच अठरा नव्हेत पण निदान आठ तरी नाटकं सहज लिहिलीं असतीं. तीं किती गाजलीं असतीं याचा अदमास त्यांच्या ‘ सती पिंगला ’ आणि ‘ संत सखू ’ या दोन नाटकांवरून करतां येतो.

‘ संत सखू ’ या त्यांच्या नाटकाचे नाट्यकलाप्रवर्तक नाटकमंडळीचे प्रयोग इतके गाजले की प्रत्येक प्रयोगाला विजयानंद थिएटर खचून भरत असे. या नाटकांत परमेश्वरी चमत्काराचा भाग होता हें त्याच्या विलक्षण लोकप्रियतेचं एक कारण असेलहि; परंतु जास्त सबळ कारण हें होतं की, खाष्ट सासूकडून होणारा सात्विक सद्‌गुणी सुनेचा छळ हा नाटकाचा मुख्य विषय होता. या विषयावर आधारलेले चित्रपट आजघटकेलाहि लोकप्रिय ठरतात, मग तीस-पस्तीस वर्षांपूर्वी संत सखूचे प्रयोग पाहण्यासाठीं मध्यमवर्गीय कुटुंबांतल्या पुरुषांच्या आणि पुरुषांपेक्षांहि बायकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत राहिल्या यांत आश्चर्य कसलं ? हरिभाऊंच्या ‘संतसखूचा’ प्रयोग माझ्या विशेष लक्षांत राहिला आहे त्याचं कारण मात्र निराळं आहे. तें हें की या नाटकांत एक छोटा मुलगा विठोबाचं काम करीत असे. संत सखूला दर्शन देण्यासाठीं त्याची बालमूर्ति खाड्कन बार होऊन रंगभूमीच्या खालच्या भागांतून एकदम प्रकट झालेली पाहतांच प्रेक्षकांच्या टाळ्या पडत आणि ‘भक्तजण सदा म्हणति दयासिंधु मला’ या पदाची पहिली तान ऐकल्याबरोबर टाळीचा दुसरा गजर होई. या बाल-नटाचं हें पद म्हणजे संत सखूचं एक मोठं आकर्षण ठरलं होतं. मात्र हें काम करणारा फुलंब्रीकरांचा छोटा कृष्णा पुढे मोठेपणीं भास्करबुवा बखल्यांचा पट्ट-शिष्य होईल आणि त्याच्या गायनाची कीर्ति हिंदुस्थानांत दुमदुमत राहील अशी कल्पना संत सखूच्या प्रेक्षकांपैकी फार थोड्यांना असेल !

* * *

: ७ :

ज्या काळांत खाडिलकरांची संगीत नाटकं गंधर्व नाटकमंडळीच्या रंगभूमी-वर एकामागून एक येत होती त्या काळांत नवे नवे संगीत शिक्षणाचे–विशेषतः बाजाची पेटी वाजविण्याचे पुण्यांत वर्ग किती निघाले त्याची नोंद कुणीं ठेवली असती तर ती मनोरंजक ठरली असती. गायनाच्या शोकीनांचं शहर म्हणून पुण्याची ख्याति नेहमीच होती. परंतु 'मानापमान' पासून तों 'स्वयंवर' पर्यंतच्या कालावधींत हार्मोनियम या वाद्याकडे पुणेकरांचं जें लक्ष वेधलं तें म्हणजे संगीत क्षेत्रांतली एक नवी लाटच म्हणावी लागेल. त्या दिवसांत रेडिओ नव्हते. ग्रामोफोनहि फार थोड्या लोकांच्या घरीं असतील. हॉटेला-हॉटेलांतून रेकॉर्ड वाजविण्याची टूमहि निघालेली नव्हती. परंतु 'मानापमान' नाटकां-तल्या चाली विलक्षण लोकप्रिय झाल्या आणि ज्याला त्याला वाटूं लागलं, हीं पदं तोंडानं म्हणतां न आलीं तरी निदान पेटीवर वाजवितां यावीत. बाजाच्या पेट्या स्वस्त होत्या. अस्सल फ्रेंच पेटी अवघ्या पाऊणशे रुपयांना मिळत असे. देशी पेटींचं चालचलाऊ खोकं तर पंधरावीस रुपयांना खरीदतां येत असे. चार आठ महिन्यांत बालगंधर्वांच्या तोंडची पदं वाजवितां येण्याइतपत पेटी-वादनांत प्रगति करतां येईल अशी लोकांची समजूत असे. क्लासेस चालविणारे धंदेवाईक मास्तर लोकांच्या या समजुतीला उत्तेजन देत असत. जो उठला तो पेटी शिकूं लागला. ज्या रस्त्यावर हार्मोनियमचा एखादा क्लास असे त्या रस्त्यावर रात्रीच्या नऊ वाजल्यापासून तों सकाळच्या सात वाजेपर्यंतचे दहा तास सोडले तर बाकीच्या चौदा तासांत दहा-पांच पेट्यांतून निघालेल्या स्वरांचा गोंगाट अखंड चालूं असे. "खरा तो प्रेमा," "नाहीं मी बोलत नाथा" "मधुकर वनवन" "सुजन कसा", "स्वकुलतारक सुता" अशा पदांच्या फेरी सुरेल बेसूर पेट्यांतून अव्याहत झडत असत. पेटीवादनाची एक विलक्षण लाट शहरभर उसळली होती! हार्मोनियम हा वाद्याला इतका भाव पूर्वी कधी आला नव्हता. नंतरच्या दिवसांतहि राहिला नाही. याचं एक कारण कदाचित् असं असेल की, नंतर थोड्याच दिवसांनी संगीत रंगभूमीलाच ओहोटी लागली

नाटकी पदांचं वेड कमी झालं, फिल्मी गाणीं लोकांना आवडूं लागलीं; परंतु तीं हार्मोनियमवर वाजवून त्यावर छोटीशी का होईना मैफल वाजवितां येईल, इतका दम तर त्या गाण्यांत नव्हता. कारणं कांहीं असोत, हार्मोनियमच्या लोकप्रियतेचा पूर कांही काळानं ओसरला. मी म्हणतों त्या काळांत घरोघरीं आणि पुण्यांतल्या रस्तोरस्तीं बाजाच्या पेट्या अष्टौप्रहर कशा वाजत होत्या त्याची आजच्या पुणेकरांना कल्पनाहि करतां येणार नाही.

बाजाच्या पेटीचे वर्ग चालविणाऱ्या लोकांपैकीं बहुतेक मास्तर बेतास बात तयारीचे आणि पोटभरू होते. परंतु कांही थोड्यांची अगदी पहिल्या प्रतीची तयारी होती, आणि चांगल्या गवयाच्या गाण्याइतकाच त्यांच्या पेटीवादनाला लोक मान देत. गाण्याप्रमाणेच पेटीवादनाच्या पांचपांच सहासहा तासांच्या मैफली होत असत. टेंब्यांची पेटी कुठे असली की खाली रस्त्यावर लोकांची थाप उभी असे. ते तर पेटीवादनांतले बादशहाच समजले जात होते. त्यांचं मुलायम नाजूक गोड वाजविणं फक्त त्यांच्यासाठींच होतं. परंतु त्यांच्या खालोखाल निष्णात समजले जाणारे कांही कलावन्त होते आणि त्यांच्या पेटीवादनाचंहि पुणेकरांना मोठंच आकर्षण वाटे. गुंडोपंत वालावलकर यांची लोकप्रियता विशेष होती. ते गंधर्व मंडळीत बालगंधर्वांची साथ पेटीवर करण्याच्या नोकरीवरच असल्यामुळे लोकांच्या विशेष नजरेसमोर होते हें एक. आणि शिवाय त्यांचं हार्मोनियम वाद्यावरचं प्रभुत्वहि असं होतं की, तालाच्या खटपटीच्या बाबतींत ते आपले गुरु टेंबे यांच्याहून वरचढ होते. गंधर्व मंडळींतील नोकरी सोडून गुंडोपंतांनी पेटीवादनाचे क्लासेस काढले ही बातमी कळण्याचा अवकाश, पुण्यांतल्या इतर कोणत्याहि क्लासमध्ये नसेल एवढी गर्दी त्यांच्या वर्गांत दाखल झाली. बाहुलीच्या हौदाजवळ गणू शिंद्यांच्या दुकानाच्या वरच्या माडीवर गुंडोपंतांचे वर्ग होते. इतर कोणत्याहि हार्मोनियम शाळेचा नसेल असा या वर्गाचा थाट होता. स्वच्छ बैठकी, दारादारांवर झुलणारे सुंदर चिटांचे पडदे, भिंतीशीं ओळीनं मांडून ठेवलेल्या सुंदर कोऱ्या बाजाच्या पेट्या! पेटीवादनांत थोड्या तयार झालेल्या विद्यार्थ्यांच्या वर्गातून " उगीच कां कांता " या पदाचे स्वर मेट्रोनोमच्या ठेक्यावर निघत असले की जिना चढून येणाऱ्या

माणसाला वाटे, त्या सुंदर तालबद्ध स्वरमाला ऐकत जिन्यांतच उभं राहावं. मध्येच गुंडोपंतांचा इशारा पाहून विद्यार्थी पेटीवरचा हात थांबवीत आणि पदाच्या अखेरच्या "मंचकी लीना" यांतील "ना" वरची तान वाजवून दाखवीत. तिच्या दाणेदार मोत्यासारख्या स्वरांनी तर माधुर्याचे तरंग हवेंत उठल्यासारखे वाटत !

'जलसा' ही गोष्ट त्या काळी विशेष रूढ नव्हती. गायिकेचा जाहीर 'जलसा' तर अशक्य कोटींतलाच होता. कित्येक वर्षांनी हिराबाई बडोदेकर यांनी या प्रयोगाचं धाडस प्रथम केलं. परंतु पुरुष गवयांचे देखील तिकिटं लावून केलेले थिएटरांतले जाहीर जलसे क्वचितच होत असत. गाण्याला तिकिटं लावणं, बैठकीवर मांड्या घालून बसण्याऐवजी श्रोत्यांनी खुर्चीवर बसणं, गायकानं थिएटराच्या स्टेजवर बसून गाणं, असले प्रकार गवयांना भ्रष्टाकारासारखे वाटत असत. यामुळे गायनकलेची अप्रतिष्ठा होते असं ते बोलून दाखवीत. जुनं सोडायचं नाही, कोणतीहि नवी गोष्ट करायची नाही, या अस्सल मुसलमानी आडमुठेपणाचा हा एक मासला होता. आमच्या हिंदु गवयांनी मुसलमानांपासून विद्या घेतली तिच्याबरोबरच गायनाविषयींच्या आडमुठ्या समजुतीहि घेतल्या. जाहीर जलसा म्हणजे एक प्रकारचा भ्रष्टाकार असं मुसलमान गवयांप्रमाणेच त्यांनाहि वाटत असे. मात्र चमत्कार असा की पुण्यांत या समजुतीला पहिला धक्का दिला तो एका मुसलमान गवयानंच—अबदुल करीम यांनी ! त्यांचे जलसे पुण्याच्या थिएटरांत अधूनमधून होत असत. किर्लोस्कर संगीत मंडळीचं स्वतःच्या मालकीचं एक थिएटर असावं या कल्पनेप्रमाणेच पुण्यांत संगीताचं शिक्षण देणारं एक विद्यालयंहि असावं अशी कल्पना होती व त्या कल्पनेंतून 'भारत गायन समाज' निघाला. या समाजातर्फे अधूनमधून किर्लोस्कर थिएटरांत जलसे होत असत. ह्या जलशांत क्वचित् टेंब्यांचं किंवा गुंडोपंतांचं पेटीवादन होत असे, बालगंधर्वांचं गाणं होत असे आणि शेवटी भास्करबुवा गायला बसत. परंतु जलशाला आलेल्या सामान्य लोकांना फक्त बालगंधर्वांच्या गाण्याची रुचि असे. त्या गाण्याचा कार्यक्रम आटोपला आणि भास्करबुवा आसनस्थ होऊन तंबोरे पिळूं लागले की श्रोते उठून जात आणि अर्धे थिएटर रिकामं होत असे.

१०(०९

परंतु भास्करबुवांच्या खासगी मैफली पुण्यांत पुष्कळ होत असत. आणि त्यांची रंगत अवर्णनीय असे. आबासाहेब मुजुमदारांच्या घरीं, पुरंदऱ्यांच्या माडीवर, विंचूरकरांच्या वाड्यांत, अशीं भास्करबुवांच्या गाण्यांचीं ठरलेलीं ठिकाणं होतीं. गंधर्व नाटक मंडळींचा मुक्काम पुण्यांत असला की मंडळींच्या बिऱ्हाडीं भास्करबुवा एकदा तरी बसायचे हें ठरलेलं. मागे दोन तंबोऱ्यांचा झंकार चाललेला असायचा, एक तंबोरा कृष्णा मास्तरच्या हातीं असायचा, एका बाजूस पेटीची साथ करण्यासाठी गुंडोपंत वालावलकर बसलेले असायचे, दुसऱ्या बाजूस शंकरभय्या किंवा दत्ताराम तबल्यावर बसलेले असायचे. श्रोत्यां-मध्ये निवडक दर्दी मंडळी असायची. भास्करबुवांनी पहिल्या चीजेला प्रारंभ केल्याबरोबरच ‘ अहाहा ! ’ ‘ वा ! वा ! ’ असे उद्गार श्रोत्यांच्या तोंडून बाहेर पडायचे आणि मग मैफलीला असा कांही रंग चढायचा की विचारूं नये. १९१७ ते १९२० या चार वर्षांच्या अवधींत भास्करबुवांनी आपलं स्वर्गीय गायन पुण्याच्या लोकांना अगदी पोटभर ऐकविलं. आजच्या काळांत भास्करबुवांच्या दर्जाच्या गवयाचं गाणं करायचं झालं तर ५०० पासून १००० रुपयांपर्यंत बिदागी मोजावी लागेल. त्या काळांत भास्करबुवांना किती बिदागी द्यावी लागत असे तें कुणी विचारूं नये, अन् कुणी सांगू नये !

चार वर्षांत शहरांतल्या हार्मोनियम क्लासेसना खाडिलकरांच्या व इतर नाटककारांच्या नाटकांना आणि भास्करबुवांच्या मैफलींना जशी भरती आली होती तशी पुणेकरांच्या राजकारणविषयक उत्साहालाहि आली होती. टिळ-कांची होमरूल चळवळ जसजशी फोफावूं लागली तसं तसं सरकारचं भय वाढूं लागलं, आणि टिळकांवरच्या तिसऱ्या राजकीय खटल्याची सुरुवात मुंबईत न होतां पुण्यांत झाली. ‘ एक वर्षपर्यंत चांगली वर्तणूक ठेवून शांतता राखण्याची हमी म्हणून वीस हजारांचा जातमुचलका आणि दहा दहा हजारांचे दोन जामीन तुमच्याकडून कां घेऊं नयेत याविषयींचीं कारणें समक्ष येऊन कळवा ’ अशी नोटीस पुण्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनं टिळकांवर बजावली. या खट-ल्याचं काम मॅजिस्ट्रेटपुढे ता. ७ ते १२ ऑगस्टपर्यंत चाललं. या वेळेस टिळ-कांच्या तर्फे बॅरिस्टर जिनांनीं काम चालविलं हें लक्षांत ठेवण्यासारखं आहे. निकाल टिळकांच्या विरुद्ध झाला. फक्त जामिनाची रक्कम कमी झाली. यावर

हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलं. या अपिलाचं कामहि जिना यांनीच चालविलं. हायकोर्टमध्ये टिळक निर्दोषी ठरले. टिळकांवर भरण्यांत आलेला तिसरा राजद्रोहाचा खटला वायबारासारखा फुकट गेला. टिळकांनी हा खटला जिंकल्यामुळे होमरूलची चळवळ कायदेशीर ठरली आणि तिला आणखी जोर चढला. आपल्या चळवळीचा प्रचार केवळ स्वदेशांतच न करतां खुद्द इंग्लंडमध्ये जाऊन करण्याचं टिळकांनी ठरवलं. शिष्टमंडळ घेऊन टिळक विलायतेस निघाले तेव्हा पुणेंकरांचा उत्साह शिगेला पोचला. टिळकांचें विलायतेस प्रयाण हा एकच विषय ज्याच्या त्याच्या तोंडीं झाला. टिळकांना निरोप देण्यासाठी गडकऱ्यांनी कविता केली तींत त्यांनी सांगितलं की, ' बाकीचं काय आणाल तें आणा, पण मुख्य म्हणजे तिकडे बंदिस्त पडलेली शिवरायांची भवानी तलवार तेवढी अवश्य घेऊन या ! '

परंतु टिळकांच्या आणि लोकांच्या या उत्साहावर सरकारनं दुष्ट प्रहार केला. विलायतची बोट गाठण्यासाठी टिळकांचं शिष्टमंडळ कोलंबोपर्यंत गेलं, परंतु विलायत सरकारनं परवाने रद्द केल्याच्या तारा केल्या आणि टिळकांना शिष्टमंडळासह परत फिरावं लागलं. टिळक जाणार म्हणून पुणेकरांत जेवढा प्रचंड उत्साह उसळला होता तेवढीच टिळक परत आले म्हणून त्यांची भयंकर निराशा झाली !

वाजतगाजत कोलंबोला गेलेले टिळक पुण्यास परत आले, परंतु नंतर पांचच महिन्यांनीं ते इंग्लंडला गेले. त्याची फारशी खबरहि पुण्यांत कुणाला आधी नव्हती. कित्येक वर्षं भिजत पडलेल्या " चिरोल केस " चा अखेरचा निर्णय लावून घेण्याच्या सर्वस्वी खाजगी कामासाठीं टिळक गेले होते. अर्थात ' चिरोल केस ' च्या प्रगतिकडे व निकालाकडे पुणेंकरांचे डोळे लागले. या केसमध्ये टिळकांना यश मिळेल असं कुणाला वाटत नव्हतं. स्वतः टिळकांनाहि यशाची खात्री नव्हतीच, परंतु आशा देखील फार थोडी होतीं. परंतु चिरोलनं आपल्या पुस्तकांत टिळकांची व पर्यायानं हिंदी जहाल राजकारणाची बदनामी केली हाती आणि स्वतःचं आणि राष्ट्रीय चळवळीचं नांव साफ करून घेण्यासाठीं न्यायालयाची अखेरची वरिष्ठ पायरी चढून पाहण्याचं टिळकांनीं ठरवलं होतं. " एका मोठ्या शहाण्या माणसाचा एक मोठा वेडेपणा " असं टिळकांच्या

आशेचं वर्णन कित्येकांनी केलं. परंतु वेडी का होईना आशा टिळकांनी धरली होती खरी ते हट्टानं विलायतेस गेले. टिळक पुण्यांत नव्हते, परंतु पुणेकरांचे कान त्यांच्या खटल्याच्या निकालाकडे लागले होते !

टिळकांची आशा शेवटीं उद्ध्वस्त झाली. न्याय मिळेल ही कल्पनाहि खोटी ठरली आणि दाव्याचा एकंदर खर्च फार तर पाऊण लाख रुपये हा अंदाजहि साफ खोटा ठरला. चिरोलला द्यावयाच्या पैशासकट एकंदर खर्च तीन लाखांच्या घरांत गेला. परंतु हें कळल्यावर पुणेकर दिङ्मूढ होऊन स्वस्थ बसले नाहीत. टिळकांना तीन लाख रुपयांची थैली देण्याची कल्पना निघाली आणि ही कल्पना जाहीर झाल्याबरोबर देशांतून चहूकडून टिळक पर्स फंडाला दिलेल्या देणग्या अशा वेगानं येऊं लागल्या की 'केसरी' च्या अंकांत प्रसिद्ध होणारा फंडाचा एकंदर आंकडा सारखा फुगत चालला. चिरोल खटल्यांत टिळकांचा व्यक्तिशः पराभव झाला नव्हता, लोकांचं धुरीणत्व घेऊन त्यांनीं अखंड केलेल्या चळवळीविषयी तो इन्साफ होता, आणि या चळवळींत आपण सारे भागीदार आहोंत या भावनेनंच देशाच्या कोनाकोपऱ्यांतून लोकांनीं फंडासाठीं पैसे पाठविले. १९१९ सालच्या नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस टिळक मुंबईस परत आले. ते येऊन पोंचण्याच्या पंधरा दिवस आधीच फंडाची रक्कम तीन लाखापर्यंत पोंचली होती. हा आंकडा प्रसिद्ध झाला तेव्हां अँग्लो इंडियन पत्रांच्या डोक्यांत तिडीकच उठली. डिसेंबरच्या पहिल्या तारखेस टिळक पुण्यास आले, तेव्हा त्यांची मोठी मिरवणूक काढण्यांत आली. लोकांनी रस्त्यावर तोरणं, कमानी उभारल्या होत्या. देवल यांच्या सर्कशींतील हत्ती आणि घोडे मिरवणुकींत चालत होते.

पुण्याच्या म्युनिसिपालिटीतर्फे टिळकांना मानपत्र देण्यांत आलं. आता ज्याला फुले–मार्केट म्हणतात त्या मार्केटमागच्या पटांगणांत टिळकांच्या जाहीर सन्मानाची प्रचंड सभा झाली. या सभेंतल्या मानपत्राला मवाळ पक्षांतील रँगलर परांजपे, फर्ग्युसन कॉलेजांतील कांहीं प्रोफेसर आणि ब्राम्हणेतर पक्षांतले लोक विरोध करणार होते. परंतु ऐनसभेच्या वेळेस ते आपल्या घरीं दडून राहिले. मानपत्राला उत्तर देतांना टिळक म्हणाले; "विरोध होणार होता तो अखेर विरोधाभासच ठरला, परंतु विरोधाभास का होईना पण झाला हें बरं

झालं." पुढे रँग्लर परांजपे ह्यांचा उल्लेख करण्यासाठीं ते म्हणाले, पण "विलायती मीठ मात्र समक्ष येऊन आमच्या खिरींत पडलं नाहीं! त्याची मी वाट पहात होतों. पण विरोध करणारे लोक आहेत कुठं?" नंतर नव्या सुधारणांना उद्देशून त्यांनी लोकांना सांगितले की "जे काही मिळेल तें तर व्याज, पण पुन्हां बाकीचं राहिलेलं मिळविण्यासाठीं निश्चयानं झटा. आपसांतील फाटाफूट आज योग्य नाही. एकी असल्याखेरीज, ज्यांच्या हातीं स्वराज्य आहे त्यांची मूठ उघडणार नाहीं."

मार्केटमागच्या ज्या पटांगणांत विलायतेहून परत आलेल्या टिळकांनी पुण्याच्या नगरपालिकेचं मानपत्र मवाळ पक्षाच्या व इतर निंदकांच्या नाकावर टिच्चून घेतलं, त्याच पटांगणांत आणखी आठ महिन्यांनी टिळकांच्या मृत्यूची शोकसभा भरणार आहे हे त्या वेळेस कुणाच्या स्वप्नांत तरी आलं असेल काय? मानपत्राच्या या सभेंत त्या भयंकर आदृष्टाचा ओझरता उल्लेख जरी झाला असता तरी लोकांचा ऊर दुःखाच्या धसक्यानं फाटून गेला असतां. "विरोध करणारे सारे लोक कुठे आहेत?" असा प्रश्न करून आपापल्या घरीं दडून बसलेल्या मवाळ व सत्यशोधक पुढाऱ्यांना हिणविणाऱ्या विजयी टिळकांच्या व्यासपीठावरील आकृतीकडे पाहून सभेला जमलेल्या हजारो पुणेंकरांची अशी खात्री होती कीं टिळकांच्या सहवास आणि पुढारीपण यापुढेहि दीर्घकाल आपल्याला लाभणार आहे. पूर्वी कधी नव्हे इतकी टिळकांच्या मार्गदर्शनाची गरज भासावी अशा वळणानं राजकारणाच्या प्रवाहाला गति मिळत होती.

नव्यानं जाहीर झालेल्या सुधारणा राबवायच्या की त्यांवर बहिष्कार टाकायचा असा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला होता. बहिष्काराच्या आणि असहकारितेच्या चळवळीसाठी देशव्यापी आंदोलन करण्याच्या कल्पना गांधीजींच्या डोक्यांत घोळत होत्या. टिळकांच्या गायकवाड्यांतून राजकारणांचीं सूत्रं कोणत्या दिशेनं हालतात त्याकडे देशांतले कोट्यावधि लोकच नव्हे तर हिंदुस्थान आणि विलायत सरकारहि डोळे लावून बसले होते. नव्या सुधारणा कायद्याप्रमाणें होणाऱ्या निवडणुका आपल्या पक्षातर्फे लढविण्याची तयारी टिळक जोरांत करूं लागले होते. परंतु गांधीजींच्या असहकारितेबद्दल टिळक कोणतं धोरण स्वीकारतात तें कलकत्त्यांत भरणाऱ्या कॉंग्रेसमध्यें ठरणार होतं. या कॉंग्रेसचे अध्यक्ष टिळक होतील असाहि दाट संभव होता.

कॉंग्रेस जवळ जवळ येत होती अशा वेळेस पुण्यांत एक गोड समारंभ झाला तो म्हणजे सहासात महिन्यापूर्वी चिरोल केसच्या बाबतींत लोकांनी जो टिळकफंड जमविलेला होता. तो त्यांना अर्पण करण्याचा. या समारंभाच्या शेवटीं भाषण करतांना टिळक म्हणाले, " मी फिर्याद केली ती व्यक्तिशः चिरोल साहेबांवर असली तरी खरं युद्ध सरकारशींच होतं. चिरोल साहेबांतर्फे काम चालविणारा एडवर्ड कार्सन यानं ज्यूरीला उद्देशून केलेल्या भाषणांत असे उद्गार काढले की, 'हा खटला टिळकांनी जिंकला तर इंग्रज सरकावर अनर्थ गुदरेल व त्यांना हिंदुस्थानांत राज्य करणं कठीण जाईल.' यावरून खटल्याचं खरं स्वरूप सहज उघड होण्यासारखं आहे. तें लक्षांत घेऊनच लोकांनी एवढा फंड जमाविला, हा फंड माझ्याकरिता उभारून तुम्ही आज मला खरोखर विकत घेतलं आहे."

जाहीर सभेंतल्या व्यासपीठावरून पुणेंकरांना झालेलं टिळकांचें हें शेवटचं दर्शन! जुलै महिन्यांतल्या अखेरच्या आठवड्यांत टिळक मुंबईस गेले असतांना आजारी झाले, आणि त्या आजारांतच ता. १ ऑगस्ट १९२० रोजीं त्यांचं देहावसान झालं. त्यांच्या अस्थि पुण्यास आणण्यांत आल्या तेव्हा अस्थींचा नगरप्रवेश-समारंभ अपूर्व थाटाचा झाला. एका मोठ्या चारचाकी रथावरच्या पालखींत अस्थींची नक्षीदार चंदनी पेटी ठेवलेली होती. स्वयंसेवक मंडळी रथ ओढीत होती. पालखीवर उंच काठीची रेशमी डेरेदार छत्री उभी केली होती. टिळकांचे दोघे मुलगे पालखीवर चवऱ्या वारीत होते. रथापुढे पुण्यांतल्या साऱ्या भजनी दिंड्या चालल्या होत्या. टाळमृदुंगांच्या आवाजांनी वातावरण घुमत होतं. अशा अपूर्व समारंभात टिळकांच्या वाड्यांत त्यांच्या अस्थींनी प्रवेश केला! ज्या पुण्यांत टिळक चौपन्न वर्षे साडेतीन हात देहानिशी सतत वावरले होते त्या त्यांच्यावाचून शून्य झालेल्या पुण्यांत ते अस्थिरूपांत तारीख ३ रोजीं परत आले! ज्या गायकवाडवाड्याला त्यांच्या कर्मभूमीचं आणि हिंदुस्थानच्या राजधानीचं स्वरूप गेलीं कित्येक वर्षे आलं होतं त्या वाड्यांत त्यानी अखेर अस्थिरूपानं एका करंडकांत विसावा घेतला!

टिळकांच्या मृत्युनिमित्त मार्केटमागच्या पटांगणांत जी शोकसभा झाली. ती प्रचंड होती. सबंध पटांगण आणि चहूबाजूचे रस्ते जड अंतःकरणांनी जमलेल्या

माणसांनी फुलून गेले होतें. टिळक आपल्यातून कायमचे गेले ही कल्पना स्वीकारण्यास पुणेकरांचीं मनं तयार नव्हतीं. पण ती खरी मानणं भाग होतं. अशा भयंकर दुःखाची पुण्यांतील ही पहिली आणि शेवटचीच सभा म्हणावी लागेल. या सभेंत बोलतांना शिवरामपंत परांजपे आपल्या हुंदक्यांशीं आणि अश्रूंशीं झगडतच बोलले. अध्यक्षस्थानीं लाला लजपतराय होते. ते पुण्याच्या लोकांना उद्देशून म्हणाले, "तुमचं सांत्वन प्रत्यक्ष परमेश्वरालादेखील करतां येणार नाहीं." ज्या वेळेस देशाला टिळकांची अत्यंत गरज होती अशा वेळेस ते स्वर्गवासी झाले या घटनेचं इतकं दुःख लालाजींना झालं होतं की, त्या भरांत ते म्हणाले, "माझा हा मायदेश अत्यंत अभागी आहे! माझी सारी उमर चळवळींत गेलीं. पण या देशांत इतके धर्म, इतके पंथ, इतक्या जाती, इतके पक्ष आहेत की, आपल्याला कधी सुखाचे दिवस येतील की, नाही अशा शंकेनं माझं अंतःकरण अनेकदां विदीर्ण होतं.

या सभेच्या दिवशीं पुण्याचा आणि टिळकांचा संबंध संपला. राष्ट्रीय चळवळीची राजधानी या नात्यानं या शहरानं चाळीस वर्षं भोगलेलं वैभव संपलं. नंतर लवकरच असहकारितेची लाट आली आणि पुण्यांतल्या जहाल पक्षाचीं दोन छकलं झालीं. राजकारणांतलं पुण्याचं पुढारीपण नाहिसं झालं. टिळकांच्या वेळचं तें जुनं पुणं अंतर्धानच पावलं...मी स्वतःहि थोड्याच दिवसांनी पुण्यापासून दूर गेलों, तो आता एकतीस वर्षांनी पुन्हा पुण्याचा रहिवासी होत आहे...आता रात्रीच्या वेळेस सहज सहल करीत लकडी पुलावर जाऊन कठड्यावर रेलून आजूबाजूस पाहूं लागलों की माझ्या ओळखीचं तें जुनं पुणं मला कुठं दिसत नाही. या पुलाचं जुनं नांवहि जाऊन आता तो "संभाजी पूल" झाला आहे. पुलाचं रूप पालटलं आहे! आणि पुण्याचंहि! या पुलाच्या कमानीखालून मी फर्ग्युसन कॉलेजांत जाऊं लागलों तेव्हापासून चाळीस वर्षांचं पाणी वाहून गेलं आहे. नदीच्या पात्रांतून वाहणारं पाणी दूर दूर जाऊन अखेर कुठे आणि केव्हा तरी समुद्रांत जातं, त्याप्रमाणंच पुण्यांतल्या जुन्या व्यक्ती आणि घटना विस्मृतीच्या सागरांत गडप झाल्या आहेत. पण पाणी वाहून गेलं तरी त्याबरोबर वहात आलेल्या मातीचा आणि वाळूचा थोडा तरी थर पात्रांत खोल दडून बसलेला असतो, आणि हात घातला तर त्याचे थोडे कण हाताला लागतात, तद्वतच या नव्या संभाजी पुलावर उभं

राहून पाहूं लागलों की जुन्या पुण्याच्या आठवणी माझ्या मनांत येऊं लागतात. प्रत्यक्ष डोळ्यांना दिसणारं प्रचंड विस्ताराचं नवं पुणं पाहण्याऐवजीं माझी अंतर्दृष्टि माझ्या आठवणींतलं जुनं पुणंच पाहूं लागते आणि टिळकांच्या काळां-तलं तें जुनं पुणंच मला अधिक रम्य आणि वैभवसंपन्न वाटतं !

# ब्रह्मदेशांत मी काय पाहिलें ?

कोणतंहि मोठं शहर पाहतांना त्याच्या आधुनिक वैभवाची साक्ष पटविणाऱ्या गोष्टी बघण्यापेक्षां जुन्या संस्कृतीशी व इतिहासाशी त्याचा संबंध दर्शविणारे अवशेष बघण्याची मला अधिक इच्छा असते. ज्याला ऐतिहासिक परंपरा नाहीं, आगापिछा नाहीं असं नवं कोरं करकरीत शहर केवढंहि विस्तीर्ण कितीहि गजबजलेलं; आणि कितीहि शोभिवंत असलं तरी माझ्या दृष्टीनें तें फारसं रमणीय ठरणार नाहीं. ज्यांची पाळंमुळं जमिनीत खोल गेली आहेत अशा वृक्षासारखं शहर असायला हवं.

आजची दिल्ली मला प्रेक्षणीय वाटते ती नव्या दिल्लीच्या ऐश्वर्यामुळें नव्हे,तर हजारो वर्षांचा भूतकाळ त्या त्या शतकांतील राजवटींच्या आणि घडामोडींच्या ज्या खुणा दिल्लीच्या परिसरांत ठेवून गेला आहे त्यामुळें. काशी विश्वेश्वराचं प्राचीन मंदिर, आणि बुद्ध कालातला इतिहास सांगणारं ‘ सारनाथ ’ अशा स्थळामुळे मला आजची काशी रमणीय वाटते. मुंबईची खरी शोभा ‘ गेट वे ऑफ इंडिया ’त नाहीं तर कित्येक शतकांच्या इतिहासाची आठवण ताजी करून देणाऱ्या ज्या अनेक गोष्टी शहराच्या आजूबाजूस आहेत त्यांत आहे. शनिवारवाडा, पर्वती, सिंहगड अशा ज्या स्थळांत मराठ्यांच्या व पेशव्यांच्या काळांतल्या आठवणी आज घटकेलाहि राहिलेल्या आहेत त्या स्थळामुळे पुणे शहराला खरा दिमाख आलेला आहे. कोणत्याहि नव्या शहरी मी गेलो कीं त्या शहराची प्राचीन परंपरा दाखविणाऱ्या कोणत्या खुणा दिसतात ते पाहण्यासाठीं मी उत्सुक असतो.

ब्रह्मदेशाची राजधानी रंगून या शहरांत प्रवेश केल्याबरोबर पहिला प्रश्न माझ्या मनांत आला तो हा कीं, शहर किती प्राचीन आहे, आणि त्याच्या प्राचीनत्वाच्या कोणत्या खुणा आज उरलेल्या आहेत ? या माझ्या प्रश्नाचं उत्तर मला मिळायला वेळ लागला नाहीं.

प्राचीन दिल्लीचे अवशेष बघण्यासाठीं नव्या दिल्लीपासून कित्येक मैल दूर जावं लागतं. ‘सारनाथ’ हे स्थळ काशीपासून कित्येक मैलांच्या अंतरावर आहे

रंगूनची गोष्ट तशी नाही. त्याच्या प्राचीन इतिहासाची आणि संस्कृतीची खूण आधुनिक शहराच्या सीमेवर आणि जवळच आहे. शिवाय ती खूण एखाद्या भग्न अवशेषासारखी नसून मूळच्या प्राचीन वैभवात जशी होती तशीच आजहि अभंग आहे. आणि ' मिंगलादोन ' ( ' मंगलधाम ' चा अपभ्रंश ! ) नावाचा रंगूनचा जो विमानतळ आहे तेथून बारा तेरा मैल अंतरावरच्या शहराकडे निघाल्याबरोबर ती उन्हात तळपत असलेली दृष्टीस पडूं लागते. रंगून शहराच्या कोणत्याहि दिशेनं बघितलं तरी कित्येक मैलांच्या अंतरावरून सूर्यकिरणांनीं झळाळणारी ही उंच खूण सहज दिसल्यावाचून राहात नाही.

रंगूनच्या प्राचीनत्वाची ही वैभवशाली खूण म्हणजे ' श्वे डगॉन पॅगोडा ' या नांवाचं बुद्धमंदिर होय. कित्येक मैलांच्या अंतरावरून दिसतो तो या मंदिराचा सुवर्ण कळस. या ब्रह्मदेशाचं वर्णनच मुळी करतात ' सुवर्णमंदिरांची भूमि ' शब्दांनी. रंगून या राजधानीच्या शहराची गोष्ट सोडा, ब्रह्मदेशांत ज्या ज्या गांवी हिंडावं त्या त्या गांवी सोन्याच्या कळसाचे पॅगोडा आढळतात. ब्रह्मी भाषेंत पॅगोडाला म्हणतात ' फया '. ब्रह्मदेशांत असे किती ' फय ' आहेत या प्रश्नाचं उत्तर द्यायचं झालं तर 'अगणित' असंच म्हणायला हवं. जिकडे हिंडावं तिकडे हे ' फये ' विखुरलेले दिसतात. मी मागे काश्मीरला गेलो तेव्हां बर्फानं आच्छादलेली पर्वत-शिखरं पाहिल्याबरोबर प्रथम अगदीं विस्मित होऊन त्याकडे बघत मी उभा राहिलो. परंतु नंतरच्या दिवसांत जिकडे बघावं तिकडे बर्फाची चमचमणारी चंदेरी शाल डोक्यावरून ओढून घेणारे डोंगर मला जिकडे तिकडे दिसूं लागले, आणि माझं पहिलं आश्चर्य ओसरलं. पॅगोडांच्या बाबतीतहि असंच झालं. ब्रह्मदेशच्या सफरींत ते पदोपदी दिसूं लागले. तेव्हां विस्मयाची धार बोथट झाली. मात्र मनांतला पहिला विस्मय शिळा झाला तरी ' श्वे डगॉन पॅगोडा ' या स्थळाचं अपूर्व सौंदर्य मनाला मोह घालीत राहीलच. 'मिनीगॉन' नांवाचं रंगूनच्या पश्चिम दिशेकडे जे सुंदर उपनगर आहे तिथल्या ' अशोक' नांवाच्या बंगल्यांत मी उतरलो होतो, तिथून शहराकडे आणि शहरांतून परत अशा रोज माझ्या चार पांच तरी खेपा होत असत. आणि प्रत्येक खेपेस उंच टेकडीवरचं ते बुद्धमंदिर आणि पालथ्या घातलेल्या घंटेच्या आकाराचा त्याचा उंचच्या उंच सोनेरी कळस याकडे बघितले की त्या त्या घटकेची त्याची शोभा मोठी प्रेक्षणीय वाटल्यावांचून राहात नसे.

रंगून शहरी आणि इतर ठिकाणींहि हिंदूंचं एखादं देऊळ किंवा मुसलमानांची मशीद क्वचित् आढळते परंतु, ब्रह्मी लोकांच्या प्रार्थनेची स्थळं म्हणजे ‘ फये ’ किंवा पॅगोडाच. आपल्याकडे ज्याप्रमाणें राममंदिर, विठ्ठलमंदिर, शंकराचं देऊळ, लक्ष्मीनारायणाचं देऊळ. असे देवालयाचे विविध प्रकार आहेत तसे ब्रह्मदेशात नाहींत. देऊळ म्हटलं कीं पॅगोडाच असावयाचा. त्याच्या आकाराचं, भव्यतेचं आणि उंचीचं प्रमाण कमी अधिक दिसेल, परंतु त्याचा एकंदर नमुना ठरीव साच्याचा असतो पूर्व, पश्चिम अशा चारी दिशांनी प्रवेश द्वार, कळसाखालच्या गोल आकाराच्या मुख्य मंदिरांत चारी दारांच्या बरोबर समोर बसविलेल्या बुद्धमूर्ति, आणि या मुख्य मूर्तींच्या आजूबाजूस—देवळाभोंवती प्राकार असेल तर त्या प्राकारांच्या पडव्या पडव्यांतहि—मांडलेल्या आणखी कित्येक बुद्धाच्या मूर्ति, मूर्तींपुढें उजळलेले दिवे – हाच ‘ फया ’ चा किंवा पॅगोडाचा ठरलेला साचा आणि सरंजाम ! आपल्याकडे मुख्य मंदिराभोंवतालच्या उपमंदिरांत निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति असतात, असला प्रकार पॅगोडांत नाहीं. लहानमोठ्या अनेक मूर्ति आढळतील ( श्वे डगॉन पॅगोडांतल्या मूर्तींची संख्या तर शेकड्यांनी मोजावी लागेल ! ), परंतु त्या साऱ्या मूर्ति बुद्धाच्याच असतील. ध्यानस्थ बसलेल्या, आडव्या निजलेल्या, उभ्या परंतु साऱ्या बुद्धाच्याच ! या नमुन्याचे आणि थाटाचे हजारो ‘ फये ’ ब्रह्मदेशभर जिकडे तिकडे विखुरलेले आहेत.

परंतु श्वे डगॉन पॅगोडा साऱ्या जगातला सर्वांत मोठा आणि सर्वांत जुना पॅगोडा आहे. इतका भव्य, विस्तीर्ण आणि प्राचीन पॅगोडा जपानमध्यें किंवा चीनमध्येंहि नाहीं. हे श्वे डगॉनचं वैशिष्ट्य आहे. हा पॅगोडा बांधल्याला अडीच हजार वर्षं होत आली आहेत

हा पाहताना मनात सारखा विचार येत राहतो तो हाच, कीं इतक्या प्राचीन काळीं एवढी अवाढव्य आणि इतकी सुबक मनोहर वास्तु ज्यांनी बांधली त्यांच्या कल्पनेच्या भव्यत्वाची आणि कुशल कारागिरीची प्रशंसा कोणत्या शब्दांनी करावी ? वेरूळची लेणी, अजंठ्यांची चित्रं, अबूच्या पहाडावरची संगमरवरी जैनमंदिरं, किंवा मदुरेच्या मीनाक्षी – मंदिराची उत्तुंग गोपुरं पाहताना ज्या कौतुकानं आणि विस्मयानं मन भारावून जातं त्याचाच अनुभव श्वे डगॉन पॅगोडांची उंच टेकडीवरची इमारत पाहताना येतो.

मंदिराच्या चार रस्त्यांपैकीं पूर्वेकडचा चढणीचा रस्ता दुतर्फाच्या छोट्या छोट्या दुकानांनी गजबजलेला आहे. त्यामुळे केरकचऱ्यानं अस्वच्छ झालेला आहे, व अरुंद आहे. सर्वांत प्रशस्त, अत्यंत स्वच्छ, आणि भव्य वाटणारा पश्चिम दिशेकडचा रस्ता, रात्रीच्या वेळेस या रस्त्यावर आणि मुख्य मंदिराच्या भव्य प्राकारात विजेची रोषणाई केलेली असते. पालथ्या घंटेच्या आकाराचा मंदिराचा सोनेरी कळस दिवसा उन्हात चमचमत असतो तर रात्रीच्या वेळेस अगदी कळसाच्या टोकापर्यंत बसविलेल्या विद्युत्‌दीपांनी शोभत असतो. पश्चिम द्वाराकडून प्रवेश केला की सुमारे एकशेवीस पायऱ्या चढाव्या लागतात. साऱ्या पायऱ्या संगमरवरी दगडाच्या आहेत. आठ आठ दहा दहा पायऱ्यांवर प्रशस्त टप्पा असून प्रत्येक टप्प्यावर खूप मोठाले खांब आहेत. हे सारें बांधकाम डोंगरातच केलेलं आहे. सुमारे वीस फुटांच्या उंचीच्या छताखालून पायऱ्या चढून जातांना आपण एक उघडाबोडका डोंगर चढत आहोत असं वाटण्याऐवजी एखाद्या सुंदर प्रासादाच्या महालातून जात आहोत असं वाटत राहतं. पश्चिमेकडच्या या वाटेवर दुकानांचा गजबजाट नाहीं, परंतु प्रत्येक टप्प्यावर मोठ्या-मोठ्या गुलाबांचे गुच्छ, रंगीत कागदांच्या माळा आणि पताका व मेणबत्त्या विकण्याचे स्टॉल्स आहेत. या स्टॉल्सवरच्या बायका 'घ्या हो घ्या हो फुले ताजी' अशा अर्थाच्या आरोळ्या ठोकू लागतात. दर्शनासाठीं येणाऱ्या भक्तांनीं मंदिरातल्या प्राकारांतल्या मूर्तीपुढें मेणबत्त्या लावण्याचा परिपाठ आहे. तेलातुपाचे दिवे पॅगोडात कुठे दिसणार नाहींत. जिकडे तिकडे छोट्या छोट्या मेणबत्या तेवत असलेल्या आढळतील. ( ख्रिस्ती धर्मात मेणबत्त्यांचा शिरकाव झाला तो बुद्धधर्माच्या अनुकरणामुळेंच की काय कुणास ठाऊक ! ) एकशेवीस पायऱ्यांची ही प्रशस्त वाट फारच स्वच्छ राखलेली आहे. ही वाट चढून गेल्यावर खूप विस्तीर्ण उघडा प्राकार लागतो, तो फरसबंद आणि अत्यंत स्वच्छ आहे. या वर्तुलाकार प्राकाराची एकंदर प्रदक्षिणा अर्ध्या अधिक मैलाची सहज आहे. या प्राकारात मधोमध गोलाकृति मुख्य मंदिर आहे. या मंदिरांत चारी प्रवेशद्वारासमोर तोंड करून बसलेल्या दहा बारा फूट उंचीच्या सोन्याच्या बुद्धमूर्ति आहेत.

मूर्तीवर फूलं वाहण्याचा प्रघात नाहीं मूर्तीपुढच्या कट्ट्यावर फुलं, माळा इत्यादि जी कांहीं पूजा आणली असेल ती ठेवावयाची.

त्या देखील कट्ट्यावर मूर्तीला गंधलेपन करण्याचीहि चाल नाही. मूर्तीवर पाणी शिंपडण्याची रीत नाही. तीर्थप्राशनाची तहान कुणा भक्ताला लागत नाही. यामुळे आपल्या हिंदू देवालयांत हमखास आढळणारी ओल, चिकचिकाट, निर्माल्याचा कचरा इत्यादि गोष्टी बुद्धमंदिरात बिलकूल आढळत नाहीत. जिकडे तिकडे सारं कसं स्वच्छ असतं.

' फया ' त पुजारी दिसत नाहींत. भिकारीहि भेटत नाहींत. दर्शनासाठी येणाऱ्या लोकांना दक्षिणा द्यायची असेल तर कुलूप लावलेल्या मोहोरबंद पेट्या चढणीच्या चार वाटा ज्या ठिकाणी प्राकाराला येऊन मिळतात त्या ठिकाणी ठेवल्या आहेत. त्यात नोटा, नाणी, काय टाकायचं असेल ते टाकायचं. यामुळें आपल्याकडच्या देवळांना येणारं गलिच्छ व्यापारी स्वरूप आपोआप बंद झालेलं आहे. पॅगोडांत पुजारी नाहीत, परमार्थाचे दलाल नाहींत व भिकारी नाहीत; त्याचप्रमाणे जातिभेद आणि धर्मभेदहि नाहीत, हिंदूंनी, मुसलमानांनी किरिस्तावांनी, वाटेल त्यानं पॅगोडांत खुशाल शिरावं आणि मंदिरांतल्या अगदी मुख्य मूर्तीपर्यंत जावं. सोवळं ओवळं नाही, विटाळ-चंडाळाची कल्पना नाही, आरती दुपारतीचा कलकलाट नाही ! एवढं प्रचंड प्राकार, परंतु जिकडे तिकडे कशी गंभीर शांतता पसरलेली असते. मूर्तीपुढच्या प्रशस्त संगमरवरी सभामंडपासारख्या जागेत गवताच्या चट्या आंथरलेल्या असतात. त्यांवर गुडघे टेकून ध्यानस्थ होऊन काय प्रार्थना करावयाची असेल ती मनांतल्या मनांत करावयाची. पुरुषांसाठीं आणि बायकांसाठीं निराळ्या जागा नाहींत. पुरुष आणि स्त्रिया शेजारी शेजारी गुडघे टेकून ओणव्या होऊन प्रार्थनेत मग्न झालेल्या दिसतात !

वर्तुलाकार प्राकारात जागोजाग उपमंदिरं आहेत. तिथलाहि सारा सरंजाम आणि थाट मुख्य मंदिरातल्या सारखाच. मोठ्या आणि छोट्या मंदिरांत एक गुळगुळीत, मुद्दाम घडवून तयार न केलेला परंतु कांहीसा वाटोळा असा सात आठ शेर वजनांचा दगड ठेवलेला असतो. हा दगड तीन वेळा उचलून मनांतल्या मनांत आपल्या इच्छेचा उच्चार करून मागणं मागितलं की इच्छा पूर्ण होते असा समज आहे. एका उपमंदिरात मी गेलो तेव्हां कित्येक तरुण ब्रह्मी मुली प्रार्थना करून हा दगड उचलतांना मला दिसल्या. "तुम्ही काय मागणं मागता ?" असं मी त्यांना विचारलं, तेव्हां त्या लाजून हसल्या व कांहीं बोलेनात; परंतु त्यांच्या

बरोबर असलेली एक ठेंगणी ठुसकी वयस्क स्त्री मला सांगू लागली की, " या साऱ्या शाळेत शिकणाऱ्या मुली आहेत. मी त्यांची मास्तरीण आहे. यांची परीक्षा जवळ आली आहे परीक्षेंत यश मिळावं असं मागणं या मागत आहेत.

बुद्धधर्मीय लोक बुद्धदर्शन केल्यानंतर प्रदक्षिणा घालतात कीं नाहीं ते विचारून घ्यायचं मी विसरलो, परतु माझ्या हिंदु संवयीप्रमाणें प्राकारात मी हिंडलो तो प्रदक्षिणा घालण्याच्या हेतूनच.

प्रदक्षिणेच्या वाटेवर एके ठिकाणची खूप मोठी घंटा मला दाखविण्यांत आली. या घंटेचं वजन चाळीस टन आहे. यावरून ती किती मोठी असेल पहा. थरावदी नांवाच्या राजानं १८४१ मध्यें ही साडेआठ फूट उंचीची घंटा तयार करवून पॅगोडाला नजर केली. म्हणजे ती एकशें पंधरा वर्षांची जुनी आहे. मंदिरांतल्या घंटा वाजविण्याची बुद्धांची रीत चमत्कारिक आहे. आपल्या हिंदू मंदिरांतील घंटांना मधोमध एक लंबक असतो तसा लंबक या घंटांना मुळी नसतोच. एक मोठं लाकडी दांडक घंटेसमोर अशा बेतानं टांगलेलं असतं की, ते जोरात लोटलं म्हणजे त्याचा आघात घंटेच्या खालच्या काठावर व्हावा आणि "घोंऽ" असा गंभीर ध्वनि निघावा. श्वे डगॉन पॅगोडातल्या चाळीस टन वजनाच्या या प्रचंड घंटेपुढें भलं मोठं दांडगं लाकडी दांडकं टांगलेलं नव्हतं तर नुसतंच खालीं ठेवलं होते, ते दोन्ही हातानं उचलून घ्यायचं आणि एखाद दार लोटून उघडण्यासाठीं त्यावर आपण जसा प्रहार करू तसा घंटेच्या खालच्या कडेवर टोला मारायचा. मला असं सांगण्यांत आलं की जो पाहुणा श्वे डगॉन-मधील ही घंटा वाजवील त्याचं ब्रह्मदेशांत पुन्हा येणं घडल्यावाचून राहात नाहीं. मी म्हटलं ठीक आहे, हा समज खरा असला आणि भगवान बुद्धाच्या कृपेनं माझं पुन्हां येणं घडलं तर मला नको आहे थोडंच? परंतु ते न घडलं, आणि लाकभ्रम खोटा ठरला तरी देखील मी येवढंच म्हणेन की मी वाजविली ती घंटा नव्हे तर नकारघंटा होती.

श्वे डगॉन पॅगोडातल्या घंटेबद्दल या लौकिक श्रद्धेचा उल्लेख एका मोठ्या माणसाच्या तोंडून मला या नंतर चारपांच दिवसांनीच ऐकायला मिळाला. सर ह्यूबर्ट रान्स हे ब्रह्मदेशाचे शेवटचे गव्हर्नर होते. स्वतंत्र ब्रह्मी सरकारची स्थापना झाली ती ह्याच गृहस्थांच्या हातून. ब्रह्मदेशातील माझ्या मुक्कामात

ब्रह्मी स्वातंत्र्य दिनानिमित्त झालेल्या अनेक कार्यक्रमांना पाहुणा म्हणून मी हजर राहिलो. सर ह्यूबर्ट रान्स यांना सन्मानाचा किताब देण्यासाठी ब्रह्मी सरकारनं मुद्दाम पाचारण केलं होतं. या संबंधात ब्रह्मदेशचे 'अदिपदि' ( 'अधिपती'चा हा अपभ्रंश आपल्याकडे ज्याप्रमाणे बाबू राजेंद्र प्रसाद यांना आपण 'राष्ट्रपती' म्हणतो त्याचप्रमाणेच ब्रह्मी राजघटनेत 'अदिपदि' हा सबंद देशाचा घटनात्मक प्रमुख समजला जातो ) अदिपदि डॉ. बा आ यांच्या भव्य राजप्रासादातील दरबार हॉलमध्यें मोठ्या थाटात सत्कार समारंभ झाला. त्या वेळेस उत्तरादाखल केलेल्या भाषणांत सर ह्यूबर्ट रान्स विनोदानं म्हणाले, " आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा आपला कायमचा निरोप घेऊन मी स्वदेशी परत गेलो होतो. परंतु आपण मला पुन्हा बोलावून घेतलंत, आणि ब्रह्मदेशाला मी पुन्हा भेट देत आहे. हा आपल्या प्रेमाचा प्रभाव म्हणावा की श्वे डगॉन पॅगोडातली घंटा मी वाजविली होती त्या घंटेचा हा प्रसाद म्हणावा ? "

जगातला सर्वांत मोठा आणि जुना पॅगोडा म्हणून श्वे डगॉनची भव्यता आणि वैभव मनाला थक्क करून सोडण्यासारखं असेल, परंतु इतर लहान-मोठे पॅगोडा पाहतानाहि तिथली कमी अधिक प्रमाणातली श्रीमंती मनांत भरतेच.

'फया'तल्या मुख्य चार मूर्ती पांच सहा फूट उंचीच्या आणि सोन्याच्या असतात. मांदिरातल्या इतर सरंजामाचं ऐश्वर्यहि नजरेत भरण्यासारखं असतं. स्वच्छता आणि शांतता या दोन्ही दृष्टींनी पॅगोडा म्हणजे नमुनेदार देऊळ वाटतं. दक्षिणेचा जुलूम करणारे पुजारी आणि हात पसरून लोचटपणा करून सतावणारे भिक्षेकरी हे दोन्ही उपसर्ग पॅगोडात किंचित् देखील नसल्यामुळें आपल्या मनाच्या गांभीर्याला धक्का अगदींसुद्धा बसत नाहीं. कुणाला मज्जाव नाहीं. स्पृश्यास्पृश्यतेच्या कल्पना नाहींत. या साऱ्या गोष्टी लक्षांत घेतल्या तर असं खचितच म्हणावसं वाटतं कीं आदर्श मंदिर कसं असावं तर या पॅगोडासारखं. परंतु पॅगोडातल्या सोन्याच्या मूर्ति आणि इतर ऐश्वर्य बघितलं म्हणजे दुसरेहि कांहीं विचार मनांत आल्यावाचून रहात नाहींत.

पॅगोडाच्या भव्य इमारती आणि त्यातल्या मोठमोठ्या सोन्याच्या बुद्धमूर्ती बघून वाटतं, कीं हा बुद्धधर्माचा विकास आणि जय म्हणावयाचा कीं त्याची

थट्टा म्हणावयाची ? हिंदू धर्माचं मूलतत्त्व ज्या कर्मकांडामुळें, उच्चनीच भेदामुळें, आणि मूर्तिपूजेमुळें पार लुप्त झालं होतं त्याविरुद्ध बंड करून गौतमानं नवा धर्मसंप्रदाय निर्माण केला. ब्रह्मचिंतन, अपरिग्रह, साऱ्या वासनांचं निर्मूलन, आणि अखेर निर्वाण, यावर बुद्धानं जोर दिला. त्याच्या संप्रदायाचा झपाट्यानं फैलाव झाला तो त्यातल्या या उच्च शिकवणुकीमुळें आणि ज्या बुद्धानं कर्म-कांडाचं ढोंग खणून काढलं त्या बुद्धाचीच देवळं लक्षावधि नव्हे तर कोट्यावधि रुपये खर्चून भक्तांनी बांधलेली दिसतात ! श्वे डगॉन पॅगोडातल्या मुख्य मंदि-रांत आणि उपमंदिरांत बुद्धाच्या मूर्तींचा अक्षरशः खच पडलेला आहे.

तो पाहिल्यावर मनांत येते कीं मूर्तिपूजेविरुद्ध ज्यानं हत्यार उपसलं त्या बुद्धालाच त्याच्या भक्तांनीं मूर्तिरूप करून टाकलंय. काळानं बुद्धावर घेतलेला हा केवळ सूड म्हणायचा ? जे जे प्रिय किंवा आदरणीय असेल त्याची साकार मूर्ती घडवायची व त्या मूर्तीची पूजा करावयाची ही मनुष्याच्या अंतःकरणांतली एक दुर्दम्य अविनाश प्रेरणा आहे. तिला दडपण्याचे प्रयत्न ज्या ज्या धर्मांनीं किंवा संप्रदायांनी केले त्यांत कालांतरानं कोणत्या ना कोणत्या तरी स्वरूपात मूर्ती-पूजेचा गुणोपासनेचा, बडिवार शिरलेला दिसतो.

* * *

: २ :

श्वे डगॉन पॅगोडा सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वीचा जुना आहे व त्यासाठीं रंगून शहराची प्रसिद्धी प्राचीन कालापासून आहे. परंतु आतां रंगूनचं वैभव वाढविणारा आणखी एक नवा पॅगोडा शहराच्या उत्तरेस सात मैलावर बांधलेला आहे.

नव्या स्वतंत्र ब्रह्मी सरकारनं कोट्यावधि रुपये खर्चून हा नवा 'फया' किंवा पॅगोडा बांधला, आणि त्याला नांव दिलं, 'कबा–ए पॅगोडा' (म्हणजे जगत् शांति मंदिर). ब्रह्मदेशांत ब्रिटिश राजवटीचा शेवट होऊन लोकांचं स्वराज्य स्थापन झालं १९४८ साली जानेवारीच्या ४ थ्या तारखेस. त्यानंतर राष्ट्रीय उत्थापनाला पोषक होतील असे अनेक उपक्रम ब्रह्मी सरकारनं केले. १९५४ साली अखिल जागतिक बुद्ध परिषद रंगून शहरी भरली ती ब्रह्मी सरकारच्या आमंत्रणानंच. बुद्धधर्माच्या स्थापनेपासून अडीच हजार वर्षांत भरलेली ही सहावी अखिल बुद्ध परिषद होती. या परिषदेचा सोहाळा फार मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यांत आला. देशोदेशीच्या बुद्धमहंतांना आणि बुद्ध धर्माच्या अभ्यासूंना आमंत्रून बोलाविलं होतं. डॉ. आंबेडकर हे अशा निमंत्रित पाहुण्यांत होते.

या सोहाळ्याच्या निमित्तानं 'कबा-ए पॅगोडा' बांधण्यांत आला, व पॅगोडापासून दोन फर्लोंगाच्या अंतरावर दुसरी एक अत्यंत भव्य वास्तु बांधण्यांत आली. 'कबा–ए पॅगोडा फारशा उंचीवर नाहीं किंवा विशेष भव्यहि नाहीं. आधुनिक स्थापत्यविशारदांनीं कितीहि आटोकाट अक्कल चालविली आणि यंत्राच्या सहाय्यानं बांधकाम केलं तरी प्राचीन स्थापत्याच्या भव्यतेपुढें त्यांच्या कृती कशा खुजा ठरतात याचाच हा पॅगोडा म्हणजे पुरावा वाटतो. कुणीकडे श्वे डगॉन पॅगोडाची माणसाला स्तिमित करून टाकणारी रचना, आणि कुणीकडे अगदींच सामान्य वाटणारा हा 'कबा-ए पॅगोडा'! परंतु या पॅगोडापासून दोन फर्लोंगावर जी वास्तु बांधण्यांत आली आहे ती बघितल्यावर मात्र आधुनिक स्थापत्य कलेचं कौतुक करावसं वाटतं.

ही वास्तु म्हणजे सहाव्या जागतिक बुद्धपरिषदेसाठी बांधण्यांत आलेलं भव्य सभागृह. हें सभागृह सुमारें दोनशे फूट लांब, दीडशे फूट रुंद आणि पन्नास फूट उंच आहे. 'फया' प्रमाणेच या सभागृहालाहि चारी दिशाना चार प्रवेशद्वारं आहेत. पूर्वेच्या द्वारासमोर दीडशे फूट रुंदीचा दुमजली भव्य प्लॅटफॉर्म असून उत्तरेकडील आणि दक्षिणेकडील बगलात ज्या गॅलऱ्या बांधल्या आहेत त्या प्रत्येकींत सुमारे पांचशे माणसांची बसण्याची सोय केली आहे. शिवाय मधोमधच्या विस्तीर्ण जागी दोन हजार माणसं सहज बसतील. परंतु या सभागृहाचं वैशिष्ट्य त्याची ही भव्यता नसून दुसरंच आहे. खडबडीत दगडधोंड्याची बनलेली वाटावी अशी एक वर्तुलाकार उंच टेकडी बांधलेली असून त्या टेकडीच्या गाभ्यात हे विस्तीर्ण सभागृह बसविलेलं आहे. म्हणजे प्राचीन कालातल्या गुहेची ही आधुनिक आवृत्ति आहे म्हणा ना. त्या वास्तूचं नांव देखील ठेवलं आहे 'चत्ता संगायना गुंफा'! (म्हणजे ज्या ठिकाणी बुद्धानं दाखविलेल्या संघमार्गाचं चिंतन करायचं ती गुहा.)

प्राचीन कालीं ज्याप्रमाणें गिरीकंदरांतल्या गुंफांतून बुद्धभिक्षू राहात असत व धर्मचिंतन करीत असत त्याप्रमाणेंच या आधुनिक गुंफेचा उपयोग व्हावा. अशी योजना आहे. केवळ १९५४ साली भरलेल्या जागतिक बुद्ध परिषदेच्या कामासाठी सभागृह हवं होतं म्हणून ही गुंफा बांधली असं नव्हे.

आपल्याकडे ज्याप्राणें महाभारताची अधिकृत संहिता तयार करण्याचा उद्योग चालू आहे त्याचप्रमाणे बुद्धाच्या धर्मग्रंथाची अधिकृत आवृत्ति काढण्याची योजना आहे, आणि हें काम करण्यासाठीं देशोदेशीचे आमंत्रित तज्ञ, भिक्षू, रंगून शहरी येऊन राहिलेले असून त्यांचं संशोधनाचं काम या जगत्-शांति मंदिरांत चाललेलं आहे. हे काम १९५६ साली पूर्ण व्हायचं आहे. त्यासालीं म्हणजे यंदाच बुद्धाच्या निर्वाणाला बरोबर अडीच हजार वर्षे पुरी होणार आहेत व त्यानिमित्त फार मोठा उत्सव होणार आहे.

या जगत् शांति मंदिरात बुद्धाच्या धर्मग्रंथाचं पठणहि सतत चाललेलं असतं. पूर्वद्वारासमोरच्या दुमजली प्लॅटफॉर्मवर सन्मान्य श्रेष्ठ भिक्षु बसलेले असतात. त्यांच्यापैकीं दोघे चौघे ग्रंथाचं वाचन धीरगंभीर मोठ्या आवाजात करीत असतात. दोन्ही बाजूंच्या गॅलऱ्यात देशोदेशीचे भिक्षु धर्मग्रंथ घेऊन बसलेले असतात. व तेहि हळु आवाजात संहिता वाचीत असतात. या पठणाचं नेतृत्व

करणाऱ्या भिक्षूपुढे 'माइक' ठेवलेला असतो. मंदिराच्या चारी प्रवेद्वारावर दूरध्वनिक्षेपक बसविलेले आहेत. यामुळें कबा ए पॅगोडाच्या आवारांत शिरल्या-बरोबर आपल्या कानी भिक्षूंचं पठण पडूं लागतं. या ठिकाणी हिंडत असताना 'नवा नवा.. धमा धमा' ('नवधर्म' की काय कुणास ठाऊक? हे दोन शब्द मला सारखे ऐकू येत होते. गुंफेतल्या प्रचंड सभागृहात अशाप्रकारे भिक्षूंचं पठण चाललं होतं, आणि हॉलच्या संगमरवरी फरशीच्या मधल्या जागेत आंथ-रलेल्या मऊ गवताच्या चट्यावर बसलेले स्त्री पुरुष शांतपणें श्रवण करीत होते. साऱ्या भिक्षूंच्या अंगावरची वस्त्रं केशरी होती. साऱ्यांनी मुंडन केलेलं होतं. या मंदिरांत देखील सोवळं ओवळं नाही, कुणाला मज्जाव नाही. 'फया' पाहताना जे मनात येतं तेच शांत गंभीर वातावरणानं भरलेल्या या मंदिरांत उभं राहिल्यावर येतं, की "या रे या! ज्यांना ज्याना म्हणून संसाराच्या व्याधीतून मुक्त होण्याची इच्छा असेल ते सर्वजण येथे या!" बुद्ध धर्माची पवित्र आणि उच्च शिकवण बुद्धधर्मीयांनी अजूनहि पाळली आहे खरी!

पॅगोडा म्हणजे ब्रह्मी लोकांच्या एकंदर जीवनाचा मध्यबिंदु म्हणावा लागेल. आपल्याकडे ज्याप्रमाणें चांगलासा पाणवठा पाहाचा आणि त्याभोंवती गाव वसवायचं अशी पद्धति आहे, त्याप्रमाणें ब्रह्मदेशांतली प्राचीन कालापासून चालत आलेली रीत अशी कीं 'फया' बांधायचा आणि त्याभोवती गांव वसवायचं.

खेडेगावाचा देखील मध्यबिंदु 'फया'. ब्रिटिशांनी नव्या रंगून शहराची मांडणी केली तीहि एका पॅगोडाचा मध्यबिंदु कल्पून. या पॅगोडाचं नाव 'सूले पॅगोडा' असं आहे. आज घटकेचं मुख्य रंगून शहर श्वे डगॉन पॅगोडापासून चार पाच मैलांच्या अंतरावर आहे. सारी उपनगरें हिशोबात घेतली तर दक्षिणोत्तर चवदा मैलांचा व पूर्वपश्चिम दहा मैलांचा रंगूनचा एकंदर विस्तार आहे. परंतु ब्रिटिश लोकांनी जे रंगून शहर वसविलं आणि आज ज्या ठिकाणी सारा व्यापार उद्योगधंदा, वस्ती, परोपरींच्या वाहनांची रहदारी, चित्रपटगृह, लहान-मोठी हॉटेलं, बँका, कचेऱ्या इत्यादि साऱ्या व्यवहारांचं केंद्रीकरण झालेलं आहे ते एक छोटंसंच शहर आहे. दक्षिणेच्या बाजूस रंगून नदीचें पात्र, त्यात हाकारून राहिलेली जहाजं, गलबतं, नौका, उतारूंचे व मालाचे धक्के, आणि उत्तरेच्या बाजूला रेल्वेचं स्टेशन, यातलं अंतर इतकं थोडं की पायी चालून गेलं तरी पुरता अर्धा तास काही लागायचा नाही. पूर्व-पश्चिम लांबी थोडी

अधिक आहे. परंतु ते अंतर देखील चालणाऱ्याला तासाभरांत सहज चालून जाता येईल इतकंच आहे. म्हणजे सूले पॅगोडाभोवती ब्रिटिशांनी वसविलेलं मुख्य रंगून शहर छोटसंच आहे. परंतु किती आखीव, रेखीव आणि सुबक! आडवे पांच सहा आणि उभे पांचसहा मुख्य हमरस्ते, त्यांच्या योगानं बनलेले चौक, आणि मुख्य रस्त्याशीं समांतर असलेले लहान लहान रस्ते ! कुठे गल्ली नाहीं, कुठे बोळ नाहीं ! वाट चुकण्याचा संभव नाहीं. पटावर मांडलेल्या सोंगट्याप्रमाणे साऱ्या इमारती. गगनचुंबी इमारत एकहि नाहीं. तिहीपेक्षां अधिक मजल्याच्या इमारती मोजतां येतील इतक्या थोड्या. अमका रस्ता आणि त्यावरील अमुक क्रमांक एवढं माहीत असलं कीं कोणतीहि इमारत शोधण्यासाठीं हिंडत बसावं लागत नाहीं. एका मोठ्या देशाच्या राजधानीचं शहर एवढंस छोटं असावं याचं जसं आश्चर्य वाटतं, त्याप्रमाणें मध्यभागीच्या सूले पॅगोडा भोवती वसलेल्या या शहराची अगदी बांधेसूद रचना पाहून कौतुक वाटतं.

स्ट्रँड रोड, मर्चंट स्ट्रीट, डलहौसी स्ट्रीट, फ्रेझर स्ट्रीट अशा पूर्व-पश्चिम रस्त्यातून आणि स्पार्क्स स्ट्रीट, फायरे स्ट्रीट, मोगल स्ट्रीट अशा दक्षिणोत्तर रस्त्यातून मोटारी, जीपगाड्या, बसेस, रिक्षा, अशा वाहनातून धांदलीनं धावणारी पळणारी रंगूनची चित्रविचित्र दुनिया मोठी पाहण्यासारखी वाटते.

दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास आठवला कीं मनांत येतं दुर्दैवाच्या केवढ्या भयंकर दोन तडाख्यातून हे रंगून शहर गेलेलं आहे. १९४२ सालीं जपान्यांनीं ब्रह्मदेशावर हल्ला केला आणि तिथली ब्रिटिश सत्ता उखडून टाकली आणि लगेच दोन वर्षांच्या अवधीनंतर, ब्रिटिशांनीं परत ब्रह्मदेशांत घुसून जपानी सत्ता निपटून टाकली. ब्रह्मदेशाच्या प्रजेनं युद्धांत कोणत्याच पक्षातर्फे प्रत्यक्ष उडी घेतली नाहीं. परंतु त्यांचा देश दोन वेळां विलक्षण रणकंदनाची भूमि ठरला. 'दोघांचं भांडण, तिसऱ्याचा लाभ' या सुभाषिताऐवजीं 'दोघांचं भांडण, तिसऱ्याचं कांडण' असा विचित्र दुर्दैवी अनुभव ब्रह्मदेशाला आला. प्रथम जपानी आले, त्यांनीं बॉंबिंग केलं; आणि नंतर इंग्रज-अमेरिकन फौजा आल्या त्यांनीं तर 'कार्पेट बॉंबिंग केलं'.

या भयंकर संहाराच्या काळांत रंगून शहराचं जीवन अगदीं केविलवाणं होऊन गेलं होतं. शहराला स्मशानाची अवकळा आली होती. बहुतेक माणसं

शहर सोडून खेड्यापाड्यात आणि जंगलात गेली होती. जे गेले नव्हते ते श्वे डगॉन पॅगोडाच्या आश्रयानं जीव मुठींत धरून किड्यामुंग्याप्रमाणे रहात होते. अवघ्या बाराचवदा वर्षांपूर्वी संहाराचा आणि उत्पाताचा हा इतिहास घडला. परंतु त्याच्या करुण कहाण्या आता विस्मृतीत गडप झालेल्या आहेत. हिवाळ्यांत वठलेलं झाड वसंत–ग्रीष्म ऋतूत पुन्हा फुलाफळांनी डवरलेलं दिसावं तद्वत् रंगून शहर आता पुन्हा सजलेलं, फुललेलं, धांदलीनं धावपळीनं गजबजाटानं दुथडी भरून चाललेलं पाहिलं कीं मनांत येतं, माणसाची जात किती चिवट ! अवघ्या बारा- चवदा वर्षांपूर्वीच ज्यानी प्रलय काळाचं दर्शन एक वार नव्हे तर दोन वार घेतलं ते हे रंगूनचे रहिवाशी रस्त्यारस्त्यातून गर्दी करताहेत, आपापले उद्योग पाहताहेत, बाजारहाट करताहेत, खाताहेत, पिताहेत, वीत वीत लांबीचे लठ्ठ लठ्ठ चिरूट ओढताहेत ! आपण सामान्यतः काळाचा उल्लेख ' सर्व भक्षी ' असा करतो. परंतु खरी गोष्ट अशी आहे की काळ ज्याप्रमाणे सर्व गोष्टींचा नाश करतो त्याप्रमाणेच तो नष्ट झालेल्या गोष्टींना पुन्हां जिवंतहि करतो ! सृष्टीचा संहार आणि संवर्धन दोन्ही कार्य करणारं शंकर हे एकच दैवत आपण कल्पिलं आहे ते बरोबर आहे !

भारतीय जनता शहरांत नाहीं खेड्यात आहे, असं म्हणण्याची रीत आहे. कांहीं एका विशिष्ट अर्थानं ते खरेंहि आहे. भारताप्रमाणेंच ब्रह्मदेशहि कृषि-प्रधान देश आहे. साऱ्या जगाला तांदूळ पुरविणारा तो देश आहे.

उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या चिंदविन, इरावती, सालविन यासारख्या मोठाल्या नद्या आणि त्याना समांतर असलेल्या पर्वतांच्या रांगा व जंगलं अशा भूभागात विखुरलेल्या पन्नास हजार खेड्यातले किसान हीच खरी ब्रह्मी जनता. परंतु ही गोष्ट मान्य केल्यानंतरहि असंच म्हटलं पाहिजे की ब्रह्मी लोकांच्या विविधरंगी जीवनाचं दर्शन घ्यायचं असेल तर रंगून शहरच बघायला हवं. ब्रह्मदेशाची एकंदर लोकसंख्या एक कोटी ऐंशी लक्ष आहे ( म्हणजे मराठी भाषिकांच्या संख्येहून एक कोटी वीस लक्षानं कमी आहे. ) यापैकी एक कोटी चाळीस लक्ष लोक खेड्यांत राहणारे आहेत. पण जे खेड्यात पिकतं ते विकतं शहरातून. देशाच्या साऱ्या संपत्तीची बाजारपेठ असते शहरातच. कोणत्याहि देशातलं मोठं शहर म्हणजेच लोकांच्या बहुरंगी जीवनाचं दर्शन घडविणारा आरसा होय. १८५६ सालीं पुरती अर्धालाख देखील नसलेली रंगूनची लोक-

संख्या आता साडेसात लक्षांच्या घरांत आली आहे. ही साडेसात लाखाची ब्रह्मी दुनिया काय खाते-पिते, कोणते कामधंदे करते, कोणते षोक करते कशी नटते थटते, कोणत्या रंगढंगात मग्न असते, इत्यादि प्रश्नांची उत्तरं शोधायची असतील तर सकाळी दहा वाजल्यापासून सुरू होणाऱ्या छोट्या सुबक रंगून शहराच्या हमरस्त्यावरच्या वर्दळीकडे घटका दोन घटका बघावं.

अशा प्रकारे पाहताना अगदी पहिली गोष्ट नजरेत भरते ती म्हणजे जिकडे तिकडे फार मोठ्या संख्येनं दिसणाऱ्या ब्रह्मी स्त्रिया, दुकानांत, रस्त्यांत बाजारात, भाजी मार्केटात, चहूकडे स्त्रियाच स्त्रिया ! क्षणभर भास होतो की आपण एखाद्या बायकांच्या राज्यांत तर आलो नाहीं ! लहान मोठ्या दुकानावर मालक म्हणून बसणाऱ्या स्त्रियाच ! रस्तोरस्ती फुटपाथवरून मांडलेले फराळाचे स्टॉल्स चालविणाऱ्या स्त्रियाच ! भाज्या, फुलं, फळं विकणाऱ्या स्त्रियाच ! फॅशनेबल दुकानांत विक्रीचं काम करणाऱ्या स्त्रियाच ! बाजार करण्यासाठीं हिंडणाऱ्याहि स्त्रियाच ! पडदा नाहीं ! बुरखा नाहीं! पुरुषाचा धक्का लागेल अशा विचाराचा या ब्रह्मी स्त्रियाना संकोच नाहीं, बोलण्याचालण्यांत भलती वावगी लाज नाहीं.

अक्षरशः हजारो स्त्रिया दृष्टीस पडतात येवढंच नव्हे, तर त्या साऱ्या निःसंकोच वावरत असतात, बोलत असतात, हसत असतात ! इतक्या स्त्रिया जिथे दृष्टीस पडतात असं या रंगूनसारखं दुसरं शहर पृथ्वीच्या पाठीवर क्वचित् असेल ! इथे मुशाफरांनी स्त्री दर्शनाची हौस मनसोक्त भागवून घ्यावी !

* * *

## : ३ :

रंगून शहरांत जिकडे तिकडे बायकाच बायका दिसतात खऱ्या, परंतु मोहक लावण्य अगदीं क्वचित् दृष्टीस पडतं. ब्रह्मी, चिनी, जपानी सारेच बुद्धधर्मीय आहेत. आणि वर वर पाहतां त्यांच्या वर्णात आणि रूपांत इतका सारखेपणा आहे कीं एक दुसऱ्यापासून निराळा म्हणून ओळखणं कठीण जावं. परंतु थोड्या सरावानं त्यांच्यातली भिन्नता समजूं लागते.

आपल्याकडे देशस्थ कोण आणि कोकणस्थ कोण हें देखील जाणता माणूस ज्याप्रमाणें सांगूं शकतो, त्याप्रमाणें चिनी माणसांपैकीं कँटनचा कोण आणि चुंकींगचा कोण तेंसुद्धां ओळखतां येतं. उत्तर देश, मध्यदेश आणि दाक्षिण देश असे ब्रह्मदेशाचे भाग आहेत. आपल्याकडे ज्याप्रमाणें तळ कोकणांत राहणारी माणसं आणि देशावर राहणारी माणसं असा फरक आहे, त्याप्रमाणेंच समुद्र-सपाटीवर राहणारे ब्रह्मी, आणि डोंगर पठारावरचे ब्रह्मी असा फरक आहे, आणि तो ओळखतां येतो म्हणतात. इतके सूक्ष्म फरक ओळखण्याची कला माझ्या मुक्कामांत मला हस्तगत करतां आली नाहीं. परंतु कांहीं ढोबळ गोष्टी मला कळूं लागल्या. त्यापैकीं पाहिली ही, कीं ब्रह्मी बायकांचा एक विशिष्ट वर्ण आहे. ज्याला हा वर्ण आवडेल त्याला ब्रह्मी स्त्री कदाचित् रूपवती वाटेल. मला स्वतःला कांहीं ब्रह्मी स्त्रियांचा वर्ण आवडला नाहीं.

जिचं वर्णन काळ्या रंगाची म्हणून करावं लागेल अशी ब्रह्मी स्त्री औषधा-लाहि मिळायची नाहीं. ( ‘ नाटक ’ ही संस्था आपण ज्या स्वरूपांत ओळखतों त्या स्वरूपांत ब्रह्मदेशांत जवळजवळ नाहींच म्हणावं लागेल. परंतु ललिता-सारखे किंवा तमाशासारखे करमणुकीचे प्रकार आहेत. यांना म्हणतात ‘पोए.’ यांत विनोदी कोट्या आणि चावटपणा यांचा मसाला भरपूर असतो. परंतु स्त्रीच्या काळेपणावर केलेल्या कोट्या आढळणार नाहींत. कारण काळीमिट्ट स्त्री ही वस्तूच लोकांना माहीत नाहीं. गडकऱ्यांच्या इंदूबिंदूसारखी पात्रं ‘ पोए ’ वाङ्मयांत अशक्य आहेत. ) साऱ्याच स्त्रिया गौरवर्ण दिसतात.

परंतु या गोरेपणांत लाली बिलकूल नाहीं. फिकट पिवळट असा हा गोरा रंग फारसा आकर्षक मला तरी वाटला नाहीं. साऱ्या बायका आजारी असल्यासारख्या वाटतात. त्यांचं अंग लुसलुशीत असतं, परंतु रसरशीत नसतं. ज्यांनी काश्मीरच्या बायकांचं गुलाबी सौंदर्य, किंवा विपुल केशभार पाठीवर रूळत सोडणाऱ्या, भांगात शेंदूर घालणाऱ्या, हरिणासारख्या डोळ्यांच्या बंगाली स्त्रियांचं लावण्य, किंवा कमरेला शुभ्र लुंगी लावणाऱ्या सहसा चोळी न घालणाऱ्या, भरदार वक्षभागाच्या, काळ्या रंगाच्या परंतु निकोप तब्येतीनं मुसमुसणाऱ्या केरळातल्या स्त्रियाचं मोहक रूप, किंवा पंजाबी, गुजराथी, महाराष्ट्रीय स्त्रियांचं सौंदर्य पाहिलं असेल त्याला ब्रह्मी स्त्रिया सुंदर वाटायच्या नाहींत. त्यांच्या फिकट पिवळ्या अंगावर मन जडत नाहीं हे तर झालंच; परंतु शिवाय दुसरीहि एक गोष्ट मनाला खटकते. ती ही की कांहींशा पसरट तोंडाच्या, बसक्या नाकाच्या, रुंद जिव्हणीच्या, कमरेपासून वरचा भाग उंच परंतु खालचे पाय मात्र आखूड अशा बांध्याच्या या स्त्रियांपैकीं तरण्याताठ्या कोणत्या आणि वयस्क कोणत्या ते चटकन ओळखतां येत नाहीं. जणु या स्त्रियांना वय नाहींच ! माणसाच्या चेहऱ्यात कोवळ्या वयाचा, नव्या नवतीचा, भर ज्वानीचा जो अर्थपूर्ण वेगवेगळा भाव दिसायला हवा तो ब्रह्मदेशातल्या पुरुषांच्याहि ठिकाणीं नाहीं आणि बायकांच्याहि ठिकाणीं नाहीं ! पॅगोडातल्या बुद्धाच्या मूर्ती ज्याप्रमाणें भावशून्य त्याप्रमाणेंच इकडल्या पुरुषांचे आणि बायकांचे चेहरे भावशून्य वाटतात. जणु मुद्रेवरची ही भावशून्यता म्हणजे बुद्धधर्माचाच एक परिणाम होय !

या ब्रह्मी स्त्रिया चेहऱ्याची सजावट करण्याच्या बाबतींत कांहीं कमी पुढारलेल्या नाहींत. मध्यम वर्गीय आणि श्रीमंत बायका पावडर-लिपस्टिकचा उपयोग सर्रास करतात. खालच्या वर्गातल्या बायका आपल्याकडच्या गोपीचंदनासारख्या कसल्यातरी गंधाचं लेपन चेहऱ्याला व अंगालाहि करतात.

कमरेला लुंगी आणि अंगात विलायती फॅशनची काचोळी, आणि तिच्यावर बहुधा मनगटापर्यंतच्या बाह्यांचं झिरझिरीत कापडाचं पोलक्यासारखं कुडतं हीच साऱ्या स्त्रियांची ठरीव वेशभूषा. वस्त्राच्या उंचीपणावरून आणि तलमपणावरून बाईची श्रीमंती काय समजेल तेवढीच. बाकी पोषाखात वैचित्र्य कांहीं नाहीं. पोलक्याची शिलाई बाराबंदीसारखी असते. त्याच्या गुंड्या मधोमध गळ्याखालीं नसतात, तर उजव्या खांद्यापासून कमरेपर्यंतच्या रेषेंत असतात.

सुखवस्तु वर्गातल्या बायकांच्या अंगातलं हे पोलकं बहुधा मच्छरदाणीसारख्या जाळीदार कापडाचं असतं. यामुळें आंतली चोळी अगदीं ठळकपणें दिसते. लांबून येणाऱ्या स्त्रीकडे पाहिलं म्हणजे तर ती आपलं अर्ध अंग उघडं टाकूनच आपल्याकडे येत आहे असा भास होतो. साडी नाहीं तेव्हां पदरहि नाहीं! अंगावरून कांहीं उत्तरीय घेण्याची रीत नाहीं. (स्वातंत्र्यदिनोत्सवानिमित्त 'अदिपदि' डॉ. बा. आ यांच्या प्रासादापुढच्या विस्तीर्ण बगीच्यात झालेल्या गार्डन पार्टीला गेलो त्यावेळेस मात्र थोरामोठ्यांच्या बायकांनी खांद्यावरून पंजाबी दुपट्ट्यासारखी उंची वस्त्रं घेतलेली दिसली.) आपल्याकडच्या लहान मुली परकर पोलकं घालून खुशाल हिंडतात, त्याप्रमाणें खाली 'लुंगी' व वर 'अंगी' येवढ्याच वस्त्रानिशी ब्रह्मी बायका सर्रास वावरतात. जाळीदार अंगी-तून आपलं अंग जवळ जवळ उघडं दिसत आहे या जाणिवेची शरम त्यांच्या गावी देखील नसते. स्त्री सौंदर्य पाहूं इच्छिणाऱ्या मुशाफराच्या दृष्टीनं हे फार सोयीचं आहे. परंतु खेदाची गोष्ट एवढीच की जाळीदार पोलक्यातून दिस-णाऱ्या चोळीखालचा वक्षभाग बहुधा सपाट असतो! स्त्री दुरून दिसते तेव्हा ठीक दिसते. पण जवळ आली की अपेक्षाभंग झाल्यावाचून राहात नाही!

चेहरेपट्टी रंगविण्याचा ब्रम्ही स्त्रियांना हव्यास आहे. कित्येक स्त्रियांच्या दातांत सोनंहि चमकतं. परंतु केशरचनेचं कौशल्य या स्त्रियांच्या ठिकाणीं बिलकुल नाहीं. परोपरीच्या वेण्या, आणि अंबाड्यांच्या तऱ्हा तर नाहींतच. परंतु केसांत फुलं माळण्याचादेखील प्रघात नाहीं. वास्तविक या देशांत फुलं पुष्कळ आहेत, पिवळा चाफा आहे, आणि जाईजुई मोगऱ्यासारखीहि फुलं आहेत. परंतु का कोण जाणे, डोक्यात फुलांचे अलंकार घातलेले चांगले दिसतात हे जणुं या ब्रम्ही स्त्रियांच्या गावीच नाही. आपल्याकडे दक्षिण हिंदुस्थानांत पुरुषदेखील केसांचे भरदार बुचडे बांधतात आणि त्यावर फुलं माळतात! पण इकडे ब्रह्मदेशांत बायकांच्यादेखील डोक्यावर फुलांच्या वेण्या किंवा गुलाबाचे गेंद चढत नाहीत. डोक्यात घालायचा एकच अलंकार या स्त्रियांना माहीत आहे. तो म्हणजे केस विंचरायचा कंगवा! डोक्याच्या मागच्या बाजूस केसांची गाठ मारायची आणि त्या गाठीत आडवा कंगवा ठेवून द्यायचा! साधु–बैरागी किंवा शीख लोक जटांची गांठ मुकुटाप्रमाणें डोक्यावर बांधतात तशाप्रकारे केसांची रचना करणाऱ्या स्त्रियाहि अधूनमधून दृष्टीस पडतात!

हमरस्त्याच्या दोन्हीं बाजूस फूटपाथवर खाण्यापिण्याच्या स्टॉल्सची एकच गर्दी झालेली आढळते. खाण्यापिण्याचा शोक ब्रम्ही लोकांना एकंदरीत फार असावा. रस्त्याच्या दोन्ही बाजूस मांडलेल्या या स्टॉल्सवर गिऱ्हाइकांची गर्दी अहोरात्र असते.

जेव्हां बघावं तेव्हां इथे खाणंपिणं चाललेलं असतं. स्टॉलवर मिळणारे खाद्य पदार्थ स्टॉलच्या दर्जाप्रमाणें वेगवेगळे असतात; आणि त्या दर्जा प्रमाणेंच स्टॉल चालविणारी बाई साध्या भरड पोषाखाची किंवा झोकनोक कपडे केलेली आणि पावडर लिपस्टिक लावलेली असते. गरीबी थाटाच्या स्टॉलवर शिजविलेल्या भाताचा भला मोठा हंडा, आणि कालवणाचं पातेलं असतं. यातून थाळीत काढून दिललं जेवण चटईवर किंवा वाकड्यावर बसून गिऱ्हाइकं जेवतात. चांगल्यां थाटाचा स्टॉल असेल तर तिथे भात व कालवण हे पदार्थ मिळतातच, परंतु शिवाय मांसाहाराचे अनेक प्रकार तयार असतात. डुकराच्या मांसाचा लोकांना शोक फार. सोलून शिजविलेली कोवळी कोवळी डुकराची पिलं दोरीवर टांगलेली असतात, आणि त्याखेरीज चिकन, डक, असे प्राणीही लटकलेले असतात! तळलेले व भाजलेले मासेहि तयार असतात. गिऱ्हाईक मागेल त्याप्रमाणें त्या खाद्यपदार्थांचं वाढप थाळींत करून देण्यांत येतं. याखेरीज ब्रह्मी लोकांना अत्यंत प्रिय असलेला आणि सर्रास सगळ्या स्टॉल्सवर मिळणारा पदार्थ म्हणजे 'शेवया' एका मोठ्या प्लेटमध्यें खूप शेवया, शिजविलेली अंडी, तळलेले छोटे मासे इत्यादि पदार्थ घ्यायचे, त्यावर मुबलक कालवण ओतायचं, आणि हात मारायचा ही इकडच्या खाण्या- पिण्याच्या चैनीपैकी एक मोठी चैन होय. या स्टॉल्सवर चहा बहुधा मिळतो. मात्र दूध साखरेवाचूनचा 'चिनी' पद्धतीचा चहा पिण्याचा प्रघात जास्त. यामुळें मधोमध चहाच्या काढ्यानं भरलेली मोठी किटली ठेवलेली असून भोवताली कपबशा मांडलेल्या असतात. गिऱ्हाइकानं हवा तेवढा चहा कपात ओतून घ्यावा आणि प्यावा!

उगीच गमतीनं का होईना एखाद्या स्टॉलला आश्रय द्यावा असं माझ्या कधीं मनांत आलं नाहीं. शेवयांची चव एकदां चाखावी असं वाटलं. परंतु स्टॉलवर टांगलेले ते 'मत्स्य, कच्छ वराहा' दि अवतार पाहिले कीं शेवया पाहून जिभेला सुटलेलं पाणी पार शुष्क होऊन जात असे!

ब्रम्हदेशांतील मुक्कामांत ‘ साजा ’ ( शेवया ), ‘ चौ चौ ’ ( तांदळाची गोड बर्फी ) इत्यादींची ती मिसळ ( हिला ‘ मोहेंगा ’ म्हणतात. ) त्यावर ‘ नयोदिसँग ’ (म्हणजे कोंबडीची कढी ) ओतून मी कधी पोटांत घालीन असं मला वाटलं नव्हतं. परंतु एके दिवशीं अकस्मात् या पक्वान्नाची आणि माझी समोरासमोर गाठ पडली ! आणि ती अशा परिस्थितींत कीं त्याला तोंड देण्यावाचून मला गत्यंतर राहिलं नाहीं. ‘ अदिपदि ’ डॉ. बा आ यांनीं स्वातंत्र्यदिनानिमित्त दिलेल्या गार्डन पार्टीच्या वेळेस पाहुण्यांच्या टेबलांवर काट्याचमच्यांच्या सरंजामानिशी सुंदर प्लेटीतून हेच पक्वान्न वाढलेलं होतं ! ‘ पंगत बसली ’ तेव्हा तरुण स्वयंसेविकांनी मोठमोठे चिनीमातीचे कटोरे भरून वाफा निघणारी कढत कढत ‘ नयोदिसँग ’ प्रत्येक टेबलापुढें आणली. रंगूनला ज्यांच्या बंगल्यावर मी उतरलो होतो ते श्री. दीनानाथ माझ्याजवळच बसले होते. ते मला म्हणाले, “ प्रोफेसर, घ्या.” मी हसून म्हटलं, “ मला शिकवा बुवा.” आणि मग त्यानीं जे जे सांगितलं ते ते करून मी बशीतली ती सारी मिसळ खाऊन टाकली ! प्रेसिडेंटकडची ती गार्डन पार्टी, तेव्हा मिसळीतले सारे पदार्थ अगदी उंची, काजू, बदाम, पिस्ते इत्यादीनी युक्त असल्यामुळें ते पक्वान्न मला इतकं आवडलं कीं शिष्टाचार संभाळावयाचा नसता तर मी आणखी देखील मागून घेऊन खाल्लं असतं. या अनुभवानंतर रस्त्याला स्टॉल्सवर दिसणाऱ्या शेवयांबद्दलचा माझा प्रतिकूल ग्रह पुष्कळसा निवळला. परंतु बाकड्यावर बसून स्टॉलवरचा तो पदार्थ खाण्याचं धैर्य मात्र मला अखेरपर्यंत झालं नाहीं !

‘ मोहेंगा ’ ची चव मला चाखण्यास अकस्मात मिळाली तसाच प्रकार दुसऱ्या एका बाबतींत झाला. ‘ पोए ’ नांवाच्या करमणुकीच्या प्रकाराला ब्रह्मी लोकांच्या सांस्कृतिक जीवनांत महत्त्वाचं स्थान आहे. ज्या रंगभूमीवर ‘ नाटकं ’ होतात अशा अर्थाची रंगभूमि ब्रह्मदेशांत नाहीं.

जुन्या रंगभूमीची परंपरा नाहीं, आणि नवीदेखील रूढ झालेली नाहीं. चित्रपटांच्या नव्या सुधारणेनं ब्रह्मदेशावर स्वारी केलेली आहे. बरे वाईट कसे का होईनात परंतु ब्रह्मी भाषेत चित्रपट तयार होतात. रंगून शहरात कितीतरी चित्रपटगृहं आहेत. आणि त्यापैकी काही फारच चांगली आहेत इंग्रजी आणि हिंदी चित्रपट विशेषकरून चालतात. माझ्या मुक्कामात राजकपूरचा नवा श्री. ४२० ’ दोन थिएटरात चालू होता. त्यांपैकी एकावर कार्डबोर्डचा तयार केलेला

खूप मोठा हत्ती, आणि त्यावर बसलेला राजकपूर त्या रस्त्यानं जातायेता मला रोज दिसत होता. मात्र चित्रकारानं राजकपूरचा चेहरा ब्रह्मी करून टाकला होता, आणि नरगिसच्या चेहऱ्यातहि योग्य ते फेरफार करून ती एकाद्या ब्रह्मी तरुणीसारखी भासेल अशी तिला रंगविली होती. कवीप्रमाणेच चित्रकारदेखील निरंकुश असतो तो असा! माझ्या मनात रोज येत असे, राजकपूर व नरगिस यांनी इकडे येऊन स्वःच्या या प्रतिमा बघायला हव्यात!

चित्रपटाच्या आधुनिक लाटेपासून ब्रह्मी लोक कोरडे राहिले नाहींत. परंतु नाटकी रंगभूमि त्यांना अजून माहीत नाहीं. चित्रपटांच्या जोडीचीं त्यांची आवडती करमणुक म्हणजे 'पोए.' 'पोए' चे चार प्रकार आहेत. ज्यांत प्राचीन बुद्ध-धर्मी राजांची चरित्रं किंवा बुद्धाचं चरित्र आख्यानरूपानं सांगितलं जातं त्याला म्हणायचं 'झा पोए' या प्रकारांत रामायणाचं आख्यानहि पुष्कळदां सांगितलं जातं. ( रामायणाप्रमाणें महाभारत मात्र भारताबाहेरच्या आशियाटिक देशांत पोचलेलं नसावं ही एक आश्चर्याची गोष्ट म्हणायला हवी ) ज्यात आपल्या-कडच्या तमाशाप्रमाणें सोंगाडे असतात. त्यांचे विनोदी संवाद असतात, बरा-चसा उत्तान पांचटपणा असतो, आणि बायकांचा नाच असतो, असा जो प्रकार आहे त्याचं नाव 'अन्येन पोए'! ज्यांत पाश्चात्य 'बॅले' प्रमाणें संघ-नृत्य असतं त्याला म्हणतात 'येन पोए' आणि चवथा प्रकार कळसूत्री बाहु-ल्यांच्या खेळांचा. या प्रकाराला म्हणतात "योक्थे पोए." पोएच्या एकाच कार्यक्रमांत या सर्व प्रकारची सरमिसळहि होत असते. परंतु 'पोए' चा कार्य-क्रम सबंध रात्रभर चालायचा हे ठरलेलं. कधी पॅगोडापुढच्या आवारांत हे होतात तर कधीं एखाद्या मोहोल्ल्यांतल्या धनिकांनी ते करविले तर हमरस्त्या-वर होतात. क्वचित तिकिट लावून थिएटरमध्यें ते केले जातातहि. परंतु आपल्या कडील ललित—तमाशासारखी ही झक्कड आम जनतेला मोफत खुली असायची असा प्रघात जास्त. सामान्य ब्रह्मी जनतेची सर्वांत आवडीची करमणुक म्हणजे रात्रभर पॅगोडापुढील किंवा हमरस्त्यांच्या चौकांत चालणारे हे 'पोए'.

साहजिकच करमणुकीचा हा प्रकार बघण्याची माझी फार इच्छा होती. परंतु ज्यांचा पाहुणचार मी घेत होतो ते श्री. दीनानाथ मला म्हणाले, "उगीच कशाला जाता रस्त्यावरचे पोए बघायला ? अदिपदीच्या गार्डन पार्टीच्या वेळेस पोएचा अगदीं निवडक कार्यक्रम तुम्हांला बघायला मिळणारच आहे." म्हणजे

२९०५० दि. ३-५

शेवयांची आणि माझी जशी या गार्डन पार्टीच्या निमित्तानं गाठ पडली त्याचप्रमाणें त्या पार्टीच्या वेळेसच 'पोए' 'पोए' म्हणून ज्यांची कीर्ति म्हणा अगर दुष्कीर्ति म्हणा ऐकत होतो ते मला अनायसे बघायला मिळाले.

अदिपदी डॉ. बा. आ. यांचा राजप्रसाद फारच भव्य आणि ऐश्वर्याचा आहे. त्याभोंवतालचं आवार कित्येक एकरांचं आहे. जिकडे तिकडे वृक्षाची आणि वेलीची वन्यशोभा आहे. पार्टीच्या वेळेस प्रासादापुढच्या हिरवळीवर चार हजार पाहुण्यांसाठीं टेबलांच्या रांगा मांडलेल्या होत्या. स्वातंत्र्य दिनोत्सवांतला अखेरचा कार्यक्रम म्हणून ही पार्टी देण्यांत आल्यामुळें देशोदेशींच्या स्वतंत्र राज्यांचे प्रतिनिधी, वकील, ब्रह्मी सरकारचे मंत्री, अधिकारी, शहरांतील सारे बडे बडे नागरिक अशा प्रकारे स्त्री-पुरुषांचा प्रचंड मेळावा जमा झाला होता. इंग्रजीत ज्याला धनाढ्य आणि गुणाढ्य जनतेची 'साय' म्हणता येईल अशी मंडळी जमा झालेली होती. मात्र कमरेला लुंगी, अंगात कुडतं आणि रंगीत चिंधीची गाठ मारून डोक्यावर घातल्याप्रमाणें भासणारी पालथ्या वाटी सारखी टोपी एवढाच श्रीमंत ब्रह्मी पुरुषांचा देखील अस्सल राष्ट्रीय पोशाख दिसला. विलायती सूट बूट घालणारे फार थोडे दिसले. मोठ्या मोठ्या श्रीमंत ब्रह्मी बायकांचा देखील या पार्टीच्या वेळचा पोशाख खाली 'लुंगी' आणि वर 'अंगी' येवढाच होता. त्यासाठीं वापरलेलं कापड फार उंची होतं, आणि स्त्रियांनी खांद्यावरून किंमती भरजरी कापडाचे दुपट्टे घेतले होते येवढंच. मात्र संध्याकाळच्या कोवळ्या उन्हांत जमलेल्या त्या प्रचंड जमावाकडे बघितलं की नाना रंगाच्या वस्त्रांची इंद्रधनुष्य पसरल्यासारखी वाटत होती.

समोर मोठा प्रशस्त रंगमंच तयार केला होता. त्यावर किनखापी मखमलीचा पडदा टाकला होता. पार्टीला जमलेल्या लोकांचं खाणपिणं संपल्यावर वाद्यवृन्द वाजू लागला, मखमलीचा पडदा सरकला, मंचकावरचे दिवे उजळले, आणि निवडक 'पोए' चा कार्यक्रम सुरू झाला. मी मोठ्या उत्सुकतेनें पाहू आणि ऐकू लागलो.

ब्रम्ही वाद्यवृन्द कसा असतो तें मी मुद्दाम आधी स्टेजवर जाऊन बघून आलो होतो. आपल्याकडे ज्याप्रमाणें समारंभांत वापरला जाणारा अस्सल मराठी थाटाचा वाद्यमेळ म्हणजे सनई, पिपाणी, ढोल, झांजा इत्यादि वाद्यांचा असतो त्याप्रमाणेंच अस्सल ब्रह्मी वाद्यवृंदांत सनई (थोड्या निराळ्या विचित्र

आकाराची आणि लांब ) असतेच. ढोल असतो तो इतका प्रचंड कीं तो एका स्टँडवर टांगलेला असतो.

परंतु यांच्या जोडीला दोन चमत्कारिक वाद्येहि असतात. त्यापैकीं एकाचं नांव 'सैंग वैंग ' आणि दुसऱ्याचं नांव चे वैंग ' सैंग ' म्हणजे तबला आणि ' वैंग ' म्हणजे मंडल. ' चे ' म्हणजे घंटा. म्हणजे या दोन वाद्यांची नांवं ' तबला मंडळ ' आणि ' घंटा मंडळ ' असं म्हणतां येईल. वाजविणारा मधोमध बसलेला असतो. आणि त्याच्यापुढें वर्तुळाकार सुमारें अठरा तबले ठेवलेले असतात. मात्र आपल्या इकडच्या तबल्याहून फार लहान आकाराचे ते असतात आणि वेगवेगळ्या सुरांत लावलेले असतात. घंटा असतात त्या टांगलेल्या नव्हे तर एका वर्तुळाकार लाकडी चौकटींत पालथ्या वाटीसारखा बसविलेल्या आणि वेगवेळ्या सुराच्या असतात. ' तबलातरंग ' आणि ' घंटातरंग ' अशा नावांनीं या वाद्यांचा उल्लेख केला तरी त्यांचा बोध आपल्याकडच्या लोकांना चटकन होईल. हीं दोन्हीं वाद्यं ब्रह्मी वाद्यवृन्दांत अगदीं हटकून असायचींच. समारंभाच्या वेळच्या संगीतांतच नव्हे, तर गाण्याची किंवा नृत्याची साथ करतानादेखील.

या वाद्यवृन्दाचें संगीत श्रुतिमनोहर आणि परिणामकारक वाटलं. खणखणीत आणि भरगच्च ! गांभीर्य आणि शांतता उत्पन्न करणारं ! सनयातून निघणाऱ्या स्वरमालेकडे नीट लक्ष दिल्यावर आधी ऐकलेली एक गोष्ट मला पटली. ती ही, की ब्रह्मी लोकांनीं नृत्यकला उचलली ती भारतापासून नव्हे तर जावा-बालीच्या लोकांपासून, परंतु ब्रह्मी गायनपद्धतीवर भारतीय संगीताची छाप आहे.

चीनच्या संगीतात ' स्वरसप्तक ' नाहीं फक्त ' स्वरपंचक ' आहे. ब्रह्मी संगीत किंवा वाद्यवादन ऐकतांना क्वचित चिनी संगीत कानीं पडल्याचा भास होतो, परंतु नीट ऐकलं की लक्षांत येतं की सात स्वर किंवा खरं म्हणजे बारा स्वर लागत आहेत. आपल्याला परिचित असलेलं आपण कांहींतरी ऐकत आहोंत असं वाटल्यावाचून राहात नाहीं. मात्र दादऱ्याच्या किंवा केरव्याच्या साध्या ठेक्यापलीकडे तालांची खटपट बिलकूल नसते. ' तबला तरंगा ' चा उपयोग तालाची वेलपती काढण्याऐवजीं ' हार्मनी निर्माण करण्यासाठींच करण्यांत येतो. ठेका चालू असतो तो स्टँडवर टांगलेल्या पडघमसारख्या भल्या मोठ्या ढोलावरच !

प्रारंभीचं वृन्दवादन झाल्यावर जे कार्यक्रम झाले त्यांनादेखील याच वाद्य मेळाची साथ होती. या कार्यक्रमाविषयीं मला विशेष उत्सुकता होती कारण ब्रह्मी सरकारच्या 'मिनिस्ट्री ऑफ कल्चर' नं हें मुद्दाम तयार करवून सादर केले होते. शिवाय यात पहिल्या प्रतीचे ब्रह्मी नर्तक, नर्तकी आणि गायक भाग घेणार होते. अगदी निवडक 'पोए' मला बघावयास मिळणार होते.

परंतु हे सारे कार्यक्रम मला अगदीं निराशाजनक वाटले. तमाशांतल्या वगा-प्रमाणें नृत्यसंगीतानं भरलेला एक प्रवेश झाला. तो ब्रह्मदेशांत विख्यात असलेला केनेथ सीन नांवाचा नर्तक, व त्याच्या चार भागीदारणी यानी केला. त्यांच्या संवादांतली काय गंमत असेल ती मला कशी कळणार ?

गाणं आणि नृत्य याकडे माझं विशेष लक्ष होतं. आणि ती दोन्हीहि मला अगदीं सुमार वाटली. ब्रह्मदेशांतील प्रसिद्ध चित्रपट तारका 'ची ची थे' हिच्या नृत्याचा एक खास प्रवेश झाला. तोहि मला अगदीं सामान्य वाटला. आप-ल्याकडची शाळकरी पोरंदेखील याहून बरं नाचतील ! या नटीचं रूपहि पाह-ण्यासारखं नव्हतं, किंवा एकदां डावीकडे अंग वाकविण्यापलिकडे तिचं नृत्यहि जात नव्हतं. घरी कमलाबाईंना लिहिलेल्या पत्रांत मी लिहिलं, " ...सारांश, 'ची ची थेचा नाच पाहून "छी छी थू : !" म्हणावसं वाटलं !

या ब्रह्मी तारकेचं आणि त्या रात्रीं झालेल्या इतर कार्यक्रमांतील स्त्रियांचं नृत्य पाहतांना त्यांच्या वस्त्रभूषेचा फार चमत्कार वाटला. प्रत्येक नाचणाऱ्या बाईच्या कमरेची लुगी इतकी लांब आणि घोळदार होती कीं तिच्यांत पाऊल अडकूं न देतां ती कशी नाचत होती देव जाणे ? या घोळदार लुगीचं कारण कळलं ते असं कीं पूर्वीच्या काळांत नर्तकी नाचत असत राजापुढें. आणि नर्तकीसारख्या बाईनें राजाला आपली पाऊलं दिसूं दिली तर तो राजाचा अपमान होईल असा समज होता. आतां राजे इतिहासजमा झाले. नर्तकीचीं पाऊलं दिसली तर त्यांत अपमान समजणारे लोक उरले नाहींत. उलट बाकीचं अंग राहो पण निदान तिची पाऊलं तरी दिसली तर हवी म्हणणाऱ्या प्रेक्षका-पुढें नाच होतो. परंतु तरीदेखील ब्रह्मी नर्तकीच्या लुंगीची लांबी कांहीं कमी होत नाहीं. ही गैरसोयीची आणि दिसायलाहि विद्रुप अशी लांबी छाटणारा पहिला क्रांतिकारक नृत्य-दिग्दर्शक ब्रह्मदेशात लवकर अवतरो अशी बुद्धाची प्रार्थना मी मनातल्या मनात करीत होतो.

संगीतात आणि नाटकांत ब्रह्मी लोक अजून फार मागं आहेत त्याप्रमाणेंच मैदानी खेळांतहि. स्वतंत्र ब्रह्मी सरकारनं बलसंवर्धनाचा मोठा कार्यक्रम आंखला आहे, ब्रह्मी तरुण पुरुष शरीरानं चांगले मजबूत आहेत. स्वातंत्र्यदिनानिमित्त झालेला परेडचा आणि 'मार्च पास्ट'चा मोठ्या थाटाचा समारंभ मी पाहिला तेव्हां एकंदर चतुरंग सैन्याचं संचलन मला फार सुंदर वाटलं.

परंतु एकंदरीत मैदानी व मर्दानी खेळांची परंपरा ब्रह्मदेशांत दिसली नाहीं इंग्रज लोक ज्या ज्या देशांत गेले तिथें तिथें क्रिकेटची आवड त्यांनीं रुजविली आणि वाढवली, या विधानाला ब्रह्मदेश अपवादच समजावा लागेल. इकडे क्रिकेट फार कमी. माझा मुक्काम ब्रह्मदेशांत असताना भारत आणि न्यूझीलंड यांच्यातले अखेरचे दोन कसोटी सामने भारतांत झाले, परंतु रंगूनच्या इंग्रजी दैनिक पत्रांत या सामन्यांचं वृत्त एका अक्षरानंदेखील येत नव्हतं ! हॉकीचा देखील ब्रह्मदेशांत प्रचार नाहीं. लोकांचा सगळ्यांत आवडता खेळ 'सॉकर'. सॉकरच्या सामन्याला मात्र प्रचंड गर्दी जमते. युगोस्लाव्हची फूटबॉल टीम आली होती, व तिचे ब्रह्मी फूटबॉल टीमशी सामने माझ्या रंगूनच्या मुक्कामातच झाले. आठ आठ नऊ नऊ गोल्सनी ब्रह्मी टीमचा पराभव झाला. म्हणजे सॉकरमधला ब्रह्मदेशाचा दर्जा फार खालचा आहे. परंतु आम जनतेला या खेळाचा शोक फार आहे. सामन्याला साठ साठ सत्तर सत्तर हजार लोक जमतात. आणि अशा सामन्यासाठीं स्टेडियम बांधला आहे तो देखील मोठा पाहण्यासारखा आहे. मधलं मोकळं मैदान फारसं विस्तीर्ण नाहीं. त्यावरची हिरवळहि काही गालिचासारखी नाहीं. परंतु ' ग्रँड स्टँड ' भव्य आणि बादशाही थाटाचा आहे.

या स्टेडियमला ' ऑंग सान ' या पुढाऱ्याचं नांव दिलं आहे. रंगूनमधल्या सगळयात मोठ्या प्रेक्षणीय मार्केटलाहि ' बोग्योक ' मार्केट म्हणतात. 'बोग्योक' म्हणजे ' सेनापती '. ब्रह्मदेशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या आधीच लोकांनी प्रेमानं आणि आदरानं ऑंग सान यांना ' सेनापती ' अशी पदवी दिली होती. आणि लोक त्यांचा उलेख फक्त ' बोग्योक ' येवढ्याच शब्दानं करीत असत व अजूनहि करतात.

आपण ज्याप्रमाणें गांधीजींना ‘ राष्टपिता ’ म्हणतो त्याप्रमाणें ब्रह्मी लोक ऑंग सान यांना ब्रह्मी स्वातंत्र्याचे जनक मानतात. या दिवंगत पुढाऱ्याविषयीं ब्रह्मी लोकांच्या मनांत अमर्याद आदर असावा असंच त्याचं एकंदर चरित्र घडलं.

१९४० च्या रामगड येथील कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं ऑंग सान इकडे हिंदुस्थानांत आले होते. त्यावेळेस ते विश्वविद्यालयांतून नुकतेच बाहेर पडलेले एक पोरसवदा तरुण होते. परंतु तेव्हांहि स्वातंत्र्याचा लढा करणाऱ्या ब्रह्मी जनतेचे ते एक लाडके पुढारी होते. आणि त्यांच्या कर्तृत्वाविषयीं लोकांना फार मोठ्या आशा होत्या. या आशा ऑंग सान यांनीं शंभर टक्के पूर्ण केल्या. ब्रह्मदेशांतील ब्रिटिश सत्ता झुगारून देण्यासाठीं त्यांनीं कायदेशीर–बेकायदेशीर सर्व प्रकारची चळवळ केली. त्यांना स्थानबद्ध करू पाहणाऱ्या ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या हातावर तुरी देऊन एकोणतीस सहकाऱ्यांनिशी ते ब्रह्मदेशांतून निसटले, आणि थेट जपानला गेले. ‘ तीस भाई ’ असा या शूर साहसी मंडळींचा उल्लेख ब्रह्मी लोक प्रेमानं करू लागले.

ऑंग सान यांनीं व त्यांच्या साथीदारांनी जपानमध्यें सर्व प्रकारचं लष्करी शिक्षण तर घेतलंच, परंतु ब्रह्मदेशावर चाल करून जपानी सैन्यानं जावं असाहि बनाव घडवून आणला,आणि जपानी सैन्यानं प्रत्यक्ष ब्रह्मदेशावर हल्ला चढविला तेव्हां त्या सैन्याबरोबर तेहि आले व सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेसारखीच ब्रह्मदेश–मुक्ति फौज त्यांनीं उभी केली. सुभाष बोस आणि ऑंग सान या दोघांच्या चरित्रांत उत्कट देशभक्ति आणि साहस यांचं जे साम्य आहे ते नजरेत भरण्यासारखं आहे. नेताजींच्या आझाद हिंद चळवळीच्या दिवसांत त्यांना ऑंग सान यांचं मित्रत्व आणि सर्व प्रकारचं सहाय्य लाभलं होतं हे अगदीं साहजिक म्हणावं लागेल.

ब्रह्मदेशाच्या इतिहासाचा काहीसा गमतीचा भाग असा की या देशाला दोनदा स्वातंत्र्य मिळालं. प्रथम १९४२ साली जपान्यांनी ब्रह्मी देशातली ब्रिटिश सत्ता हुसकून लावली, आणि बेगडी स्वतंत्र ब्रह्मी सरकार निर्माण केलं. पुढे तीन वर्षांनी ब्रिटीश ब्रह्मदेशांत सैन्यानिशी पुन्हां घुसले व जपान्यांची हकालपट्टी करून त्यांनी आपली राजवट पुन्हां सुरू केली. परंतु बदललेल्या काळातल्या जनतेच्या स्वातंत्र्याच्या मागणीपुढें त्याना हार खावी लागली, ब्रह्मदेशांतलं

बिऱ्हाड कायमचं उठविणं त्याना भाग पडलं, आणि १९४७ साली ब्रह्मदेश खराखुरा स्वतंत्र झाला. म्हणजे सत्तेची क्रांति ब्रह्मदेशात दोन वेळा झाली, आणि या दोन्ही वेळा क्रांतिकारक चळवळीची सूत्रं यशस्वीपणें हलविण्याची बहादुरी ऑंग सान यानीच केली ! म्हणूनच ' बोग्योक ' ( सेनापती ) हा किताब लोकांनी त्यांना दिला.

दुर्दैवाची गोष्ट येवढीच की गांधीजींप्रमाणेंच ऑंग सान यांचाहि १९४७ सालीं खून झाला. त्यावेळेस ते अवघे चौतीस वर्षांचे होते. त्यांच्या खुनाचीं हकीकतदेखील घडली ती एकाद्या शोकनाट्यांत शोभण्यासारखी होती. १९४७ सालीं जुलै महिन्याच्या १९ तारखेस सकाळीं १० वाजता ऑंगसान आणि स्वतंत्र ब्रह्मी सरकारचे इतर सात मंत्री सेक्रेटरिएटमध्यें एका सभेच्या कामांत मग्न असताना लष्करी पोषाख कलेले हत्यारबंद लोक सभेच्या खोलीत घुसले व त्यांनी डोळ्याचं पातं लवतं न लवतं तोंच गोळ्या झाडून अष्टप्रधानांचे मुडदे पाडले ! ' मिओ चिट ' (मिओ म्हणजे देश, आणि चिट म्हणजे प्रेम ') पक्षाचा पुढारी ' ऊ सॉं ' यानं वैयक्तिक आकसानं हा अत्याचार घडवून आणला होता. ' ऊसा'ची रीतसर चौकशी होऊन त्याला फाशी देण्यात आलं. गांधीजीप्रमाणेंच ब्रह्मदेशचे स्वातंत्र्याचे जनक ऑंग सान यांचीहि देशबांधवाकडूनच हत्या झाली या शोकपूर्ण साम्याचा मोठा चमत्कार वाटतो. गांधीजीसारखेच ऑंगसानहि असे खुनी इसमाच्या गोळीला बळी पडले त्याचप्रमाणेंच मायदेश स्वतंत्र झालेला बघून ते मृत्यू पावले. त्यांची स्मृति ब्रह्मी लोकांच्या अंतःकरणांत सदैव ताजीच राहील.

ऑंग सानचा एक पुतळा रंगून शहरांत आहे. रंगूनच्या जवळपास जी रमणीय लहानमोठी सरोवरे आहेत त्यांत शहरापासून सगळ्यांत जवळ असलेलं रॉयल लेक हे आहे.

या सरोवराच्या काठावर उद्यान आहे. हे उद्यान कांहीं फारसें सुंदर राखलेलं नाहीं. परंतु लोकांची संध्याकाळीं फिरायला जाण्याची ही आवडती जागा आहे. रंगूनमधली ही एक ' चौपाटी ' च आहे म्हणा ना. अर्थात याठिकाणीं येणारे लोक खाऊन पिऊन घाण करतातच. इथेंहि चणे फुटाणे विकणारे लोक म्हणजे उत्तर हिंदुस्थानांतून आलेले भय्येच असल्याचं मला आढळून आलं. यापैकीं एका भैय्याला मी विचारलं, " भेळ नाहीं का रे विकीत तूं ? " तो

हंसला आणि म्हणाला, "इकडच्या लोकांना भेळ नाहीं आवडत साहेब." वास्तविक ब्रह्मदेश म्हणजे तांदळाचा देश, असं असूनहि तांदळापासून होणाऱ्या कुरमुऱ्यांच्या 'भेळ' या संस्थेचा इकडे प्रचार झालेला नसावा ही फार आश्चर्याची गोष्ट म्हणावी लागेल. परंतु भेळ सोडली तरी 'मोहेंगा' आणि मांसाहाराचे पदार्थ मिळतातच, आणि उद्यानाची खराबी करण्याची हौस ब्रह्मी लोकांना भागवितां येतेच. ब्रिटिश लोक रंगूनमध्यें असतांना त्यांनीं या उद्यानाला आणि सरोवराला अतिशय सुंदर स्वरूप दिलं होतं. आतां स्वातंत्र्याच्या आठ वर्षांत ब्रह्मी लोकांनीं त्या सुंदर जागेचा उकिरडा करून टाकण्यांत मोठंच यश संपादन केलं आहे! या ठिकाणाची ब्रह्मी सरकार अशी आबाळ होऊ देत आहे याबद्दलचा वाटणारा खेद ब्रह्मी स्वातंत्र्याचा जनक ऑंग सान यांच्या येथील पुतळ्याकडे पाहिलं कीं अधिकच तीव्र होतो.

ब्रॉंझ धातूच्या या पुतळ्याला सोनेरी मुलामा दिल्याचं पाहून अतिशय वाईट वाटलं. ब्रॉंझ पुतळयाची मूळची भव्य ऐट पार खलास करून टाकणारी ही 'सोनेरी' कल्पना स्वतंत्र ब्रह्मी सरकारच्या ज्या मंत्र्यानं किंवा अधिकाऱ्यानं काढली असेल त्याचं डोकं खरोखर तपासायला हवं.

गतवर्षी मध्य प्रदेशातल्या दौऱ्यावर गेलो असतांना एके ठिकाणीं एका सुंदर पुतळ्याची सोनेरी मुलाम्यानं अशीच दुर्दशा केलेली पाहिली होती. एखाद्या सुंदर शिल्पकृतीचं असं मातेरं करणाऱ्या माणसाला पाश्चात्य देशांत खचित फांशी देण्यांत येईल! सोनेरी मुलामा दृष्टीआड करून ऑंग सानच्या पुतळ्याकडे मी बघू लागलो, तो किती वेळ तरी जागच्या जागीच खिळल्यासारखा उभा होता. हा पुतळा उंच चौथऱ्यावर उभा केलेला नसावा याचंहि मला फार आश्चर्य वाटलं. परंतु तो पुतळा चौथऱ्यावर नसूनहि तो पाहणाऱ्याच्या मनांत भरावा अशी त्याची ऐट आणि एकंदर घडणीतील कसब आहे. किती साध्या पवित्र्यांत शिल्पकारानं ऑंग सान यांना उभं केलं आहे! आणि पवित्र्याच्या त्या साधेपणातच केवढं लढाऊ सामर्थ्य, केवढी निर्भयता, आणि देशसेवेची केवढी कळकळ त्यानं परिणामकारक रीतीनं दाखविली आहे.

हा पुतळा मला फार फार आवडला. रंगून शहरातल्या एखाद्या विस्तीर्ण चौकांत खूप उंच चौथऱ्यावर तो उभा केलेला नसावा याबद्दल मला खेद वाटला. त्याला सोनेरी मुलामा चढविलेला बघून तर अगदी संताप आला.

रंगूनमधील ब्रह्मी रहिवासी मी असतो आणि ब्रह्मी असूनहि शिल्पकलेचं मर्म मला कळत असतं तर ऑंग सानच्या पुतळ्याबाबत घडलेल्या या दोन्ही प्रमादांचं परिमार्जन झालं पाहिजे म्हणून मोठी सार्वजनिक चळवळ करावी असं मला वाटलं असतं. परंतु पुतळ्याच्या रुबाबांत उणेपणा आणणाऱ्या या दोन गोष्टी असूनहि तो पुतळा मला अतिशय सुंदर वाटला. डावा हात मागच्या बाजूस केलेला, त्या हातांत कागद धरलेले, अंग किंचित् पुढें झुकविलेलं, उजवा हात पुढें केलेला, 'नको, नको!' असा उद्गार काढतांना पसरल्याप्रमाणें उजव्या हाताचा पालथा पंजा जरा पसरलेला, तोंडावर जसं गांभीर्य तसंच अगदीं किंचित हास्य, तीक्ष्ण डोळ्यांची प्रश्नार्थक नजर समोरच्या माणसांकडे लावलेली—अशा पवित्र्यातील, लष्करी पोषाखांतील ब्रह्मदेशाच्या स्वातंत्र्याचा तो जनक जणू बोलतच आहे असा तो पुतळा पहात असतांना मला स्पष्ट भास होत होता.

मनांत आलं, कोणत्या प्रत्यक्ष प्रसंगावरून शिल्पकारानं ही अविस्मरणीय शिल्पकृति तयार केली आहे? ज्या वेळेचा ऑंग सान यांचा हा पवित्रा शिल्परूपानं अमर करून ठेवला आहे त्यावेळेस ते काय म्हणत होते? तो नाट्यपूर्ण क्षण व त्या क्षणाची ऑंग सान यांची मुद्रा आणि मूर्ति शिल्पात तंतोतंत ओतण्याचा चमत्कार करणारा हा शिल्पकार कोण होता? तो मला प्रत्यक्ष भेटेल काय? त्याच्याशी मला बोलतां येईल काय?

या प्रश्नांची उत्तरं सहज मिळतील अशी माझी कल्पना नव्हती. परंतु इच्छेचा जोर असला कीं ती पूर्ण होते हेंच खरं. ऑंगसानचा हा पुतळा ज्यानं तयार केला त्या शिल्पकाराची आणि माझी प्रत्यक्ष भेट अकल्पित रीतीनं झाली. जसा पुतळ्यावर मी खुश झालो त्याप्रमाणें तो घडविणारा कलावंत भेटल्यावर त्यानंहि मला खुष करून टाकलं. त्याच्या आणि माझ्या मुलाखतीची हकीगत ऐकण्यासारखी आहे.

* * *

## : ५ :

रंगून समुद्रापासून एकवीस मैल दूर आहे. परंतु इथें रंगून नदीचं पात्र खूप विस्तीर्ण आणि खोल असल्यामुळें रंगूनला पहिल्या प्रतीच्या बंदराचा दर्जा प्राप्त झालेला आहे. कलकत्ता ज्याप्रमाणें समुद्रालगत नसूनहि मोठं बंदर आहे त्याप्रमाणेंच रंगूनहि आहे. उत्तरेकडून वहात येणारी इरावती नदी रंगूनजवळ आली कीं तिला ' रंगून नदी ' म्हणतात.

अस्सल ब्रह्मी भाषेतलं हिचं नांव ' ल्हेंग ' असं आहे. रंगूनच्या बंदरावर मी चक्कर टाकली तेव्हां केवढाली तरी प्रचंड जहाजं धक्क्यापासून अगदीं जवळच नांगर हाकारून उभी राहिलेली मला दिसली. त्यांत दोन लढाऊ जहाजंहि होती. लोकल गाड्याप्रमाणें जवळपासच्या उतारूंची ने-आण करणाऱ्या बोटी आणि मालाची वाहतुक करणाऱ्या छोट्या मोठ्या नावा जिकडे तिकडे विखुरलेल्या दिसत होत्या. नदीचं पाणी मात्र अत्यंत गढूळ आणि काळसर लालसर असल्यामुळें त्या देखाव्यातला मनोहरपणा कमी झाला होता.

तांदूळ हे जसं ब्रह्मदेशातलं मुख्य पीक त्याप्रमाणेंच जंगलातल्या ' टीक ' झाडांचे प्रचंड सोट म्हणजे या देशांतून निर्यात होणारी एक मुख्य चीज आहे. ' टीक 'चे अजस्त्र ओंडके खेड्यापाड्यांतून वाहून नेण्याचं काम रेड्यांच्या गाड्या करतात. परंतु नदीचं पाणी हेच या लाकडांच्या वाहतुकीचं मुख्य साधन आहे. ' टीक 'चे मोठमोठे सोट खुशाल पाण्यांत सोडून द्यायचे, आणि इकडून तिकडे पाठवायचे. केरळांतल्या अंतर्भागांत दृष्टीस पडणाऱ्या दृश्यासारखंच दृश्य ब्रह्मदेशांतल्या खेडेगांवांतून दिसतं. पाण्यानं वेढलेलं खेडं, पाण्यांतून जाणाऱ्या येणाऱ्या नावा, काठावर ओढून घेतलेले किंवा प्रवाहातून संथ गतीनें जाणारे ' टीक 'चे सोट, खेड्यांतली घरं, लहानशी बाजारपेठ, आणि कित्येक पॅगोडांचे उन्हांत चमकणारे कळस—हे ब्रह्मी खेड्याचं ठराविक चित्र म्हणावं लागेल. नद्या-नाले, सरोवरं आणि जंगलं अशांच्या कोंदणात, ' खेडुतांचा ब्रह्मदेश ' ठिकठिकाणीं बसलेला दिसतो. रंगूनचा नवा ' भिंगलो दान '

विमानतळ किंवा नवं रेल्वे स्टेशन यापेक्षां रंगूनचं बंदर हेच स्थळ असं आहे कीं जिथें जलसंचारी ब्रह्मी जीवनाचा एक नमुना दृष्टीस पडतो.

बंदर या नात्याचं रंगूनचं महत्व दोनशें वर्षांचं जुनं आहे. या देशाचं मूळचं ब्रम्ही नांव ' म्यामा पी ' असं होतं ( पी म्हणजे देश ) राजधानीचं मूळचं ब्रह्मी नांव ' यानगोन ' ' यानगोन 'चा अर्थ युद्धाचा अंत किंवा शांति असा आहे.

उत्तर ब्रह्मदेशांतील लढाऊ टोळ्या आणि दक्षिण ब्रह्मदेशचे राजे यांच्यात कित्येक वर्षं चालू असलेलं युद्ध अखेर या ठिकाणीं संपलं, म्हणून हें नांव त्याला मिळालं. ब्रिटिशांच्या कृपाप्रसादानं ' म्यामा 'चा झाला " बर्मा " आणि ' यानगोन 'चं झालं ' रंगून ' ! आजचं छोटं सुबक मुख्य रंगून शहर ब्रिटिशांनीं एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस वसविलें तेंदेखील राज्यकारभाराप्रमाणेंच व्यापाराचं एक केंद्र आणि बंदर म्हणूनच. त्यामुळेंच अस्सल रंगून शहर खोलगटांत आहे. शहराच्या दक्षिणेस तर नदीचं विस्तीर्ण पात्रच आहे व त्यामुळें तिथें शहर संपतंच. परंतु पश्चिम, उत्तर आणि पूर्व अशा तीन दिशांना छोट्या छोट्या टेकड्यांचा विस्तीर्ण प्रदेश असून त्यांत अलिकडच्या काळात सुंदर सुंदर उपनगरं निर्माण झाली आहेत.

माणसानं वस्ती केली की वन्य शोभा छाटली कापली जाते, हा न्याय इथेंहि दिसतो. परंतु अजूनहि या निरनिराळ्या उपनगरांत जिकडे तिकडे उंच उंच जुने वृक्ष आपली छाया पसरून उभे असलेले दिसतात. नानाविध वृक्षलतांच्या, फुलझाडांच्या व फळझाडांच्या बाबतींत हा देश खचितच वैभवसंपन्न आहे. आणि जंगलांच्या अस्सल ऐश्वर्यापासून रंगून शहर जरी शेकडो मैल दूर असलं तरी रंगूनच्या उपनगरांत विपुल वन्य शोभा आढळते. पळसाचे वृक्ष जिकडे तिकडे दिसतात. इकडली आंब्याचीं झाडें आपल्या इकडच्या सारखीं डेरेदार नसून उंच उंच असलेलीं पाहून आश्चर्य वाटतं. आपल्याकडे पिंपळाचं झाड असलं तर एकटंच आणि एखाद्या पारावर असतं. इकडे पिंपळ जिकडे तिकडे–रस्त्याच्या कडेला देखील-आपली पानं चमकदार लोलकांसारखी उन्हांत हालविताना दिसतात. (बुद्धधर्माबरोबरच पिंपळ ब्रह्मदेशांत आला म्हणतात, आणि हा पवित्र वृक्ष जो कोणी कापील त्याला वेड लागतं असा इकडं समज आहे. ) या वृक्षाच्या जोडीला पांढरा चाफा पुष्कळ आहे. क्वचित्

बकुळीचे वृक्ष दिसतात. ‘अशोक’ तर खूपच आहेत. जांभळांची, बोरांची झाडं आहेत. गुलमोहोर आणि ‘फरगेट मी नॉट’चे निरनिराळे प्रकार ठिकठिकाणीं विखुरलेले आहेत. उंच टेकड्यावरच्या अशा बहुविध वृक्षराजी घातलेला विंझणवारा ऐटीनं अंगावर घेणारी रंगूनची उपनगरं म्हणजे विहाराच्या मोठ्या रम्य जागा म्हणाव्या लागतील.

ऑंग सान यांचा पुतळा घडविणाऱ्या शिल्पकाराला मी भेटलो तो अशा एका रमणीय उपनगरांतील एका बंगल्यांत. या उपनगरांत रंगून युनिव्हर्सिटीचं कित्येक मैलाचं विस्तीर्ण आवार आहे व शिवाय आजुबाजूस श्रीमंत लोकांचे मोठे टुमदार बंगले आहेत.

बनारसच्या हिंदु विश्वविद्यालयाचं आवार खूपच मोठं आहे. परंतु त्याहूनहि रंगून युनिव्हर्सिटीचं परिसर मला अधिक मोठं वाटलं. ब्रह्मदेशांत विश्वविद्यालयीन शिक्षणहि मोफत आहे. बायका निराळ्या पुरुष निराळे अशी फाळणी नाहीं. वसतिगृह खूप मोठे आहे. मोठमोठी क्रीडांगणं आहेत. पोहोण्यासाठीं तलाव आहेत. विद्यार्थ्यांची संख्या सात हजार असल्याचं समजलं. युनिव्हर्सिटीच्या आवाराच्या दक्षिण सीमेवरच्या प्रशस्त राजरस्त्याला ‘युनिव्हर्सिटी ॲव्हेन्यु’ असं नांव आहे. या रस्त्यावरच्या एका बंगल्यांत ऑंगसानचा पुतळा बनविणाऱ्या शिल्पकाराला भेटण्यासाठी मी गेलो. या शिल्पकाराचं नांव ‘बेनबिस कॉपनॉल’ माझ्या आगमनाची वर्दी आधी मिळाल्यामुळें स्वारी बंगल्याच्या पायरीवर वाट पहात उभीच होती.

व्हरांड्यांतल्या बैठकीच्या जागीं बसल्याबरोबर मी त्याला म्हटलं, “ तुम्ही केलेला ऑंगसानचा पुतळा मला किती आवडला ते सांगायसाठीं व तुमचें अभिनंदन करायसाठीं मी मुख्यतः आलो आहे. तुमचा थोडासा वेळ घेणार आहे, माफ करा.

तो म्हणाला, “ हवा तितका वेळ घ्या. तुम्ही आलात, मला फार आनंद झाला. ”

मी म्हटलं, “ सध्या ‘संयार्डो न्यांगनान’ नांवाच्या दिवंगत भिक्षूचा पुतळा घडविण्याचं काम तुम्ही करीत आहांत असं ऐकतो. तो मला बघायला मिळेल काय? तुमचा स्टूडिओ दाखवाल काय?

“ जरूर जरूर या. ” असं म्हणून त्यानं मला हात धरून उठविलं.

अर्धवट तयार झालेला नवा पुतळा बघून मी परत व्हरांड्यांत आलो. इतक्यांत कॉमनॉलची बायको म्यूरिएल बाहेर गेली होती ती घरीं परत आली व आतला स्टूडिओ पाहण्यास जावयाच्या ऐवजीं चहा फराळासाठीं आम्ही पुन्हा बैठकीवर बसलो, आणि चहा घेतां घेतां गप्पा मारूं लागलो. कॉपनॉलनं आंत जाऊन एक खूप मोठी फाईल आणली व आपल्या एकेका कामाची छायाचित्रं दाखवितां दाखवितां तो बोलूं लागला.

सुमारें पंचेचाळीस वर्षांच्या उंच सडसडीत बांध्याच्या या इंग्रज शिल्पकाराला बोलण्याचा कंटाळा दिसला नाहीं. त्याची बोलण्याची तऱ्हाहि मोठी आकर्षक होती. त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं कीं त्याचे पाणीदार निळे डोळे आणि मिशा पिळाव्यात त्याप्रमाणें पिळलेल्या झुपकेदार भुवया नजरेंत विशेष भरत. मी एखादा प्रश्न विचारला कीं ज्याची कलाविषयक मत ठाम ठरलेलीं आहेत अशा माणसाप्रमाणें तो लगेच बोलूं लागे. हातवारे फारसे न करतां मुद्रेवर अभिनय दाखवी, एखादा मुद्दा विशेष आग्रहानं सांगतांना त्याचे डोळे चमकूं लागत, आणि त्याच्या झुपकेदार भुवयांची मोठी गमतीदार हालचाल होत असे. धाडधाईनं तो खूप बोले, आणि मग एकदम रेलून डावा तळवा कपाळावर टेकून म्हणे, ' शाबास ! ' मीच सारखी बडबड करतोंय. तुम्हीं बोला ना कांहीं तरी. "

त्याची बायको म्यूरियल मध्येंच एकदां म्हणाली, " खरंच, आज हे किती बोलताहेत. "

मी म्हटलं, " माझ्या भेटीमुळें यांना कधीं नव्हे ते इतकं बोलावसं वाटत असेल तर माझा त्यांत गौरवच आहे. "

कॉपनॉल मनापासून हंसला व म्हणाला, " तुम्ही फार गोड बोलणारे आहांत हो. परंतु खरंच आतां तुम्हीं कांहीं तरी बोला. "

मी म्हटलं, " बोलत नाहीं पण एक प्रश्न विचारतों. "

कॉपनॉल म्हणाला " विचारा. "

मी म्हटलं, " तुमच्या ऑंगसानच्या पुतळ्याला सोनेरी मुलामा दिलाय तो तुम्ही पाहिलात काय ? तुमच्या संमतीनं दिलाय काय तो ? "

तो आवेशानं म्हणाला, " छे छे ! अशा भयंकर कृत्याला मी कशी संमति देईन ? त्या मुलाम्याची वार्ता कळल्यापासून माझ्या मनाचं चैन नाहीसं झालं आहे. पण एक मात्र सांगतो. त्या सोनेरी मुलाम्याविषयीं तीव्र नापसंती दर्शविणारे तुम्ही पहिलेच गृहस्थ मला भेटताहात. या देशांत कलेची खरी दृष्टी कोणाला नाही. तुमच्या एकंदर बोलण्यावरून तुम्हाला कलेचा फार समज आहे असं वाटतं, आणि म्हणून तुमच्या भेटीनं मी फार खुषीत आहे. "

मी चटकन म्हटलं, " मला कलेतलं कळतं हा तुमचा समज चुकीचा आहे मला फक्त फार फार आवड आहे. "

कॉपनॉलनं म्यूरीयलकडे पाहून डोळे मिचकावले व म्हटलं, " बरं बरं. तसं का होईना ? "

मी म्हटलं, " तुम्ही तयार केलेल्या ऑंगसानच्या पुतळ्याचा सगळ्यांत आकर्षक विशेष कोणता असेल तर त्याचा पवित्रा. हा साधा परंतु अत्यंत भावपूर्ण आणि प्रभावी पवित्रा तुम्ही पसंत केलात याबद्दल तुम्हाला फार मोठी शाबासकी द्यायला हवी. कोणत्या प्रसंगीचा हा पवित्रा आहे ? मला सांगाल काय ? "

" सांगतो " असं म्हणून कॉपनॉल बोलू लागला.

१९४७ सालची गोष्ट ! ऑंगसान लोकप्रियतेच्या कळसावर होते. परंतु देशांत प्रतिगामी विचाराची माणसंहि होतीच.

ऑंगसानचे वैरीहि होतेच. ऑंगसानचे सहकारी एकदां त्यांना म्हणाले. " स्वतःच्या संरक्षणाची यत्किंचितहि काळजी न घेतां तुम्हीं खुषाल वावरतां, लोकांच्या गर्दीत मिसळतां हें कांहीं बरं नव्हे. तुमच्या जीविताची व सुरक्षिततेची जबाबदारी आम्ही किती दिवस आणि कशी सांभाळायची. तुम्हीं नेहमी शस्त्र जवळ ठेवायला हवं. " यावर ऑंगसाननी त्या मित्राना कांहींच उत्तर दिलं नाहीं. परंतु लवकरच एका जाहीर सभेंत बोलतांना त्यांनीं हा विषय काढला. आपले सहकारी आपल्याला असा असा सल्ला देतात असं सांगितलं, व नंतर सभेंतल्या हजारों लोकांना उद्देशून ते म्हणाले, " माझ्या जीविताची काळजी मी कशासाठीं घेऊं ? माझा प्राण मी तुमच्या हवालीं केलेला आहे. मी जिवंत राहूं नये असं या सभेंत ज्याला वाटत असेल त्यानं याक्षणीं उठावं जवळ यावं, आणि माझ्यावर गोळी झाडावी ! मी आनंदानं मरेन. तुम्हांला मी हवा असेन

तोपर्यंतच जगण्याची माझी इच्छा आहे. तुम्हांला मी नकोसा होईन त्याक्षणींच मलाहि जगण्याची इच्छा राहाणार नाहीं. ''

हा नाट्यपूर्ण क्षण आणि त्या क्षणींचा ऑँगसान यांचा लोकविलक्षण आविर्भाव कॉपनॉलनं आपल्या सुंदर शिल्पकृतींत कायमचा कोरून ठेवला आहे.

कॉपनॉलच्या तोंडून ही सारी हकीगत ऐकल्यावर कांहीं वेळ माझी वृत्ती गंभीर झाली. जो पुतळा मला आधीच फार आवडला होता तो आतां मला समजलेल्या या नव्या अर्थानं अधिकच सुंदर वाटूं लागला.

कांहीं वेळानं स्तब्धता मोडून मी कॉपनॉलला म्हटलं, " तुम्हीं नुसते शिल्पकारच नव्हे तर कवीदेखील आहांत. ''

पुन्हां मघाच्याप्रमाणें हंसून कॉपनॉलनं म्युरियलकडे बघितलं आणि डोळे मिचकावले.

मी निरोप घेऊं लागलो तेव्हां तो म्हणाला, " वा ! माझा स्टुडिओ न पाहतांच जातां काय ? '' मला आंत नेतां नेतां तो सांगू लागला, " तुम्हाला माहीत नसेल माझं घराणं चित्रकाराचं आहे. माझे आजोबा व माझे वडील प्रख्यात पेंटर होते. ''

मी म्हटलं, " म्हणजे तुम्ही चित्रकाराचे शिल्पकार झालात म्हणायचे ? तुम्हाला कोणतं काम जास्त आवडतं ? चित्रकलेचं की शिल्पकलेचं ? ''

" दोन्ही !'' असं हसत म्हणून त्या त्या कलेत कोणत्या तंत्रांचं अवधान ठेवावं लागतं आणि कोणत्या बिकट गोष्टी साधण्यात आनंद असतो त्याविषयीं तो बोलू लागला

लंडन, पॅरिस, व्हिएन्ना इत्यादि ठिकाणच्या कॉपनॉलच्या मोठमोठ्या शिल्पकृतींचे फोटोग्राफ पाहून ज्याप्रमाणें त्याचा मोठेपणा माझ्या मनांत भरला होता त्याप्रमाणेंच स्टूडिओंत तयार होऊन पडलेली आणि तयार होत असलेलीं त्याची मोठमोठी रंगचित्रं बघून त्याच्या चित्रकलेंतील कसबाचीहि मला कल्पना आली.

रंगून शहराचा रात्रीचा देखावा एका सहा फूट लांब व चार फूट रुंद फलकावर त्यानं रंगविलेला पाहिला तो तर फारच सुंदर होता. शहराच्या विस्तीर्ण परिसरांत जिकडे तिकडे उजळलेले दिवे, त्या प्रकाशांतली वनश्री व इमारती मागच्या बाजूस रोषणाईनं शोभणारा श्वे डगॉन पॅगोडाचा कळस, आणि दूरच्या

क्षितिजाच्या रेषेच्या वरच्या बाजूचं आकाश अशा त्या फलकावरील चित्रांत विविध रंगाची मोठी मोहक मौज भरलेली दिसत होती. एकेक चित्र बघून माझ्या तोंडांतून 'वाहवा' चा उद्‌गार निघत होता.

कॉपनॉल म्हणाला; "तुम्ही लंडनला माझ्या घरीं या म्हणजे मी माझं खूप खूप काम तुम्हांला दाखवीन. आणि आपण खूप बोलूं." त्यानं आपला संपूर्ण पत्ता लिहून दिला येवढंच नव्हे तर घराचा नकाशादेखील काढून दिला. तो पुन्हां म्हणाला, "लंडनला कधीं आलांत तर माझ्याकडं आल्यावाचून राहूं नका, बरं का?"

मी म्हटलं, "येईन, येईन परंतु अशक्य गोष्टीबद्दल काय उगीच बोलत आहोंत आपण?"

त्यानं हसून म्हटलं, "अशक्य काय म्हणून? आज तुमची माझी भेट होईल हें तरी कुठें शक्य वाटलं होतं? परंतु ती झाली कीं नाहीं? त्याच न्यायानं तुमची आणि माझी लंडनमध्यें भेट होईल, बघा!"

आपल्या किती तरी शिल्पकृतींचे फोटोग्राफ मागच्या बाजूस सही करून त्यानं मला आधीं दिले होते. एका फोटोग्राफवर आपल्या सहीखालीं त्यानं लिहिलं होतं, 'ज्याला तुमच्या सान्निध्यांत फार नम्रता वाटते–' मी निघालों तेव्हां टेबलावर पडलेले फोटोग्राफ गोळा करीत त्यांचे पुन्हां एकदां आभार मानले आणि एक स्वाक्षरींची वही पुढें करून म्हटलं, "माझ्या छोट्या मुली-साठीं यांत तुमची सही हवी."

आम्ही घरच्या पायऱ्यावर उभे होतों. तो म्हणाला, "किती तरी सह्या दिल्या. आतां दुसरं कांहीं देतो."

खालच्या पायरीवर उतरून उभं राहून त्यानं मला सांगितलं, "जरा आहात तसेच उभे राहा पाहू."

त्यानं स्वाक्षरीची वही उघडली. पहिल्या पानावर पांच मिनिटांत फाऊंटन-पेननं माझं रेखाचित्र काढलं, व वही परत माझ्या हातांत देत म्हटले, "हे तुम्हाला आवडेल खास."

मी पाहिलं तो चित्राखालीं त्यानं सही केली होती व वरच्या बाजूस इंग्रजीत लिहिलं होतं, "क्षमा मागून."

त्याचा आणि त्याच्या पत्नीचा अखेर निरोप घेतांना "माझ्या आयुष्यातल्या अत्यंत आनंदाच्या घटकांपैकीं तुमच्या घरीं घालविलेल्या घटका होत्या;" असं मी म्हटलं ते अगदीं मनापासून ! ब्रह्मदेशचे पंतप्रधान व इतर मंत्री यांच्या भेटीपेक्षां या कलावंताची भेटच मला फार मोलाची आणि अविस्मरणीय वाटली. आणि त्याचा साधा प्रेमळ मनमोकळेपणा बोलघेवडा स्वभाव बघून कलावंतांच्या बाबतींत जो अनुभव मला पूर्वी अनेक वेळां आला तोच पुन्हां आल्यासारखा वाटला. तो अनुभव या गोष्टीचा। की खरे मोठे कलावंत साधे आणि नम्रच असतात !

* * *

## : ६ :

एका विख्यात ब्रह्मी चित्रकाराला भेटण्याची माझी इच्छा मात्र पुरी झाली नाहीं. या चित्रकाराचं नांव ' बा ची ' याची चित्रं माझ्या दृष्टीस पडली ती आकस्मातच. एका हॉटेलमधे सहज गेलो असतांना ! रंगून बंदरानजिक जो पूर्व पश्चिम मोठा रस्ता आहे त्या रस्त्यावर स्ट्रँड नांवाचं हॉटेल आहे. रंगून-मधलं हें सगळ्यांत मोठं आणि बादशाही हॉटेल.

इथला रोजचा दर माणशीं पन्नास रुपये. मात्र या भलत्या दरावरून इथला थाटमाटहि भलताच असेल असं समजणं चुकीचं होईल रंगूनमधल्या एकंदर राहणीचं मानच मुंबईपेक्षांहि दुपटीनं महाग आहे.

ब्रह्मदेशांत आठ आणे, चार आणे, दोन आणे आणि एक आणा अशीं नाणीं आहेत तीं हुबेहुब आपल्यासारखीं ! पैसा हें नाणें अजिबात प्रचारांत नाहीं. कारण पैशा दोन पैशाला कोणतीहि वस्तु मिळत नाहीं. पानपट्टी मी पहिल्या दिवशीं घेतली तेव्हां साध्या हिरव्या पानाच्या पट्टीला ( पिकलेलं पिवळं पान कधीं बघायलाच मिळालं नाहीं. ) एक आणा पडला. कॅप्स्टन सिगरेट पाकीटची किंमत दीड रुपया ! भिकार ब्रह्मी सिगरेटच्या पाकिटाला बारा आणे! आपल्याकडे दोन आण्यांना मिळणाऱ्या वहीएवढी वही एकदां घेतली तेव्हां नऊ आणे द्यावे लागले ! म्हशीचं दूध दुर्मिळ असून गाईचं दूध चांगलंच महाग आहे. हॉटेलांतला चहा मुंबईच्या पावडर–दुधाच्या चहाचाच भाऊ ! आणि शिवाय महाग ! टॅक्सी पुष्कळ आहेत. परंतु त्या सगळ्या जीपगाड्या त्यांना मीटर नाहींत आणि असली जीपगाडी पांच रुपयांच्या खालीं मिळत नाहीं. ट्रॅमगाड्या पूर्वीं होत्या. परंतु लढाईच्या बॉंबहल्ल्यानंतर ज्या बंद झाल्या त्या झाल्याच ! ठिकठिकाणीं त्यांचे रूळ तेवढे अजून आहेत ते पाहिले म्हणजे मनांत येतं, कानांतले अलंकार गेले, आणि भोकं मात्र राहिलीं खरीं. ' बस ' गाड्या चांगल्या आहेत. परंतु त्यांचेहि दर आपल्या इकडल्या दराच्या दिडी-दुपटीनं आहेत. फणा काढलेला नाग, पिसारा पसरलेला मोर, हत्ती, सिंह,

फया अशी चित्रं ' बस ' वर रंगविलेलीं असतात त्यावरून ती कुठं जाणार तें लोकांनी ओळखायचं. बसमधल्या कंडक्टरचं काम बायकाच करतात.

सगळ्यांत सोयीचं वाहन म्हणजे सायकलरिक्षा. आपल्याकडे हैद्राबाद, नागपूर अशा शहरी आढळणाऱ्या रिक्षाहून हे निराळ्या बांधणीचे आहेत.

मोटार सायकलला जशी ' साईडकार ' असते तशी होडीच्या आकाराची लांकडी बैठक सायकलच्या डाव्या बाजूस दोन चाकावर बसविलेली असते. या बैठकींत दोन स्वाऱ्यांनी पाठीला पाठ लावून बसायचं. अर्थात् दोन स्वाऱ्यांचा हा संकेत नेहमीच पाळला जातो असं नाहीं. कित्येकदां सबंध कुटुंबच्या कुटुंब ट्रंका–वळकट्यासह सायकलरिक्षांत बसून ( ! ) चाललेलं मी पाहिलं. रंगून शहरांत अशा दोन अडीच हजार रिक्षा सहज असतील. त्यांचंहि भाडं कांहीं कमी नसतं. रंगूनच्या महागाईला साजेसच असतं. रंगूनमधें राहणाऱ्या माणसाच्या खिशांत पैसे खुळखुळत असले तरी त्यांत कांहीं फारसा अर्थ नाहीं ! ' लंकेत सोन्याच्या विटा ' या म्हणीचा अनुभव माणसाला पदोपदी येतो.

तेव्हां माणशी रोजचे पन्नास रुपये घेणारं स्ट्रँड हॉटेल फारच ऐषआरामाचं असेल ही कल्पना चुकीची ठरेल. परंतु येवढी गोष्ट सोडली तर हे हॉटेल मोठे दिमाखदार आहे यांत शंका नाहीं. " बा ची " या प्रख्यात ब्रह्मी चित्रकाराचं नांव मला प्रथम समजलं ते या स्ट्रँड हॉटेलांत एकदां सहज गमतीनें गेलो तेव्हां! इथल्या मधल्या प्रशस्त हॉलच्या भिंतीवर चांगली सहासहा फूट लांब व चार-चार फूट रुंद अशा आकाराची चित्रं दिसली. ती एकदम माझ्या नजरेत भरली. एकेक चित्र मी न्याहाळून पाहू लागलो. प्रत्येक चित्राच्या खालच्या कोपऱ्यांत सही होती ' बा ची. '

चित्रकलेच्या खास दृष्टीनं तर हीं चित्रं प्रशंसा करण्यासारखी होतीच, एकेका चित्रांतील आकृतिरेखा, मांडणी, सजावट, आणि रंगसंगति तर बहारीची होतीच. परंतु साऱ्या चित्रांत अस्सल ब्रह्मी जीवनातील एकेक प्रसंग चितारलेला असल्यामुळें ती मला विशेष आवडली. ' डेकोरेटीव्ह स्टाइल ' नं म्हणजे चित्र शोभिवंत दिसावं या हेतूला प्राधान्य देऊन–हे चित्रफलक चित्रकारानं रंगविलेले दिसले. परंतु एकटीदुकटी बाई, किंवा एकटादुकटा पुरुष न काढता ब्रह्मी जीवनातील एकेक प्रसंग त्यानं चित्रात उभा केलेला आहे.

एका चित्रांत ' शान ' संस्थानांतील एका गांवांतील बाजार दिसतो. दुसऱ्यांत कोंबड्यांची झुंज दिसते. त्यांत रक्तबंबाळ झालेले बेभान कोंबडे, कोंबड्याप्रमाणेंच बेभान झालेले त्यांचे मालक आणि लढाई पाहण्यासाठीं गोळा झालेले बघे लोक या सर्वांचं चित्रण मोठं जोमदार केलेलं आहे. कोंबड्याच्या झुंजीवर लोक जुगार खेळतात म्हणून सरकारनें बंदी घातली आहे. परंतु लपून छपून हा खेळ चालतोच. लोकांना याचा षोक फार आहे. एका चित्रांत खेडुतांच्या नृत्याचा प्रसंग चितारलेला आहे, त्यांतहि नर्तिका व तिचे साथीदार यांचे वेष व मुद्रेवरील भाव मोठ्या कसबानं रंगविलेले आहेत.

ब्रह्मदेशाचे लोक चंगीभंगी आणि उत्सवप्रिय आहेत. त्यागाची शिकवणूक देणाऱ्या बुद्धधर्माचं आचरण करणाऱ्या ब्रह्मी लोकांत चंगीभंगीपणाची व उत्सवतेची आवड असावी हें थोडं चमत्कारिक वाटतं, परंतु तसं आहे खरं. सबंध वर्षभर एकेका महिन्यांत कोणता तरी सण येतो व त्या सणाच्या निमित्तानं ब्रह्मी लोक उत्सव करीत असतात.

' कासोन ' महिन्याच्या पूर्णिमेला जो उत्सव येतो त्यांत वटवृक्षाच्या झाडाची पूजा करण्यात येते. गौतम बुद्धाला ज्ञानाचा साक्षात्कार झाला तो एका वट वृक्षाखालीं, म्हणून बुद्धधर्मीयांना हा वृक्ष पवित्र आणि प्रिय वाटतो. वटपूजेचा हा उत्सव इंग्रजी मे महिन्याच्या प्रारंभाच्या सुमारास होतो. दुसरा एक उत्सव नोव्हेंबरच्या मध्याला होतो. या सुमारास ' ताझौंगमान ' हा ब्रह्मी पंचांगातला महिना चालू असतो. या महिन्याच्या पूर्णिमेस जिकडे तिकडे खूप रोषणाई करण्यांत येते, आणि बुद्धभिक्षूंना दानदक्षिणा, देण्यांत येते. आपल्याकडच्या दिवाळी सारखाच काहीसा हा उत्सव आहे.

परंतु ब्रह्मदेशातला सगळ्यांत मोठा उत्सव म्हणजे ब्रह्मी नवसंवत्सरीच्या सुरुवातीचा. पाडव्याच्या दिवशी घराघरात आणि सार्वजनिक ठिकाणीहि बुद्धाच्या मूर्तींना सुगंधी पाण्यानं स्नान घालण्यांत येतं, आणि 'फोजी' ना (बुद्ध भिक्षूना) भोजन देण्यांत येते. नंतरच्या दोन दिवसात लोक आनंदोत्सव करतात. आपल्याकडच्या होळीच्या सणासारखा हा ब्रह्मी उत्सव आहे; आणि या उत्सवांतला मुख्य दिवस म्हणजे ब्रह्मी लोकाची रंगपंचमीच म्हणावी लागेल. मात्र फरक असा, की आपल्याकडे रंगपंचमीच्या दिवशीं रंग खेळतात, तर ब्रह्मदेशांत

साधं पाणी अंगावर फेकण्याचा प्रघात आहे. या उत्सवाचं नांव ' थिजान' असं आहे. या उत्सवांत रस्तोरस्तीं जलकुंभ ठेवलेले असतात. पाण्याचे मोठमोठे हौद घेऊन बैलगाड्याहि जात येत असतात.मुलं, बायका,पुरुष हातांत पिचकाऱ्या किंवा भांडीं घेऊन हिंडत असतात. कुणीहि कुणाला यथेच्छ भिजवावं! त्याबद्दल कुणी तक्रार करायची नाहीं. इतकेंच नव्हे तर पुरुषानं अनोळखी बाईलादेखील वाटेल तें विचारावं. तिनं विनयभंगाची तक्रार करायची नाहीं. प्रख्यात ब्रह्मी चित्रकार ' बाची ' याच्या हातची जी सहा चित्रं स्ट्रँड हॉटेलच्या हॉलमध्यें मी पाहिलीं त्यांत ' थिंजान ' उत्सवांतील जलसिंचनक्रीडा दाखविणारं एक चित्र होतं. या चित्रांत विविध रंगांची बहार करायला तर चित्रकाराला संधी मिळाली आहेच, परंतु चित्रांतल्या एकेका आकृतीची जी गति दिसते आणि साऱ्या माणसांच्या मुद्रेवर जो अवखळ अनावर मस्त आनंद दिसतो त्यामुळें हे चित्र फारच आकर्षक वाटतं.

एका चित्रात एका आठ वर्षाच्या मुलाची घोड्यावरून मिरवणूक निघाली आहे. मुलाला खूप सजविलेलं आहे. मुलाचे आईबाप त्याचा म्हातारा आजा इत्यादि मंडळी मिरवीत निघाली आहेत. या बट्टूला कुठे नेत आहेत ?

बुद्धभिक्षूंच्या मठाकडे नेत आहेत त्याला. तिथें गेल्यावर त्याच्या अंगावरचीं उंचीं वस्त्रं काढण्यांत येतील, त्याचं मुंडण करण्यांत येईल, त्याला भिक्षूच्या हवालीं करण्यांत येईल, आणि त्याचं अध्ययन सुरू होईल. आपल्याकडच्या व्रतबंधासारखाच हा विधी आहे,म्हणा ना ? या विधीचं ब्रह्मी नाव ' शिन्प्यू ' असं आहे. पूर्वीच्या काळीं या विधीनंतर छात्रानं मठात राहून चौदा चौदा वर्षं अध्ययन करायचं असे. ब्रह्मी लोकांत जातिभेद नाहींत त्यामुळें सर्रास साऱ्या घरातले मुलगे मठात विद्यार्जन करीत. ब्रह्मदेशांत आज साक्षरतेचं प्रमाण साठ टक्क्यांच्या वर आहे. या गोष्टीचं पुष्कळसं श्रेय या जुन्या पद्धतीला द्यायला हवं. आतां नव्या कालमानाप्रमाणें मुलगे मठात दीर्घकाल रहात नाहींत. फक्त तीनचार दिवस राहून देखील घरीं परत आले तरी हरकत नसते. तथापि शिन्प्यूचा विधी कोणी चुकवीत नाहीं. प्रत्येक मुलाच्या बाबतींत तो झाला पाहिजे.कुटुंबाच्या परिस्थितीप्रमाणें त्याचा थाट कमी अधिक

असतो इतकंच, 'बा ची'नं काढलेल्या या चित्रांत घोडा मोठा ऐटबाज आहे, मारे थाटमाट करून घोड्यावर बसलेल्या बटूचा चेहरा बघण्यासारखा आहे आणि त्याच्या मागून चाललेल्या वऱ्हाडी मंडळीच्या आकृती आणि मुद्रा रंगविण्यांत चित्रकारानं मोठंच कौशल्य दाखविलेलं आहे.

परंतु या सर्वांहून अधिक सरस आणि काव्यमय जे चित्र आहे त्यांत ब्रह्मी लोकांतली एक गमतीची चाल मोठ्या सहृदयतेनं रंगविण्यांत आली आहे. ती चाल अशी आहे, कीं लग्न झालेलं नवं जोडपं रात्रीं शयन मंदिराकडे जाऊं लागलं कीं नवऱ्या मुलीच्या मैत्रिणी सोन्याची साखळी खोलीच्या दारावर धरतात आणि जोडप्याला आडवून म्हणतात, आम्हाला कांहीं तरी बक्षिसी मिळाल्याखेरीज वाट मिळायची नाहीं. मग नवऱ्या मुलानं आपल्या वधूच्या सखीजनांचं समाधान करायचं असतं. त्यानं नजराणा दिला कीं वाट खुली होते व तो आपल्या नववधूस घेऊन खोलींत प्रवेश करतो. आपल्याकडे गर्भाधानाच्या दिवशीं जावयानं रुसायचं आणि सासऱ्यानं त्याचा हट्ट पुरवायचा अशी जुनी चाल होती. ब्रह्मी लोकांत जावयाऐवजीं वधूच्या सखीजनांचा रुसवा वरानं काढायचा असतो. आपल्याकडे नवऱ्या मुलीच्या मैत्रिणी दांपत्याच्या वस्त्रांची गाठ मारतात आणि दोघांनी एकमेकाची नांवं घेतल्याखेरीज गाठ सोडणार नाहीं म्हणतात, तशातलीच कांहींशी ब्रह्मी लोकांतली ही चाल म्हणतां येईल. या चालीत मोठं काव्य आहे खचित. 'बा ची'नं काढलेल्या चित्रांत या काव्याला मोठं मोहक रूप दिलेलं आहे.

या चित्रांत डाव्या अंगाला नववधूच्या मैत्रिणी दाखविलेल्या आहेत. त्यांनीं दारावर सोन्याची सांखळी धरून वाट अडविलेली आहे. नवरानवरीकडे त्यांच्या नजरा लागलेल्या आहेत, त्यांत कौतुक, आनंद, मस्करी असे अनेक भाव दिसत आहेत. उजव्या अंगाला वडीलधारी माणसं आहेत. घरांतली छोटी मुलंहि आहेत. मोठ्या माणसांना जो प्रकार चाललाय त्याचं कौतुक वाटत आहे. नवऱ्या मुलीची भावंडं मात्र ही काय गंमत चालली आहे अशा अर्थानं बघत आहेत. चित्र पाहणाराचं लक्ष तरुण दंपतीकडे वेधावं असा चित्रकाराचा अर्थातच हेतु आहे व त्या दोघांच्या आकृती चित्राच्या मध्यभागीं टाकून त्यानं त्या विशेष खुलविल्या आहेत. वधू मान मुरडून वराकडे बघत आहे आणि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलगत
अनुक्रम 21040 दि: 22-5-2012
क्रमांक 29 नों: दि: 30-12-2014



जणुं म्हणत आहे, " बघा हो, किती खोडकर या माझ्या मैत्रिणी! आता यांचं समाधान तुम्हींच करा. " तिचा नवरा हसत हसत बघत आहे आणि वधूच्या मैत्रिणींना द्यावयासाठीं तयार ठेवलेली प्रेमाची खंडणी देण्यासाठीं त्यानं खिशांत हात घातला आहे. बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य ह्या तिन्ही अवस्थांतली माणसं चित्रांत दाखविण्यांत चित्रकाराची सहृदय योजकता जशी दिसून येते, त्याचप्रमाणें प्रत्येक व्यक्तीची आकृति, वेषभूषा आणि वयाला शोभेल अशा प्रकारचा मुद्रेवरील भाव रंगविण्यांत त्यानं जें कसब दाखविलं आहे त्यामुळें चित्राची शोभा आणि परिणामकारकता फारच वाढलेली आहे.

ब्रह्मी लोकांच्या लग्नविधींत गमतीजमती पुष्कळ आहेत, आणि वधुपक्षाला मनस्ताप व्हावा अशा चालीरीति नाहींत. मुख्य म्हणजे पैशाची मागणी आणि वसुली कोणत्याच पक्षाकडून केली जात नाहीं. हुंड्याची चाल नाहीं. प्रीति-विवाह पुष्कळच रूढ आहेत.

बायकांना समान हक्क आणि स्वातंत्र्य ब्रह्मदेशांत फार पूर्वीपासून आहे. ब्रह्मदेशचे लोक एक नंबरचे आळशी आणि विलासी आहेत असें मी ऐकलं होतं. परंतु मी जें कांहीं पाहिलं त्यावरून ही समजूत मला चुकीची वाटली. पुरुषांचा चंगीभंगीपणा कोणत्या देशांत नाहीं? पंजाबी लोकांचा खाण्याचा हव्यास ब्रह्मी लोकांत आढळला खरा, परंतु पंजाबी पुरुषांचा कपड्यालत्त्यांचा षोक ब्रह्मी पुरुषांत खचित नाहीं. कमरेला ' लुंगी ' आणि अंगांत ' अंगी ' ( ब्रह्मी शब्द ' लोंजी ' आणि ' एंजी ' असे आहेत ) येवढाच अस्सल ब्रह्मी पुरुषांचा पोषाख व बहुतेक पुरुष तोच करतात. ब्रह्मी बायकांना तर 'आळशी' ही पदवी बिलकुल देतां येणार नाहीं. खेडूत बायका भातशेतांत राबत असतात. रंगून शहरांत चारसहा मोठाली भाजी मार्केटं आहेत. तिथें तर कष्टाची सारी कामें करणाऱ्या हजारो बायका दृष्टीस पडतात. फॅशनेबल बायका दुकानं चाल-वितात, बसमधल्या कंडक्टरचं काम करतात, पुरुषांच्या बरोबरीनं कचेऱ्या-तल्या नोकऱ्या करतात! असं असतांना या बायकांना ऐदी, आळशी म्हणा-यचं कसं? सिंधमध्यें आणि दिल्ली–लाहोरकडे असतांना त्या प्रांतांतल्या अष्टौ-प्रहर खाटल्यावर बसून राहणाऱ्या गृहिणी (!) मी बघितल्या आहेत. त्यांच्या तुलनेनं ब्रह्मी बायका शंभर पटीनं कष्टाळू आणि उद्योगी ठरतील. ब्रह्मी

बायकांच्या रूप सौंदर्यावर मी लुब्ध झालो नाहीं. तेव्हां त्यांचा वावगा कैवार घेऊन मी बोलेन असा संभव नाहीं. परंतु आळशीपणाचा आरोप त्यांच्यावर घेतला जातो तो खोटा आहे येवढं मला सांगितलंच पाहिजे !

आश्चर्याची गोष्ट खरी, परंतु ब्रह्मदेशांत लग्न म्हणजे एक व्यावहारिक करार समजण्यात येतो. नवरा आणि बायको दोघांचेहि इस्टेटीवरचे हक्क समान असतात. विधवांनी पुनर्विवाह करण्याविरुद्ध रूढी नाहीं.

घटस्फोटाची परवानगी आहे. मात्र त्याबद्दलचा दावा कोर्टांत नव्हे तर पंचायतीकडे जातो. लग्नानंतर स्त्रीचं नांव बदलत नाहीं ! आडनांव तरी बदलतं काय ? या प्रश्नाचं उत्तर असं कीं ब्रह्मी लोकांना आडनांवंच नसतात ! फडके, महाजनी, गोखले, गाडगीळ अशी कुटुंब-नांव तिकडे नाहीतच ' सौभाग्यवती ' अशा अर्थाची उपाधीहि लग्न झालेल्या स्त्रीच्या नांवामागं लागत नाही ! परंतु पुरुषांच्या व स्त्रियांच्या नांवामागं लागणाऱ्या इतर उपाधी पुष्कळ आहेत. पुरुषांच्या नांवामागं ' ऊ ' ( इंग्रजीत लिहितांना फक्त U अक्षर लिहितात ) अशी उपाधी बहुधा असते. ' ऊ ' चा अर्थ काका. सध्याच्या ब्रह्मदेशाच्या पंतप्रधानांच नांव ' ऊ न ' असं आहे ( म्हणजे ' न काका ' ) ' मॉंग ' ( भाऊ ), आणि ' को ' ( दादा ) असेंहि शब्द पुरुषाच्या नांवामागं लावण्यांत येतात. आपण मराठींत हरीभाऊ, भालुदादा असं म्हणतो. म्हणजे नातं दर्शविणारा प्रत्यय नांवापुढें लावतो. ब्रह्मी भाषेंत तो नांवाच्या मागं लागतो. ऊ नू, मॉंग नू किंवा को नू असं म्हणायचं. पुढाऱ्यांच्या मागं ' बो ' असा सन्मादर्शक प्रत्यय लावतात. कांहीं पुरुषांच्या नांवामागं 'सया' लावतात. ' सया ' म्हणजे आचार्य ) एखाद्या बाईचं नांव ' खिन ' असं असेल तर लग्नानंतरहि ती ' खिन ' च राहते. ' मा ' म्हणजे ताई, आणि ' डॉ ' म्हणजे मावशी. आपल्या मराठींत आपण उषाताई आणि गोदूमावशी असं म्हणतो. परंतु ' खिन ' ची धाकटी बहीण तिला हाक मारतानां ' मा खिन ' असं म्हणेल आणि भाचा म्हणेल ' डॉ खिन ' !

आपल्याकडे जोशी, रानडे, पवार, सरनाईक अशा आडनांवावरून माणसाच्या जातीच्या बोध होतो. ब्रह्मदेशांत आडनांवं नाहींत. याचं मुख्य कारण ब्रह्मी लोकांत जातीभेदच नाहींत. बुद्धधर्माचे इतर गुणावगुण कांहीं असोत, परंतु वर्णांची उच्चनीचता त्या धर्मानं निपटून काढली, समाजातल्या स /८

लोकांत आणि स्त्री-पुरुषांत समानता राखण्याचा कटाक्ष ठेवला, ही त्याची मोठ्या मोलाची कामगिरी समजावी लागेल. ब्रह्मी जीवनांत चातुर्वर्ण्य नाहीं. मात्र वर्णविग्रह झाला असला तरी वर्गविग्रह झालेला नाहीं. श्रीमंत गरीब असे वेगवेगळे वर्ग निर्माण झालेच आहेत व त्यांतील कलह चालूच आहे. बुद्धधर्मांत जाती भेद नाहींत म्हणून कुणाच्याहि वाट्याला शुद्रत्व आलेलं नाहीं म्हणून स्पृश्य–अस्पृश्य असा अन्याय्य आणि दुष्ट फरक नाहीं. म्हणून त्या धर्माचं मोठं आकर्षण आमच्या डॉ. भीमराव आंबेडकरांना वाटतं ते ठीक आहे. परंतु बुद्धधर्मीय समाजांतहि संपत्तीच्या तत्त्वावर वरिष्ठ आणि कनिष्ठ असे वर्ग तयार झाले आहेतच. म्हणूनच कम्युनिस्ट प्रचाराला ब्रह्मदेशांत पुष्कळ वाव आहे; आणि आजच्या ब्रह्मी सरकारला ज्या अनेक विरोधी शक्तींशी झुंझावं लागत आहे त्यांत कम्युनिस्टांची बंडाळी सर्वांत प्रमुख आणि कठीण आहे. माणसांची आडनांवंच गाळून टाकली की एकसंधि समाज आपोआप निर्माण होतो, हा हिशेब वाटतो तितका सरळ नाहीं. समाजातल्या कलहाची बीजे पैशांत आहेत, या सिद्धांताचा दाखला हवा असेल तर ब्रह्मदेशाचं उदाहरण लक्षांत घेण्यासारखं म्हणावं लागेल !

* * *

दा. क्र. 70609

# : ७ :

बंधुभावाच्या आणि भलाईच्या भाषेला सध्यां ऊत आलेला आहे. कोणत्याहि देशातल्या लोकांना भाई म्हणण्याची आणि त्यांच्याकडून भाई म्हणवून घेण्याची आम्हा भारतीयांची तयारी आहे.

चौ एन लाय भारतात यायचा अवकाश, देशांत जिकडे तिकडे 'हिंदी चीनी भाई–भाई' अशा घोषणा उठतात, बुल्गानिन आला रे आला की देशाच्या काना कोपऱ्यांतून 'हिंदी रूसी भाई–भाई' ची धून दुमदुमू लागते. ब्रह्मदेशाहून परत येतांना कलकत्त्याच्या मुक्कामांत 'स्टेट्समन' या कलकत्त्याच्या इंग्रजी दैनिकांत एका विनोदी लेखकाचा लेख वाचला. त्यांत त्यानं सूचना केली होती कीं भारत सरकारनं एक अधिकृत 'भाई–भाई कॅलेंडर' काढावं! जानुआरी महिन्यांत लोकांनीं घरोघर रस्त्यावर अमुक एका देशाच्या नांवानं भाई-भाईचा मंत्र जपावा, फेब्रुआरी महिन्यांत अमुक देशाच्या नावानें, अशा प्रकारे वर्षांतल्या साऱ्या महिन्यांचं वाटप करून टाकावं! कदाचित लवकरच बाराहि महिने अपुरे वाटतील. पण पुढचं पुढें पाहतां येईल. सध्या बारा महिन्यांची तर बेगमी होईल.

या उपहासगर्भ टीकेला पुष्कळ अर्थ आहे. नेहरू इंग्लंडला गेले कीं इंग्रज-हिंदी मैत्री जुनी आणि दृढ असल्याच्या गप्पांनी वातावरण भरून जातं. पंडितजी अमेरिकेला गेले कीं हिंद-अमेरिकेची दोस्ती अभंग असल्याच्या हवाल्यांनी दशदिशा भरून जातात. चौ एन लाय इकडे आला की हिंदी चिनी संस्कृति प्राचीन कालापासून एकरूप असल्याच्या बाता पाहुणे आणि यजमान दोघेहि मारू लागतात. बुल्गानिन आला की हेच नाटक! टिटो आला कीं हाच तमाशा परंतु या औपचारिक मंत्रपठणांत खऱ्या दोस्तीचें ब्रह्म किती, आणि वायफळ शब्दांची माया किती त्याबद्दलची अंदरकी बात ज्याची त्याला माहित. दुनिया झुकती है, और झुकानेवाला बहोत है!

उद्यां नेहरूंनीं ब्रह्मदेशांत दौरा काढला तर 'ब्रह्मी–हिंदी भाई भाई' अशा आरोळ्या मारून ब्रह्मी जनता त्यांचे स्वागत करील याबद्दल शंका नको. पर-

वांच्या माझ्या मुक्कामांत ब्रह्मी स्वातंत्र्यदिनाचा मोठा उत्सव झाला तेव्हां भारताचे पंतप्रधान आणि राष्ट्रपति यांचे ब्रह्मी सरकारला संदेश आलेच होते, आणि त्यांत 'तुम्ही आम्ही भाऊ भाऊ' अशा अभिप्रायाचंच अभिनंदन होतं. परंतु आम्हां हिंदी लोकांविषयीं ब्रह्मी जनतेला आणि सरकारला खरोखर कितीसं बंधुप्रेम वाटतं ? मला वस्तुस्थिति दिसली ती अशी, कीं हे बंधुप्रेम कांहीं फारसं वाया चाललेलं नाहीं. उलट व्यापाराच्या, उद्योगधंद्याच्या व नोकरीच्या निमित्तानं जे भारतीय ब्रह्मदेशचे रहिवाशी झालेले आहेत तेच ब्रह्मी सरकारच्या आणि जनतेच्या डोळ्यांत सलत आहेत. आणखी नवे भारतीय तर त्यांना मुळींच यायला नको आहेत. चार आठ दिवसांचे मुशाफीर म्हणून त्यांनीं यावं, पैसा खर्च करावा. ब्रह्मदेशांतला पैसा भारतांत जाता कामा नये. ब्रह्मदेशांत व्यापार अगर नोकरी करणारे जे भारतीय आहेत त्यांनींहि मिळविलेला सारा पैसा ब्रह्मदेशांतच खर्च केला पाहिजे. भारतांत पाठवितां कामा नये. भारतीय कलावंतांच्या एखाद्या सांस्कृतिक शिष्टमंडळानं उद्यां ब्रह्मदेशाला भेट दिली तर सत्कारांच्या देखाव्यात कांहीं कमी पडणार नाहीं. परंतु ब्रह्मी लोकाना भारतीय लोक मनापासून हवे आहेत काय? या प्रश्नाचं उत्तर 'नको आहेत' असंच द्यावं लागेल. ख्यालीखुशासाठी, प्रवासाच्या मौजेसाठी भारतीय लोक गेले तर त्यांची हरकत नाहीं. परंतु 'प्राप्तीचा वाटा' मागणारे भारतीय त्याना नको आहेत. येवढंच नव्हे तर ब्रह्मी लोकांच्या मनात हिंदी लोकांविषयीं कांहीशी विरोधाची अढीच आहे. या विरोधाचा प्रथमदर्शनी थोडा चमत्कार वाटतो. परंतु इतिहासाकडे बघितलं की त्याचा उलगडा होतो.

पहिली गोष्ट अशी कीं, ब्रह्मदेशावर ब्रिटिशांचा अंमल होता त्या शंभर वर्षांच्या काळांत गोऱ्या राज्यकर्त्यांनीं हिंदी विरुद्ध ब्रह्मी असंच भांडण व्यवस्थिपणें निर्माण केलें.

त्या काळांत ब्रह्मदेशातल्या हिंदी लोकांकडे पाहून ब्रह्मी लोकाना वाटत असे, हे परकी उपरे लोक आमच्या देशात येऊन खुशाल चरत आहेत हा काय न्याय ? १९४२ साली ब्रह्मदेशावर जपान्यांचा हल्ला झाला गोरे राज्यकर्ते पळून गेले. त्यांच्याबरोबर हिंदी लोकहि बहुसंख्येनं पळाले. ब्रह्मी लोकांना वाटलं, बरी गेली पीडा ! जे हिंदी लोक पळून न जाता ब्रह्मदेशात राहिले त्यांच्याबद्दल ब्रह्मी लोकांना अप्रीतीच वाटली. नेताजी सुभाषचंद्र बोस यानी

१९४३ मध्ये आपल्या आझाद हिंद सरकारची आघाडीची राजधानी रंगूनमध्ये आणली. आझाद हिंद फौजेची आघाडीची कचेरीहि ब्रह्मदेशात आली. नेताजींच्या असामान्य व्यक्तिमत्वामुळें आणि लोकप्रियतेमुळे कोट्यवधि रुपयांचा फंड हिंदी धनिकांनी व गरीबांनी त्यांच्या पायाशी ओतला. सुरुवातीच्या त्या दिवसात आझाद हिंद सेनेच्या शिपायांना कपड्यालत्त्यांची व खाण्यापिण्याची ददात अनुभवावी लागली नाही. जपाननं स्थापन केलेल्या बेगडी स्वतंत्र ब्रह्मी सरकारजवळ पैसा नव्हता, अन्नधान्य नव्हतं कापडचोपड नव्हत. ब्रह्मी जनतेचे हाल होत होते. त्याना वाटे आमची दुर्दशा चालली आहे, आणि या हिंदी लोकांची बेस्यांची मात्र आमच्या देशात चैन चालू आहे.

अशा प्रकारे परकेपणा, मत्सर, अप्रीति, यांची जी वाढ झाली ती ब्रह्मदेशाला खरं खुरं स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या सात आठ वर्षांच्या काळांत नाहींशी होणं कसं संभवनीय आहे? भारताच्या फाळणीनंतर निर्वासितांचा लोंढा वाट सांपडेल तिकडे गेला त्याप्रमाणें ब्रह्मदेशाकडेहि वळला. तो थोपविता थोपवितां ब्रह्मी सरकारच्या नाकीनऊ आले. ब्रह्मी लोकांना आज भारतीयांचा दुष्टावा करावयाचा आहे असं नव्हे. परंतु साहजिकपणेच त्यांना आज कुणाचीहि दोस्ती हवी आहे ती स्वतःचा कांहीं फायदा साधत असेल तर. अंतरदेशीय व्यवहारांत दोस्तीच्या पोकळ शब्दाला कांहीं महत्त्व नसतं. उधार मैत्रीला कांहीं अर्थ नसतो. रोखीच्या भाषेत बोलावं लागतं, मैत्री, भांडवल कर्ज द्या म्हणायचं आणि त्याच्या बदल्यांत आमच्याकडे अमुक माल तयार होतो तो किती घेतां बोला असं विचारायचं-अशाच न्यायानं सारे देश आज घटकेला मैत्रीची देवघेव करीत आहेत. लहानमोठ्या सर्वच देशांना आज बाजारपेठा हव्या आहेत. दुसऱ्या देशावर राज्यसत्ता चालवावयाची या अर्थाचा वसाहतवाद आतां संपला आहे, परंतु बाजारपेठा मिळविण्यासाठी जो तो देश यथाशक्ति हातपाय पसरीत आहेच. रशिया-अमेरिकेसारखी बडी राष्ट्रे आपल्या आर्थिक सत्तेचं जाळं जिकडेतिकडं पसरू पाहात आहेत ते व्यापार वाढविण्यासाठींच. ब्रह्मदेशासारख्या छोट्या देशांचंहि आज घटकेचं धोरण एकच आहे ते हे, कीं आपल्या मालाला बाजार पेठ मिळवायची.

ब्रह्मदेशाला भारताची मैत्री हवी असली तरी त्या मैत्रीत त्यांचा सवाल एव ढाच आहे, कीं, आमच्या देशांतून निर्यात होणारा कोणता माल किती घेता बोला?

पेट्रोल, लाकूड आणि तांदूळ या ब्रह्मदेशांत उपलब्ध होणाऱ्या मुख्य गोष्टी. ब्रह्मदेशाच्या उत्तर भागांत पेट्रोल तेलाच्या साडेचार हजार खाणी आहेत.त्यांतून काढलेलं पेट्रोल तीनशें मैल लांबीच्या मोठमोठ्या नळांतून रंगून शहरीं आणलेलं आहे. तिथं ते साफ केलं जातं व नंतर परदेशी रवाना होतं. दुसऱ्या महा-युद्धाच्या आरंभी ब्रह्मदेशांतील पेट्रोलचे वार्षिक उत्पादन दोन अब्ज गॅलन होतं ! जंगली लाकडाचं ब्रह्मदेशांतील उत्पादनही असंच अजस्त्र आहे. तांद-ळाच्या पिकाचीहि गोष्ट अशीच. एके काळी बर्माचा तांदूळ जगभर जात होता. ती स्थिति आतां पालटलेली आहे. उत्पादनाच्या मानानं बाजारपेठ तोकडी पडू लागली आहे. यामुळें आमचा तांदळाचा साठा किती उठविता बोला, असा ब्रह्मी सरकार उठल्याबसल्या सवाल टाकू लागलं आहे. हिंदुस्थानांत तयार होणारी शेतीची अवजारं, उसाचे चरक, लेथ, एंजिनं अशा यंत्रांची बर्माला खरं म्हणजे आज फार गरज आहे. परंतु यंत्रांच्या मोबदल्यांत ब्रह्मी तांदूळ भारताला नको आहे. आणि त्यामुळें वर सांगितलेली यंत्रं बर्माला नको म्हणावी लागत आहेत. मैत्री कितीहि हवी असली तरी त्यावर व्यापाराचं बंधन आजच्या काळांत अपरिहार्यपणें कसं पडतं त्याचं हे एक छोटसं उदाहरण म्हणून सांगितलं याखेरीज स्थूलमानानें हें खरंच, कीं हिंदी लोकांविषयींच्या अप्रीतीची जुनी अढी ब्रह्मी लोकांच्या मनांत आहे.

याचा अर्थ असा नव्हे, कीं ब्रह्मदेशांत हिंडतांना या अप्रीतीचा प्रत्यय पदो-पदी येतो. ज्याला केवळ गमतीनं ब्रह्मदेशांत सहल करायची आहे त्याला या अप्रीतीचा वासदेखील यायचा नाहीं. ब्रह्मी लोकांचा प्रेमळपणा व आथित्य-शीलता यांचाच अनुभव येईल. महागाईचा प्रश्न सोडला तर ब्रह्मदेशांतली सफर मजेचीच वाटेल. भाषेची अडचण मात्र जाणवल्यावांचून राहणार नाहीं. छोटे दुकानदार, टॅक्सीवाले, रिक्षावाले, मजूर या लोकांशी गाठ पडली कीं मोठी पंचाईत होते. ब्रह्मदेशांत हिंदुस्थानी सर्रास सर्वांना कळतं असं मी ऐकलं होतं, परंतु ते साफ खोटं आहे. सामान्य लोकांना इंग्रजी समजत नाहीं. प्रेम आणि भांडण या दोन्ही गोष्टी चांगल्या रीतीनं करायच्या असतील तर ज्या व्यक्तीशी गांठ असेल तिची भाषा उत्तम येत असेल तरच प्रेम किंवा भांडण रंगतं. ब्रह्मदेशांत या दोन्ही गोष्टी फार मुष्कीलीच्या !

किती नाना प्रकारचे लोक आहेत या रंगून शहरांत. किती देशांचे आणि किती धर्मांचे! रंगूनची लोकसंख्या जवळजवळ साडेसात लक्ष आहे.

यापैकीं अस्सल बर्मी साडेचार लक्ष असून सत्तर हजार चिनी, दीड हजार युरोपियन आणि अमेरिकन, जवळ जवळ दीड लक्ष हिंदुस्थानी व पाकिस्तानी आहेत, आणि ज्यांना 'देशी संस्थान' अशी ब्रिटिशांच्या राजवटींत संज्ञा होती व ज्यांचं आता नव्या ब्रह्मी स्वतंत्र सरकारात विलिनीकरण झालेलं आहे अशा मुलखातील सुमारे सोळा हजार लोक आहेत. त्यात्या संस्थानावरून या लोकांना 'करेन' 'चिन' 'काचिन', 'शान' अशी नावं पडलेली आहेत. हेच संस्थानी लोक ब्रह्मदेशाचे मूळचे रहिवाशी. चेहेऱ्याची ठेवण, शरीराचा बांधा, वेषभूषा या बाबतींत अस्सल ब्रह्मी स्त्री पुरुषांहून ही माणसं एकदम निराळी दिसतात. नुसती निराळीच नव्हे तर जराशी अधिक चित्तवेधकहि. स्वातंत्र्यो-त्सवानिमित्त झालेली परेड मी पाहिली. तिच्यात करेन, शान, चिन, काचिन सैनिकांच्या तुकड्या आमच्या पुढून जाऊ लागल्या तेव्हां अस्सल ब्रह्मी सैनिकां-हून हे जवान अधिक मजबूत, धिप्पाड, नाकी डोळी देखणे, व एकदम मनांत भरण्यासारखे मला वाटले. तोंडातून सहजोद्‌गार निघावा त्याप्रमाणें मी आनंदाने टाळ्या वाजविल्या. पाहतो तो परेड पाहण्यासाठीं जमलेल्या प्रचंड समाजातूनहि टाळ्यांचा गजर उठला. त्या गजराचं कारण मात्र निराळं होतं. माझ्याजवळ बसलेल्या एका अमेरिकन वृत्तपत्रकारानं ते मला सांगितलं. ते कारण असं कीं शान, करेन इत्यादि संस्थानात घटनात्मक विलीनीकरणानंतरहि विरोधी चळ-वळयांच्या कटकटी बरेच दिवस चालू होत्या त्या यंदा बहुतांशी संपल्यासारख्या झाल्या होत्या. आणि स्वातंत्र्याच्या सोहाळ्यात या संस्थानांनी पूर्वी कधी नव्हे इतक्या उत्साहाने भाग घेतला होता. या राजकीय घडामोडीला अनुलक्षून संस्थानी फौजांचं विशेष स्वागत करण्यासाठीं माझ्या भोवतालच्या गर्दीतले लोक टाळ्या वाजवीत होते. मी मात्र टाळ्या वाजवीत होतो तो जवानांच्या रुबाबावर आणि चित्रमय पोशाखावर मी खुष झालो होतो म्हणून!

भारतात देशी संस्थानांचा प्रश्न जसा बिकट होता तसाच कांहींसा ब्रह्म-देशांतल्या संस्थानांचाहि होता. वल्लभभाई पटेलांनी भारतातली संस्थानं पुसून टाकण्याची जी अमोलिक कामगिरी धडाडीच्या कठोरपणानं करून

दाखविली तशी कामगिरी करणारा कुणी खंबीर मंत्री स्वतंत्र ब्रह्मी सरकारात नव्हता असं दिसतं.

यामुळें या संस्थानांची कटकट जवळ जवळ सहा वर्षं चालूं राहिली. आतां ही संस्थानं संपूर्णतः विलीन झालेली आहेत व एकसंध राज्यसंघ ब्रह्मदेशांत निर्माण झाला आहे. तथापि देशांतील अस्वस्थता आणि बंडाळी ब्रह्मी सरकारला निर्मूल करतां आलेली नाहीं. याबाबतींत ब्रह्मदेशाच्या नैसर्गिक भौगोलिक रचनेची जी अडचण आहे ती फार चमत्कारिक आहे, आणि ती कधीं काळीं तरी दूर होईल काय अशी शंका मनांत आल्यावाचून राहात नाहीं. उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहणाऱ्या चार मोठ्या नद्या, त्या नद्यांशी समांतर असलेल्या पर्वतांच्या रांगा आणि दऱ्याखोऱ्या व जंगलं अशा स्वरूपाची मध्य व उत्तर ब्रह्मदेशाची रचना आहे. या भागांत सैन्याच्या हालचाली करणं फार कठीण आहे बंदोबस्त ठेवणं जवळजवळ अशक्य आहे. भूमिगत राजकीय चळवळ करणाऱ्यांना या भागाचा आश्रय सहज घेतां येतो. अशा विरोधी चळवळ्यांनीं स्वतंत्र ब्रह्मी सरकारला पांच सहा वर्षं हैराण करून सोडलं होतं. कम्युनिस्ट पुढाऱ्यांनीं ब्रह्मी सरकारशी एक प्रकारचं यादवी युद्ध चालू ठेवलं होतं. हे युद्ध आतां पुष्कळसं थंडावलं आहे. परंतु ज्यांचा राजकारणाशी कांहींच संबंध नाहीं, ज्यांना केवळ वाटमारी व लुटालूट करावयाची आहे अशा गुंडांना, दरोडेखोरांना, लुटारूंना आपला धंदा चालवून दऱ्याखोऱ्यांत आणि जंगलांत सुरक्षित राहता येतंच. या लोकांची कटकट ब्रह्मी सरकारला कायमची मिटवितां येईल कीं नाहीं शंका आहे. या लोकांचे घातपाती अत्याचार नित्य चालूच आहेत. ब्रह्मदेशांत हवा तिकडे हवा तेव्हां स्वच्छंद संचार मुशाफिराला करतां येत नाहीं, याची जाणीव मलादेखील झाल्यावाचून राहिली नाहीं.

कुठेहि रेल्वेनं जायचं झालं तर लोक फक्त दिवसाउजेडी प्रवास करतात. रात्री जे स्टेशन लागेल तिथे रात्रभर मुक्काम करायचा, उजाडल्यावर पुढे जायचं अशी व्यवस्था करावी लागते.

रात्रीच्या वेळेस आगगाडीवर कुठे कसा डाका पडेल त्याचा भरंवसा नाही दिवसाच्या प्रवासात देखील पुष्कळदां असं होतं की घातपाती लुटारूंनी कुठे पूल पाडून टाकलेला असतो, रूळ उखडलेले असतात. गाडी त्या ठिकाणी

थांबते. दुरुस्ती झाल्यावाचून पुढे जाऊ शकत नाहीं. यामुळें दुरुस्तीच्या कामीं रेल्वे खात्याला अव्याहत खर्च करावा लागत आहे, आणि याचा परिणाम म्हणजे भाड्यांत भरमसाट वाढ करावी लागत आहे. रंगून ते मंडाले अंतर जेमतेम चारशें मैलाचं आहे. या अंतराचं थर्ड क्लासचं रेल्वे भाडं आपल्या-कडच्या मानानं किती असावं ? फार तर आठ दहा रुपये. परंतु आहे। पन्नास रुपये ! यामुळें प्रवासी लोक रेल्वेनं जाण्याऐवजी विमानानंच जाणं पसंत करतात. याचा परिणाम असा झाला आहे की विमानाची भाडीही वाढलेली आहेत आणि विमानात चटकन हमखास जागा मिळत नाहीं.

ब्रह्मदेशांतून ब्रिटिश राज्यकर्ते चालते झाले त्या गोष्टीला सात वर्षं होऊन गेली आहेत. आपल्या भारतीय स्वातंत्र्याचं आणि बर्मी लोकांच्या स्वातंत्र्याच वय जवळजवळ सारखंच आहे. त्याच्या प्रत्यक्ष परिणामात मात्र तफावत आढ-ळते. स्वतंत्र भारताचा कारभार ज्यांच्या हातात गेला त्यांच्या लोकप्रिय झालेल्या कृत्यांपेक्षां ज्यामुळें लोक नाराज झाले अशा कृत्यांचीच यादी मोठी ठरण्याचा संभव आहे. काही सकारण, काही अकारण असा बराच असंतोष स्वतंत्र भारताच्या जनतेत पसरलेला आढळतो. 'सरकारनं शिक्षणक्षेत्रांत उकीरडा करून ठेवलाय ', ' सरकारनं छोट्या उद्योगधंदेवाल्यांना हैराण केलं आहे.' ' सरकारनं जमीनदारांचं वाटोळं केलं आहे.' ' सरकारच्या करमणूक करानं जीव नकोसा केला आहे. ' अशा नाना प्रकारच्या तक्रारींचीं शल्यं समाजाच्या वेगवेगळ्या थरांच्या मनांत सलत आहेत.एक प्रकारच्या वैफल्याची भावना लोकांत दिसत आहे. ब्रह्मदेशांत असली भावना फारशी आढळत नाहीं. ब्रह्मी सरकारनं ब्रह्मदेशाची मागासलेली स्थिती पुष्कळच सुधारून दाख-विली आहे. मुख्य म्हणजे नवे नवे उद्योगधंदे खुले झाल्यामुळें लोकांना पोटभर मिळविता येऊं लागलेलं आहे. आपल्या मायदेशांत पूर्वीं कधीं नव्हती इतकी सुबत्ता आल्याचा विश्वास लोकांना वाटू लागला आहे.या सुबत्तेप्रमाणेंच शांतता आणि स्वस्थता ब्रह्मी जनतेला अर्थात् हवी आहे ती प्रस्थापित करण्यासाठीं सरकारी उपायहि चालू आहेत. परंतु ते उपाय केव्हां आणि कितपत यशस्वी होतील हे मात्र सांगतां येत नाहीं. गुंड, लुटारू आणि दरोडेखोर यांचा उपद्रव बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चाललेला आढळून येतो.

माझ्या मुक्कामात स्थानिक वृत्तपत्रांत आढळलेल्या तीन बातम्या येथें देण्या-सारख्या आहेत.

" लॅटर स्ट्रीटवरील भात गिरणीचे धनाढ्य मालक व चीपे रोड नं. ९८ बंगल्यात राहणारे लिम त्वा कॉंग गेल्या सहा महिन्यापासून बेपत्ता आहेत. गेल्या ऑगस्टमध्यें ९ तारखेस सरकारी अधिकाऱ्यांचा गणवेष केलेल्या सहा लोकांनीं त्यांच्या बंगल्यात शिरून त्यांना पळवून नेलं. पुढें कांहीं दिवसांनी त्यांच्या माणसांना चिनी भाषेंत लिहिलेलं एक पत्र मिळालं. त्या पत्रांत लिहिलं होतं ' तीन लक्ष रुपयांची खंडणी आम्हाला दिलीत तरच लिम त्वा कॉंग यांची आम्ही मुक्तता करूं. या पत्राच्या आधारानं पोलीस कसून शोध करीत आहेत, परंतु अद्यापि त्याचा कांहीं उपयोग झालेला नाहीं. "

दुसरी बातमी " ऊ सॉ हान आय. सी. एस. यांचे बंधु ऊ आये यांना गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या बारा तारखेस सहा हत्यारबंद लोकांनीं त्यांच्या राहत्या बंगल्यातून काढून पळवून नेलं. पळवून नेणारांनीं पत्रद्वारें मागितलेली खंडणी दिली गेली नाही. ऊ आये यांचा अद्यापि शोध लागलेला नाहीं.त्यांचा निकालच लावण्यांत आला असावा असा तर्क आहे. "

आणखी एक बातमी " रविवार ता. ८ जानुआरीस तोंडावरून बुरखे घेतलेले तीन हत्यारबंद लोक इन्या रोडवरील मॉईंग पॉटरी वर्क्सचे मालक ऊ थॉ यांच्या बंगल्यांत शिरले आणि जडजवाहीर व रोख रक्कम मिळून एक लाखाचा ऐवज घेऊन ऊ थॉ यांच्या मालकीच्या मॉरिस गाडींतून पळून गेले. "

* * *

## : ८ :

मला नुसता आजचा ब्रह्मदेश बघायचा नव्हता, तर एखाद्या कूट चित्रांचे विस्कटलेले कपटे जुळवून चित्र सांधून जमविण्याचा आपण प्रयत्न करतो त्याप्रमाणें मिळेल तितकी माहिती घेऊन व स्थळं पाहून १९४३ पासूनच्या दोन वर्षांत ब्रह्मदेशांतली अवस्था कशी होती त्याचं चित्र कल्पनेनं बनवायचं होतं.

त्या दोन वर्षांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा संचार, त्यांच्या आझाद हिंद सरकारची राजधानी, आणि आझाद हिंद फौजेची आघाडीची कचेरी ब्रह्मदेशांत होती. नेताजींच्या एकंदर चळवळीचा रोमांचकारी इतिहास तीन कादंबऱ्यांच्या रूपानं सांगण्याच्या माझ्या संकल्पासाठीं माहिती मिळवावी म्हणून मी ब्रह्मदेशाच्या सफरीवर गेलो होतो. सामान्य मुशाफराच्या दृष्टीनें तर ब्रह्मदेश मला बघायचा होताच, आणि त्या देशातल्या लोकांचं जीवन पाह्यचं होतंच; पण माझ्या मनांतला अधिक महत्त्वाचा आणि अधिक प्रबळ हेतु होता तो नेताजींचं ब्रह्मदेशातील वास्तव्य आणि कार्य याबद्दल शक्य तितकी माहिती मिळविण्याचा. नेताजींच्या निकट सहवासांत आलेल्या शक्य तितक्या व्यक्तींना मला भेटायचं होतं. नेताजींची पावलं ज्या ज्या ठिकाणी उमटली ती ती ठिकाणं डोळ्यानी पाह्यची होती.

१९४१ सालीं जानेवारी महिन्यांत कलकत्त्यांतील एलजिन रोडवरील आपल्या बंगल्यांत सुभाषचंद्र बोस ब्रिटिश सरकारच्या नजरकैदेंत व कडक पहाऱ्यांत होते. तेथून ता. १५ जानुआरी रोजीं सुभाषबाबू निसटले, व पेशावरला गेले. या साहसी पलायनाचे तपशील सुभाषबाबूंनीं आपल्या हयातींत कुणाला सांगितलें नाहींत. आतां तर त्या साहसाची विश्वसनीय हकीगत उजेडांत येण्याचा संभवच नाहीं. याबाबतींत इतिहासांत येवढंच नमूद होईल, कीं चुडीदार पायजमा, शेरवानी, डोक्यावर फेज टोपी, दाढी वाढविलेली अशा थाटांतल्या मौलवीचा वेष धारण करून व झियाउद्दीन असं नांव धारण करून सुभाषबाबू पळाले व पेशावरला पोंचले. तेथून ते काबूलला गेले. उत्तमचंद

नांवाच्या व्यापाऱ्याच्या घरांत अठ्ठेचाळीस दिवस राहिले. तेथून मास्कोला गेले. तेथें आठ दिवस राहून बर्लिनला पोंचले. जवळ जवळ दोन वर्षं त्यांनीं जर्मनींत वास्तव्य केलं. जर्मनीच्या हातीं पडलेल्या हिंदी युद्धबंद्यांची ‘ आझाद हिंद फौज ’ निर्माण केली. ( आझाद हिंद फौज प्रथम सिंगापुरांत तयार झाली अशी सामान्य समजूत आहे ती चुकीची आहे. नेताजींनीं अशी फौज १९४१ सालीच जर्मनीमध्यें उभारली होती व तिच्यांत चार हजार सैनिक होते ! ) हिंदुस्थानावर चाल करून जायचं तर जर्मनींतून फौज नेण्यापेक्षां दूर पूर्वेतल्या सिंगापूराहून ब्रह्मदेशच्या मार्गानं नेणं अधिक इष्ट ठरेल असं वाटल्यावरून सुभाषचंद्र बोस जर्मन व जपानी सरकारांच्या सहाय्यानं पाणबुडीतला नव्वद दिवसांचा साहसी प्रवास करून बर्लिनहून टोकिओला गेले. तेथून १९४३ च्या जुलायच्या आरंभीं सिंगापुरांत दाखल झाले. स्वतंत्र हिंदी सरकारची स्थापना ‘ झाशी-राणी ’ नावाच्या स्त्रियांच्या आणि चाळीस हजारांच्या आझाद हिंद फौजेची उभारणी इत्यादि गोष्टींची प्रचंड तयारी अवघ्या पांच सहा महिन्यांत त्यांनीं केली. आझाद हिंद फौज ब्रह्मदेशांतून हिंदी सरहद्दीवर धडक मारण्यासाठीं चालू झाली. आणि मग युद्धाच्या आघाडीपासून शक्य तितक्या जवळ असण्याच्या हेतूनं नेताजी आपली राजधानी व युद्धकचेरी घेऊन ब्रह्मदेशातच येऊन बसले !

१९४४ च्या जानेवारी महिन्यापासून पुढे १९४५ च्या ऑगस्ट महिन्यांत झालेल्या अपघाती मृत्यूपर्यंतचा दीड वर्षांचा काळ नेताजींनी मुख्यतः ब्रह्मदेशातच घालविला. या काळांत नेताजींची कीर्ति आणि यश शिगेला पोचलं, आणि याच काळाच्या उत्तरार्धात प्रतिकूल दैवाचे क्रूर तडाखे त्यांना खावे लागून अखेरीस तर त्यांचा शोचनीय अंत झाला ! माझ्या संकल्पित कादंबऱ्यांसाठीं आशा–निराशा व हर्षखेद यांनी भरलेल्या या नाट्यपूर्ण कालखंडाची शक्य तेवढी माहिती मला मिळवायची होती. नेताजींच्या ब्रह्मदेशांतील वास्तव्यात जे जे घडलं त्याचं समग्र चित्र तयार करतां आलं तर करायचं होतं. माझ्या सुदैवानं अशा एका गृहस्थांच्या घरीं माझ्या पाहुणचाराची व्यवस्था झाली की जे नेताजींच्या ब्रह्मदेशांतील कार्यांत अग्रभागी होते, ज्यांच्या प्रत्यक्ष नजरेसमोरच आझाद हिंद फौजेची विजयी आगेकूच आणि नंतरची माघार

घडली होती. या गृहस्थाचं नांव श्री. दीनानाथ. हे मूळचे पंजाबकडले. पण गेलीं तीसपस्तीस वर्षं ब्रह्मदेशांत राहिले आहेत. आणि ब्रह्मी स्त्रीशी लग्न करून ब्रह्मी नागरिकच बनले आहेत. रंगून येथील श्वे डगॉन पॅगोडा पाहण्याची जशी मला उत्कंठा होती. तशीच नेताजी ज्या ठिकाणीं राहिले ज्या ठिकाणीं बोलले, ज्या ठिकाणीं त्यांनीं सहकाऱ्यांशी महत्वाच्या मसलती केल्या, त्या त्या ठिकाणांची यात्रा करण्याची मला उत्कंठा होती माझ्या उत्कंठेतला वैयक्तिक हेतूचा भाग वजा केला तरी मला असं वाटतं कीं या ठिकाणांना ऐतिहासिक महत्व आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासांतलीं चार सोनेरी अक्षरें त्या जागीं लिहिलीं गेलीं आहेत. भारतीयांपैकी ज्यांना शक्य होईल त्यांनीं या स्थळाचं दर्शन घ्यावं. ज्यांना शक्य नसेल त्यांनी निदान त्यांचं वर्णन तरी ऐकावं.'

१९४४ च्या प्रारंभीं नेताजींनी आपल्या आझाद हिंद सरकारची राजधानी ब्रह्मदेशांत आणली. यासाठीं ते रंगूनला आले ते आपल्या चळवळींचे सारे अठरा कारखाने घेऊनच.

आझाद हिंद फौज हिंदुस्थानच्या सरहद्दीच्या रोखानं ब्रह्मदेशांतून चालू लागली होती. साऱ्या लष्करी हालचालींची सूत्रं हालविण्यांत येत होतीं रंगूनहून. यामुळें लष्करी कारभाराची सगळीं अंगं उपांगं रंगूनमधेंच होतीं. नेताजींचं वास्तव्य तर या शहरांत होतंच. परंतु शहराच्या चौदा मैलांच्या परिसरांत आझाद हिंद फौजेचं मुख्य ठाणं जमाल अॅव्हेन्यू नावाच्या रस्त्यावर एका सुंदर बंगल्यांत होतं, जवळच्याच बंगल्यांत आझाद हिंद बँक होती, टामवे रोडवर स्वातंत्र्य संघाची कचेरी होती. 'झाशी-राणी' पथकाचा तळ थिंगा ग्यून विभागांत होता, फौजेची मुख्य छावणी आहलोन विभागांत 'कुशिंग' हायस्कूलच्या मोठ्या इमारतींत होती, बॅक्टॉ येथें आझाद हिंद दलाचं शिक्षणकेंद्र होतं, ताडगोले येथे लष्करी रुग्णालय होतं, आणि युनिव्हर्सिटी अॅव्हेन्यूवर आझाद हिंद रेडिओचं स्टेशन होत. १९४४-४५ सालांत नेताजींच्या आझाद हिंद चळवळींतल्या ज्याअद्भुत घटना झाल्या त्या काळाच्या उदरांत गडप झाल्या आहेत. परंतु त्यांच्या खुणा रंगून शहराच्या आसमंतांत पसरलेल्या आहेत.

रंगून शहराच्या ऐन मध्यभागीं ज्युबिली हॉल आणि टाऊन हॉल नांवाच्या ज्या इमारती आहेत तिथल्या सभागृहांत नेताजींची जाहीर व्याख्यानं बहुधा

होत असत. फार मोठाल्या सभा ‘ झाशी-राणी ’ पथकाच्या थिंगा ग्यून येथील छावणीनजिकच्या विस्तीर्ण मैदानांत होत असत. ज्युबिली हॉल पेक्षां टाऊन हॉलची इमारत अधिक भव्य आहे, आणि आतलं दुसऱ्या मजल्यावरचं सभागृह एखाद्या दरबार हॉलसारखं बादशाही थाटाचं आहे. या ठिकाणीं नेताजींच्या व्याख्यानासाठीं बेसुमार गर्दी होत असे. नेताजींच्या गळ्यांत जे हार पडत त्यांचा लिलाव होत असे. एकेक हार चारचार पांचपांच लाखांना विकत घेण्यासाठीं धनिक लोकांत अहमहमिका लागत असे, हें सांगितलं तर आज कुणाला खरं तरी वाटेल काय? खरोखरच लोकांची नेताजींवरची भक्ति, नेताजींचें संघटनाचातुर्य, आणि त्यांनीं अंगिकारिलेलं एकेक साहस यांच्या हकीगती म्हणजे विलक्षण अद्‌भुताचा इतिहास आहे. त्यांच्या एका शब्दाबरोबर हजारो सैनिक निर्माण होत होते. एका सवालाबरोबर लक्ष लक्ष रुपये त्यांच्या पायाशीं पडत होते. आझाद हिंद बँक स्थापण्याची कल्पना निघण्यापासून अवघ्या चार दिवसांत कोट्यावधि रुपयांच्या भांडवलांनीं बँक स्थापिली जाऊन प्रत्यक्ष काय कार्य करूं लागली, हा केवढा चमत्कार! असे चमत्कार प्रत्यहि घडत होते. १९४५ च्या जानुआरी महिन्यांत नेताजीच्या वाढदिवसानिमित्त त्यांची सुवर्णतुला करण्यांत आली, तिची तयारी एका बैठकीत झाली होती. ही सुवर्णतुला ज्युबिली हॉलमध्यें झाली म्हणून हे सभागृह कितीहि पाहिलं तरी मला पुरेसं वाटलं नाहीं. मनांत सारखं येत होतं, त्या सुवर्णतुलेच्या समारंभाच्या सर्व आठवणी या भिंतींना खचित अजूनहि होत असतील! याच व्यासपीठावर सिंहासनासारख्या खुर्चीवर नेताजी बसले असतील! लोकांची अपूर्व भक्ति पाहून याच ठिकाणीं त्यांना गहिंवर आला असेल!

या ज्युबिली हॉलमध्यें आज म्यूझियम आहे, आणि सरकारी आर्ट स्कूलहि आहे. म्यूझियममध्यें एका कपाटांत जुन्या काळांतील ब्रह्मी योद्ध्यांची त्यावेळच्या शस्त्रास्त्रांनीं सज्ज अशी मूर्ति ठेवलेली आहे. एके ठिकाणीं मंडालेला राणीचा रत्नजडीत जुना पलंग मांडलेला आहे. सध्याचे बर्मी पंतप्रधान ऊ नू हे नुकतेच परदेशांच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांना मिळालेले नजराणे एका कपाटांत ठेवलेले आहेत. परंतु मला सर्वांत महत्वाचं आणि पाहण्यासारखं कपाट वाटलं तें ज्यांत आँग सान यांचा लष्करी पोशाख, बूट आणि हातांतली छोटी काठी

मांडून ठेवली आहेत ते ! ऑंग सान यांच्या रॉयल लेकच्या काठावरील पुतळ्याकडे ज्याप्रमाणें मी पहात उभा राहिलों होतो त्याप्रमाणेंच त्या वीर पुरुषाच्या या स्मृतीचिन्हांकडे खूप वेळ बघत राहावसं मला वाटलं !

रंगून येथील मुक्कामांत नेताजी ज्या बंगल्यांत राहात असत तो युनिव्हर्सिटीच्या परिसरानाजिक आहे. त्याच्या एका बाजूस ' इन्या लेक ' नांवाचं मोठं सुंदर सरोवर आहे. बंगल्याच्या मोठ्या गच्चीवरून सरोवराचा देखावा दिसतो. रात्रीच्या जेवणानंतर नेताजी सहकाऱ्यांशीं व मित्रमंडळीशीं गप्पागोष्टी करीत या गच्चीवर बसत असत. बंगला प्रशस्त आणि टुमदार आहे. ब्रिटिश राजवटीत इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्सच्या हुद्यावर असलेले तारापोर नांवाचे पारशी गृहस्थ होते, त्यांचा हा बंगला. १९२८ सालीं ब्रिटिश सरकारनं नेताजींना पकडून ब्रह्मदेशांत रवाना केलं त्यावेळेस ते तारापोर साहेबांच्या ताब्यांतले कैदी होते. आणि अवघ्या पंधराच वर्षांनी हे तारापोरसाहेब हिंदुस्थानांत पळून गेले होते आणि त्यांच्या मालकीच्या बंगल्यांत नेताजी स्वतंत्र हिंदुस्थान सरकारचे पंतप्रधान म्हणून मोठ्या इतमामानं राहात होते ! काळ कुणाची कशी चेष्टा करतो पहा !

आझाद हिंद सरकारचं रेडिओ स्टेशन ज्या इमारतीत होतं ती इमारत म्हणजे एक अत्यंत भव्य आणि सुंदर असा प्रासादच होता. कांहींशा उंचवट्यावरच्या या प्रासादापुढें खूप मोठं आवार आहे. सारी बांधणी उंची संगमरवराची आहे. प्रवेशद्वारानं आंत गेल्याबरोबर जो सुंदर बांधणीचा हॉल लागतो. त्यातले वीसबावीस फूट उंचीचे वाटोळे संगमरवरी खांब इतके मोठे आहेत, की एकेका खांबाला मिठी घालायला दोन माणसं कांहीं पुरायची नाहीत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठी रुंद प्रशस्त संगमरवरी पायऱ्या आहेत. वरचा मजला तर अत्यंत शोभिवंत आणि दिमाखदार आहे. ' आझाद हिंद रेडिओ बोलत आहे ' असा जगातील लक्षावधि श्रोत्यांना रोमांचित करणारा आवाज १९४४–४५ साली दिवसातून तीन वेळा निघत असे तो या इमारतीतून ! ' कानबॉझा पॅलेस ' हे त्यावेळचं तिचं नाव अद्यापीहि कायम आहे. मात्र या इमारतींत आता काय आहे ? तर एक ऐषआरामी हॉटेल ! काळाच्या चेष्टेचा हा आणखी एक निराळा नमुना !

या कानबॉझा पॅलेसची कहाणी ऐकण्याजोगी आहे. चिनसॉंग नांवाच्या एका चिनी व्यापाऱ्यानं हा प्रासाद बांधला. हा व्यापारी आपला देश सोडून ब्रह्मदेशांत नशीब काढण्यासाठीं आला तो एक सामान्य गरीब फेरीवाला म्हणून. पण रंगूनचा पायगुण त्याला भलताच अनुकूल ठरला. नशीबानं त्याला असा काही हात दिला की तो कोट्याधिश बनला. रंगूनची भूमीच नशीबाच्या बाबतीत विलक्षण सुपीक आहे कीं काय कोण जाणे? कारण हबीब नांवाच्या दुसऱ्या एका क्रोडोपतीची हकीगत समजली ती अशीच. खिशांत पुरती दहाहि चांदीची नाणी नाहींत अशा अवस्थेत हा मुसलमान माणूस रंगूनला आला, व अत्तरं विकू लागला. नशिबानं त्याला उचलून धरलं. तो क्रोडोपती झाला. नेताजी रंगूनमध्यें दाखल झाले. आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठीं धनिकांजवळ पैसे मागूं लागले. "सब करो निचावर, बनो सब फकीर!" (सर्वस्वाचं दान करा, सर्वजण फकीर व्हा!) असा संदेश प्रत्येक व्याख्यानात देऊ लागले. त्यांच्या व्याख्यानाचा परिणाम हबीबवर इतका झाला कीं त्यानं आपली कोट्यावधी रुपयांची सारी दौलत नेताजींच्या स्वाधीन केली. या अभूतपूर्व दातृत्वाचा उल्लेख नेताजी पुढें मोठ्या विनोदपूर्ण रीतीनं करूं लागलं. कुणाहि मोठ्या धनिकाजवळ फंड मागताना ते म्हणत, तुम्ही थोडं 'हबीब मिक्चर' द्या ना." कानबॉझा पॅलेस बांधणारा चिन सॉंग नेताजींच्या रंगूनमधील वास्तव्यात रंगूनमध्यें नव्हताच म्हणून, नाहीं तर त्याचीदेखील सारी दौलत नेताजींच्या पायाशी आली असती!

कानबॉझा पॅलेस बांधण्यासाठीं चिंगसॉननं चिनी कामगार आणि कलावंत आणले होते. बांधकामासाठीं लागणारा संगमरवरी दगडहि चीनमधून आणला होता. पैसा म्हणजे त्याच्या हिशोबी पाण्यासारखा होता. त्याला एकदां समुद्रपर्यटन करण्याची लहर आली तेव्हा त्यानं विचार केला. भाड्याच्या आगबोटींत जायचं? हॅः! त्यानं एक आगबोट खरेदीच केली, आणि शेपन्नास दोस्तांना घेऊन तो जगप्रवास करून आला. परंतु काळाच्या चेष्टा नेहमी चालूंच असतात हेंच खरं! कांहीं दिवसांनीं चिन सॉंगच्या वाट्याला दिवाळखोरी आली. त्यानं इतर मालमत्तेप्रमाणेंच कानबॉझा पॅलेसहि बॅंकेकडे गहाण टाकला. बॅंकेकडून एका मारवाड्यानं कित्येक लक्ष किंमतीचा तो प्रासाद अवघ्या, ऐंशीं हाजारांस खरेदी केला. १९४२ मध्यें ब्रह्मदेशावर जपान्यांचा हल्ला झाला

तेव्हां कानबॉझ पॅलेसचा मूळचा चिनी मालक केव्हांच परागंदा झाला होता, आणि नवा मारवाडी मालकहि सारी चीजवस्त टाकून हिंदुस्थानांत पळून गेला. कानबॉझा पॅलेस जपान्यांच्या ताब्यांत आला. नेताजी आपलं आझाद हिंद सरकार घेऊन रंगूनला दाखल झाले तेव्हां त्यांच्या अठरा कारखान्यांसाठीं जपान्यांनीं ठिकठिकाणच्या मोकळ्या जागा आणि छोट्या मोठ्या इमारती दिल्या. तारापोरचा बंगला नेताजींच्या खासगी वास्तव्यासाठीं जसा त्यांनीं दिला त्याचप्रमाणें कानबॉझा पॅलेस आझाद हिंद रेडिओसाठीं त्यांच्याकडून मिळाला. आझाद हिंद रेडिओवर काम करणारे सुबोध चतर्जी नांवाचे गृहस्थ आजहि रंगूनमध्यें आहेत. कानबॉझा पॅलेस दाखविण्यासाठीं तेच माझ्याबरोबर होते. नेताजींच्या भाषणाचं रेकॉर्डिंग ज्या खोलींत करण्यांत येत असे ती खोली, जिथून कार्यक्रम ध्वनिक्षेपित होत असत त्या स्टूडिओची जागा, जिथें कलावंत बसत असत ती जागा, सारं त्यांनीं मला दाखविलं. तें पाहून मी त्यांना म्हणालो, “ इतकी बादशाही थाटाची भव्य आणि शोभिवंत इमारत जगांतल्या दुसऱ्या कुठल्याहि रेडिओकेंद्राच्या वाट्याला खचित आली नसेल ! ” ते हसले परंतु नेताजींच्या चळवळीला एकदां एवढ्या ऐश्वर्याचे दिवस आले होते, आणि पुढें अचानकपणें सारीच वाताहात कशी झाली याचाहि विचार मनांत आल्याप्रमाणें त्यांच्या नजरेंत दुःखाची सावली आल्याचा भास मला झाला !

निरनिराळ्या देशांतून येऊन रंगूनमधे स्थायिक झालेल्या लोकांच्या वेगवेगळ्या वसाहती निर्माण झालेल्या आहेत.

श्रीमंत लोकांची निवासस्थानं हवेशीर उपनगरांत आहेत, आणि सामान्य लोकांच्याहि भिन्नभिन्न धर्माप्रमाणें वेगवेगळ्या जागीं ‘ बस्ती ’ आहेत. चिनी लोक ज्या भागांत राहतात त्याला ‘ चायना टाऊन ’ म्हणतात. अस्सल बर्मी लोकांची वस्ती आहलोन, लानमॉडॉ टामवे इत्यादि भागात आहे. बहुसंख्य हिंदी लोक सूले पॅगोडाच्या अवतीभोंवती राहतात. दक्षिण हिंदुस्थानांतील तामिळी लोक फार पूर्वीपासून रंगूनमधें आलेले आहेत, त्यांची ‘ बस्ती ’ ‘ कमायुत ’ नांवाच्या भागात आहे. या वस्तींतल्या तामीळ हायस्कूलच्या मैदानांत ता. २३ एप्रिल १९४५ रोजीं नेताजींचं जें जाहीर व्याख्यान झालं तें रंगूनमधलं त्यांचं अखेरचं व्याख्यान होतं. त्या मैदानाची जागा पाहण्यासाठीं मी गेलो तो या कारणासाठीं.

१९४४ च्या उन्हाळ्यांत असा एक दिवस आला होता कीं, हिंदुस्थानच्या हद्दीतील मणीपूर संस्थानची राजधानी जी इंफाळ तिला आझाद हिंद फौजांनीं दिलेला वेढा यशस्वी होणारासं वाटलं होतं. वेढ्यांत अडकलेली इंग्रजी फौज शरण येण्याच्या घाईला आली होती. इंफाळ पडलं असतं, कीं आझाद हिंद फौजांनीं बंगाल आणि आसाम प्रांतात विजयानं प्रवेश केला असता. मग नेताजींच्या हिशोबाप्रमाणें सबंध हिंदुस्थानांत बंड उठलं असतं, आणि ब्रिटिश राजकर्त्यांची हकालपट्टी झाली असतीं. " चलो दिल्ली " हा मंत्र प्रत्यक्षांत आलेला दिसला असता ! वेढा देऊन बसलेल्या आझाद हिंद फौजांना इंफाळ पडणार याबद्दलची इतकी खात्री वाटू लागली होती कीं, बँकॉक, सायगांव, रंगून, सिंगापूर इत्यादि ठिकाणच्या आझाद हिंद रेडिओला आघाडीवरून एका दिवसात तीन वेळा संदेश आले ' कोणत्याहि क्षणीं इंफाळ आमच्या हातीं पडेल. विजयोत्सवाची तयारी ठेवावी ! '

परंतु इंफाळ पडण्याऐवजी युद्धाचा डावच उलटला. इंफाळमध्यें विजयी प्रवेश करण्याऐवजी आझाद हिंद फौजांना वेढा उठवून माघार घ्यावी लागली. ही दुष्ट दुर्दैवी घटना ज्या कारणांनी घडली ती कारणं कादंबरींतच सांगण्यासारखी आहेत. येथें एवढंच सांगतो कीं, यापुढें युद्धाचं पारडं साफ फिरलं. आझाद सैन्याची माघारच चालू राहिली. वेस्ट कमायुत हायस्कूलच्या मैदानांत नेताजींचं अखेरचं व्याख्यान झालं त्यावेळेस परिस्थिती ही अशी होती. दुर्दैव पाठी लागलं होतं. जिकडे तिकडे निराशा दिसत होती. परंतु या व्याख्यानांत नेताजींनी काय सांगितलं माहीत आहे? ते म्हणाले " युद्धाच्या एका फेरीत आपण हार खाल्लीं आहे. पण याचा अर्थ काय आपण विजय गमावला असा थोडाच आहे? असा अर्थ कुणी करूं नये. दिल टाकूं नये. आपल्या फौजांची माघार तात्पुरती आहे. पावसाळा संपला कीं, आपल्या फौजा पुन्हां हिंदुस्थानच्या रोखानं चालूं लागतील हें निश्चित समजा. जपानचा पराभव झाला तरी आपली झुंझ थोडीच संपणार आहे? ती चालूच राहील ! तुम्हीं आजपर्यंत पुष्कळ स्वार्थत्याग केलात. परंतु त्याहूनहि मोठा स्वार्थत्याग आतां तुम्हांला केला पाहिजे. तुमच्या त्यागाचं बळ माझ्या पाठीशीं असल्यावर भारताच्या स्वातंत्र्याचं आपलं स्वप्न सिद्धीस गेल्यावाचून राहणार नाहीं. हें मी सांगत नाहीं परमेश्वर सांगत आहे असं समजा ! "

वेस्ट कमायुत हायस्कूलच्या कांपाऊंडमध्यें आज घटकेला एक चौथरा आहे. त्यावर संगमरवरी दगडाचा चबुतरा आहे. त्या चबुतऱ्यावर पुढील मजकूर कोरलेला आहे. " कमायुतमधील हिंदी लोकांनीं नेताजींचं हें छोटसं स्मारक ता. २३–४–४५ रोजीं झालेल्या त्यांच्या व्याख्यानाची स्मृति म्हणून उभारलेलं आहे. "

ज्या नेताजींच्या स्वातंत्र्य चळवळीचा दीड वर्षांचा नाट्यपूर्ण इतिहास ब्रह्मदेशांत घडला त्याचं सबंध ब्रह्मदेशांत असलेलं येवढंच स्मारक आज घटकेला आढळतं ! बाकी कोणतीहि गोष्ट जागेवर उरलेली नाहीं. सारी वाताहात झाली आहे. नेताजींनीं स्थापन केलेल्या बँकेतली बहुतेक स्टर्लिंग दौलत ब्रिटिशांनी रंगूनला परत आल्यावर जप्त केली. त्या वेळच्या जपानी नोटांच्या रूपातली तीस लाखांची शिल्लक आजहि बँकेजवळ आहे. परंतु त्या नोटांना आज काय किंमत आहे ? बार्दानात भरून ठेवलेल्या आहेत त्या नोटा !

वेस्ट कमायुत हायस्कूलच्या मैदानातला तो चौथरा बघतांना माझं मन अतिशय विषण्ण झालं ! केवढी प्रचंड चळवळ नेताजींनी केली आणि या एका लहानशा दगडावरील मजकुरापलिकडे त्या चळवळीचं व नेताजींचं दुसरं कोणतंहि स्मारक ब्रह्मदेशांत आढळूं नये, या विचारानें मला अत्यंत खेद झाला! मनांतला विचार माझ्याबरोबर असलेल्या मंडळीजवळ मी बोलून दाखविला. तो ऐकून त्यांचेहि चेहरे कष्टी व उदास झाले. मात्र लगेच मी त्यांच्याजवळ असाही उद्‌गार काढला कीं, ' बाकी मोठमोठी साम्राज्याच्या साम्राज्यं काळाच्या उदरांत गडप झाली. मग नेताजींची चळवळ तर काय अवघ्या चार वर्षांची होती. ब्रह्मदेशांत तिची एवढीच स्मृति शिल्लक राहावी याचं दुःख आपण कशाला करा ! "

* * *

# कथाकलीच्या माहेरघरीं

कथाकली, भरतनाट्यम्, कथ्थक, मणिपुरी—भारतीय नृत्याचे हे सर्व प्रकार मुंबई शहरांत बसल्या बसल्या पहावयास मिळतात. रसिक आणि धनिक यांचं मुंबई शहर म्हणजे एक मोठं आगर, सर्व प्रकारच्या कलावंताचं आश्रय-स्थान. दूरदूरचे कलावंत या शहरीं येतात आणि आपली कला सादर करतात. कथाकली नृत्याचे प्रयोग मला मुंबईस पहावयास मिळाले होते; परंतु ते पाहून माझं पूर्ण समाधान झालं नव्हतं. वाटत होतं, ज्या ठिकाणीं कथाकलीचा प्रथम उदय झाला, आणि जिथं अजूनहि या नृत्याचं परंपरागत पुराणस्वरूप जतन करून ठेवलेलं आहे, त्या कथाकलीच्या माहेरघरीं जाऊन तें नृत्य पहावं.

भारतीय नृत्याच्या सर्व तऱ्हा|मुंबईत पहावयास मिळतात. त्या तेथें पहावयास मिळतात हें जसं खरं, तसंच धंद्याची सोय, प्रेक्षकांची अभिरुचि इत्यादि गोष्टी विचारांत घेण्याची कलावंतांना आवश्यकता वाटते आणि त्यामुळें कोणताहि नृत्यप्रकार सादर करतांना त्याला ते थोडं तरी आधुनिक स्वरूप देतात. या युक्तीमुळें प्रेक्षकांना नृत्य अधिक आकर्षक वाटत असेल, समजायला कमी कठीण वाटत असेल. परंतु त्या त्या नृत्यप्रकाराचं परंपरागत शुद्ध स्वरूप त्यांना अपरिचितच राहतं. कथाकलीच्या मूळ शुद्ध स्वरूपाचं दर्शन मला हवं होतं. तें मुंबई शहरांत घेतां येईल अशी अपेक्षा करतां येत नव्हती. म्हणून त्यासाठीं कथाकलीच्या माहेरघरीं जाण्याचा मी बेत केला.

केरळच्या अंतःपुरांत शिरायचे म्हणजे मद्रास-कोचीन एक्सप्रेसनं कोचीन बंदरापर्यंत जावं लागतं. कोचीनपासून पुढं दोन मार्ग आहेत. तिरुवल्ला नांवाच्या छोट्याशा शहरापर्यंत उत्कृष्ट डांबरी सडक आहे. ऐपत असेल तर टॅक्सीनं, नसेल तर स्टेट-ट्रान्सपोर्टच्या बसूनं तिरुवल्लापर्यंत खुष्कीचा प्रवास करावा, आणि पुढं जलमार्गानं जावं; किंवा कोचीनपासून ॲलेप्पे बंदरापर्यंत व तेथून पुढंहि सबंध प्रवास बोटीनं करावा. मीं परतीचा प्रवास पहिल्या मार्गानं केला; गेलों दुसऱ्या मार्गानं. हा दुसरा मार्ग मला अधिक रमणीय वाटला.

मीं जायचं ठरविलं होतं ॲलेप्पेच्या आग्नेयेस असलेल्या 'तलवडी' नांवाच्या गांवीं.—दोन कारणांसाठी: एक हें कीं, केरळच्या अंतरंगांतल्या

लहान गांवीं राहण्याची माझी इच्छा होती. कोणत्याहि मुलुखांतली खरी सृष्टि-शोभा बघायची असली तर त्या मुलुखांतलीं मोठी शहरं पाहण्यापेक्षां लहान खेडीं बघावींत, असं अनुभवावरून मीं ठरविलेलं आहे. आणि दुसरं कारण असं कीं, कथाकली नृत्याच्या दृष्टीनं तलवडी हें एक सुप्रसिद्ध केंद्र आहे. सुप्रसिद्ध नर्तक उदयशंकर यांनीं अमेरिकेंत दौरा काढून दिग्विजय केला, व तो केल्या-नंतर त्यांना वाटूं लागलं कीं, नृत्याचं शास्त्रोक्त शिक्षण आपण आधीं घ्यायला हवं. ज्ञानाच्या ज्या भांडवलावर आपण अमेरिकन जनतेला झुलवूं शकलों तें फार तोकडं आहे, आतां तें वाढवावं. ही त्यांची इच्छा समजल्यावर त्रावणको-रच्या महाराजांनीं आपल्या दरबारातील एक नृत्यकार उदयशंकरना शिकवि-ण्यासाठीं दिले, त्याचं नांव शंकरन् नंबुद्री. ते तलवडीस होते. ‘ फर्नान हॉल ’ नांवाच्या लेखकाचा ‘ ॲन् ॲनटमी ऑफ बॅले ’ या नांवाचा जो सुंदर ग्रंथ आहे, त्यांत जगद्विख्यात अशा हिंदी नृत्यकरांच्या कलेची तुलनात्मक चर्चा केलेली आहे. या नृत्यकारांत कृष्णन कुटी यांचा मोठा गौरवपूर्ण अंतर्भाव केलेला आहे. या कृष्णन् कुटींचं श्वशुरगृह तलवाडीला असून ते कधीं कधीं इथं येऊन दीर्घकाल राहतात. कृष्णन् कुटी यांचा मुक्काम सध्यां तलवडीला होता. त्यांच्या घरींच मी उतरणार होतों.

दक्षिण–भारताच्या विशिष्ट सृष्टिशोभेचं दर्शन केरळांत प्रवेश करण्यापूर्वीं फार आधींपासून व्हायला लागतें. मद्रास–कोच्चिन एक्सप्रेसमध्यें अर्कोणम् जंक्शनवर रात्रीं साडेसात वाजतां शिरलों आणि जेवण वगैरे आटोपून खुशाल ताणून दिली. सकाळीं सहा वाजतां खिडकी उघडून पाहिलं, तों बाहेरच्या सृष्टीचं स्वरूप एकदम बदललेलं ! आणि जितकं निराळं तितकंच सुंदर ! सारा भूप्रदेश भातशेतांच्या लहान लहान तुकड्यांनीं व्यापलेला. भाताचीं सारीं खाचरं पाण्यानं तुडुंब भरलेलीं. जिकडेतिकडे नारळीच्या झाडांच्या रांगा. दूर अंतरावर झाडीनं आच्छादिलेले डोंगर आणि सबंध देखाव्यावर एक प्रकारच्या गडद निळ्या रंगाचा हात फांसल्यासारखा. भातशेतांत काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांचा वर्ण गडद काळा; परंतु त्यांच्या कमरेच्या लुंग्या आणि अंगांतलं कुडतं पांढरं स्वच्छ. साऱ्यांचे बांधे पुष्ट आणि रेखीव. स्त्रियांचा केशभार स्वच्छ, काळाभोर आणि विपुल. गुडघाभर पाण्यांत उभ्या राहिलेल्या ओणव्या स्त्री–पुरुषांच्या या रांगा किती शोभत होत्या ! माझी गाडी वेगानं पुढं जात होती. नजरेपुढून

कधीं भातशेतांचे विस्तार सरकत होते तर मधेंच शेतजमीन नाहीशी होऊन नारळीची दाट बनं अगदी जवळुन दिसत होती. छोटीं छोटीं गांवं कधीं दुरून तर कधीं अगदीं जवळून दृष्टीस पडत होतीं. नारळीच्या झांवळ्यांनीं झांकलेलीं घरं, छोटे छोटे, परंतु अत्यंत स्वच्छ रस्ते, एखादं देऊळ किंवा एखादं चर्च पाणवठ्याकडे निघालेलीं माणसं आणि गुरं, क्वचित् एखाद्या ठिकाणीं जलप्रवाहांतून चाललेली होडी, मासे धरण्यासाठीं उभी राहिलेली धीवरकन्या—हा सारा देखावा फार मोहक होता. कोइमतुर जंक्शनच्या आधींपासूनच दक्षिणात्य शोभेचा हा नमुना दृष्टीस पडूं लागला, आणि नंतर कोचीन शहराचं एक स्टेशन एर्नाक्युलम् येथें उतरेपर्यंत सतत सहा तास हीच सृष्टिशोभा मला डोळे भरून पहावयास मिळाली.

मद्रास–कोचीन एक्सप्रेसचं अखेरच्या मुक्कामाचं स्टेशन कोचीन बंदर. परंतु मुंबईला येणारा प्रवासी बहुधा व्हिक्टोरिया टर्मिनसपर्यंत न जातां अलिकडे दादरच्या किंवा भायखळ्याच्या स्टेशनावर उतरतो, त्याप्रमाणें मद्रास–कोचिन एक्सप्रेसमधील उतारू कोचीन हार्बरपर्यंत क्वचित् जातात. बहुतेक गाडी रिकामी होते ' एर्नाक्युलम् नॉर्थ ' किंवा त्याच्यापुढच्या ' एर्नाक्युलम् साउथ ' या स्टेशनवर. कोचीन बंदर हें भारतीय नौदलाचं फार महत्वाचं ठाणं आहे. इथं आरमाराची कचेरी तर आहेच परंतु शिवाय आरमारी शिक्षणाचं मोठं विद्यालयहि आहे. पायदळांतील सेनापतीला ' कमांडर ' म्हणतात. आरमारी परिभाषेंत या किताबाचं ' कमोडोर ' असं रूप झालेलं आहे. पुण्याहून प्रवासाला निघण्यापूर्वी दोनच दिवस मला अशी माहिती मिळाली होती कीं, बी.एस. सोमण या नांवाचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ कोचीनला ' कमोडोर ' च्या हुद्यावर आहेत. कमोडोर सोमण यांच्या बंधूंची आणि माझी कांहीं निमित्तानं गांठ पडली तेव्हां त्यांनींच ही माहिती मला दिली व त्यांनीं आपल्या बंधूंना पत्रहि लिहून टाकलं की, फडके केरळच्या प्रवासासाठीं निघत आहेत, अमुक अमुक दिवशीं कोचीनला येतील. कमोडोर सोमण यांना पुण्याहून निघण्यापूर्वी मीहि एक पत्र टाकलं कीं, " अमक्या दिवशीं, अमक्या गाडीनं कोचीनला येत आहे. आरमारांतल्या इतक्या मोठ्या हुद्यावर असलेल्या आपल्यासारख्या कर्तृत्ववान् महाराष्ट्रीयाची माझ्या कोचीनच्या मुक्कामांत भेट घेणं मी माझं कर्तव्य समजतो. कोचीनला मी फार थांबणार नाहीं, परंतु आपला परिचय

करून घेतल्याखेरीज राहणार नाहीं.'' केरळच्या या प्रवासांत 'अंजलि प्रकाशन' मधील माझे सहकारी श्री. कोल्हटकर ( ज्यांना मी ' शिवराम ' अशा एकेरी नांवानं हांक मारतो व ज्यांचा आतां यापुढं त्याच नांवानं उल्लेख मी करणार आहे ) माझ्याबरोबर होते. आर्कोणम् पासून आमच्या डब्यांत आणखी दोघे सहप्रवासी होते. त्यांनींच आम्हाला सल्ला दिला कीं, हार्बरपर्यंत जाऊं नका. ' एर्नाक्युलम् साउथ 'ला उतरा. यांनीं अशीहि माहिती दिली कीं, एर्नाक्युलम् साउथ म्हणजे कोचीनचं एक चांगल्यापैकीं उपनगर असून तिथं चांगल्यापैकीं हॉटेलंहि आहेत. दुपारचे जवळजवळ बारा वाजायला आले होते तेव्हां आम्हीं साहजिक बेत केला कीं, एर्नाक्युलम्ला चांगल्यापैकीं हॉटेल हुडकून काढून स्नान--जेवण आटोपून विश्रांति घ्यावी आणि मग सावकाशपणें कमोडोर सोमण यांच्याकडे जाण्याचा विचार करावा. सामानाची बांधाबांध केली आणि स्टेश-नावर उतरायच्या तयारींत राहिलों. गाडी स्टेशनांत थाबली तोंच आरमारी पोषाखांतले एक गृहस्थ डब्यापुढं उभे ! नमस्कार करून ते म्हणाले, " मी सोमण ! " उतरलों, नमस्कार करून हस्तांदोलनहि केलं. ते म्हणाले, "माझ्या बंगल्यावर तुम्हांला न्यायासाठीं आलों आहे. " मी ' नको नको ' म्हटलं, परंतु त्यांनीं आग्रह केला.

त्यांच्या गाडींत बसून आम्ही निघालो आणि ऐंशीं फूट रुंदीच्या एका प्रशस्त सुंदर रस्त्यानं जाऊं लागलों. पं. नेहरू इकडे आले होते तेव्हा हा रस्ता मुद्दाम तयार केल्याच्या हकीकती कमोडोर सोमण सांगू लागले. मध्यम उंचीचे मोठाल्या डोळ्यांचे, अस्सल कोकणस्थ वर्णाचे गोरेपान असे हे गृहस्थ नुसतेच देखणे आणि रुबाबदार नाहींत तर त्यांना मनमोकळेपणानं बोलण्याची हौसहि आहे. हें कळल्यामुळं आमच्या गप्पा गाडीप्रमाणंच वेगानं मार्गाला लागल्या.

कोचीन हार्बरवर ज्या भागांत आरमाराचं ठाणं आहे. त्या विस्तीर्ण भागाला ' वेंडुरुथी ' असं नांव आहे. आतां मला नक्की आठवत नाहीं, परंतु वेंडुरथी या शब्दाचा मूळ अर्थ ' नागझरी ' म्हणजे ' घाणेरड्या गटार-पाण्याचा प्रवाह' असल्याचं श्री. सोमण यांनीं सांगितलं. ज्या ठिकाणीं आज आरमारी तळ दिसतो, त्या जागेंत पूर्वीं समुद्राचं गटारपाणी होतं, आणि मुंबईचा समुद्र

ज्याप्रमाणं हटवून मरीन डाइव्हचा भाग बांधण्यांत आला, त्याचप्रमाणें वेंडुरुथीची वसाहत निर्माण झाली. एर्नाक्युलम् साऊथ स्टेशनापासून सुरू झालेला मोठा रस्ता, कोचीन शहराच्या जरा अलिकडे असलेल्या पुलापाशीं आला कीं, उजव्या अंगाला वेंडुरुथीला जाणारा रस्ता फुटतो. सामान्य इतरेजनांना हा रस्ता बंद आहे. परंतु सोमणांची गाडी दुरून पाहिल्याबरोबरच पाहरेकऱ्यांनीं फाटक खुलं करून वाट दिली, आणि आमची गाडी आरमारी तळांतल्या मुख्य रस्त्यानं जाऊं लागली. दोन चार वळणं घेऊन ती अखेर सोमणांच्या बंगल्यापुढं उभी राहिली.

कमोडोरसाहेबांचे आम्ही पाहुणे होतो, त्यामुळं आरमारी तळ व त्यालाच जोडून असलेला विमानतळ पाहण्याची आमची व्यवस्था उत्तम प्रकारची झाली. विमानतळ पाहतांना मला बरेच दिवस पडलेलं एक कोडं सहजासहजीं सुटलं. घरांतला रेडिओ लावला कीं पुष्कळदां हवं तें स्टेशन लागायच्याऐवजीं मोठ्या आवाजांतले इषारे–प्रतिइषारे ऐकूं येत असत, आणि ते कुठले तें कांहीं केल्या कळत नसे. आतां मात्र समजलं कीं, जाणाऱ्या–येणाऱ्या विमानांचा ठावठिकाणा विमानतळावरील कंट्रोल-रूममधून सांगण्यांत येतो, त्यांतले हे सांकेतिक इषारे असतात. त्या विस्तीर्ण विमानतळावर ठिकठिकाणीं धोक्याच्या पाट्या लावलेल्या दिसल्या, आणि शहराच्या रस्त्यांतल्या रहदारीचं नियंत्रण करणाऱ्या पोलिस-शिपायांसारख्या पोलिसांनीं ' थांबा, विमान येतय् ' असं म्हणून आम्हांला दहा ठिकाणीं अडविलं. विमानतळावर छोट्यामोठ्या विमानांची सारखी जा-ये सुरू असल्यामुळं अशा नियंत्रणाची जरूर असते. आम्हीं विमानतळ पाहिला. त्याचप्रमाणं वेंडुरुथी येथील आरमारी शिक्षणाचं मोठं विद्यालयहि पाहिलं. या विद्यालयाला ' नॅव्हीगेशन ॲण्ड डिरेक्शन स्कूल ' असं नांव आहे. कारवारकडले कुलकर्णी नांवाचे गृहस्थ या विद्यालयाचे प्रिन्सिपल त्या वेळेस होते. त्यांना बोलायची फार हौस दिसली. विद्यालयातल्या प्रत्येक शाखेंतलं काम कसं चालतं तें त्यांनीं एखाद्या शाळामास्तराप्रमाणं आम्हांला समजावून सांगितलं. आगबोटीवरच्या तोफखान्यावरचं काम कसं चालतं तें व ही विद्या नौदलातल्या विद्यार्थ्यांना कशी शिकविण्यांत येते तें प्रात्याक्षिकासह ऐकतांना फार गंमत आली. एका मोठ्या दालनाच्या दारावर ' गनरी ' अशी पाटी होती. तिथला एकंदर

शस्त्रसंभार पाहून छाती दडपून जाण्यासारखी आहे. तोफखान्याचं शिक्षण देणाऱ्या शीख प्रोफेसरांनीं संभाषणाच्या ओघांत आम्हांला सांगितलं, " 'हिट् फर्स्ट अँड हिट् हार्ड !' ('पहिल्यांदा हाणा आणि तेंहि जोरांत हाणा !') हें लढाईतलं पहिलं सूत्र आहे. आणि तें आम्ही विद्यार्थ्यांना शिकवतों." त्या ठेंगण्या, गोऱ्यापान, दाढीवाल्या शीख अधिकाऱ्याला विनोद आवडेल कीं नाहीं याचा विचार न करतां मीं म्हटलं, " अहो, पण तुम्ही जसं आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितां, त्याचप्रमाणं शत्रूदेखील आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितातच, आणि तेही आपल्या विद्यार्थ्यांना 'हिट् फर्स्ट अँड हिट् हार्ड' असंच शिकविणार, नाहीं का ?" तो शीख अधिकारी मनापासून हंसला आणि म्हणाला, " तुमची शंका बरोबर आहे. युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत कागदी तात्त्विक शिक्षण फारसं उपयोगी पडत नाहीं. कोण कसा मोका साधतो, त्यावरच लढाईचा निकाल अवलंबून असतो. परंतु असं असलं तरी कागदी तात्त्विक शिक्षण हाच साऱ्या तयारीचा पाया आहे, आणि तें द्यायलाच हवं. खरं कीं खोटं ?"

विद्यार्थ्यांचा जेवण्याचा प्रशस्त हॉल आणि त्याला जोडून असलेलं भव्य स्वयंपाकघर पाहिलं तेव्हां ऐन दुपार झाली होती, पोटांत कावळे ओरडत होते. तयार झालेल्या स्वयंपाकाचा खमंग वास सुटला होता. या ठिकाणची व्यवस्था नुसती दाखविण्यापेक्षां हे लोक दोन पानं तयार करतील आणि आम्हांला 'जेवा' म्हणतील तर फार बरं होईल, असं माझ्या अस्सल ब्राह्मणी मनांत आल्यावांचून राहिलं नाहीं. त्या दालनांतून रिकाम्या पोटानं बाहेर पडतांना आमचीं पावलं जरा जडच झालीं होती !

आरमारी विद्यालयाची वेगवेगळीं दालनं हिंडून पहातांना एका गोष्टीचा मनावर फार परिणाम झाला. ती म्हणजे प्रत्येक जागेंतली कमालीची शिस्त, टापटीप व स्वच्छता. रेंसभर केर कुठं दिसला नाहीं. प्रत्येक दालनाची फरशी आरशासारखी स्वच्छ दिसली. डोक्याला टोपी, अंगांत लांब्या बाह्यांचा शर्ट, लांडी विजार, व पायांतले मोजे आणि मऊ तळांचे बूट — असा जो आरमारांतल्या विद्यार्थ्यांचा आणि अधिकाऱ्यांचा नखशिखान्त पांढराशुभ्र पोषाख असतो, तो पायदळांतल्या शिपायांच्या खाकी गणवेशापेक्षां अधिक शोभिवंत खचित वाटतो. मनांत एवढंच येतं कीं, हे कपडे नेहमीं स्वच्छ ठेवायचे म्हणजे

केवढी यातायात ! परंतु आगबोटीवरसुद्धां इतर अठरा कारखान्यांबरोबर परटाचाहि कारखाना असतोच, म्हणा !

कोचीनचा समुद्रतीर विस्तीर्ण आहे, परंतु मला तो रमणीय वाटला नाहीं. जुनं कोचीन शहर अक्षरशः जुनं आहे. अरुंद रस्ते, गलिच्छ वस्ती, कलकलाट, सांडपाण्याचे ओघळ दुर्गंधी, यांचा संचार शहराच्या सर्व भागांत दिसला. समुद्राच्या कांठाला लागूनच तटबंदीच्या किल्ल्याप्रमाणं भासणाऱ्या मोठमोठ्या परदेशी कंपन्यांच्या धान्याच्या व इतर मालाच्या वखारी आहेत. सहाशें वर्षांचा जुना 'डच राजवाडा' आतां संपूर्णतः मोडकळीस आलेल्या स्थितींत पहावयास मिळतो. सहा शतकांपूर्वी स्पेन देशांत ज्यू लोकांचा छळ सुरू झाला, तेव्हां ते कोचीनला आले व त्यावेळच्या राजानं त्यांना आश्रय दिला. त्या ज्यू निर्वासितांनीं कोचीनच्या ज्या भागांत वस्ती केली, त्याला 'ज्यू टाऊन' असं नांव पडलं. अरुंद गल्ल्यांचा हा भाग म्हणजे एक भुईकोट किल्लाच आहे. या भागांत सहाशें वर्षांचं जुनं 'सिनेगॉग'–म्हणजे ज्यू लोकांचं प्रार्थना मंदिर आहे, तें अवश्य पाहण्यासारखं आहे.

कोचीनचा मुक्काम वाढविण्यांत विशेष अर्थ नव्हता, म्हणून दोनच दिवस राहून आम्ही पुढें ॲलेप्पेकडे मोर्चा वळविला. कोचीन ते ॲलेप्पे बोटीचा प्रवास सुमारें साडेपांच तासांचा आहे. एक्स्प्रेस बोटीला भाडं पडलं माणशीं फक्त एक रुपया. बोट वाफेवर चालणारी, परंतु छोटीशीच होती. या बोटींना खोल्याबिल्या कांहीं नसतात. तळमजल्यांत यंत्रं असतात आणि वरच्या 'डेक'ची जागा उघडी असते. डेकच्या चहूंबाजूंस जेमतेम दोन विती रुंदीची बांकडीं लावलेली असतात, त्यांवर उतारूंनीं बसायचं. डोक्यावर छप्पर असतं, चहूंबाजूंस पडदे असतात, ते वाटल्यास सोडावे, वाटल्यास गुंडाळावे. बांकड्यांच्या मधोमध जी जागा राहते तिच्यांत उतारूंच्या सामानाचा खच रचतात. या बोटी म्हणजे इकडल्या भागांतल्या लोकल गाड्याच ! उतारूंचं सामान म्हणजे बहुधा खरेदी केलेला किंवा विक्रीसाठीं चालविलेला माल केळ्यांचे घड भाजी, नारळ, दुर्डी, सुपं, टोपल्या, चाळण्या, छत्र्या, कंदील, स्लेटपाट्या, कापड–चोपड अशा मालाचे लहानमोठे भारे नेणारे–आणणारेच बहुतेक उतारू असतात. या उतारूंची तऱ्हा अशी की, आपापल्या सामानाची ओझी

हवीं तिथें टाकायची, आणि लांकडी तक्तपोशीवर झोंप काढायसाठीं आडवं व्हायचं किंवा बाकड्यावर बसून विड्या फुंकायच्या, किंवा टोळक्याटोळक्यांनीं पत्ते खेळायचे. आम्ही मारे आधीं जागेचं रिझर्वेशन केलं होतं, पण मग आढळून आलं कीं, रिझर्वेशनची गरज नाहीं आणि त्याला कांहीं अर्थहि नाहीं. जो आधीं येऊन बसेल त्याची जागा, असाच इथला कायदा दिसला. शिवाय जागेचा तुटवडाहि नव्हता. प्रश्न एवढाच होता कीं, फूटभर रुंदीच्या फळकुटावर बसून पांचसहा तास काढायचे कसे? कांहीं वेळ बांकड्यावर बसावं, कांहीं वेळ तक्तपोशीवर पसरलेल्या बेडिंगवर ताणून द्यावी असा कार्यक्रम आम्हीं आंखला.

कोचीनहून आम्ही दुपारीं बारा वाजतां निघालो. अरबी समुद्राचं पाणी जागोजाग पश्चिम किनारा ओलांडून आंत घुसलेलं आहे. आणि समुद्राला समांतर अशी उत्तर–दक्षिण गोल पाण्याची उभी पट्टी बनलेली आहे. या पाण्याला इंग्रजींत 'बॅक वॉटर्स' म्हणतात. यांतून उतारूंची आणि मालाची वाहतूक करणाऱ्या बोटींची व पडावांची रहदारी सारखी चालू असते. पात्र कधीं पाच-सहाशें फूट रुंद झालेलं दिसतं, तर कधीं अवघ्या शें–दोनशें यार्ड रुंदीच्या पात्रांतून बोट जाते. दर अर्ध्या-पाऊण तासानं कुठल्या तरी गांवाच्या धक्क्याशीं बोट थांबते. तशी ती थांबली कीं उतारूंची चढउतार होते, आणि कॉफी, वडे विकणारे लोक कर्कश आवाजांत ओरडत बोटींत शिरतात. वडे केव्हां तरी तळून काढलेले, शिळे व लालभडक! आणि कॉफी, जिच्यावर दूध घातल्याचा नुसता आळ आलेला आहे अशी काळी मिट्ट! या खाद्यपेयांपेक्षां सृष्टिसौंदर्य बघूनच तहानभूक भागविणं बरं वाटतं. हें सौंदर्य ठरीव ठशाचं, वाटूं लागतं, परंतु त्याचा कंटाळा येत नाहीं. 'खोल पाण्यांत शिरूं नये', हें सुभाषित ध्यानांत ठेवून बघितलं तर आकर्षक वाटणारं, उन्हांत चम्चम् करणारं पाणी, मधेंच भेटणारी उलट दिशेनं येणारी बोट किंवा मालानं भरलेला भला मोठा पडाव, पुनः पुन्हा जवळ येणारे व पळणारे दोन्ही बाजूंचे कांठ, कांठावरच्या नारळींच्या दाट रांगा आणि त्या झाडींत लपलेलीं खेडीं, या, देखाव्यांत बदल कसा तो होत नव्हता. परंतु त्याची शोभा पाहत राहावंसं सतत वाटत होतं. अॅलेप्पेच्या बंदरांत शिरतांना पाण्याचं मुख्य रुंद पात्र सोडून बोट वळते, आणि अवघ्या चाळीस-पन्नास फूट रुंदीच्या कालव्यांतून झुकझुक करीत जाऊं लागते. पात्रांतलं पाणी इतकं गलिच्छ कीं, त्याकडे बघायची सोयच राहात नाहीं. परंतु दोन्हीं तीरांवर

नारळींच्या दाट बनांची अशी कांहीं शोभा दिसते कीं, तिच्यावरून नजर काढाविशी वाटत नाहीं. छोटीं छोटीं टुमदार घरं, आणि स्वच्छ सारविलेलीं सुबक अंगणं दिसूं लागतात. जणुं आपण लोकांच्या परसांतूनच जात आहोंत असा भास होतो. पश्चिम-क्षितिजाकडे झुकलेल्या सूर्याचीं किरणं हजारों नारळींच्या रांगांतून घुसलेलीं दिसतात, आणि झगझगित प्रकाशाचे असंख्य कवडसे जमिनीच्या काळ्या गालिच्यावर फुलपांखरांसारखे थरथरतांना दृष्टीस पडतात. ॲलेप्पे शहरांत प्रवेश करणाऱ्या प्रवाशाला 'सुस्वागतम्' म्हणण्यासाठी निसर्ग-सुंदरी साजशृंगार करून प्रवेशद्वारांत उभी असल्यासारखी भासते.

ॲलेप्पे बंदर म्हणजे गलिच्छ घाण पाण्यानं भरलेल्या अरूंद कालव्याच्या टोकाला असलेला धक्का, आणि त्याला लागून बांधलेली एक लहानशीं इमारत या इमारतींत बोट कंपन्यांच्या कचेऱ्या व तिकीट-विक्रीच्या छोट्याछोट्या खोल्या आहेत, आणि उतारूंनीं थांबण्याची जागा आहे. आठ-दहा वांकड्या-तिकड्या पायऱ्या चढून गेलं कीं, डांबरी हमरस्ता लागतो, आणि रस्त्याच्या पलिकडच्या बाजूस हॉटेलं, खाणावळी, छोटीछोटीं दुकानं, यांची, रांग दिसते. रस्त्याच्या एका कडेला रिक्षावाल्यांची गर्दी उभी होती. आम्हांला पहातांच या रिक्षावाल्यांनीं आम्हांला वेढा दिला. पण त्यांचीं भाषा आम्हांला कळेल तर शपथ, आणि आमची त्यांना कळेल तर शपथ! ॲलेप्पेंत चांगलं हॉटेल कोणतं व कुठें आहे ते आम्हांला माहीत नव्हतं. म्हणून आम्हीं बेत ठरविला कीं, कुलीच्या डोक्यावर सामान द्यावं, आणि चांगल्या हॉटेलचा तपास करीत चालत जावं. शहरहि अनायासें थोडंसं पाहून होईल असा विचार केला. जवळजवळ दोन मैल अशा प्रकारें पूसतपास करीत चालत गेलो. परंतु जिथें मन रमेल व उतरावंसं वाटेल असं हॉटेल कांहीं केल्या सांपडेना. भाषेची मोठी अडचण वाटूं लागली.

दक्षिण हिंदुस्थानांत साध्या कुलीलाहि इंग्रजी समजतं हा समज फारसा खरा नाहीं. आमचं इंग्रजी कुणाला समजेना. हिंदुस्थानींत बोलण्याचा प्रयोगहि काम देईना. तिथल्या लोकांची मल्याळी भाषा आम्हांला कळेना. शेवटीं एका वृत्तपत्र-विक्रेत्याच्या दुकानांत शिरून चौकशी केली. त्यानं सांगितलं, "तुमच्या पसंतीस उतरेल असं हॉटेल शहरांत नाहीं. तुम्हीं सरळ शहराबाहेरच्या रेस्ट हाऊसमध्यें जाऊन उतरावं चागलं." सामान डोक्यावर घेऊन उभ्या राहिलेल्या हेलकऱ्यांना

त्याच्याकडून आम्हीं सांगविलं, आणि हेलकऱ्यांच्या मागून आम्ही पुन्हा चालूं लागलों. शहर खूप मोठं आणि बरचसं आधुनिक, पण बकाली वाटलं. घाण तर जिकडेतिकडे होती. समुद्राच्या गलिच्छ गटार–पाण्याचा एक मोठा कालवा शहरांतून गेलेला दिसला. त्या कालव्यावर किती तरी पूल दिसले. एक पूल ओलांडून शहराच्या पलिकडच्या भागांतून चालूं लागलों तेव्हां उजव्या हाताला कालव्यांचं घाणेरडं पाणी, परंतु डाव्या अंगाला स्वच्छ टुमदार घरं दिसूं लागलीं. आणखी जवळजवळ अर्ध्या मैलाची पायपीट केल्यावर शहराच्या दुसऱ्या टोंकाला आम्ही आलों. खूप विस्तीर्ण मैदान दिसलं. त्याच्या पलिकडे समुद्र दिसला. एकदम शांत व स्वच्छ भागांत पाऊल टाकल्यासारखं वाटलं. मैदानाच्या अलिकडे सुंदर स्वच्छ डांबरी रस्ता दिसला. त्या रस्त्यांत वळून पन्नास पावलं कांही टाकलीं नसतील, तोंच ' रेस्ट हाऊस ' ची इमारत दिसली. दोन दुमजली टुमदार बंगल्यांचं मिळून हें ' रेस्ट हाऊस ' आहे. प्रत्येक बंगल्यापुढं छोटीशी बाग आहे. बंगल्यासमोर मैदान व पलिकडे समुद्र असल्यामुळं वाऱ्याचा मजेदार झोत अंगावरून सारखा वाहतो. प्रवासानं व कलकलाटनं शिणलेलीं आमचीं शरीरं आणि मनं बंगल्यांतलीं व्यवस्था पाहिल्याबरोबर ताजींतवानीं व प्रसन्न झालीं. 'रेस्ट हाऊस ' च्या कामगारानं धांवत येऊन काय हवं, काय नको, म्हणून चौकशी केली. त्या ठेंगण्या ठुसक्या माणसाचं नांव होतं गोपालन् आणि त्याची इंग्रजी भाषा तर अजबच होती; परंतु बोलण्याची तऱ्हाहि मोठी गमतीदार होती. ॲलेप्पे ' कोरड ' शहर नाहीं, भरपूर ' ओलं ' आहे आणि बिअरची बाटली पावणेचार रुपयांना मिळते हें कळल्यावर आम्हाला आनंद झाला. गोपालन्नं विचारलं, " पण आधीं थोडी कॉफी घेतां का ? " आम्हीं म्हटलं, " घेतों; पण दूध उत्तम असायला हवं. तें आहे का तुझ्याजवळ ? " गोपालन् हंसला आणि ऐट सांगण्याचा अविर्भाव करून म्हणाला, " आय विल् गिव्ह यू माय ओन् मिल्क ! " ( ' खुद्द माझंच दूध देतों तुम्हाला. ' ) त्याच्या या उत्तरानं आम्हीं खो खो करून हंसूं लागलो. आम्ही कां हंसतों तें त्याच्या लक्षांत येण्यास वेळ लागला. ते आल्यावर त्यानं खुलासा केला कीं, ' मी खाजगी रीत्या म्हशी बाळगलेल्या आहेत' व रेस्ट हाऊसमध्यें उतरणाऱ्या प्रवाशांना मी उत्तम दूध पुरवीत असतों. ' रात्रीच्या जेवणासाठीं

काय हवं नको तें गोपालन्‌नं विचारून घेतलं आणि मग अशीच कांहींतरी बडबड करीत तो निघून गेला.

या रेस्ट हाऊसमध्यें रहाण्याचं भाडं माणशीं फक्त दीड रुपया आहे. जेवणा-खाण्याचा चार्ज निराळा द्यावा लागतो. परंतु ' माय ओन् मिल्क 'ची कॉफी आणि शाकाहारी व मांसाहारी जेवण उत्तमपैकीं मिळतं असा अनुभव आला. रेस्ट हाऊसमधल्या खोल्या चांगल्या हवेशीर आहेत. व्हरांड्यांत उभं राहिलं कीं मन प्रसन्न करून टाकणारा देखावा दिसतो. पांढऱ्या वाळूनं भरलेला समुद्राचा किनारा जसा विस्तीर्ण, तसाच अतिशय स्वच्छ आहे. किनाऱ्याच्या एका टोकाला दीपस्तंभ आहे. किनाऱ्याच्या आसपास श्रीमंत लोकांचे सुंदर बंगले आहेत, आणि बोटक्लबाची इमारत आहे. या वस्तींत एक चर्चहि आहे. चार दिवसांच्या विश्रांतीसाठीं अगदीं योग्य असं हें ठिकाण कुणालाहि आवडेल.

समुद्र अगदीं नजीक असल्यामुळें समुद्रस्नानाची हौस वेळीं-अवेळीं हवी तेवढी भागवून घ्यावी. शहर पाहण्यासाठीं रिक्षांतून मनसोक्त हिंडावं. रिक्षांत एकच स्वारी बसूं शकते, पण भाडं फक्त ताशीं बारा आणे पडतं. अवघ्या आठ दहा रुपयांत आम्हीं दोन दिवसांत सबंध ॲलेप्पे शहर पाहून घेतलं. 'तथंपल्ली' नांवाचा ॲलेप्पेचा एखाद्या उपनगरासारखा जो भाग आहे, तो सृष्टिशोभेच्या दृष्टीनं सगळ्यांत अधिक पाहण्यासारखा आहे. या उपनगरांत जिकडेतिकडे नारळींचीं इतकीं दाट बनं आहेत, कीं तिथली मनुष्यवस्ती आगंतुक वाटते. वृक्षराजींच्या गर्द छायेंत खुशाल अंग टाकावं आणि फटींतून दिसणाऱ्या निळ्या आकाशाकडे घटकान् घटका बघत रहावं, असं मनांत येतं. ॲलेप्पे शहरांत पाहण्यासारखं विशेष कांहीं नाहीं. अंधाऱ्या खाणावळी, घाणेरडी हॉटेलं, देवळं चर्चेस्, व लहानमोठ्या बाजारपेठा! स्त्री–पुरुषांचीं शरीरं काळीं, पण सुदृढ आणि सुंदर. कमरेची लुंगी आणि अंगावरचं कुडतं किंवा चोळी यापलिकडे वस्त्रप्रावरणांचा सोस नाहीं. सूट-बूट केलेला माणूस दृष्टीस पडला तर नवल! यामुळं बाजारपेठेंत कापडाचं मोठं दुकान, किंवा ' टेलर्स ॲंड आउटफिटर्स ' अशा पाटीचं दुकान सहसा आढळत नाहीं. अंगावरचीं दोन वस्त्रं घरींच धुण्याचा परिपाठ असल्यामुळं परटाच्याहि धंद्याला वाव नाहीं. त्यामुळं 'लॉंड्री'ची मोठी पाटीहि कुठं दिसत नाहीं. रस्त्यांतनं हिंडणाऱ्या स्त्रिया काळ्या, पण

देखण्या वाटतात. काश्मिरांतल्या स्त्रिया गोऱ्या आणि लावण्यसंपन्न खऱ्या, परंतु त्यांच्या अंगावर कपड्यांचं घुंघट एवढं असतं, कीं एखाद्या झरोक्यांतून पाहिल्याप्रमाणं त्यांचे नाकडोळे तेवढेच दिसतात. केरळांतल्या काळ्या स्त्रियांचं सौंदर्य असं कपड्यांच्या घुंगटांत लपलेलं नसल्यामुळं आणि जनान्याचा रिवाज नसल्यामुळं तें निःसंकोचपणें पहातां येतं.

तलवडीला जाण्यासाठीं ॲलेप्पे बंदरांतून आम्हीं दुपारीं बारा वाजतां निघालों. साडेपांच तासांच्या बोटीच्या प्रवासाचं भाडं फक्त माणशीं सात आणे. बोटीचा नमुना कोचीन ते ॲलेप्पे ज्या बोटींतून आलों तिचाच. आकार मात्र थोडा लहान. शिवाय आमचा मार्ग आतां 'बॅक वॉटर्स' मधनं नव्हता, नदींतून होता. खूप खोल आणि रुंद पात्राच्या या नदीचं नांव 'पंपा' असं आहे. मल्याळी भाषेंत नदीला म्हणतात, 'आर.' 'पंप्यार' म्हणजे पंपा नदी ! या प्रवासांत सभोंवार दिसणाऱ्या सृष्टीचं स्वरूप आत्तांपर्यंत पाहिलेल्या नमुन्याचंच. मात्र नागरी जीवनापासून आपण दूर दूर चाललों आहोंत असं वाटायला लावणारी शांतता जिकडेतिकडे अधिक भरलेली दिसली. आणि शिवाय मुख्य जलमार्गाला जागोजाग उजवीकडे–डावीकडे फाटे फुटलेले दिसूं लागले. मधेंच एखाद्या फाट्यांत बोट शिरत होती, आणि एखाद्या छोट्या गांवाच्या धक्क्यांशीं पांच मिनिटं थांबून पुन्हां मुख्य जलमार्गानं जाऊं लागत होती. जिकडे तिकडे पाणी आणि नारळींची गर्द झाडी ! तासन् तास गेले तरी या दृश्यांत खंड पडेना. वाटूं लागलं, या पाण्याला कुठं अंत आहे कीं नाहीं ? या झाडीचा कुठं शेवट आहे कीं नाहीं ? मधेंच उजव्या किंवा डाव्या कांठावरच्या गांवांतलीं टुमदार घरं दिसत, त्यांच्या अंगणाला नदीचं खोल पात्र भिडलेलं असे. नदीच्या पाण्यांत डुंबणारीं पोरं आणि स्नान करणाऱ्या स्त्रिया दृष्टीस पडत. सबंध केशभार मोकळा सोडून न्हाणाऱ्या स्त्रिया बोट अंगावरून गेली तरी लाजलेल्या किंवा संकोचलेल्या दिसल्या नाहींत !

कृष्णन् कुटी यांच्या घरीं पोंचलों तो पाऊस सुरू झाला. पावसाळ्यांतल्या पहिल्या सरी धो धो पडल्या. परंतु घटकाभरानं आकाश निवळून उत्तम चांदणं पडलं. घराचं अंगण पांढऱ्याशुभ्र रेतीनं भरलेलं. एवढा पाऊस पडला तरी चिखलाचं नाव नाहीं. पायांखालची वाळू सारं पाणी मुरवून फक्त ओलसर

झालेली. जेवणानंतर अंगणांत खाटा टाकल्या आणि कृष्णन् कुटी यांच्याशीं खूप गप्पा मारल्या. गप्पांचा विषय अर्थात् मुख्यतः कथाकली नृत्याचाच. कृष्णन् यांचा स्वभाव खूप बोलघेवडा आहे. शरीरानं सहा फुटांपेक्षांहि अधिक उंच, बांध्यानं जरा किरकोळच, अशा या गृहस्थांचा चेहराहि कांहीं मोठा सुंदर नाहीं. डोळे तेवढे फार पाणीदार आणि बोलके आहेत. म्हणजे नृत्यकाराला अनुकूल अशी शरीराची ठेवण कृष्णन् यांना निसर्गानं मुळींच दिलेली नाहीं. परंतु आजघटकेला अगदीं पहिल्या प्रतीच्या नृत्यकारांत तज्ज्ञ लोक त्यांची गणना करतात. केरळांत जन्मलेल्या या कलावंतानं वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी उत्तम नृत्यकार म्हणून वहावा मिळविली, आणि त्यानंतर विद्या आणि यश या दोन्ही गोष्टी अधिकाधिक मिळवीत कीर्तीचा मार्ग ते चालत गेले. त्रावणकोरच्या दरबारांत ते कांहीं दिवस होते. त्यांचा परदेशचा दौरा अत्यंत यशस्वी झाला. उदयशंकर, गोपीनाथ इत्यादींचे नृत्यप्रयोग ज्यांनीं वाखाणले, त्या परदेशी तज्ज्ञांनीं कृष्णन्‌ची मुक्तकंठानं अशी स्तुति केली कीं, ‘ हिंदुस्थानांतून इकडे दौऱ्यावर आलेल्या सर्व नृत्यकारांत हा कलावंत श्रेष्ठ म्हणावा लागेल.’ कृष्णन् यांनीं सध्या मुंबईत एक नृत्यकेंद्र चालविलेलं आहे. या केंद्रांत तयार केलेल्या नटनटींचा संच घेऊन ते अधूनमधून मुंबईत जाहीर कार्यक्रम करतात, आणि मधूनमधून परदेशच्या दौऱ्यावर जातात. कृष्णन् यांचा स्वभाव जितका बोलका तितकाच निगर्वी आहे. उदयशंकर, गोपीनाथ, मेनका, अशा विख्यात हिंदी नृत्यकारांच्या कलेंतील दोष सांगण्यापेक्षा त्यांच्यांतील गुणच सांगतांना ते अधिक रंगत होते. इतक्या अधिकाराचा व गोड स्वभावाचा मोठा नृत्यकार भेटल्यामुळं मी हवे ते प्रश्न त्यांना विचारीत होतों, आणि ते मोठ्या तत्परतेनं त्यांचीं उत्तरं देत होते.

मीं त्यांना विचारलं, “कथाकली, कथ्थक, आणि मणिपुरी हे तिन्ही भरत—नाट्यमूचे प्रकार भरतनाट्यम् हें आपल्या देशांतील नृत्याचं मूळ शास्त्र. या शास्त्रांची आणि कलेची वाढ दक्षिणेंत एका प्रकारें झाली, उत्तरेंत दुसऱ्या प्रकारें, आणि आसामांत तिसऱ्याच प्रकारें. म्हणजे भरतनाट्यम् हा मूळचा वृक्ष म्हटला तर कथाकली, कथ्थक व माणिपुरी अशा त्या वृक्षाला तीन शाखा फुटल्या, हें सारं मला नीट समजलं. परंतु हें नीट समजल्यामुळंच मला एक शंका येते. माझं अज्ञान पाहून तुम्ही हंसणार नसाल तर विचारतो.”

परंतु या इषाऱ्याचंच त्यांना हंसू आलं. हंसत हंसत ते म्हणाले, 'विचारा.' 'माझी शंका अशी कीं, कथाकली, कथ्थक आणि मणिपुरी या जर भरत-नाट्यम्‌च्याच तीन तऱ्हा, तर भरतनाट्यम् म्हणून या तिन्हींप्रमाणंच स्वतंत्र चौथा प्रकार मानला जातो, ही काय भानगड आहे? भरतनाट्यम् हें सामान्य नांव आहे आणि कथाकली, कथ्थक, व माणिपुरी या तीन विशिष्ट प्रकारांना तें सारख्याच औचित्यानं लावता येईल. मग जणुं हे तीन प्रकार भारतनाट्यम्‌चे प्रकार नाहींतच अशा आविर्भावानं 'भरतनाट्य' म्हणून एक निराळाच प्रकार गणला जावा हें चमत्कारिक नाहीं काय?"

कृष्णन् कुटी हंसून म्हणाले, "तुमची शंका अगदीं रास्त आहे. भारतनाट्यम् या नांवानं चौथा एक नृत्यप्रकार कसा रूढ झाला, तुम्हांला माहीत आहे?

मीं म्हटलं, "नाहीं. सांगा."

ते म्हणाले, "कथाकली नृत्य स्त्रियांसाठीं नाहीं. निदान त्या नृत्यांतला 'तांडव' भाग फक्त पुरुषांसाठीं आहे. स्त्रिया कथाकली कधींच नाचत नाहींत असं नव्हे, परंतु त्यांच्या त्या नृत्याला 'दासी आटम्' असं म्हणतात. म्हणजे घरंदाज सभ्य स्त्रियांसाठीं हें नृत्य नाहीं. अड्यारचे अरुंडेल तुम्हांला माहीत असतील. त्यांची पत्नी रुक्मिणी अरुंडेल हिला कथाकली शिकण्याची व शिकल्यावर तें लोकप्रिय करण्याची इच्छा झाली. 'दासी आटम्' हें नांव स्वीकारणं तिला साहाजिक कमीपणाचं वाटलं. म्हणून तिनं नवं नांव काढलं, 'भरत-नाट्यम्'. आणि तें नांव ती वापरूं लागल्यामुळं रूढ झालं. आपल्या देशांत नृत्याचे प्रयोग पाहणारीं लाखों माणसं आहेत, परंतु जाणते लोक फार थोडे आहेत. यामुळं लोकांमधें असा समज रूढ झाला कीं, भरतनाट्यम् म्हणजे कथाकलीहून निराळा आणि स्वतंत्र्य नृत्यप्रकार आहे. वास्तविक हा समज किती चुकीचा आहे तें तुमच्या लक्षांत आलंच असेल."

अशा प्रकारें कितीतरी प्रश्नोत्तरं झाली. नृत्याखेरीज इतर विषयांवरच्या गप्पाहि झाल्या. शेवटीं मध्यरात्र उलटून गेली तेव्हां कृष्णन् म्हणाले,—"आता घरांत चला आणि निजा." शिवराम उठला. पण मीं म्हटलं, इथंच अंगणांत निजायची माझी इच्छा आहे. चांदणं कसं छान पडलं आहे."

कृष्णन् म्हणाले, " आत्तां चांदण्याची बहार वाटते आहे, पण केव्हां ढग जमतील नि पाऊस कोसळेल त्याचा नेम नाहीं. मग घरांत धांवतां धांवतां धांदल उडेल तुमची. "

पहाटे त्यांच्या या भविष्याचा पडताळा मला आला. परंतु चांदण्यांत उघड्यावर निजायची मला विलक्षण लहर आली होती व ती मी पुरी केली. कृष्णन् व शिवराम घरांत गेले. मी खाटेवरच पडून राहिलों. वरच्या स्वच्छ आकाशांत चंद्रबिंब डौलानं तरंगत होतं. हांकेच्याच अंतरावर असलेल्या पंपा नदीच्या पाण्याचा आवाज कानांवर येत होता. एखादी बोट गेली कीं तिची घंटा वाजत होती. चहूंकडे नारळींच्या झाडांच्या उंच आकृती दिसत होत्या. सारं शांत ! सारं स्तब्ध ! कथाकलीचं माहेरघर चांदण्या रात्रीच्या ऐश्वर्यानं नटून गाढ झोपी गेलं होतं !

कृष्णकुट्टींना बोलण्याची खूप हौस, आणि इंग्रजी भाषा ते चांगल्यापैकीं बोलूं शकतात, त्यामुळं त्यांचं-आमचं संभाषण अखंड चालत असे. त्यांचे श्वशुर इंग्रजी जाणणारे नव्हते. परंतु आमच्याशीं कांहीं तरी बोलावं व आतिथ्य दाखवावं अशी त्यांची फार इच्छा असे. ते मधेंच आमच्यांत येऊन बसत आणि मोडकंतोडकं हिंदी बोलत, किंवा हिंदींत जमेनासं झालं कीं संस्कृतमध्यें बोलत. ' हिज होलिनेस दि रावळसाहेब, ' अशा किताबाचे गोविंदन नंबुद्री नांवाचे हे वृद्ध गृहस्थ मोठे नमुनेदार वाटले. ' थुढिंगल हाऊस ' असं यांच्या घराचं नांव आहे. त्यांचा जमीनजुमला पुष्कळ आहे; परंतु यांचा सारा कल धर्म-कर्म-परमार्थ यांकडे आहे. त्यांच्या घरांत यज्ञशाळा आहे. गो-शाळा आहे. जटांची गांठ मस्तकावर बांधलेली, गंधभस्म अंगाला फांसलेलं, डाव्या मनगटावर एक लठ्ठ सोन्याचं कडं घातलेलं, कमरेला लुंगी, वरचं अंग उघडं, —अशा वेषांतले, हे वृद्ध गृहस्थ डोळे किलकिले करून किंचित् हंसत हंसत बोलूं लागले कीं, त्यांच्या विद्वत्तेप्रमाणेंच प्रेमळ स्वभावाचा प्रत्यय येत असे.

त्यांच्या कुटुंबांत ते स्वतः, त्यांच्या पत्नी, त्यांच्या दोन लेकुरवाळ्या मोठ्या मुली, आणि कृष्णन् यांना जमेला धरून दोन जावई, एवढी मंडळी होती. तिन्ही स्त्रियांचा वेष कमरेला पांढरी लुंगी आणि अंगांत पांढरं स्वच्छ लांडं कुडतं एवढाच. रोज न्हाऊन केंस मोकळे सोडलेले, किंवा सैलसर बांधलेले. इकडच्या

स्त्रियांत खोटा संकोच किंवा लाजरेपणा किंचितहि नाहीं. रावळसाहेबांच्या घरांतल्या तिन्ही स्त्रिया आमच्या बैठकीवरून मोकळेपणानं वावरत, आणि क्वचित् बैठकींत सामील होऊन हंसत उभ्या रहात. तिघीजणीं वर्णानं काळ्या, पण फार देखण्या होत्या. त्याहि आपापल्या परीनं आमचं आतिथ्य करण्याचा प्रयत्न करीत. गृहकृत्यांत इकडल्या स्त्रियांचा फार थोडा वेळ जातो असं दिसलं तिन्ही त्रिकाळचं जेवण म्हणजे मुख्यतः भात. तो प्रत्येक वेळेस ताजाच करायला पाहिजे असा आग्रह नाहीं. केव्हां तरी एकदां भात उकडून ठेवायचा व प्रत्येक वेळेस तो फक्त कढत वाढायचा अशी पद्धत. यामुळं 'रांधा–वाढा' च्या कटकटींतून इकडल्या स्त्रियांची जवळजवळ पूर्णतः मुक्तता झालेली आहे. 'चूल' सुटल्यामुळं 'मूल' तेवढं राहिलेलं.

इकडे घरांच्या अंगणालाच लागून पंपा नदीचं पात्र किंवा नदीचा छोटा कालवा असतो. त्यांत विवस्त्र सचैल स्नान करण्याची पुरुषाप्रमाणंच स्त्रियांचीहि रीत आहे. संध्याकाळीं चाराच्या सुमारास अशा प्रकारें स्नान करणाऱ्या विवस्त्र स्त्रिया गांवाच्या सीमेवर आढळतात. अगदीं जवळ जाऊन त्यांच्याकडे तुम्ही बघितलंत तरी त्या अंग झांकून घेण्याचाहि प्रयत्न करीत नाहींत, मग पळतील –धांवतील ही तर गोष्टच सोडा! एकंदरींत नग्नतेची लज्जा ही भावना केरळमध्यें फार कमीच. याचा अर्थ, इकडल्या स्त्रिया निर्लज्ज असतात असा करायचा नाहीं; या मुलखांतली ही एक रीत, एवढंच म्हणायचं.

'कुटी' या मल्याळी शब्दाचा अर्थ बाळ. 'मास्टर' हा बालवयदर्शक शब्द ज्याप्रमाणें 'मास्टर दीनानाथ' आणि 'मास्टर कृष्णराव' या नांवांत मोठेपणीदेखील कायम राहतो, किंवा 'शकुंतला' लग्न होऊन स्वतः बेबीवाली झाली तरी 'बेबी शकुंतला' राहते, त्याप्रमाणं बालपणी कृष्णन् यांना मिळालेलं 'कुटी' हें लाडकं उपपद अजूनहि वापरलं जातं. कुटी हे आपल्याला वाटतं तसं आडनांव नाहीं. इकडे आडनांवाचा प्रचारच नाहीं अय्यर, नाय्यर, या जातीवाचक नांवाचा वाटल्यास आडनांवासारखा उपयोग करतात. कृष्णन्च्या सासऱ्यांना या मुलखांतले सारे लोक 'रावळसाहेब' म्हणून ओळखतात. ते ऐन तारुण्यांत विरागी बनून बद्रिकेदारकडे निघून गेले होते. पुढं ते स्वदेशी आले, आणि त्यांनीं लग्न केलं. ते स्वतः उच्चवर्णीय ब्राह्मण, पण त्यांनीं बायको

केली नायर जातीची. असले आंतरजातीय विवाह इकडे अगदीं रूढ आहेत. नायर म्हणजे अय्यर नाहींत (न–अय्यर) ते. त्यांच्यांतहि वरिष्ठ–कनिष्ठ,–क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे जातिभेद आहेत. कृष्णन् हे सगळ्यांत कनिष्ठ जातीचे नायर आहेत; परंतु त्यांचं लग्न झालं आहे रावळसाहेबांसारख्या याज्ञिकाच्या नायर स्त्रीपासून झालेल्या मुलींशीं. आणि इकडे मातृप्रधान कुटुंबव्यवस्था असल्यामुळें, व स्त्रिया नव्हे तर पुरुष सासरी जात असल्यामुळें कृष्णन् राहतात श्वशुरगृही. उच्चवर्णीय ब्राह्मण, ब्राह्मण व नायर यांची संतति, आणि नायर स्त्री-पुरुष रक्ताच्या नात्यानं संबंधित होऊन विटाळ–चंडाळ, सोवळं–ओवळं यांच्या भानगडीपासून सर्वस्वी अलिप्तपणें एकाच कुटुंबांत एकत्र जेवतात, खातात, व राहतात, ही गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली कीं मनात अनेक विचार आल्यावांचून राहत नाहींत.

सकाळीं लवकर उठून यज्ञशाळा व गोशाळा पाहण्याचा बेत आम्हीं केला होता; परंतु आम्ही फार उशीरा उठल्यामुळं तो साधला नाहीं. कृष्णन् कुठं दिसेनात. रावळसाहेबांनीं सांगितलं कीं, “त्यांचं मालिश चाललेलं आहे, तें बघण्यासारखं असतं.” अंगणाच्या पलिकडच्या एका खोलिकडे त्यांनीं आम्हांला नेलं. माझी कल्पना अशी कीं, मालिश म्हणजे काय, कुणाकडून तरी कृष्णन् तेल लावून अंग रगडून घेत असतील झालं. परंतु खोलींत गेल्यावर जो प्रकार दिसला, तो पाहून आम्ही थक्कच झालों. केळीचीं मोठमोठीं पानं जमिनीवर अंथरलेलीं होतीं, व त्यावर सहा फुटांपेक्षां अधिक उंचीचे कृष्णन् पडले होते. त्यांचं सर्वांग तेलानं माखलेलं होतं, आणि एक मध्यम उंचीचा किडकिडित मनुष्य वरच्या बहालाला टांगलेल्या दोरखंडाला लोंबकळून कृष्णन्च्या छातीवर दंडांवर, खांद्यांवर, मांड्यावर पायांवर अक्षरशः नाचत होता! मात्र त्यांत धसमुसळेपणा किंचितहि नसून उलट अत्यंत सफाईदारपणा होता. इतका कीं, अंग तुडविण्याची ती एकंदर क्रिया एखाद्या तालबद्ध नृत्यप्रकारासारखीच वाटत होती. अंग तुडवून घेतां घेतां कृष्णन्नीं आम्हांला सांगितलं कीं, “इथं तलवडीला आल्यावर माझ्या नृत्याच्या अभ्यासांत खंड पडतो, परंतु माझ्या महिन्या–दोन महिन्यांच्या मुक्कामांत या मालिशांत फरक पडत नाहीं.” केरळांत नृत्य शिकविणारे जसे निष्णात गुरु असतात तशींच या मर्दनविद्येंत प्रवीण असलेलीं माणसंहि असतात. मल्याळी भाषेंत ‘आशान’

असा शब्द आहे. त्याचा अर्थ गुरु. मालिश करणाऱ्या या वाकबगार माणसांना 'आशान' अशी हांक मारतात व अंग मर्दून घेणारे कलाकार त्यांना गुरुप्रमाणें मानतातहि. कृष्णन्‌चं अंग मर्दन करणाऱ्या गृहस्थांचं नांव 'कोच्चा' असं होतं. सगळ्यांनीं त्याला हांक मारायची 'कोच्चाशान' म्हणून !

दुपारीं आम्ही थोडे भटकायला निघालों. आपल्याकडे श्रीमंत घरांत जशीं मोटार असते तशी इकडच्या घरंदाज कुटुंबाजवळ स्वतःच्या मालकीची नाव असते, व मोटार ड्रायव्हरप्रमाणंच नाव हांकणारा नोकरहि असतो. तलवडीच्या आजूबाजूची गांवं पाह्यला जायचं म्हणजे पंपा नदीच्या फांट्यांतूनच. इकडे गांवोगांवचे रस्ते जसे पाण्याचे, त्याप्रमाणेंच गांवांतलेहि कित्येक रस्ते जलमयच असतात. या रस्त्यांना नांवं नाहींत, कुठं नांवाच्या पाट्या नाहींत. परंतु त्यावांचून इकडल्या लोकांचं कांहीं अडत नाहीं. श्रीमंत लोकांच्या मालकीची मोठी नाव असते. परंतु गरीब कुटुंबातहि आपल्याकडे जशी एखादी सायकल तशी एक छोटी होडी असायचीच. आणि आपल्याकडलीं लहान मुलं जशीं बाजारांतून कांहीं आणायला सांगितलं कीं सायकलवर टांग मारतात, तशीं इकडलीं मुलं होडी वापरतात ! रावळसाहेब आम्हांला म्हणाले, "चला, तुम्हांला थोडं फिरायला नेतो." त्यांच्या मोठ्या होडींतून आम्ही निघालों. होडी हांकणारा तरुण उघडाबंब, काळाकुट्ट, पण अतिशय सुदृढ बांध्याचा आणि देखणा वाटला. तो होता बहिरा आणि मुका ! परंतु कृष्णन्‌चं व त्याचं संभाषण (!) सारखं चालू होतं. मी कृष्णन्‌ना चेष्टेनं म्हटलं, "कथाकलीच्या तुमच्या अभ्यासाचा हा उपयोग पाहण्यासारखा आहे खचित !" ते हंसले आणि आमच्या मनोरंजनासाठीं त्या नावहांक्याला आणखी जोरजोरानं कांहीं सांगूं लागले, व तोहि उलट जोरजोरानं हातवारे करूं लागला ! तो नाव चालवीत होता, ती वल्हीं मारून नव्हे, दहाबारा फूट उंचीचा एक भला मोठा बांबू त्यानं हातीं घेतला होता. तो खालीं पाण्याच्या तळापर्यंत खुपसायचा व त्याच्या रेट्यानं नावेला वेग आणि दिशा द्यायची. वल्हीं नाहींत, सुकाणू नाहीं ! सगळीं कामं एका बांबूवर भागवायची, असा इकडला खाक्या दिसला.

जवळजवळ सहा तासांची भ्रमंति करून तलवडीच्या पंचक्रोशींतलीं पांचसहा गांवं आम्हीं पाहिलीं. त्यांतलं 'एडथ्या' गांव सगळ्यांत मोठं—

एखाद्या तालुक्याच्या ठिकाणासारखं होतं. या गांवांतलं जुनं चर्च पहाण्यासारखं आहे. खिस्ती लोकांची एक जत्रा नुकतीच होऊन गेली असल्यामुळें चर्चपुढच्या मोठ्या मैदानांत कागदी पताका, कापडी निशाणं, जपानी कंदील असे अवशेष दिसले. येशु ख्रिस्ताच्या बारा प्रेषितांपैकीं सेंट टॉमस हा धर्मप्रसारासाठीं केरळांत आला व इकडेच मरण पावला असं सांगतात. ही दंतकथा खरी असो वा खोटी असो, एवढं खरं कीं, हिंदुस्थानांतल्या इतर कोणत्याहि भागांपेक्षां केरळांतली खिस्ती वस्ती सगळ्यांत अधिक जुनी–कित्येक शतकांची–आहे या भागांतले जे लोक बाटून खिस्ती झाले, त्यांना ‘ सिरियन खिस्ती ’ म्हणतात. यांची केरळांतली लोकसंख्या फार मोठी आहे. हे धर्मानं खिस्ती खरे, परंतु मल्याळी भाषाच बोलतात, आणि पोषाखहि इतर हिंदूंप्रमाणंच लुंगी आणि कुडतं एवढाच करतात. खिस्ती स्त्रीला ओळखण्याची मात्र एक गमतीची खूण समजली. ती अशी कीं, तिच्या डाव्या कमरेवर नेसत्या लुंगीच्या निऱ्या एखाद्या उघड्या पंख्याप्रमाणें खोवलेल्या असतात.

आपल्याकडे पांढरीं वस्त्रं सौभाग्याचं चिन्ह समजत नाहींत, परंतु केरळांत कुमारी, सुवासिनी, विधवा, श्रीमंत, गरीब,—सर्व स्त्रियांचा पोषाख एकजात पांढरा ! — बहुधा हातखादीचा. गांधीजींकडून शिकवणूक मिळण्यापूर्वींच कित्येक वर्षांपासून केरळांतल्या आणि आंध्रांतल्या लोकांनीं हातसुताच्या आणि हातविणीच्या कपड्यांचा अंगिकार केला होता हें लक्षांत घेण्यासारखं आहे.

कांहीं महिन्यांपूर्वीं मी देवासला गेलों असतांना ‘ भारतांतील खेडुतांचा जीवनक्रम ’ या विषयावर निबंध लिहिण्यासाठीं माहिती मिळविण्याकरता इकडे येऊन राहिलेला एक ऑस्ट्रेलियन मला भेटला. छत्रपति शहाजीमहाराजांनी त्याची–माझी ओळख करून दिली. त्यानं विचारलं, “ महात्मा गांधीचा या देशांतल्या खेडुतांवर काय परिणाम झाला, असें तुम्ही म्हणाल ? ” मी हंसून उत्तर दिलं, “ माफ करा, पण तुमचा प्रश्नच चुकीचा आहे. गांधींचा या देशांतल्या खेडुतांवर परिणाम झाला नाहीं. खेडुतांचा गांधींवर झाला. गांधींनीं हिंदुस्थानांतलीं खेडीं पाहिलीं व त्यामुळें त्यांचं तत्त्वज्ञान ठरलं. गांधींनीं खेडुतांना शिकविलं नाहीं; खेडुतांनीं गांधींना शिकविलं. ” केरळांतले स्त्री-पुरुष कपडा अगदीं कमी वापरतात आणि जो वापरतात तोहि हातखादीचा वापर-

तात, या गोष्टी पाहिल्या कीं, वरच्यासारखे विचार मनांत आल्यावांचून रहात नाहींत.

सूर्यास्त होऊं लागला तेव्हां मीं म्हटलं, " आतां जाऊं या परत घरीं. " पण रावळसाहेब म्हणाले, " छे: छे: ! आणखी एक गांव तुम्हांला दाखवायचं आहे. " मीं म्हटलं, " आतां नको. तुमच्याकडल्या गावांची आली कल्पना." ते म्हणाले, " ज्या गांवीं तुम्हांला नेणार आहे तिथं एक फार पाहण्यासारखी गोष्ट आहे. " मीं विचारलं, " कोणती ? " ते म्हणाले, " आधीं नाहीं सांगत ". त्यानीं रहस्याचा आव आणलेला पाहून मला मोठी मौज वाटली.

एका गावाच्या छोट्या धक्क्याला नाव लागली धक्क्यापासून शेंपन्नास कदमाच्याच अंतरावर असलेल्या, एखाद्या सिनेमाच्या छोट्याशा स्टुडिओ सारख्या दिसणाऱ्या एका बंद, उंच छपराकडे रावळसाहेबांनीं आम्हांला नेलं, आणि आंत शिरतांच ते म्हणाले, " बघा ! " सुमारें शंभर फूट लांबीची एक भव्य लांकडी नाव स्टँडवर ठेवलेली आम्हांला दिसली ! तिच्या पुढच्या टोंकाला भव्य ऐटबाज घोड्याची आकृति कोरलेली होती व जागोजाग सुंदर नक्षीकाम केलेले होतं. ती दाखवून कृष्णन् सांगूं लागले, " या गांवांतल्या कसबी सुतारांनीं ही नाव बनविलेली आहे. इकडल्या मुलखांत गांवोगांवीं अशा अजस्त्र नावा तयार करण्यांत येतात. एकदां आषाढांत आणि पुन्हां श्रावणांत अशा पन्नाससाठ नावांची शर्यत होते. प्रत्येक नावेंत तगडे जवान वल्हवायला बसतात. सनया–ढोल वाजविणारे प्रत्येक नावेंत असतात. सर्वांनीं फुलमाळा घातलेल्या असतात. नावा शृंगारण्यांत येतात. शर्यत पहावयास आजूबाजूच्या सर्व गांवांतून हजारों लोक येतात पाहणारे, वल्हविणारे, वाद्यं वाजविणारे, सगळेच दारू झोकून मस्त झालेले असतात. शर्यतीसाठीं राजप्रमुख मुद्दाम येतात आणि शर्यत जिंकणाऱ्या गांवकऱ्यांचा सन्मान करतात. कथाकली पाहण्या-साठीं जसे तुम्ही आलां त्याप्रमाणंच ही शर्यत पाहण्यासाठीं तुम्ही खरोखर यायला हवं. "

एक काळ असा होता कीं, वीसपंचवीस रुपये खर्चले कीं कथाकलीचा प्रयोग घडवून आणतां येत असे. ते दिवस आतां राहिलेले नाहींत. परंतु आमच्या सुदैवानं एंजिनिअरिंग खात्यांतल्या एका मोठ्या हुद्देदाराला मुलगा झाला होता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 29040 दि.
क्रमांक 294 नों: दि:



व पुत्रोत्सवाच्या निमित्तानं त्यांनीं कथाकलीचा जाहीर कार्यक्रम ठेवला होता. मात्र तो तलवडीस व्हायचा नव्हता. तिरुवल्ला शहरीं व्हायचा होता. परंतु खास कथाकलीचा प्रयोग पाहण्यासाठीं उत्तरध्रुवावर देखील जाण्याची आमची तयारी होती. मग नजीकच्या तिरुवल्ला शहरीं जावं लागेल म्हटल्यावर आम्ही मागं पाय थोडाच घेणार ! कृष्णन् कुटी यांच्याबरोबर आम्ही गेलों.

एका भव्य विष्णुमंदिराच्या सभामंडपांत कार्यक्रम रात्रीं नऊ वाजतां सुरू व्हायचा होता. आम्ही मुद्दाम लवकर गेलों. कारण रंगपटांत पात्रं कशीं रंग-तात तें मला पाह्यचं होतं. देवळाच्या एका मोठ्या ओसरींत रंगपटाची व्यवस्था करण्यांत आली होती. विजेची रोषणाई नव्हती. साध्या घासलेटच्या दोन-तीन दिवे तेवढे जळत होते. कांहीं पात्रं बसून रंगत होती. परंतु दोन पात्रं आडवीं निजली होतीं, व त्यांचीं तोंडं रंगारी रंगवीत होता. कथाकलीची रंगभूषा किंवा 'मेकअप्' म्हणजे तासन् तास खाणारी एक अजब कला आहे. डोळ्यांचीं बुबुळं तेवढीं सोडलीं तर ज्यावर नाना रंगाचं रोगण फांसलं जात नाहीं असा चेहऱ्याचा तिळाएवढाहि भाग शिल्लक रहात नाहीं ! नृत्यनाटकांतील पात्रांच्या तीन जाती कल्पिलेल्या आहेत : सत्त्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी. सत्त्वगुणी पात्राच्या चेहऱ्यांत हिरव्या रंगाचं, रजोगुणी पात्राच्या चेहऱ्यांत निळ्या रंगाचं व तमोगुणी पात्राच्या तांबड्या व काळ्या रंगांचं प्राधान्य असायला हवं, असा कथाकलीचा शास्त्रसंकेत आहे. हा संकेत पाळूनच चेहेरे रंगाविण्यात येत होते. खलपात्राचा चेहरा रंगविणं म्हणजे भलतं बिकट काम. या मुखलेपनांत तरबेज असलेल्या अनुभवी माणसांना मोठी बिदागी द्यावी लागते.

रात्री नऊ वाजतां कथाकलीचा कार्यक्रम सुरू झाला. निराळा उंच रंगमंच नव्हता. पडदे, विंगा—कांहीं नव्हतं. सुमारें दहापंधरा फूट रुंदीची सभामंड-पांतली जागा प्रेक्षकांनीं मोकळी ठेवायची असा संकेत. रंगलेल्या देवदैत्यांनीं व पात्रांनीं गर्दींतूनच वाट काढीत या रंगभूमीवर प्रवेश करायचा. विजेच्या किंवा गॅसच्या दिव्यांना मज्जाव. फक्त ज्या मानीव रेघेपुढं प्रेक्षकांनीं सरकायचं नव्हतं, त्या हद्दीवर भली मोठी पांच फूट उंचीची समई ठेवलेली, आणि तिच्यांत काकडे पेटविलेले. प्रकाशयोजना काय ती एवढीच. कारण शेंकडों वर्षांपूर्वी जसा प्रयोग करीत तसाच आजहि तो केला तरच खरा कथाकलीचा प्रयोग !

सुरुवातीला खूप मोठ्या आकाराचा पखवाज गळ्यांत बांधून एक उघड्या अंगाचा पखवाजी तो वाजवूं लागला. त्याच्या डाव्या हाताला झांजवाला होता. डावीकडे झंगटवाला होता. पखवाजाला म्हणायचं ' मध्यम.' झांजेला म्हणायचं ' टायमणी. ' आणि झंगटाला म्हणायचं ' चेंगला. ' त्या तिघांनीं सुमारें पंधरा मिनिटं चेव आल्यासारखं वादन केलं. प्रारंभींचा हा ' ऑर्केस्ट्रा ' झाला म्हणायचा. मग सुमारें सात फूट लांबीरुंदीचा एक पडदा दोघा माणसांनीं अंतरपाटासारखा धरला. पडद्याच्या आड असलेले गायक गाऊं लागले. याला म्हणायचं रंगपूजा. या रंगपूजेंत ' तोडायम् ' व ' पुरप्पाद ' असे दोन भाग असतात. गायिल्या जाणाऱ्या कवितेचा अर्थ असा कीं, कवि कन्याकुमारीच्या समुद्रतीरावर उभा राहिलेला आहे, आणि कथाकली लिहिण्यासाठीं स्फूर्ति मिळावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना करीत आहे. पडद्याआडची रंगपूजा संपल्यावर पडद्यापुढची रंगपूजा सुरू झाली. हिला म्हणायचं, ' संजुथरा. ' रंगपूजेचं गायन चालू असतांना 'पखवाजावर ध्रुपद - धमार जोरजोरांत चालूच होता, आणि झांज व झंगट वाजतच होतं. या रंगपूजेनं पाऊण तास खाल्ला. मग मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

पहिलं आख्यान होतं, 'पूतना—वधा'चं कथाकलीची रीत अशी कीं, पात्रांनीं एक अक्षरदेखील तोंडावाटे काढायचं नाहीं तालबद्ध नृत्य करतांकरतां फक्त चेहऱ्यावरील भाव आणि ठरलेल्या सांकेतिक शास्त्रोक्त मुद्रा यांच्या साहाय्यानं संभाषण किंवा स्वगत भाषण वर्तवायचं. स्थलकाल, प्रसंग, पात्रांचे संवाद, त्यांचे स्वगत विचार, इतकंच नव्हे तर मनांतल्या भावना दर्शविण्या-साठीं त्यांच्याकडून होणारा अभिनय—या सर्वांचं तपशीलवार वर्णन करणारी कविता कवीनं रचलेली असते, व तिचं गायन एक गायक करीत असतो. हीं काव्यबद्ध आख्यानं मल्याळी भाषेंत लिहिलेलीं आहेत. तीं ज्यांना समजतात, त्या प्रेक्षकांना कथाकलीचा आस्वाद घेतां येतो. पण ज्यांना मल्याळी भाषा समजत नाहीं, त्यांना आस्वाद घेणं कठीण जातं. कथाकलीमध्यें पदलालित्याचं महत्व फार कमी आहे. हा जरी नृत्यप्रकार मानला जातो तरी नृत्याला विशेष प्राधान्य यांत नाही. सारं महत्व आहे तें गायकाच्या तोंडून निघणाऱ्या काव्याला आणि त्यांत वर्णिल्याप्रमाणें पात्रांकडून होणाऱ्या मूक अभिनयाला. कथाकलीला ' नृत्यनाट्य ' म्हणण्यापेक्षां ' मूकनाट्य ' कां म्हणूं नये, असा प्रश्न माझ्या

मनांत सारखा येत होता. शिवाय असंहि वाटत होतं कीं, कथाकलीच्या एकंदर प्रकारांत धांगडधिंगा व धसमुसळेपणा फार...मात्र हे विचार मनावेगळे केले तर अभिनयाचं कौशल्य मुबलक आढळतं.

स्त्रियांच्या भूमिकादेखील पुरुषांनींच कराव्यात, असा कथाकलींतला एक संकेत आहे. त्या रात्रीच्या कार्यक्रमांत पूतनेचं काम करण्यासाठीं कोडमाल्लूर गांवचे सुप्रसिद्ध नर्तक करुणाकरन् यांना पाचारण केलं होतं. गर्दी जमली होती ती त्यांच्यासाठींच. सुमारें तासभर टिकलेल्या या आख्यानांत फक्त पूतनेचंच काम होतं. कंसानं पाठविलेली पूतना राक्षसी मथुरा नगरींत प्रविष्ट झाली, तान्हा कृष्ण जिथं खेळत होता तिथं गेली, प्रेमाची बतावणी करून त्याला तिनं जवळ घेतलं व स्तनपान करायला लावलं, आणि कृष्णानं पितां पितां तिचा जीवनरस ओढून घेऊन तिला ठार केलं असा त्या आख्यानाचा सारांश होता. पूतनेची भूमिका करुणाकरन् यांनीं अगदीं उत्कृष्ट केली यांत शंकाच नाहीं. कथ्थक नृत्यांतले परोपरीचे तालप्रकार पहावयास सरावलेली माझी नजर करुणाकरन् यांच्या नृत्यानं एकदांहि दिपली नाहीं. परंतु विविध प्रसंगांतल्या विविध भावांचा त्यांचा अभिनय कौतुक करण्यासारखा खचित होता. विशेषतः मथुरा नगरीचं सौंदर्य पाहून थक्क झालेली कृष्णाचं रूप पाहून मोहित झालेली, अशा सुंदर बालकाचा प्राणघात करण्यास कचरणारी परंतु कंसाची आज्ञा पाळलीच पाहिजे अशा जाणिवेनं अगींकाता आणणारी, परोपरीचे लडिवाळ शब्द बोलून कृष्णाला जवळ बोलविणारी व स्तनपान करावयास लावणारी पूतना त्यांनीं अगदीं हुबेहुब उभी केली! आणि तान्हा कृष्ण स्तनपान करतां करतां जीवच घेऊं लागला, तेव्हां त्याला दूर करण्यासाठीं पूतनेनं केलेली धडपड, नंतरच्या तिच्या प्राणांतिक वेदना, अखेर तिनं प्रकट केलेलं आपलं राक्षसी रूप, आणि प्राणविसर्जनाच्या वेळचा तिचा भयंकर तडफडाट, या गोष्टी दाखवितांना तर त्यांनीं अभिनयाची अगदीं हद्द केली. शेवटच्या या वीस मिनिटांत गायक स्तब्ध झाला होता. फक्त पखवाज वाजत होता, त्याची लय अत्यंत द्रुत झाली होती. या प्रकाराला 'इलाकी आदम्' असं पारिभाषिक नांव आहे. अखेरचे आंचके देऊन पूतना निश्चेष्ट पडली तेव्हां पखवाजहि बंद झाला! सारं स्तब्ध झालं! एक मोठी पौराणिक घटना घडलेली आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली अशा गंभीर जाणिवेनं साऱ्या सभेप्रमाणं मी देखील अगदीं स्तब्ध झालों!

सुरुवातीला खूप मोठ्या आकाराचा पखवाज गळ्यांत बांधून एक उघड्या अंगाचा पखवाजी तो वाजवूं लागला. त्याच्या डाव्या हाताला झांजवाला होता. डावीकडे झंगटवाला होता. पखवाजाला म्हणायचं ' मध्धम.' झांजेला म्हणायचं ' टायमणी. ' आणि झंगटाला म्हणायचं ' चेंगला. ' त्या तिघांनीं सुमारें पंधरा मिनिटं चेव आल्यासारखं वादन केलं. प्रारंभींचा हा ' ऑर्केस्ट्रा ' झाला म्हणायचा. मग सुमारें सात फूट लांबीरुंदीचा एक पडदा दोघा माणसांनीं अंतरपाटासारखा धरला. पडद्याच्या आड असलेले गायक गाऊं लागले. याला म्हणायचं रंगपूजा. या रंगपूजेंत ' तोडायम् ' व ' पुरप्पाद ' असे दोन भाग असतात. गायिल्या जाणाऱ्या कवितेचा अर्थ असा कीं, कवि कन्याकुमारीच्या समुद्रतीरावर उभा राहिलेला आहे, आणि कथाकली लिहिण्यासाठीं स्फूर्ति मिळावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना करीत आहे. पडद्याआडची रंगपूजा संपल्यावर पडद्यापुढची रंगपूजा सुरू झाली. हिला म्हणायचं, ' संजुथरा. ' रंगपूजेचं गायन चालू असतांना 'पखवाजावर धृपद - धमार जोरजोरांत चालूच होता, आणि झांज व झंगट वाजतच होतं. या रंगपूजेनं पाऊण तास खाल्ला. मग मुख्य कार्यक्रमाला प्रारंभ झाला.

पहिलं आख्यान होतं, 'पूतना–वधा'चं कथाकलीची रीत अशी कीं, पात्रांनीं एक अक्षरदेखील तोंडावाटे काढायचं नाहीं तालबद्ध नृत्य करतांकरतां फक्त चेहऱ्यावरील भाव आणि ठरलेल्या सांकेतिक शास्त्रोक्त मुद्रा यांच्या साहाय्यानं संभाषण किंवा स्वगत भाषण वर्तवायचं. स्थलकाल, प्रसंग, पात्रांचे संवाद, त्यांचे स्वगत विचार, इतकंच नव्हे तर मनांतल्या भावना दर्शविण्या-साठीं त्यांच्याकडून होणारा अभिनय–या सर्वांचं तपशीलवार वर्णन करणारी कविता कवीनं रचलेली असते, व तिचं गायन एक गायक करीत असतो. हीं काव्यबद्ध आख्यानं मल्याळी भाषेंत लिहिलेलीं आहेत. तीं ज्यांना समजतात, त्या प्रेक्षकांना कथाकलीचा आस्वाद घेतां येतो. पण ज्यांना मल्याळी भाषा समजत नाहीं, त्यांना आस्वाद घेणं कठीण जातं. कथाकलीमध्यें पदलालित्याचं महत्व फार कमी आहे. हा जरी नृत्यप्रकार मानला जातो तरी नृत्याला विशेष प्राधान्य यांत नाहीं.सारं महत्व आहे तें गायकाच्या तोंडून निघणाऱ्या काव्याला आणि त्यांत वर्णिल्याप्रमाणें पात्रांकडून होणाऱ्या मूक अभिनयाला. कथाकलीला ' नृत्यनाट्य ' म्हणण्यापेक्षां ' मूकनाट्य ' कां म्हणूं नये, असा प्रश्न माझ्या

मनांत सारखा येत होता. शिवाय असंहि वाटत होतं कीं, कथाकलीच्या एकंदर प्रकारांत धांगडधिंगा व धसमुसळेपणा फार...मात्र हे विचार मनावेगळे केले तर अभिनयाचं कौशल्य मुबलक आढळतं.

स्त्रियांच्या भूमिकादेखील पुरुषांनींच कराव्यात, असा कथाकलींतला एक संकेत आहे. त्या रात्रीच्या कार्यक्रमांत पूतनेचं काम करण्यासाठीं कोडमाल्लूर गांवचे सुप्रसिद्ध नर्तक करुणाकरन् यांना पाचारण केलं होतं. गर्दी जमली होती ती त्यांच्यासाठींच. सुमारें तासभर टिकलेल्या या आख्यानांत फक्त पूतनेचंच काम होतं. कंसानं पाठविलेली पूतना राक्षसी मथुरा नगरींत प्रविष्ट झाली, तान्हा कृष्ण जिथं खेळत होता तिथं गेली, प्रेमाची बतावणी करून त्याला तिनं जवळ घेतलं व स्तनपान करायला लावलं, आणि कृष्णानं पितां पितां तिचा जीवनरस ओढून घेऊन तिला ठार केलं असा त्या आख्यानाचा सारांश होता. पूतनेची भूमिका करुणाकरन् यांनीं अगदीं उत्कृष्ट केली यांत शंकाच नाहीं. कथ्थक नृत्यांतले परोपरीचे तालप्रकार पहावयास सरावलेली माझी नजर करुणाकरन् यांच्या नृत्यानं एकदांहि दिपली नाहीं. परंतु विविध प्रसंगांतल्या विविध भावांचा त्यांचा अभिनय कौतुक करण्यासारखा खचित होता. विशेषतः मथुरा नगरीचं सौंदर्य पाहून थक्क झालेली कृष्णाचं रूप पाहून मोहित झालेली, अशा सुंदर बालकाचा प्राणघात करण्यास कचरणारी परंतु कंसाची आज्ञा पाळलीच पाहिजे अशा जाणिवेनं अगींक्राता आणणारी, परोपरींचे लडिवाळ शब्द बोलून कृष्णाला जवळ बोलविणारी व स्तनपान करावयास लावणारी पूतना त्यांनीं अगदीं हुबेहुब उभी केली ! आणि तान्हा कृष्ण स्तनपान करतां करतां जीवच घेऊं लागला, तेव्हां त्याला दूर करण्यासाठीं पूतनेनं केलेली धडपड, नंतरच्या तिच्या प्राणांतिक वेदना, अखेर तिनं प्रकट केलेलं आपलं राक्षसी रूप, आणि प्राणविसर्जनाच्या वेळचा तिचा भयंकर तडफडाट, या गोष्टी दाखवितांना तर त्यांनीं अभिनयाची अगदीं हद्द केली. शेवटच्या या वीस मिनिटांत गायक स्तब्ध झाला होता. फक्त पखवाज वाजत होता, त्याची लय अत्यंत द्रुत झाली होती. या प्रकाराला ' इलाकी आदम् ' असं पारिभाषिक नांव आहे. अखेरचे आंचके देऊन पूतना निश्चेष्ट पडली तेव्हां पखवाजहि बंद झाला ! सारं स्तब्ध झालं ! एक मोठी पौराणिक घटना घडलेली आपण प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिली अशा गंभीर जाणिवेनं साऱ्या सभेप्रमाणं मी देखील अगदीं स्तब्ध झालों !

यानंतरचं आख्यान होतं, ‘ उत्तरा-स्वयंवरम् ’ त्याचं वैशिष्ट्य एवढंच कीं चंगनूरचे सुप्रसिद्ध पंचाहत्तर वर्षांचे वृद्ध नर्तक रामन् पिळ्ळे यांनीं त्यांत दुर्योधनाची भूमिका केली.

आणखी अशींच इतर आख्यानं झालीं. पहांटे साडेपांच वाजतां कार्यक्रम संपला. सतत कडकडणारा पखवाज, झांज, झंगट, आणि मल्याळी भाषेंतलं भसाड्या आवाजातलं गायन ऐकूनऐकून मला झीट आली होती परंतु कित्येक वर्षांची माझी इच्छा पूर्ण झाल्याचा आनंद मला होत होता. सध्याच्या सुप्रसिद्ध कलावंतांपैकीं दोन पहिल्या दर्जाचे नृत्यकार मीं पाहिले होते. कथाकलीच्या माहेरघरीं जाऊन परंपरागत शुद्ध पुराणस्वरूपांतला कथाकलीचा कार्यक्रम बघण्याची संधि मला लाभली होती आणि कथाकलींतल्या नृत्यानं जरी मला फारसं संतुष्ट केलं नाहीं तरी त्या कलाप्रकारांतल्या कोणत्या गोष्टीची प्रशंसा केलीच पाहिजे तें मला कळलं होतं. आणि सर्वांत अधिक समाधान वाटत होतं तें या गोष्टीचं कीं, केरळाच्या अगदीं अंतरंगांत जाऊन तिथल्या सृष्टीचं दर्शन मीं घेतलं होतं. काश्मीरच्या सृष्टिसौंदर्यांत उत्तुंगपणा आणि भव्यता आहे. केरळच्या शोभेची प्रकृति निराळी. परंतु तीदेखील आपल्या परीनं अत्यंत रमणीय अथांग आणि उदात्त आहे. त्या सौंदर्याच्या आठवणी माझ्या अंतःकरणांतून कधीं पुसल्या जायच्या नाहींत.

* * *

90८02
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 29060 वि...
क्रमांक ...297... नों. दि.

# काँटिनेंटल बुक सर्व्हिस

**अप्पा बळवंत चौक, शनिवार पेठ, पुणें २.**

### प्रो. ना. सी. फडके

| | |
|---|---|
| स्मृती आणि संचार | ३–०–० |
| अल्लाहो अकबर | ६–०–० |
| प्रतिभा–विलास | १–८–० |
| साहित्य-सेवेंतील स्मृती | २–८–० |

### श्री. वि वि. बोकील

| | |
|---|---|
| पिवळा बंगला | ३–०–० |
| ऐकावें तें नवलच | ३ ०–० |
| वाळूचें घड्याळ | ३–०–० |
| आणि त्यांनीं संसार केला | ३–८–० |
| पाणकळा | १–८–० |
| ताजमहाल | २–८–० |
| लक्ष्मीपूजन | ३–०–० |
| रम्य रात्री | २–०–० |

### श्री. पु. भा. भावे

| | |
|---|---|
| बंगला | ३–०–० |
| रूप | २–८–० |
| ध्यास | ४–०–० |
| स्वप्न | ३–०–० |
| अकुलिना | ३–०–० |
| फुलवा | २–८–० |

### सौ. मालती दांडेकर

| | |
|---|---|
| तरुणींचे प्रश्न | ४–०–० |
| दूर देशच्या प्रीतिकथा | २–८–० |

### सौ. वसुंधरा पटवर्धन

| | |
|---|---|
| आमचें स्त्री-जीवन | ३–०–० |
| प्रीतीची हांक | २–०–० |

### प्रो. मा. का. देशपांडे

| | |
|---|---|
| आधार | ५–०–० |
| धूम्र-तरंग | २–०–० |

### अप्टन सिंक्लेअर

| | |
|---|---|
| जंगल | ५–०–० |

### द. का. काणे

| | |
|---|---|
| चुकलेलें पांखरूं | २–०–० |

### श्री. मु. गो देशपांडे

| | |
|---|---|
| अनिर्बंध जीवन | ३–०–० |

### श्री. अमरेंद्र

| | |
|---|---|
| जीवनसंग्राम | २–०–० |

### श्री. य. य. माळी प्र. सानेगुरुजी

| | |
|---|---|
| पुनर्जन्म (नाटिका) | ०–८–० |
| नवें क्षितिज (नाटिका) | ०–८–१ |

### श्री य. गो जोशी

| | |
|---|---|
| रेघोट्यांचें दैवत | २–०–० |

### आचार्य प्र के. अत्रे

| | |
|---|---|
| निशिगंध | १–८–० |

### श्री. व. ह. कटककर

| | |
|---|---|
| मंद ज्योति | १–८–० |

### श्री. भालचंद्र खांडेकर

| | |
|---|---|
| चंद्रप्रकाश | २–०–० |

### कै गो. ब. देवल

| | |
|---|---|
| सं. शारदा | २–०–० |

### कै. अण्णासाहेब किर्लोस्कर

| | |
|---|---|
| सं. सौभद्र | १–८–० |

### श्री. बी. एम्. चऱ्होलीकर

| | |
|---|---|
| बुद्धिरेखा | ७–०–० |

सौ. कमला फडके

दुसरा बहर ३–०–०

राजरत्न वा. वि. जोशी

१. नरम-गरम २–०–०

२. बदसूर जोडपीं २–०–०

३ जगण्याची कला व मजा ३–०–०

४. विवाहितांचें नंदनवन ३–४–०

लक्ष्मणराव सरदेसाई

सागराच्या लाटा १–८–०

श्री. माणिक परदेशी

धाडशी झुंजार १–०–०

विषारी बाण १–०–०

श्री. शशिनाथ

जीवन- तरंग १–०–०

श्री. शशिकांत पुनर्वसु

संध्याकाळच्या सावल्या २–८–०

प्रो. रा. कृ. लागू

साहित्य-सुवर्ण ३–०–०

प्रो. श्री. म. माटे

सुगंधी फुलें १–०–०

व्यंकटेश माडगुळकर

काळी आई ३–०–०

पं. महादेवशास्त्री जोशी

कथासुगंध १–८–०

चिं. वि. जोशी

पाल्हाळ २–०–०

शांता ज. शेळके, एम्. ए.

ओढ ४–०–०

प्रो. रतनलाल डी. शहा

पेटती मशाल ४–०–०

य. न केळकर

ऐतिहासिक पोवाडे २–०–०

वसईची मोहीम ३–८–०

श्री. गो. ल. आपटे

विचित्र वाटमारी १–८–०

श्री. ना. वि. कुलकर्णी

असं पाहा २–०–०

श्रीमती इंदुमती पंडित

मानवी युग ३–८–०

भावी काल १–४–०

विचार १–८–०

शालेय

प्रो. रा. कृ. लागू

साहित्य-साधना ८ वी २–८–०

साहित्य-साधना ९ वी २–८–०

साहित्य-साधना १० वी २-१४-०

प्रो. मा. का. देशपांडे

नवें भाषांतर १–०–०

आंग्ल भाषापरिचय १–८–०

प्रो. रा. श्री. जोग व प्रो. पारसनीस

भाषाविकास ८ वी १–४–०

भाषाविकास ९ वी १–४–०

भाषाविकास १० वी १-१२-०

* * *

REFBK-0010802